म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 3953



REFBK-0024921

# दलित साहित्य
## प्रवाह आणि प्रतिक्रिया

— प्रा. गो. म. कुलकर्णी

संदर्भ निबंध वाङ्मय
३९५३
२४९२१
१८।४।८६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 MAY 19..
30 JUN 1986
17 DEC 1986
12 MAR 1989
26 OCT 1996

(क्र. मा. पहा
५०००-३-

# दलित साहित्य :
# प्रवाह आणि प्रतिक्रिया

संकलन–संपादन

**प्रा. गो. म. कुलकर्णी**

REFBK-0024921

प्रतिमा प्रकाशन

प्रकाशन–क्रमांक २२

प्रकाशक :
अरुण वि. पारगावकर
प्रतिमा प्रकाशन,
१३५९, सदाशिव पेठ,
पुणे – ३०

© प्रकाशकाधीन

मुखपृष्ठ : सुरेश नावडकर

प्रथमावृत्ती : १३–१–१९८६

मूल्य : ५० रुपये

मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४, बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२

आधुनिक भारतीय प्रबोधनाचे
महनीय प्रवक्ते
न्या. महादेव गोविंद रानडे
यांच्या स्मृतीस
विनीत भावाने समर्पण–

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रास्ताविक | ५ |
| प्रा. म. भि. चिटणीस | ९ |
| बंधुमाधव मोडक | १४ |
| बाबूराव बागुल | २१ |
| दया पवार | २९ |
| प्रा. केशव मेश्राम | ४० |
| वामन निंबाळकर | ४९ |
| डॉ. गंगाधर पानतावणे | ५६ |
| माधव कोंडविलकर | ६५ |
| प्रा. अरुण कांबळे | ७२ |
| नारायण सुर्वे | ८३ |
| प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध | ९४ |
| प्रा. रा. भि. जोशी | १०४ |
| वसंत पळशीकर | ११६ |
| डॉ. भालचंद्र नेमाडे | १३४ |
| डॉ. अनिल अवचट | १४२ |
| डॉ. गो. मा. पवार | १५१ |
| डॉ. आनंद यादव | १६१ |
| प्रा. या. वा. वडस्कर | १७१ |
| समारोप : प्रा. गो. म. कुलकर्णी | १८१ |
| परिशिष्ट : प्रश्नावली | २०० |

# प्रास्ताविक

दलित साहित्याची घोडदौड आज थोडी मंदावली असली तरी मागील काही वर्षांत तिला एक विशिष्ट गती आणि आवेग प्राप्त झाला होता. दलित साहित्याच्या संदर्भात ग्रंथरूपाने, चर्चात्मक पातळीवरून, संवादस्वरूपात, व्याख्यानमिषाने उलट-सुलट स्वरूपाची चर्चा दीर्घकाळ चालू आहे. या चर्चेत राजकीय-सामाजिक सांस्कृतिक-वाङ्मयीन अशा विविध घटकांची गुंतागुंत झाली आहे. ती सारी नजीकच्या काळात उलगडेलच असे नाही. यात मतमतांतरेच नव्हेत, तर ग्रहपूर्वग्रहही अंतर्भुत झालेले आहेत. या साऱ्यांना योग्य त्या दिशेने चालना मिळावी म्हणून काही संबंधित व्यक्तींच्या मुलाखती घेण्याचे योजिले. एखाद्या प्रश्नाच्या गुंतागुंतीच्या विविध बाजू निर्णायक स्वरूपात नव्हे, अनौपचारिकपणे पण आत्मीयतेने चर्चाविषय बनविण्याच्या दृष्टीने मुलाखतीचे हे माध्यम उपयुक्त वाटले. त्याचा अवलंब आता मराठी साहित्य समीक्षाव्यवहारात रूढही होऊ लागला आहे. यासाठी आवश्यक असते, ते मुलाखत देणाऱ्याचे हार्दिक सहकार्य.

प्रस्तुत मुलाखती देणाऱ्या सर्वच परिचित-अपरिचित दलित आणि दलितेतर विचारवंतांनी – लेखकांनी मला मनापासून सहकार्य देऊन उपकृत केलेले आहे, हे सांगण्यास आनंद वाटतो. यांत प्राचार्य म. भि. चिटणीस आणि प्रा. रा. भि. जोशी यांसारख्या वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध व्यक्तींपासून प्रा. अरुण कांबळे यासारख्या तरुण, तडफदार दलित नेत्याचा समावेश आहे. मुलाखतीच्या निमित्ताने या सर्वच व्यक्तींना मी वारंवार आणि विविध प्रकारे तसदी दिली पण ती मनावर न घेता या सर्वांनी मला सर्व प्रकारचे सहकार्य दिले, हे येथे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे माझे कर्तव्य आहे. या मुलाखतींची आखणी आणि आराखडा तयार करण्यात माझे मित्र डॉ. विद्याधर पुंडलीक यांचा फार मोठा सहभाग आहे. त्यांच्या या आत्मीय सहकार्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद !

मुलाखती घेतल्याचा काळ व त्यांच्या प्रसिद्धीचा काळ यांत बरेच अंतर गेल्यामुळे या मुलाखती प्रसिद्धीपूर्वी त्या त्या व्यक्तींकडे पाठवून त्यांच्या ताज्या पुस्त्या-दुरूस्त्यानंतरच त्या आज येथे प्रसिद्ध होत आहेत.

या मुलाखती तशा परिपूर्ण नाहीत. तींत अनेक त्रुटी राहिल्या आहेत, याची मला पूर्ण जाणीव आहे. या संग्रहात आणखीही काही जाणकारांच्या मुलाखती देण्याचा विचार होता, पण हे अनेक कारणांनी साध्य झाले नाही. ज्यांच्या मुलाखती मिळाल्या त्या सर्वच व्यक्तींना किंवा त्यांच्या विचारांना योग्य तो न्याय मिळाला आहे, असेही म्हणता येत नाही. संबंधित विषयाच्या दृष्टीने काही प्रश्न विषयांतरा-

सारखेही वाटणे शक्य आहे. काही मुलाखती वाजवीहून अधिक दीर्घ झाल्या आहेत, काही मुलाखतींत प्रश्नोत्तरांच्या मर्यादांचे उल्लंघन होऊन त्यांना विषय-प्रतिपादनाचे स्वरूप आले आहे. काही मुलाखती समक्ष न घेता लेखी नोंदींच्या स्वरूपात अवतरल्या आहेत.

तात्पर्य, दलित साहित्य-विचाराला चालना देण्याच्या उद्देशाने मांडलेला हा प्रपंच पूर्णतया सिद्धीस गेलेला आहे, असे म्हणता येत नाही. यातील यशाचा जो काही भाग आहे तो मुलाखत देणाऱ्या व्यक्तींचा. अपयशाचा वाटा माझा. हे असे असले तरी या साऱ्या ग्रथनातून दलितविषयक विचारांना अल्पप्रमाणात का होईना, चालना मिळेल, असा विश्वास वाटतो.

गेली काही वर्षे मी प्रा. डॉ. विद्याधर पुंडलीक यांच्या साह्याने आणि सहकार्याने दलितसाहित्याचा समाजशास्त्रीय आणि साहित्यिक अंगाने विचार करणारा एक संशोधन-प्रकल्प अंगीकारला होता. या पुस्तकातील काही मुलाखती हे याचेच एक प्रत्यक्षाप्रत्यक्ष फलित म्हणावयास हवे. आमच्या संशोधन-प्रकल्पाला दिल्लीच्या भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेने ( I.C.S.S.R. ) काही अनुदान दिले. याबद्दल या संस्थेचा व या संस्थेशी संबंधित असलेल्या सर्व व्यक्तींचा मी फार आभारी आहे.

मुलाखतींची मांडणी करताना प्रथम दलित व नंतर दलितेतर लेखक-विचारवंत असा क्रम ठेवलेला आहे. दलित साहित्यविचार म्हटले की ग्रामीण साहित्यविचाराचा संदर्भ जागा होतो. म्हणून या संग्रहातील शेवटचे दोन भाग मुख्यतः ग्रामीण साहित्यविचारांशी संबंधित आहेत. ग्रामीण साहित्यविषयक हे विवेचन पर्यायाने दलित साहित्य-संस्कृतिविषयक विचारांनाही पूरक ठरेल असा विश्वास वाटतो. डॉ. आनंद यादव आणि प्रा. या. वा. वडस्कर यांनी याबाबत जे साह्य केले, त्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहे.

या मुलाखती पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याच्या बाबतीत प्रतिमा प्रकाशन, पुणे या संस्थेचे चालक श्री. अरुण पारगावकर यांनी जी आत्मीयता दाखविली, तीबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

पुणे
१ जानेवारी १९८६ **गो. म. कुलकर्णी**

## एक खुलासा :

प्रा. रा. भि. जोशी यांची मुलाखत घेतल्यानंतर कालांतराने प्रा. रावसाहेब कसबे यांचे मार्क्स आणि आंबेडकर यांच्या परस्पर–संबंधाविषयीचे विवेचन करणारे पुस्तक प्रकाशित झाले. या ग्रंथात प्रा. कसबे यांनी मार्क्स आणि आंबेडकरसंबंधाबाबत काही वेगळ विचार मांडले आहेत. ही वस्तुस्थिती प्रा. रा. भि. जोशी यांच्या निदर्शनास आणल्यानंतर प्रा. जोशींनी आपली यासंबंधीची जी प्रतिक्रिया पत्रद्वारे कळविली, तिचा काही भाग पुढीलप्रमाणे :

'मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांची सांगड घालण्याचा प्रयत्न रावसाहेब कसबे यांच्या ग्रंथात आहे....रावसाहेब कसबेंनी मार्क्सवाद पक्केपणे स्वीकारला आहे. त्यांचा प्रयत्न आंबेडकरवाद मार्क्सवादाशी जुळता करून घेण्याचा दिसतो. त्यांनी मार्क्सवादी लेखनाचा आणि आंबेडकरांच्या लेखनाचा बारकाईने अभ्यास केलेला दिसतो. तसा माझा अभ्यास नाही, पण त्यांचा ग्रंथ वाचून मला जे जाणवले ते असे –

त्यांनी मार्क्सवादी लेखनातील काही उणिवा मान्य केल्या आहेत. पण तसे करता करता मार्क्सवादाची बाजूच घेतली आहे. आंबेडकरांनी घटनासमितीला भारताची एक घटना सादर केली होती, ती अशी : शेती, उद्योगधंदे वगैरे उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या मालकीची असावी. म्हणजे ही समाजवादी अर्थव्यवस्था झाली. ही समाजवादी व्यवस्था घटनेने राष्ट्राला द्यायची. संसद असेल, पण तिला ही व्यवस्था बदलण्याचा अधिकार असणार नाही. संसदेचे काम फक्त ही व्यवस्था राबवली जाते की नाही ते पाहणे घटना सार्वभौम, संसद सार्वभौम नाही. ही साम्यवादी शासनव्यवस्था झाली. त्यांची ही सूचना घटना समितीने मान्य केली नाही, हे वेगळे. पण आंबेडकरांची ही राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था मार्क्सवादाला धरूनच आहे, म्हणजे आंबेडकर तत्त्वतः मार्क्सवादीच होते. मग आंबेडकरांच्या अनुयायांनी मार्क्सवाद स्वीकारून मार्क्सवाद्यांबरोबर समाजक्रांतीची चळवळ करायला काय हरकत आहे ? असा एकंदर कसबे यांच्या विचारांचा रोख आहे त्यांची ही धडपड आहे, पण त्यानंतर नऊ वर्षांनी आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि खाटमांडूच्या भाषणात मार्क्सवाद नाकारला ही वस्तुस्थिती आहे.'

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५ | ५ | सर्वत्र | सर्वच |
| १६ | १२ | निर्णायकी | निर्नायकी |
| २३ | ३० | हो मि मिन्ह | हो चि मिन्ह |
| २७ | १७ | भागा | धागा |
| ३६ | ९ | आपल्यासाठीच | आणण्यासाठीच |
| ३७ | २३ | कशाला | कशावर |
| ५० | २२ | शासनखात्यात | त्रासनखात्यात |
| ६५ | ४ | खरे | सारे |
| ६९ | ३२ | स्वानभव | स्वानुभव |
| ७४ | १४ | बाह्मणप्रदर्शन | ब्राह्मणदर्शन |
| ७८ | ५ | तारुण्यात | कारुण्यात |
| ९४ | ३ | गोष्टींची | भेटीची |
| १०४ | १ | प्रा. रा. भ. जोशी | प्रा. रा. भि. जोशी |
| १०८ | २३ | घणास्पद | घृणास्पद |
| १३६ | ३० | भाणिबडेपणा | भाबडेपणा |
| १३६ | ३३ | घणं | घेंणं |
| १५४ | २० | बटी | बेटी |
| १८२ | १३ | संबोधित | संबंधित |

( टीप : काही महत्त्वाच्या मुद्रणदोषांचेच फक्त हे शुद्धिपत्र आहे. )

# १ : प्रा. म. भि. चिटणीस

३७५३ विषय

[ प्राचार्य म. भि. चिटणीस यांचे औरंगाबाद येथे अलीकडेच निधन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दीर्घकालापासूनचे तें एक निकटवर्ती सहकारी व कार्यकर्ते. डॉ. आंबेडकरांच्या विचारांची दिशा अचूकपणे हेरण्याबद्दल त्यांची ख्याती होती. ते आंबेडकरी विचारांचे एक अधिकारी भाष्यकार मानले जातात. डॉ. आंबेडकरांनी आरंभिलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमात त्यांचा फार मोठा सहभाग होता. आंबेडकरी विचारधारेतील स्पष्टता व परखडपणा जरी प्राचार्य चिटणीसांनी आत्मसात केलेला असला तरी हा विचार मांडण्याची त्यांची पद्धती उग्र नसून सौम्य व शांत होती. त्यात एक साक्षेप आढळतो. त्यामुळे हे विचार नेहमीच अंतर्मुख करणारे ठरत. त्यांच्या प्रस्तुतच्या मुलाखतीतही याचा प्रत्यय येतो.

प्रकृती बरी नसतानाही व प्रस्तुत मुलाखतकाराचा विशेष परिचय नसताही विनंती करताच तत्काळ मुलाखत देण्यास ते सज्ज झाले. त्यांचे हे सौजन्य केवळ अविस्मरणीय आहे. त्यांची प्रकृती बरी नसल्यामुळे काही मोजकेच प्रश्न विचारण्यात आले. त्यांनीही त्यांची मोजक्या शब्दातच उत्तरे दिली. तीच येथे उद्‌धृत केली आहेत. याला मुलाखत म्हणण्यापेक्षा काही प्रश्नोत्तरे असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. ही प्रश्नोत्तरे प्राचार्य चिटणिसांच्या घरी दि.१७–२–८२ रोजी औरंगाबाद येथे त्यांच्यासमोरच नोंदविली आहेत. ]

---

प्रश्न : ‘ दलित जाणीव ’ म्हणजे नेमके काय ?

शोषितविषयक सर्व जाणीवांहून ‘ दलितांची जाणीव ’ अगदी वेगळी आहे. Tribes किंवा इतर मंडळींना, अगदी Criminal Tribes नाही. ‘हिंदूधर्मानं’ स्पृश्य म्हणूनच स्वीकारलं आहे. तशी स्थिती ‘ अस्पृश्य ’ दलितांची नाही, म्हणून ही जाणीव इतर दलितविषयक जाणिवेहून वेगळी. Criminal Tribes स्वतःहून बाजूला राहतात, दलित मुद्दाम बाजूला टाकले जातात, हा फरक सामान्यतः लक्षात घेण्यासारखा आहे. माणसाची जाणीव (उदा. मजूर, शेतकरी इ.) त्याच्या त्याच्या व्यवसायाला धरून असते. Some Times They may be going

on parallel lines. उदा. ऑफिसमध्ये सर्वांचं एकत्र वागणं. पण एकत्र वागताना जो role माणूस घेतो, तो ऑफिसबाहेरच्या जगात घेत नाही. कामगार वर्गात सर्व शोषितांच्या संदर्भात Workers of the world unite, you have nothing to loose but your chains अशी घोषणा दिली जाते, पण व्यवहारात कामगारवर्गात अस्पृश्यतेविषयीची भावना नष्ट झालेली असतेच असं नाही. विशिष्ट Psychological Mechanism मुळे हे होतं. हे पूर्वापार चालत आलेलं आहे. यामुळं 'दलित जाणीव' ही इतर सर्व शोषित-विषयक जाणिवांहून वेगळी मानावी लागते.

प्रश्न : ही जाणीव फक्त वर्णाश्रमाविरोधी की सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध विद्रोह करून उठलेली ? केवळ वर्णाश्रमविरोधी असल्यास तिनं काय साधतं ? यामुळे दलित चळवळींना एकाकीपणा –isolation– येत नाही का ?

ही चळवळ निश्चितपणेच वर्णविरोधी आहे, तिचा Axis आहे. ही चळवळ वर्णाश्रमावर आधारलेल्या 'ब्राह्मण्या' विरुद्ध, धर्माविरुद्ध, कायद्याविरुद्ध आहे. जी जाणीव स्वातंत्र्य, समता, बंधुताविरोधी असते, तीविरुद्ध दलित चळवळीचा रोख आहे. भारतात ही इंग्रजांमुळे आली. इंग्रजांनी Criminal Code मध्ये समानतेचे हे तत्त्व ग्रंथीत केलं.

यामुळे isolation येतं, पण आज घडीला ते आवश्यक आहे, या isolation खेरीज दलिताची अस्मिता जागृत राहणारच नाही. वेगळेपणामुळे दलितांचा awareness कायम राहील. अदलितांतील आवश्यक ते संस्कार घेऊनही दलितांनी हा awareness टिकविला पाहिजे.

प्रश्न : ही जाणीव ग्रामीण साहित्यातील जाणिवेहून वेगळी आहे ? असल्यास कशी ? का ? गरिबी, दुःख, विषमता या बाबी येथेही नाहीत का ? 'दलित'त्वाचा व्यापक अर्थ घेणं इष्ट नाही का ?

'ग्रामीण' जाणिवेहून निश्चितच ही जाणीव वेगळी मानावयास पाहिजे. दलितत्वाची खरी प्रतीती इतरांपेक्षा खेड्यातच अधिक येते. खेड्यातील गरीब श्रीमंत झाला तर इतरांच्या डोळ्यावर येत नाही, पण दलितसमाजातील एखादी व्यक्ती धनवान झाल्यास खेड्यातील स्पृश्य समाज रागावतो. नामांतराच्या चळवळीत खेड्यापाड्यातील दलितांची घरं जाळली गेली, हे कशाचं द्योतक ? डॉ. आंबेडकर यालाच 'Hindu Lawlessness' असं म्हणत असत. दलितांना अजून तरी मनुष्य म्हणून वागविलं जात नाही, मग ही वागविणारी व्यक्ती अशिक्षित असो किंवा सुशिक्षित.

प्रश्न : दलित साहित्याला वेगळे निकष लावावेत ?

दलित साहित्य अद्यापि फार मर्यादित आहे. निकषांची इतक्यात घाई करू नये.

प्रश्न : वेगळ्या साहित्यशास्त्राचा आग्रह धरावा का ?

वेगळ्या साहित्यशास्त्राचा आग्रह तूर्त बाजूला ठेवावा.

प्रश्न : दलित साहित्याला कोणतं विशेषण लावता येईल ? या साहित्याला अपूर्व म्हणावं की वेगळं म्हणावं ?

केवळ दलित म्हणून अपूर्व म्हणावयाचं काही कारण नाही. कोणत्याही साहित्यात tradition चा भाग येतोच; किंवा या tradition बद्दलची प्रतिक्रिया यते. संगीतकलेत या परंपरेचं दर्शन घडतं तर नवचित्रकला हा प्रतिक्रियेचा भाग आहे. (उदा. पिकॅसोची चित्रं) साहित्य हे भाषेवर अधिष्ठित असतं, आणि भाषा हा tradition चाच भाग असतो ना ? म्हणून दलित साहित्याला अ–पूर्वं न मानता दलित साहित्य वेगळं आहे, असं मानणं अधिक योग्य.

प्रश्न : दलित साहित्याच्या बाबतीत 'सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच' घेतला जावा असं म्हटलं जातं, ते का ? असा 'अॅप्रोच' न घेताही दलित साहित्याचा आस्वाद घेता येणार नाही का ?

मराठी साहित्यविचारात आजवर सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच घेतला गेला नव्हता; तो घ्यावयास पाहिजे. आजपर्यंत खालचा माणूस साहित्यात येई, तो विनोदासाठी. खालचा माणूस मोठा आहे असं दाखवावयाचं झाल्यास त्याला सरदार वगैरे केलं जाई. मराठीत आजवर सामान्य माणसाला महत्त्वच दिलं गेलं नाही. कारण आपल्याकडे Social Mobility कमी आहे. साहित्यास्वाद अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच न घेताही घेता येईल; पण पूर्णपणे आस्वाद घेण्यास हा अॅप्रोच उपयोगी पडेल.

प्रश्न : दलित साहित्यावर खालील आक्षेप घेतले जातात त्याबद्दल आपलं मत काय ?

(अ) ते प्रचारी आहे (ब) एकसुरी वाटतं (क) यात व्यक्ती येत नाही (ड) आक्रस्ताळेपणा आढळतो (इ) हे साहित्य नकारात्मक आहे.

(अ) व (ब) प्रचारी व एकसुरी आहे, हे खरं आहे. ते तसं राहणं स्वाभाविक आहे. (क) व्यक्ती येत नाही याचं कारण They were treated as a collective whole, not as individuals यामुळे समष्टी येणं आजतरी स्वाभाविक आहे; कारण, हा समाज दलितत्वापासून दुरावलेला नाही. त्याला समाजात सतत कुठंना कुठं दलितत्वाचा अनुभव येतच राहतो. यामुळंच कम्युनिस्ट विचारसरणी पत्करलेल्या बाबूराव बागुलांनाही लिहिताना दलितत्वावरच

भर द्यावा लागतो. दलित लेखक कोणत्याही मतप्रणालीचा असला तरी शेवटी त्याला दलितत्वाच्या संदर्भातच विचार करावा लागतो–पुढचा आक्षेप ? –आक्रस्ताळेपणा आढळतो, (ड) हे साहित्य नकारात्मक आहे. (इ) आक्रस्ताळेपणा आढळतो, हे खरं आहे, नकारात्मक आहे हेही खरं आहे. हा नकार कशासाठी आहे हे स्पष्ट सांगितलं जात नाही. दलितसाहित्याला काय हवं ? तर समता, बंधुता यांची वाढ. हा या साहित्याचा positive भाग होईल. पण अद्यापि हे साहित्य तसं होकाराकडे वळलेलं नाही.

प्रश्न : दलित साहित्यात विचाराचा, चिंतनाचा भाग कमी आहे, असं आपल्याला वाटत नाही का ?

होय. दलित साहित्यात विचारापेक्षा भावनांवरच अधिक भर आहे, हे खरं आहे. पण हा आरोप होऊ शकत नाही. कारण दलित आपल्यावर झालेले अन्याय विसरू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यांना आपण शहाणपणाचा उपदेश करू नये. एकदा purgation होऊ द्या, ते झालं की या वस्तुस्थितीत बदल होईल.

प्रश्न : दलित जाणीव कायम, निरंतर राहणारी ? तसं असल्यास जातिसंस्था बदलत गेल्यावर काय ?

जोपर्यंत हिंदुधर्माची वृत्ती बदलत नाही तोवर ही जाणीव बदलणार नाही. हिंदुधर्म नष्ट झाल्याशिवाय ही जाणीव बदलणार नाही. तसं झाल्यानंतर ही दलित जाणीवही नष्ट होईल,–समग्र मानवजात एका पातळीवर येईल. पण हे लौकर होईल, असं वाटत नाही.

प्रश्न : ‘ शहरी ’ दलित साहित्य आणि ‘ ग्रामीण ’ दलित साहित्य असे प्रकारभेद मानावेत का ?

शहरी वस्तीतही दलित समाज झोपडपट्टीतच राहतो. ही झोपडपट्टी दलितांच्या खेड्यातील वसाहतीपेक्षा फारशी वेगळी नसते; त्यामुळे शहरी दलित साहित्य व ग्रामीण दलित साहित्य, असा फरक करण्याचं मला कारण दिसत नाही.

प्रश्न : दलित अस्मिता सतत आणि वेगळेपणानं जागविणं,यात vested interest नाही का ?

ज्याला तुम्ही vested म्हणता ते vested interest नसून तो दलितांच्या अस्मितेचा भाग आहे. हे सर्व परिस्थिती जाणून घेण्यावर अवलंबून आहे. अस्मितेमुळे संघर्ष निर्माण होतो, हे खरं आहे. पण तो आज तरी आवश्यक वाटतो. कारण संघर्षाशिवाय–लढाईशिवाय या चळवळीला गती येणार नाही.

प्रश्न : आता एकच प्रश्न. दलित साहित्यामुळं मराठी साहित्याच्या संदर्भात काय घडलं ? दलित साहित्याची मराठी साहित्याच्या संस्कृतीला contribution काय ?

परंपरागत मराठी साहित्य नाकारणं, हीच दलित साहित्याची मराठी साहित्याच्या संस्कृतीला contribution व दलित साहित्याने जातिसंख्या नाकारून हिंदुधर्मातील अनैतिक धारणेवर आघात केला. भारतीय समाजाला नीतिमान बनविणं हे दलित साहित्याचं प्रयोजन आहे. दलित चळवळ ही पतितोद्धाराची चळवळ नसून राष्ट्रोद्धाराची चळवळ आहे. याला दलितोद्धाराची चळवळ न म्हणता हिंदुधर्म उद्धाराची चळवळ म्हणावयास पाहिजे. हिंदुधर्मातील ब्राह्मणीवृत्ती नष्ट करून त्या ठिकाणी या साहित्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता स्थापन करावयाची आहे. हिंदुधर्मात हे नाही. उदा. गीता घ्या. गीतेनं अर्जुनाला विचारस्वातंत्र्य नाकारलं आहे. अर्जुनाची मूळ धारणा चांगली आहे, पण त्याला 'युद्धाय युज्यस्व' असा आदेश देऊन त्याचा मूळ विचार कलुषित केला आहे. अर्जुनाला कृष्णानं जो स्वधर्म सांगितला आहे त्या स्वधर्माचा अर्थ येथे वर्णप्राप्त कर्म असा आहे. गीतेचा मोर्चा बौद्धधर्मविरोधी आहे. बौद्धधर्म 'तूच तुझा धर्मदीप हो' असं सांगतो तर गीता व्यक्तीचं हे स्वातंत्र्य काढून घेते. स्वातंत्र्य, समता न मानणं हा धर्म नव्हे. हिंदुधर्मात स्वातंत्र्यापेक्षा शास्त्रप्रामाण्यावर भर आहे. हिंदुधर्मातील सद्गुणाची सारी कल्पनाच यावर आधारलेली आहे. उदा. दान करताना 'दान' कोणाला करावयाचं? तर शास्त्रानं अधिकारी ठरविलेल्या पुरुषाला म्हणजे गरजूला नव्हे तर पर्यायानं ब्राह्मणाला! हिंदुधर्मात असे खूप छेदभेद आहेत. दलित साहित्याचा रोख या प्रकारच्या सर्वच विषमतेविरुद्ध आहे आणि त्यातच राष्ट्राच्या उद्याच्या समतेची, स्वातंत्र्याची बीजं आहेत, म्हणून दलित साहित्याकडे राष्ट्रविमोचनाची चळवळ या दृष्टीनं पाहिलं पाहिजे.

•

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९५३
२२२२९
ग्रंथ शाखा (रुपये प्रत)

# २ : बंधुमाधव मोडक

[ मूळचे सांगली जिल्हयात राहणारे पण आज मुंबई येथे (मालाड पश्चिम) स्थायिक झालेले. काहीकाळ त्यांनी पोलिस खात्यातही नोकरी केली. बंधुमाधव ही तशी दलित साहित्यातील अतिशय महत्त्वाची व्यक्ती. दलित जीवनानुभवांवर त्यांनी १९४८ पासूनच कथालेखन करण्यास प्रारंभ केला. या दृष्टीने पाहता त्यांना दलित साहित्याचे आद्य प्रणेतेच म्हणावयास पाहिजे. पण त्यांचा ' आम्हीही माणसं आहोत! ' हा कथासंग्रह प्रसिद्ध होण्यास १९८१ साल उजाडावे लागले ! हा कथासंग्रह प्रसिद्ध झाल्या झाल्या तो विलक्षण लोकप्रिय ठरला. लागोपाठ त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या. पण एवढे असूनही दलित साहित्याच्या या गदारोळात त्यांच्यासारखा लेखक दीर्घकाळ उपेक्षित राहावा ह्याची खंत वाटल्याखेरीज राहात नाही. ' अस्मितादर्श ' मेळाव्याचे अध्यक्षपद त्यांना अलीकडेच लाभले ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. विद्रोही दलित साहित्य निर्मितीच्या पूर्वीचे आंबेडकरी विचारातून प्रवृत्त झालेले कथा–साहित्य कोणत्या प्रकारचे होते ? त्याचा कस काय आहे ? हे पाहावयाचे झाले असल्यास अभ्यासकाला बंधुमाधवांच्या कथेकडेच वळावे लागेल. बंधुमाधवांवर सानेगुरुजी आणि खांडेकर ह्यांची छाप आहे. कारण हे लेखक बंधुमाधवांच्या उमेदवारीच्या काळात लोकप्रिय होते. तंत्रदृष्टया त्यांची कथा मागील काळात जमा होणारी पण त्यातील अनुभवांचे अस्सलपण लक्षात घेण्याजोगे. विद्रोहरहित दलित साहित्यही किती प्रभावी होऊ शकते याचा हा एक चांगला नमुना.

बंधुमाधव दीर्घकाळ उपेक्षित राहण्याचे कारण त्यांची काहीशी प्रसिद्धी पराङ्मुखवृत्ती. त्यांच्या विनम्रवृत्तीचा प्रत्यय त्यांच्या मुलाखतीतही आढळतो. कोणताही विशिष्ट पवित्रा न घेता ते साहित्याकडे पहातात. त्यांची ही सोज्वळवृत्ती त्यांच्या लेखनाप्रमाणे त्यांच्या बोलण्याचालण्यातही आढळून येते. मुलाखतीच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी कोणतेही आढेवेढे न घेता किंवा आडपडदा न ठेवता मनमोकळेपणाने उत्तरे दिली.

ही मुलाखत त्यांच्या घरीच झाली.

मुलाखत दिल्याबद्दल बंधुमाधवांचा निरोप घेऊन मी बाहेर पडलो. त्यांच्या सौजन्यपूर्ण वागण्याचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला. हे सौजन्य व्यक्तिगत पातळीवर मला सगळ्याच दलित लेखकांकडून लाभले आहे. हे मुद्दाम नमूद करावेसे

वाटते. यातील काही माणसे लेखनातून किंवा व्यासपीठावरून जेवढी कडवी वाटतात तेवढी खाजगी वागण्यात नसतात. उलट त्यांच्या ठिकाणी एक सौहार्द, जिव्हाळा आढळतो व्यक्तिशः मी तो भरपूर प्रमाणात अनुभवलेला आहे. बंधुमाधव मोडक सर्वच प्रकारच्या प्रकाशस्रोतांपासून अलग आहेत. त्यांचे विचार समतोल आहेत. जुन्या–नव्याचा एक संगम त्यात मला आढळला. त्यांचे सर्वत्र निवडक साहित्य प्रकाशित व्हावे असे मनापासून वाटते. दलित साहित्यातील एक ऐतिहासिक महत्त्वाचा दुवा या दृष्टीने त्यांच्या साहित्याला महत्त्व आहे.

त्यांच्या मुलाखतीला येथे अग्रक्रम द्यावासा वाटला तो यासाठीच.]

---

प्रश्न : ‘ दलित जाणीव ’ म्हणजे काय ?

चातुर्वर्ण्याखाली दडपलेल्या व्यक्तींना किंवा समूहाला मध्यवर्ती कल्पून जे लिहिलं किंवा बोललं जातं, ते सारं माझ्या मते दलित जाणिवेत जमा होतं.

प्रश्न : या जाणिवेत सर्व शोषितांचा समावेश होत नाही काय ?

तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आता ही जाणीव अधिक व्यापक झाली. तीत सर्व शोषित समाजही दाखल झालेला दिसतो. पण मी आताच म्हटल्याप्रमाणं चातुर्वर्ण्यानं पीडलेल्या समाजाशीच ती मुख्यतः संबंधित होती, आहे आणि काही काळ तरी ती तशीच राहील.

प्रश्न : या जाणिवेला व्यापक अधिष्ठान देणं इष्ट नव्हे काय ?

चातुर्वर्ण्याधिष्ठित अन्यायाविरुद्ध हाक देणारी अशीच ही जाणीव यापुढेही राहावी, असं मला वाटतं. कारण इतरांत ती मिसळून गेल्यास आपलं वैशिष्टच ती गमावून बसेल. तिला कणाच राहणार नाही. तिचा स्वतःचा आवाज म्हणून उरणार नाही.

प्रश्न : पण यामुळे तिला संकुचितपणा येणार नाही का ?

आपलं वैशिष्टच कायम ठेऊन तिला इतरांशी सहकार्य करता येईल. पण दलित जाणिवेचं हे वेगळेपण काही काळ तरी ठेवलं पाहिजे अन्यथा गोंधळ माजेल, असं मला वाटतं.

प्रश्न : ग्रामीण साहित्यातील जाणीव आणि दलित साहित्यातील जाणीव यात तुमच्या मते साम्य–विरोध कुठं आहे ?

माझ्या मते, या दोन्ही जाणिवा वेगळ्या आहेत. आजचं ग्रामीण साहित्य ग्रामीण जीवनाकडं तेवढ्या गांभीर्यानं पहात नाही. एक ‘ गंमत ’ म्हणून पाहातं. ते व्यक्तिकेंद्रित आहे. त्यात प्रबोधन नाही. शिवाय ‘ ग्रामीण वाङमय ’ ही संज्ञा व्यापक आहे. ‘ दलित ’ त्यातला एक भाग असला तरी तो वेगळा आहे. असा वेगळेपणा

ग्रामीण समाजाच्या मनात नसता तर आज खेड्यापाड्यांतून अस्पृश्यांविरुद्ध दंगली माजविल्या जात आहेत, त्या माजवल्या गेल्या नसत्या. खेड्यातला माणूस अजूनही दलितांना आपल्यात सामावून घेण्यास तयार नाही हाच याचा अर्थ नाही का ? 'ग्रामीण वाङ्मय' खरडणाऱ्या लेखकांना याची जाण नाही.

प्रश्न : तुम्ही म्हणता त्या संदर्भात खेड्यातील स्पृश्य आणि अस्पृश्य विभागलेले आहेत, हे मान्य, पण अस्पृश्या-अस्पृश्यांतही सवतेसुभे का दिसावेत ? ज्यांना आपण परंपरेनं महार, मांग, चांभार म्हणतो त्यांत तरी आपापसात कुठं ऐक्य आहे ? तुमच्या मते याची कारणं कोणती ?

दलित चळवळीच्या आरंभीच्या काही काळात हे सर्व वर्ग एक होते. उदा. श्री. राजभोज हे चांभार समाजातील असूनही या चळवळीत होते. पण पुढे राजकारणातील नागमोडी वळणांनी यात छेदभेद निर्माण झाले. आंबेडकरांच्या निधनानं निर्णायकी निर्माण झाली. त्यागापेक्षा भोगाची चटक लागली. त्यातल्या त्यात दलितांच्या उद्धारासाठी महार जमातीनं जेवढा त्याग केला, किंवा महार जमात आजही जेवढा त्याग करीत आहे, तेवढा चांभार किंवा मांग वगैरेसारखा समाज करीत नसल्याचं तुम्हाला दिसेल. चांभारासारख्या इतर अस्पृश्य जमाती चळवळीपेक्षा बदलत्या औद्योगिक परिस्थितीचा व्यावसायिक लाभ उठविण्यात अधिक गर्क आहेत. महारांना असे पारंपरिक व्यवसाय नाहीत. त्यांनी आपल्या बलुतेदारीचा केव्हाच त्याग केलेला आहे. महार जमात पूर्वीपासूनच शूर म्हणून गाजली आहे. आजही दलित चळवळीसाठी तीच पुढे आहे. त्यामुळंही इतर अस्पृश्य जमातींना त्याचा दुस्वास वाटत असावा. शिवाय मनुष्य-स्वभाव म्हणून काही आहेच. त्यामुळंही हेवेदावे निर्माण होतात. याचा परिणाम म्हणजे अस्पृश्य जमाती एक होत नाहीत. अस्पृश्यसदृश भटक्या जमातींकडे तर अद्यापि कोणाचं लक्षही गेलेलं नाही.

प्रश्न : दलित अनुभव दलितेतर लेखकाला व्यक्त करता येईल किंवा नाही ?

दलित अनुभव दलितेतर लेखक व्यक्त करू शकेलही. नाही असं म्हणता येणार नाही. माटे-माडगूळकरांनी काही प्रमाणात ही दलित जाणीव व्यक्त केली आहेही. दलित जीवनाचं चित्र म्हणून या दोघांचं लेखन चांगलं आहे. पण दलित जीवनाचे प्रत्यक्ष चटके या मंडळींना बसलेले नसल्यामुळे दलितांच्या जीवनातला आतला कढ दलितेतर लेखकांना व्यक्त करता येणार नाही. माटे हे माझं प्रेरणास्थानच आहेत. पण त्यांनाही दलित जीवनाचा आतला गाभा व्यक्त करता आला आहे असं मला वाटत नाही. माटे आणि माडगूळकर या दोघांत या बाबतीत तुलनाच करावयाची झाल्यास मी माटेंना अधिक मोठा मानेन. कारण माटेंनी दलित-जीवनाशी प्रत्यक्ष कृतीनं अधिक जवळीक साधली होती. त्यांना 'महार-माटे' म्हणूनच लोक ओळखीत. त्या मानानं व्यंकटेश माडगूळकर दलित जीवनाकडे दुरून, तटस्थपणे

पाहतात असं वाटतं. माडगूळकरांनी दलित जीवनातील दारिद्रय चांगल्या प्रकारे व्यक्त केलं आहे. पण या जीवनातील विविध दुःखं व्यक्त करण्यास ते तेवढे यशस्वी झाले नाहीत, असं मला वाटतं.

प्रश्न : माडगूळकरांची विशिष्ट शैली लक्षात घेता, ते सूचकपणे किंवा संयतपणे दलित जीवनातील दुःखांनाही भिडतात, असं तुम्हाला वाटत नाही ?

तुम्ही म्हणता ते काही अंशी मान्य केलं तरी प्रत्यक्ष अनुभव आणि जिवंत सहानुभूती यांत काही एक अंतर राहणारच. दलितांचं दुःख बाहेरून पाहणं आणि आतून भोगणं यात प्रमाणाचा फरक राहणारच.

प्रश्न : दलित साहित्यासाठी वेगळं साहित्य शास्त्र असावं असं तुम्हास वाटतं ?

साहित्यशास्त्र एकच आहे. पण दलित साहित्यातील जे उत्स्फूर्तपणं निर्माण होतं, ते कोणत्याही 'तंत्रा'त बसेल असं नाही. जे उत्स्फूर्त असतं, ते तंत्राचा विचार करून जन्म घेत नाही, पण ही एक बाजू झाली. मी समीक्षाशास्त्राचा अभ्यासक नाही. पण याला दुसरीही एक बाजू आहे. कोणतीही कला घेतली तरी 'कले'चे म्हणून काही नियम असतात, आणि ते सार्वत्रिक असतात. उदा. संगीत घेऊ. संगीतात अनेक प्रकार आहेत. पण 'संगीतशास्त्र' म्हणून त्यात काही समानताही असली पाहिजे, हे गृहीत आहे.

प्रश्न : कलेचा तुम्ही म्हणता हा व्यापक अर्थ लक्षात घेतल्यास कलादृष्टया दलित साहित्याबद्दल तुमचं काय मत आहे ?

दलित साहित्यात कलादृष्टया कच्चा असा बराच भाग आहे, हे मान्यच केलं पाहिजे. पण दलित लेखक जसजसा व्यासंगी होत जाईल तसतसा त्याच्या साहित्यातील हा कच्चा भाग कमी होत जाईल. कलेत अनेक प्रकार, भेद असतात. त्या दृष्टीनं त्याचा वेगवेगळा विचार केला पाहिजे. पण व्यापक अर्थानं कलेची वेगवेगळी शास्त्रं नसतात. मात्र दलित साहित्य हे आजवरच्या मराठी साहित्याहून वेगळं आहे, याचं भान साहित्यशास्त्रानं बाळगावं, त्या दृष्टीनं या साहित्याचा विचार करावा अशी अपेक्षा आहे.

प्रश्न : आता दलित साहित्यावरील आक्षेपांकडे वळू. पहिला आक्षेप ते प्रचारी आहे हा.

प्रचारी आहे, हे खरं आहे. आणि त्याला त्याचाही नाइलाज आहे. कारण प्रचारासाठी, बोधपूर्वक्तेसाठीच ते जन्माला आलेलं आहे. तो त्याचा हेतूच आहे. निदान मी तरी माझ्यापुरतं बोलावयाचं झाल्यास प्रचार वर्ज्य मानीत नाही. माझ्यापुढं साहित्याचा जो पॅटर्न आहे, तो सानेगुरुजींचा आहे.

प्रश्न : आक्षेप नंबर दोन–ते एकांडं आहे.

हेही स्वाभाविक आहे. कारण दलितांचा 'दलित' म्हणून असलेला अनुभव

एकच आहे. हा अनुभव हाच या साहित्याचा गाभा आहे.

प्रश्न : यामुळं कलादृष्टचा त्यात गौणत्व येत नाही का ?

काही काळ तसं होणं अपरिहार्य आहे. पण यातूनच चांगल्या साहित्याच्या शक्यता जन्माला येतात. आज तसं साहित्य थोडचा फार प्रमाणात निर्माण होत आहेही.

प्रश्न : समूहभाव अधिक प्रमाणात येतो, व्यक्ती येत नाही, असाही एक आक्षेप आहे.

वर दिलेल्या कारणानंच त्यात समूहभाव निर्माण होणेही स्वाभाविक आहे.

प्रश्न : हे साहित्य आक्रस्ताळं आहे.

दलित साहित्यातील विद्रोह भावनेमुळे ते आक्रस्ताळी वाटतं. कालांतरानं हा आक्रस्ताळेपणा कमी होईल. विद्रोह, सततचा विद्रोह उपयोगी नाही.

प्रश्न : हे साहित्य नकारात्मक आहे.

आक्रस्ताळेपणाबद्दल मी जे म्हटलं तेंच नकाराबद्दलही म्हणतो. आक्रस्ताळेपणा किंवा नकार सततचा राहणं इष्ट नाही. अर्थात दलितेतर जेवढचा प्रमाणात आपुलकीनं आमच्या जवळ येतील, तेवढचा प्रमाणात नकार बोथट होत जाईल.

प्रश्न : ही दलित जाणीव कायम स्वरूपाची मानावयाची की कालांतरानं दूर होणारी ?

' दलित जाणीव ' कायम निरंतर राहील असं नाही. त्याचा केवळ एक ' इतिहास 'ही बनेल. परिस्थितीतील बदलाप्रमाणे या जाणिवेतही बदल होत जाईल. दलित साहित्य म्हणून वेगळं राहणार नाही. त्याचे ' निग्रो साहित्य ', ' ख्रिस्ती साहित्य ' याप्रमाणे दलित साहित्याचेही निरनिराळे वर्ग कदाचित होतील. दलित जाणीव समाजमनात इतकी खोल रुजून बसली आहे की ती पूर्णपणे लौकर दूर होण्याची आशा नाही. आपण आपले कपडे बदलले, पण हृदय बदललं नाही. आपण अद्यापि परंपरावादीच आहोत. परिवर्तनाची प्रक्रिया जेवढी तीव्र असावयास पाहिजे, तेवढी नाही. खेडी आहेत तिथंच आहेत. खेडचांचं पुढारीपण ज्या मराठा समाजाकडे आलं आहे, तो समाजही या बाबतीत पुरेसा जागृत नाही. इतरांना जागृत करण्याची गोष्ट तर दूरच राहिली. आजच्या दलित साहित्यात कवितेचा भाग मला पांढरपेशाच वाटतो. त्यांच्या भाषेचं वळण त्या प्रकारचं आहे, जरी जातिसंस्था बदलत गेली तरी दलित जाणीव व्यापक अर्थानं कमी होणं कठीण आहे. समाजात जोपर्यंत विषमता आहे तोपर्यंत ही जाणीव या ना त्या स्वरूपात असणारच.

प्रश्न : दलित साहित्याचं ' ग्रामीण ' व ' शहरी ' असं वर्गीकरण करणं वास्तवाला कितपत धरून होईल ?

शहरी दलित आणि ग्रामीण दलित हा फरक राहणारच. कारण खेडचातील

वातावरण आणि शहरातील वातावरण यातच फार फरक आहे. त्यामुळं या साहित्यातील काही संदर्भही वेगळे राहतात. वातावरणात जोपर्यंत फरक राहील, तोपर्यंत शहरी दलित आणि ग्रामीण दलित असा साहित्यातही फरक राहील.

प्रश्न : तुमचा आवडता वाङ्मयप्रकार कोणता ?

कविता आरंभी लिहिली. पण कथेतच मन अधिक रमतं. दलितेतर जाणिवांनी युक्त असलेलं कादंबरी लेखनही टोपण नावानं केलेलं आहे. स्फुट स्वरूपाचंही काही लेखन आहे. 'आत्मचरित्र' लेखनाचा संकल्प सोडलेला आहे. त्या दृष्टीनं मला गो. नी. दांडेकरांचं आत्मचरित्रलेखन 'स्मरणगाथा' आदर्श वाटतं. मी पोलीस खात्यात असल्यानं डिटेक्टिव्ह स्वरूपाचंही काही लेखन केलं आहे. पण त्यात मला तसा रस नाही. साप्ताहिकात लिहिण्याची सवय झाल्यामुळं स्फुट स्वरूपाचे छोटे छोटे लेख लिहावे असंही वाटतं.

प्रश्न : तुमच्या लेखनात तुम्ही अधिक महत्त्व कशाला देता ? स्वानुभवाला, कल्पनेला का इंटरप्रिटेशनला ?

स्वानुभवाला प्राधान्य द्यावं असं वाटतं. माझ्या कथा-साहित्यातील पुष्कळ अनुभव हे माझे स्वतःचे आहेत. माझ्या साहित्यात कल्पना कमी आहे, किंवा नाहीच. प्रचार हा मी महत्त्वाचा उद्देश मानतो. या दृष्टीनं इंटरप्रिटेशन.

प्रश्न : इतर समाजाचे चित्रण तुम्ही कितपत केलं आहे ?

मातंग समाजाचं चित्रण केलं आहे.

प्रश्न : लेखक म्हणून दलितेतर विषयही हाताळावेत असे तुम्हाला नाही वाटलं?

इतर विषय फारसे हाताळलेले नाहीत. हाताळावे असं मात्र वाटतं. पण त्या विषयाचा अनुभव नसल्यामुळे स्वानुभवावरच अधिक लिहावं असं वाटतं. जनसामान्यांबद्दल मला कळवळा वाटतो. या दृष्टीनं वामन कर्डकसारख्यांचं साहित्य मला महत्त्वाचं वाटतं. लोकसाहित्याचाही यादृष्टीनं विचार व्हावयास पाहिजे असं मला वाटतं.

प्रश्न : आजच्या संदर्भात लोकसाहित्याचा विचार कशाप्रकारे करता येईल, असं तुम्हाला वाटतं ?

'लोकसाहित्य विपुल, विविध व मौलिक आहे. लोकसाहित्यात प्रबोधन आहे. एका एका विषयाला वाहून घ्यावंसं वाटतं. बहुजन समाज अजून अज्ञ आहे. त्याला सुज्ञ करण्याची किमया त्यानं जमेल, असं मला वाटतं.

प्रश्न : तुमच्या साहित्यविषयक आवडी-निवडी ?

दलितेतर साहित्य थोडंफार वाचतो. खांडेकर, सानेगुरुजी, माटे हे माझे आदर्श होते असं तुम्हाला मी सांगितलंच. गो. नी. दांडेकरही आवडतात. कारण हे साहित्य

सात्विक आहे. सात्विकता एकंदरीनं मला प्रिय आहे. सात्विकताशून्य साहित्य मला तेवढं पचत नाही.

प्रश्न : तुम्ही मुंबईत राहता. या शहरातील नागरी एकाकीपणासारख्या विषयावर लिहावं असं तुम्हाला नाही वाटत ?

नागरी एकाकीपणा वगैरे विषय होऊ शकतील, पण मी त्यावर लिहिलं नाही हे खरं. दलितेतर अनुभवक्षेत्रही महत्त्वाचं आहे. पण माझ्यापुरतं तरी दलित अनुभवांना प्राधान्य द्यावं असं मला वाटतं.

प्रश्न : लेखक म्हणून तुमच्या काही अडचणी, तक्रारी ?

तक्रारी ? अहो, दलित साहित्य विपुल प्रमाणात निर्माण होत आहे. पण यावं तितकं ते प्रकाशात येत नाही. प्रकाशित झालेल्या साहित्याचंही योग्य प्रकारे मूल्यमापन होत नाही. आज पुढे आलेले दलित लेखक आपल्या दलित लेखक बंधूंना फारसं साहाय्य करीत नाहीत. आपल्यापुरताच विचार करतात. फक्त शाब्दिक सहानुभूती व्यक्त करतात. माझ्यासारख्याला अनुल्लेखानं मारण्याचा प्रयत्न करतात.

प्रश्न : दलित साहित्याचा मराठी साहित्यावर कोणता परिणाम झाला असं वाटतं ?

नवीन अनुभव, नव्या जाणिवा, नवीन शब्दाप्रमाणं, वाक्प्रचार दलित साहित्यानं मराठी साहित्याला दिले. चातुर्वर्ण्याखाली दडपलेला मोठा जनसमूह भारतात अस्तित्वात असल्याची जाणीव या दलित साहित्यानं इतर मराठी साहित्यिकांना करून दिली आहे, हे विशेष.

# ३ : श्री. बाबुराव बागुल

[ श्री. बाबुराव बागुल हे आघाडीचे दलित लेखक आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यांची या क्षेत्रातही कमाई एवढी मोठी आहे की दलित कथा-लेखक म्हटले की अग्रक्रमाने जे नाव डोळयांसमोर येते, ते श्री. बाबूराव बागुल यांचेच. बागुल हे केवळ ललित लेखक नाहीत. दलित साहित्याचे आणि त्यामागील सांस्कृतिक घडामोडींचे व्यापक भान असलेले ते एक विचारवंत- तत्त्वचिंतकही आहेत. मार्क्सवादाची त्यामागे बैठक आहे. त्यांच्या या विचाराचा एक विशेष असा की ते विद्वज्जड किंवा तर्ककर्कश कधीच नसतात, त्यात एक सहज स्वरूपाची सर्जनशीलता अधूनमधून डोकावते; यामुळे त्यांचे हे विचार चमकदारपणाचा सोस नसताही दलित साहित्याविषयी मधूनच काहीतरी वेगळे, नवे सांगून जातात. उदा. प्रस्तुत मुलाखतीतील त्यांचे कर्णविषयक विवेचन. श्री. बाबूराव यांचे औपचारिक शिक्षण फारसे झालेले नसले तरी त्यांचे वाचन विस्तृत आणि सखोल आहे. सवड मिळेल तेव्हा ते मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात जाऊन बसतात. मुंबईत त्यांचा शोध घेण्याचे ते एक मोक्याचे ठिकाण. ते केव्हाही भेटले तरी संभाषणात लगेच रंगून जातात. त्यातून त्यांचे नवे नवे विचार कानी येतात. पण शिस्तशीर बैठक मारून काही प्रतिपादन करण्याचा मात्र त्यांना तसा कंटाळाच. यामुळे त्यांची मुलाखत घेणे एका बाजूने सोपे तर दुसऱ्या बाजूने अवघड होऊन बसले होते. गृहस्थ हुलकावण्या तर देत नाहीना अशी शंकाही एकदोन वेळा चाटून गेली. पण सुदैवाने या मुलाखतीचा हा योग एका भरदुपारी महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या अतिथिगृहातील त्यांच्या वास्तव्य स्थळी अचानकपणे जुळून आला. मुलाखतीला मुहूर्त चांगला मिळाला असावा. कारण त्या दिवशी त्यांना भेटण्यासाठी, पाचारण करण्यासाठी मुलाखत संपेपर्यंत तरी तेथे कोणी आले नाही. त्यामुळे एका विश्रब्ध वातावरणात मुलाखतीची ही बैठक जमून गेली. बाबूरावांचा त्या दिवशी चांगलाच मूड लागलेला होता. त्याचा प्रत्यय या मुलाखतीतून येतो.]

---

प्रश्न : तुम्ही ' दलित जाणीव' कशाला म्हणता ?

मला असं वाटतं की लेखक हा त्याच्या त्याच्या जातीत जगत असतो. आणि त्याचं

बालपण जातीच्या शाळेमध्ये शिक्षित आणि संस्कारित होत असतं. म्हणून त्याची जाणीव ही 'जातीची जाणीव' असते. तेव्हा कोणत्याही लेखकाची जाणीव ही मुळात त्याच्या जातीची जाणीव असते. त्यामुळे त्यानं आपल्या जातीबाहेरचं किंवा गावाबाहेरचं वेगळं जीवन पाहिलेलं नसतं. हरिभाऊंनी शेतकऱ्यांवर एक दोन गोष्टी लिहिल्या. पण त्या गोष्टी म्हणजे खऱ्याखुऱ्या ग्रामीण कथा नाहीत. माडखोलकर आणि खांडेकर यांनी दलित नायक उभा केला, पण तो खराखुरा दलित नायक नाही. डॉ. आंबेडकरांच्या उदयानंतर कर्ण हे पात्र मराठी ललित साहित्यामध्ये अनेक लेखकांना आकर्षित करणारं पात्र ठरलं. कर्ण त्यांना आंबेडकरांमध्ये दिसू लागला. पण कर्ण व आंबेडकर ही दोन परस्परविरोधी चित्रं आहेत. कर्णाची जाणीव ही वर्णवादी जाणीव आहे, तर डॉ. आंबेडकरांची जाणीव ही लोकशाहीवादी जाणीव आहे. तेव्हा दलित जाणीव म्हणजे लोकशाहीची जाणीव. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव व माणसाच्या मोठेपणाची जाणीव.

प्रश्न : वर्गीय जाणीव व दलित जाणीव वेगवेगळ्या की एकच ?

वर्ग जाणीव व दलित जाणीव ह्या एकच आहेत. मी जर इंग्लंडमधला लेखक असतो व कुलकर्णी यांनी जर हा प्रश्न मला विचारला असता तर मी वर्गीय जाणिवेहून वेगळी अशी दलित जाणीव नसते असं म्हटलं असतं. कारण तेथे वर्गीय समाज आहे व इथे वर्णसमाज आहे. आज आहे व पूर्वीही होता. येथेही वर्ग आहेत. परंतु हे वर्ग इथे जातीत विभागले आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय व तत्सम हा शोषकांचा व शासकांचा वर्ग आहे. या श्रमिकवर्गाची आघात करण्याची ताकद कधीही संघटित होऊ नये, म्हणून या शोषक–शासक वर्गांनी जाती निर्माण करून शुद्र, अतिशूद्र हा श्रमिक वर्ग विघटित केला. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्येसुद्धा असं म्हटलं आहे की शूद्र मोठ्या संख्येनं एका गावामध्ये ठेऊ नयेत. तसंच मनुस्मृतीमध्ये असं म्हटलं आहे की, ज्या गावात शूद्रांची संख्या अधिक असेल तेथे ब्राह्मणांनी राहू नये. कारण जिथं शूद्रांची संख्या जास्त असते तिथं नास्तिकवादाचा प्रभाव असतो. तर आता महाराष्ट्राची व भारताची आर्थिक रचना ही भांडवलशाही प्रधान आहे.येथील राजनीतीसुद्धा तशीच आहे. आणि शूद्र, अतिशूद्रांतून म्हणजे श्रमिक समाजातून नवे दोन वर्ग उदयाला आले आहेत. एक बुद्धिजीवी वर्ग व दुसरा श्रमिक वर्ग. या दोन्ही वर्गांना सामाजिक जाणीव व बांधिलकी असल्यामुळे त्यांच्या ठायी क्रांतिकारक भावना अधिक आहे. जातीतून, धर्मातून आणि आजच्या आर्थिक रचनेतून आलेलं दूरत्व व अमानवी जीवन नाहीसं करण्यासाठी तो अग्रभागी रहाणारच आहे. दलित जाणीव आणि वर्ग जाणीव ही या प्रकारच्या क्रांतीची जाणीव आहे. आणि ही क्रांती सम्यक् क्रांती असेल. सम्यक् क्रांती म्हणजे धर्म, संस्कृती, राजनीती, अर्थरचना यांच्यात दलितानुकूल किंवा शोषितानुकूल परिवर्तन करणारी.

प्रश्न : आर्थिक शोषणाच्या निर्मूलनामुळे दलित शोषणाचा म्हणजे जातीचा प्रश्न सुटणार नाही असं म्हटलं जातं तें कितपत खरं आहे ?

आज दलितामधून काही लोक दोन पैसे बाळगून आहेत. आणि काही लोकांना जातीचे व्यवसाय टाकून देण्याची संधी रिझर्व्हेशनमुळे मिळालेली आहे. ते मनूने सांगितलेले ब्राह्मण, क्षत्रियांचे व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे थोडीशी प्रतिष्ठा व संपत्ती आहे. या स्थितीला सामाजिक सुधारणा म्हणता येईल. ही आर्थिक क्रांती नव्हे. दलित, श्रमिक जनतेच्या हातात राष्ट्रातील सामाजिक उत्पादनाची सर्व साधनं व संपत्ती अद्यापि आलेली नाही. खरी आर्थिक व सामाजिक क्रांती जेव्हा होते तेव्हा दलित, श्रमिक वर्ग सत्ताधारी झालेला असतो. या परिस्थितीत श्रमिक वर्ग सत्ताधारी होतो. व्यक्ती नव्हे. आज फक्त काही दलित व्यक्ती 'सुधारलेल्या' आहेत. एकंदर दलितवर्ग विषमतापूर्ण जीवनच जगतो आहे. बहुसंख्य लोकांना मान वर करायलासुद्धा जागा नाही. तेव्हा व्यक्तीची सुधारणा होणं आणि आर्थिक व राजकीय सत्ता दलित जनतेच्या हातात येणं ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत. म्हणून आर्थिक शोषणाच्या निर्मूलनामुळे दलितशोषणाचा प्रश्न सुटणार नाही, हे म्हणणं फसवं आहे.

प्रश्न : बरं तुम्ही असं म्हटलं की कर्णाची जाणीव व दलित जाणीव ह्या भिन्न आहेत. तेव्हा हे अधिक स्पष्ट कराल काय ?

कर्ण हा वर्ण मानतो. कर्णाकडे दान मागून गेलेले सर्व ब्राह्मण म्हणून आलेले होते व त्यांना त्यानं आदरपूर्वक दान दिलं होतं. कर्ण जेव्हा ब्राह्मणांना वरिष्ठ मानतो तेव्हा तो कोणाला कनिष्ठ किंवा नीचही मानतो. यावरून कर्ण जाती मानत होता हे स्पष्ट होतं. जन्म हा नियतीच्या हाती असतो व पौरुष हे माणसाच्या हातात असतं असं तो मानीत होता. कर्णाला वर्णव्यवस्था मान्य होती. म्हणजे हिंदू विचारसरणी, हिंदू वैचारिकता त्याला मान्य होती. कर्ण नियती मानतो. पूर्वकर्म, पूर्वपुण्य, पूर्वपाप मानतो. म्हणून गतजन्मीच्या पापाची शिक्षा भोगण्यासाठी किंवा पुण्याचे फळ भोगण्यासाठी म्हणून हीन किंवा उच्च जातीत जन्म घेतो असं तो मानतो. कर्ण शोषणसत्ता व धर्मसत्ता मान्य करतो. स्त्रियांसंबंधीचा त्याचा दृष्टिकोण हा त्या वेळचा सरंजामी दृष्टिकोणच आहे. म्हणून द्रौपदीवस्त्रहरणाची तो मजा पहात बसतो. असा हा धर्म, वर्ण आणि कर्माचं तत्त्वज्ञान मानणारा कर्ण दलित नायक होऊच शकत नाही. दलित नायकाचा आदर्श डॉ. आंबेडकर असू शकेल, स्टॅलिन, लेनिन, माओ, हो मि मिन्ह असू शकेल. बुकर टी. वॉशिंग्टन असू शकेल किंवा मार्टिन ल्यूथर किंग असू शकतील. फुले असू शकतील आणि खरोखरीच फुले ही दलित साहित्याची अत्यंत आदरणीय, आदर्शवत अशी वैचारिकता व पर्सनॅलिटी आहे.

प्रश्न : ग्रामीण व दलित साहित्यात तुम्ही कोणता फरक मानता ?

ग्रामीण साहित्याला सिद्धांत नाही. वैचारिकता नाही. ग्रामीण साहित्याचे आदर्श स्पष्ट झालेले नाहीत. ग्रामीण साहित्य म्हणजे काय हेही स्पष्ट झालेलं नाही. वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था याबद्दल हे साहित्य काही बोलत नाही. त्या दिशेनं विचार करीत नाही. परिणामत: ग्रामीण साहित्य म्हणजे वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करणारं साहित्य असंच ठरत नाही काय ? त्याचा दलित जाणिवेशी कुठं संबंध येतो ? मला तर अशी शंका येते की, जी गोष्ट लोकशाहीच्या व दलित साहित्याच्या व क्रांतीच्या गाजावाजांना किंवा घोषणांना घाबरून हिंदूवर्गवादी बोलू शकत नाहीत, ती ग्रामीण साहित्याच्या पदराआडून, बुरख्याआडून तर बोलली जात नाही ना ? म्हणून ग्रामीण साहित्याचे सिद्धांत ग्रामीण साहित्याच्या पुढाऱ्यांनी स्पष्ट केले पाहिजेत. औद्योगीकरणामुळे खेड्यातील गरीब व्यावसायिकांचे धंदे बसले आहेत. उदा. चांभार व मांग घ्या. मांग, बुरुड व चांभारांचे पारंपरिक धंदे नष्ट झालेले आहेत. ग्रामीण गरिबाच्या दु:स्थितीची ही गोष्ट हे ग्रामीण लेखक कधी लिहितील ? या यंत्रयुगाला किंवा भांडवली उत्पादनाला हे विरोध करणार आहेत का ? त्यांची उपासमार टळावी म्हणून हे कुठचा उपाय सांगणार आहेत ? यंत्रं मोडण्याचा व पारंपरिक धंदे सुरू करण्याचा मार्ग त्यांना ते सुचविणार आहेत ? खेड्यामध्ये विज्ञान आणि नवीन उत्पादन-साधने गेलेली आहेत. शेतीचं आधुनिकीकरण व औद्योगीकरण होत आहे. या नव्या बदलामुळे जुन्या भूमीतून किंवा शेतकऱ्यांतून फिटर, इलेक्ट्रिशियन, या बदलाचे ते स्वागत करणार का इंजीनिअर असा नवा माणूस येतो आहे. या नव्या माणसाला ग्रामीण साहित्य विरोध करणार का ? शेती उत्पादनावर नवे नवे उद्योगधंदे निघत आहेत. सहकारी साखर कारखाने, संस्था, बँका, ह्या सहकारी संस्थातून दिसणारी भांडवली प्रवृत्ती, शोषण करण्याचे प्रकार याबद्दल ग्रामीण साहित्य काय भूमिका घेणार आहे ? इथे शेतकऱ्यांच्या बाजूची भूमिका म्हणजेच डॉ. आंबेडकरांच्या बाजूची भूमिका होते. आंबेडकर शेतीच्या औद्योगीकरणाची व राष्ट्रीयीकरणाची भूमिका घेतात आणि शेतीमध्ये जे लहान मोठे बदल होत आहेत त्या बदलातून व्यक्त होणाऱ्या वेदना आणि सुखद आकांक्षांचीही नोंद घेतात. ग्रामीण साहित्याच्या पुरस्कर्त्यांनी अशी आपली भूमिका स्पष्ट करणं आवश्यक आहे. अशी भूमिका ते जेव्हा स्पष्ट करतील तेव्हा ग्रामीण साहित्य वेगळं असणार नाही. ते दलित साहित्याचा एक भाग बनेल. खरं म्हणजे दलित साहित्य आपल्या गतीनं वाढतं आहे. तेव्हा बहुमतांचं साहित्य असा वेगळा प्रकार करणं म्हणजे हिंदूवृत्ती प्रकट करणंच होय. हिंदू मानसिकता व वैचारिकता दलित या शब्दाचा अर्थ अस्पृश्य असाच घेते. समाजवादी व साम्यवादी किंवा आंबेडकरवादी यांच्या

दृष्टीनं मानसिकता व वैचारिकता लक्षात घेतली तर दलित या शब्दाचा अर्थ शोषित, पीडित, श्रमिक समाज असा होतो व त्यात क्रांतीचा संकेत असतो. दलित साहित्यानं सम्यक क्रांतीची भूमिका अगदी प्रारंभापासून घेतली असल्यानं फुले, आंबेडकर, मार्क्स ही त्यांची विचारकेंद्रं बनली आहेत. हे जाहीर असूनही ग्रामीण साहित्य आपली चूल वेगळी का मांडते ? मध्ययुगीन खेडं–त्या वेडचा खेडचांची जातीभेद, वर्णभेद मानून, देवधर्माच्या खुळचट समजुती, स्त्रियांची उपेक्षा व दुय्यम स्थान, ती पापाची खाण आहे असं मानणं हे लेखन करण्यासाठी हे ग्रामीण साहित्य आहे काय ? की नाना पाटील आणि त्यांच्या मागून काम करणारे, नव्या विचाराचे तरुण कार्यकर्ते, त्यांचे विचार स्वीकारणारे व त्यांना ठोकणारे यांचं चित्रण म्हणजे ग्रामीण किंवा औद्योगिकदृष्टचा बदलत्या खेडचाचं ज्वलंत चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य ? आम्हाला वाटतं हे बदलतं खेडं व ते बदलण्यासाठी काम करणारे लोक हे खरे नायक असावेत.

प्रश्न : दलित अनुभव दलितेतर लेखकाला व्यक्त करणं जमेल ?

जमेल. दलित लेखक हा स्वभावतःच क्रांतीच्या बाजूनं असतो. तो जातीजातींतील विषमता मोडण्याच्या मनोवृत्तीचा असतो. दलितेतर लेखकही ते व्यक्त करू शकतो. कोणत्याही लेखकाला व्यक्त करायचं असतं ते जीवन आणि त्यातील वास्तव. सध्या तरी दलितेतरामध्ये दलित जाणीव व्यक्त करणारा लेखक आज कोणत्याही भाषेत नाही. मराठीत नाही. मराठीत प्रेमचंदही अजून नाही.

प्रश्न : दलित साहित्यानं वेगळ्या साहित्यशास्त्राची मागणी करणं कितपत योग्य?

वेगळं साहित्यशास्त्र येतच आहे. येणारच. पूर्वी संस्कृत मंडळींचे कवितेसाठी काही नियम होते. केशवसुतांनी ते मोडून टाकले. पुढे जागतिक वाङमय आहेच. सौंदर्यशास्त्राचे नियम बदलले. आपण क्रांतीच्या जाणिवा व्यक्त करणारे आहोत. मायकोव्हस्की, चेकॉव्ह, टॉलस्टॉय यांनी क्रांतिकारी जाणिवा मांडल्या. त्यांनी नवीन जाणिवा दिल्या... फॉर्म बदलणार. विषय बदलणार, रिदमसुद्धा बदलतील. तेव्हा अशा बदलत्या परिस्थितीत सौंदर्यशास्त्र तरी पूर्वींचंच कसं राहील ?

प्रश्न : दलित साहित्याचा विचार 'सोशल अ‍ॅन्थ्रापॉलॉजिक अ‍ॅप्रोच'ने करण्याबद्दल तुमचं मत काय ?

मला वाटत नाही तो करावा. अमेरिकेतील निग्रो हे अमेरिकेत एकप्रकारे उपरे आहेत. त्यांचा मूळचा देश, रंग, रूप वेगळं आहे. त्यांच्या साहित्याबाबत असा सोशल अ‍ॅन्थ्रापॉलॉजिक अ‍ॅप्रोच योग्य ठरेल. दलितांच्या भूतकाळाचा सोशल अ‍ॅन्थ्रापॉलॉजिकल पद्धतीनं विचार करणं योग्य नाही. आज आम्ही दलित आहोत. आम्ही क्रांती करणार आहोत. आम्ही उद्याचे नायक आहोत. नेते आहोत. आम्ही आदिवासी आहोत. आम्ही अमेरिकेमधील निग्रोसारखे नाही. आम्हाला मातृभूमी

आहे. हा देश आमचा आहे. निग्रो अमेरिकेत उपरे आहेत. आम्हाला हा देश, येथील विषमता, समाजव्यवस्था बदलावयाची आहे. नष्ट करायची आहे. ती आम्ही करूच.

प्रश्न : दलित साहित्यावर ते प्रचारकी असल्याचा आरोप करण्यात येतो, त्याबद्दल तुमचं म्हणणं काय ?

कुठलेही उत्कृष्ट साहित्य हे प्रबोधन करणारं असतं. म्हणून ते प्रचारकीही असतं.

प्रश्न : दुसरा आरोप ते एकसुरी असल्याचा.

हरिभाऊंनी प्रथम विधवेवर लिहिलं. प्रेमचंदांनी लिहिलं व शरदचंद्रांनी लिहिलं. अनेकांनी विधवेवर लिहिलं. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय दलित साहित्यात गांधी, आंबेडकरांच्या उदयामुळे शेतकरी, शूद्रातिशूद्रामध्ये नवजागृती आली. विसाव्या शतकातील साहित्यात नव्या जाणिवा आल्या. ह्या नव्या जाणिवांमुळेच सर्व भाषिक लेखकांमध्ये विधवाविषय आला. त्यांचं चित्रण तसं एकसूरीच नाही का ? नवी वैचारिक जाणीव आली की, वैचारिकतेतील समान घटकांमुळे या वैचारिकतेतून जन्माला आलेल्या साहित्यातही ही समानता, ज्याला तुम्ही एकसूरीपणा म्हणता, ती येते. दलित लेखकांची जाणीव नवीन असल्यामुळे त्यातही सर्वत्र या प्रकारचा एकसूरीपणा आला. पण हा एकसूरीपणा कालांतरानं जाईल. मुक्या माणसाला वाचा फुटली म्हणजे तो अखंडपणं एकाच सुरात बोलत राहतो. त्या त्याच्या एकसूरीपणातूनच त्याच्यात नवीन शक्ती प्रदर्शित होते. दलित साहित्याच्या बाबतीतही काहीसं हे असंच आहे.

प्रश्न : हे साहित्य समूहनिष्ठ आहे, त्यात व्यक्ती येत नाही, असा एक आरोप.

काव्यात समूहमन व्यक्त होतं. पण बाबूरावांच्या कथा, शंकररावांच्या कथा, अण्णाभाऊ साठेंच्या कथांमध्ये व्यक्तिचित्रण येतं. म्हणून हा आरोप कवितेपुरता खरा आहे. बरीचशी दलित कविता ही भाष्य स्वरूपाची असल्यामुळेही ती व्यक्तिनिरपेक्ष स्वरूपाची वाटते.

प्रश्न : दलित साहित्यावर आक्रस्ताळेपणाचाही आरोप आहे.

हा आरोप चुकीचा आहे. तरुण मुलगी ही उत्साहानं चालते आणि प्रौढ स्त्री मोजूनमापून पावलं टाकते. तरुण मुलीची वेगवान चाल सौंदर्य निर्माण करते. तशी प्रौढ पुरंध्रीची चालसुद्धा सौंदर्य प्रकट करते. नवं पाणी जोरानं येतं. वेगानं जातं. हा पाण्याचा वेग देखणा असतो. या आवेगाला आक्रोश म्हणता येईल का ? दलित कवितेतून व साहित्यातून क्रांतिरस प्रकट होतो. जुन्या पद्धतीनं साहित्यविचार करणारी मंडळी ह्या पद्धतीला आक्रस्ताळं म्हणतात. हा त्यांचा दोष आहे. दलित साहित्याचा नाही.

प्रश्न : हे साहित्य नकारात्मक वाटतं, या आक्षेपाबद्दल तुमचं म्हणणं काय आहे ?

नकार हे त्याचं वैशिष्टय आहे. ह्या वैशिष्टयानं म्हणजे नकारानं कलेची व

विचाराची विलक्षण रूपं अजून प्रकट केलेली नाहीत. पण ती पुढेमागे प्रकट होणार आहेत. दलित साहित्यानं मांडलेला हा नकार अटळपणे भारतीय मनाचा हुंकार होणार आहे. प्रत्येक भारतीय स्त्री आणि प्रत्येक भारतीय दडपलेला मनुष्य मग तो कुठल्याही जाती-जमातीचा असो, तो नकार हे जीवनमूल्य मानतो. तत्त्वज्ञान म्हणून, लढाइचे हथियार म्हणून, स्वातंत्र्याचा मंत्र म्हणून तो नकार या जीवनमूल्याचा स्वीकार करणार आहे. कारण भारती समाजय संस्कृती म्हणून भारतीय मन हे सर्वंकष विषमतेचा पुरस्कार करीत असतं. म्हणून विषमतेचे विरोधक स्त्रीशूद्र, अतिशूद्र भारतीय विचाराला नाकारणारच.

प्रश्न : ' दलित जाणीव ' ही कायम, निरंतर राहणारी चीज आहे की इतिहासातील एक अवस्था म्हणून ?

दलित जाणीव ही क्रांतिकारी जाणीव असल्यामुळे क्रांती ही कधीच म्हातारी व निरर्थक होत नसते. ती प्रकाशाप्रमाणेच असते.

प्रश्न : दलित साहित्यात ग्रामीण व शहरी असा भेद मानावा का ?

दलित साहित्यात ग्रामीण व शहरी हा भागच नाही. कारण क्रांतीमध्ये शहरी क्रांती व ग्रामीण क्रांती असा भागच नसतो. क्रांती ही क्रांतीच असते. दलित साहित्य हे क्रांतीचं साहित्य आहे. ते शहर आणि खेडं या दोघांनाही सारखंच व्यापतं. त्यात बाह्यत: काही फरक दिसला तरी त्याचा भागा एकच आहे.

प्रश्न : दलित जाणीव ठेवणं यात व्हेस्टेड इंटरेस्ट आहे ?

हा जातीयवाद्यांचा आरोप आहे. (साधना साप्ताहिकाचा ऑगस्ट ८० चा अंक पहा.)

प्रश्न : तुमचे आवडते लेखनप्रकार कोणते ?

कथा व कादंबरी हा प्रकार. कविता शेकडो लिहिल्यात. फाडून टाकल्या. पण आता माझा काव्यसंग्रह येतो आहे. मी आत्मचरित्र लिहिणार नाही. उलट त्यावर मी कादंबऱ्या लिहिणार आहे.

प्रश्न : तुमच्या साहित्यात स्वानुभवाचा भाग किती ? कल्पनेचा किती ?

स्वानुभव व कल्पनांचंही मिश्रण असतं.

प्रश्न : तुमच्या साहित्यलेखनाची प्रमुख प्रेरणा कोणती ?

साहित्य लेखनाची प्रेरणा नुसतं जीवनदर्शन नसतं, तर जीवनाचं इंटरप्रिटेशन असतं. मी कार्यकर्ता आहे. यामुळे ही इंटरप्रिटेशनची भूमिका माझ्या मनात असतेच.

प्रश्न : दलितांप्रमाणे दलितेतरांचंही चित्रण करावं असं तुम्हाला वाटतं की नाही?

निग्रो, मुस्लिम, ख्रिश्चन, इराणी, ज्यू, पाटील, ब्राह्मण इत्यादी जातींची चित्रणं आलेली आहेत. येणार आहेत.

प्रश्न : दलितेतर साहित्याबद्दल तुमचा अभिप्राय काय ? ते तुम्हाला अर्थशून्य वाटतं काय ?

दलितेतर साहित्य अर्थशून्य वाटत नाही. आपल्याला एकांगी भूमिका घेता येणार नाही. कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, दिलीप चित्रे, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, इतर भारतीय भाषांतले जीवनाच्या बाजूनं लिहिणारे कवी, नाटककार, कादंबरीकार व जगातलेही आवडतात.

प्रश्न : दलितेतर हे तुमच्या साहित्याचे विषय होतात की नाही ?

आमच्या साहित्याचा हे विषयही होऊ शकतात. दलित लेखक व कोणताही लेखक हा जीवनातून विविध अनुभव व्यक्त करायला उत्सुक असतो व जो हे नाकारतो तोही एक प्रकारचा जातिवादच आहे.

प्रश्न : लेखक म्हणून तुमच्या काही तक्रारी ? अडचणी ?

काही तक्रारी नाहीत.

प्रश्न : दलित साहित्यानं मराठी साहित्याला काय दिलं ?

दलित साहित्यानं नकार दिला. विद्रोह दिला. सारी आराध्यदैवतं कोसळवून टाकली. वाङ्मयीन व सांस्कृतिक आदर्शांची समीक्षा केली. आणि क्रांतीचा उद्गार कुठल्याही क्रांतिकारक राजकीय पक्षापेक्षा अधिक धीटपणानं मांडला. उदा. यशवंत मनोहर, नामदेव ढसाळांच्या कविता.

●

# ४ : दया पवार

[ ' कोंडवाडा ' या कवितासंग्रहामुळे दया पवारांचे नाव कवी या नात्याने परिचित असले तरी त्यांना खरी प्रसिद्धी मिळाली ती त्यांच्या ' बलुतं ' या आत्मचरित्रपर लेखनामुळे. या आत्मचरित्राने मराठी साहित्यविश्वात विलक्षण खळबळ उडवून दिली. त्याच्या लागोपाठ दोन तीन आवृत्त्या निघाल्या.

मराठीत आत्मचरित्रलेखनाचा पायंडा तसा फार जुना आहे. पण समाजातील अधःस्तराचे भेदक दर्शन प्रथमच घडले, ते ' बलुतं'मुळे. किंबहुना ' बलुतं ' हा दलित आत्मचरित्रक्षेत्रातील इशारा शब्द बनला. दलित आत्मचरित्र लेखनाला या नंतरच्या काळात एक उधाणच आले. दलित जीवनातील भेदक वास्तवाचे दर्शन घडण्याच्या दृष्टीने ही आत्मचरित्रे विशेष मोलाची आहेत. मराठी आत्मचरित्र लेखनाचे दालनही यामुळे समृद्ध झाले. या साऱ्यांचा आरंभबिंदू म्हणून दया पवारांचे ' बलुतं ' विशेष महत्त्वाचे.

दया पवारांच्या लेखनात इतर अनेक दलित लेखकांप्रमाणेच विद्रोहाचे सूर उमटतात. पण याबरोबरच दलितेतर साहित्यातील प्रवाहांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी समंजस आणि समतोल असल्याचाही प्रत्यय येतो. एखाद्या प्रश्नाला एकाहून अधिक बाजू असतात याची त्यांना मूलतःच जाण असल्यामुळे कोणताही प्रश्न ते सकृतदर्शनीच धसमुसळेपणाने धुडकावून लावीत नाहीत. प्रश्नाची दुसरी बाजू समजून घेण्याकडे त्यांचा निश्चित कल असतो. त्यामुळे प्रस्तुतची मुलाखत दलित अंगोपांगे समजून घेण्यास उपकारक ठरेल.

या मुलाखतीसाठी त्यांनी मला देता येईल तेवढे सर्व प्रकारचे सहकार्य दिले. यातील काही भाग गोरेगाव येथील त्यांच्या निवासस्थळात सिद्ध झाला आहे, तर काही भाग मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या आवारात. दया पवारांच्या घरी जाण्याची, त्यांच्या कुटुंबियांचा परिचय करून घेण्याची संधीही मला या निमित्ताने मिळाली. ' बलुतं ' च्या उत्तरार्धाची मांडणी कशी करावी, याबद्दलच्या आपल्या काही कल्पनाही त्यांनी बोलून दाखविल्या. ' बलुतं ' चा हा उत्तरार्ध केव्हा प्रसिद्ध होतो, याची उत्सुकता माझ्याप्रमाणेच इतरही अनेकांना लागून राहिली आहे. ]

प्रश्न : ' दलित जाणीव ' म्हणजे काय ? समाजवादी, साम्यवादी जाणिवांहूना ती वेगळी ? समतेचा आशय असलेल्या इतर जाणिवांहून वेगळी ? सर्व शोषित :यात अंतर्भुत होतात की नाही ? या जाणिवेचा सर्वच विषमतेशी संबंध नाही काय ?

भारतीय समाजात आतापर्यंत मध्यमवर्गीयांची जाणीवच मातब्बर ठरलेली आहे. या जाणिवेच्या पाठीमागे आजपर्यंत समाजातील सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा उभी होती, आहे. या मध्यमवर्गीय norms नाच समाजानं दीर्घकालपर्यंत मान्यता दिलेली आहे. धार्मिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये त्यांचं प्राबल्य असतं. हेच norms साहित्यावरही कार्यकर ठरलेले आहेत.

या सर्वच norms ना छेद देणारी,तळागाळातील माणसांबद्दल आपुलकी बाळगणारी, वरील कप्पेबंद व्यवस्थेला झिडकारून देऊ इच्छिणारी जी क्रांतिकारी जाणीव ती दलित जाणीव.

प्रश्न : ही जाणीव फक्त वर्णाश्रमधर्माच्या विरोधी ? की सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध विद्रोह करून उठलेली ? केवळ वर्णाश्रमविरोधी असल्यास तिनं काय साधतं? त्यामुळे एकटेपणा isolation येत नाही काय ?

हे विधान ढोबळ आहे. वर्णाश्रमव्यवस्था, आर्थिक विषमता या तशा दोन गोष्टी नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हा प्रश्न केवळ सामाजिक नाही किंवा केवळ आर्थिक नाही. तो socio-economic आहे. विद्रोह व्यक्त करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या होऊ शकतात. पण विद्रोह total आहे. माझ्या मते ही दलित जाणीव अंतिमत: सर्वच शोषणाच्या विरुद्ध असल्यामुळे त्यात वर्णाश्रमानं भरडलेल्या लोकांप्रमाणेच इतरही येतात. दलित वर्ग हा आजच्या समाजव्यवस्थेत सर्वाधिक प्रमाणात शोषित ठरलेला असल्यामुळे तो ही जाणीव व्यक्त करणाऱ्यात आघाडीवर आहे. पण ही जाणीव त्या वर्गापुरतीच मर्यादित राहण्याचं कारण नाही. ही जाणीव सर्वव्यापी असल्यामुळे एकटेपणाचा isolation चा प्रश्न उपस्थित होत नाही. दलितेतर माणूसही त्यात सामील होऊ शकतो. पण ही शक्यता तो जाणिवेच्या पातळीवर किती declass, decaste होतो यावर अवलंबून आहे. मी लेखक आहे म्हणजे मी फक्त माणूस आहे. हे जपलं पाहिजे. मी ' दलित ' म्हणून वेगळी अहंकारी उतरंड नको. दलित म्हणून या मागासलेपणाची व न्यूनगंडाची भावना नको. किंवा जातीय अहंकारही नसावा. जाणिवेच्या पातळीवर वरवर सरकण्याची प्रक्रिया दिसते. कुणी ब्राह्मण होऊ इच्छितो तर कुणी क्षत्रिय. या शिड्या कोसळल्या पाहिजेत. परंपरागत अर्थाने दलित शब्दाकडे पाहू नये. गोरा रंग हा सौंदर्याचं लक्षण म्हणून ओळखला जावा, यात परंपरागत मानसिकता

काम करीत असते. ब्लॅक इज ब्युटीफुल अशी नवी संकल्पना निग्रोंनी काढली. त्याचप्रमाणे ' दलित ' ही संकल्पना नवी आहे, तिला पारंपरिक अर्थ चिकटवू नये. दलित जाणीव ही आदर्श भारतीयाबद्दलच्या संकल्पनेची जाणीव आहे. छेदभेद वाढवणं, हिंसकत्व उत्तेजित करणं हे त्यात बसत नाही.

प्रश्न : तुमचा declass चा अर्थ काय ?

इथं declass चा परंपरागत अर्थ अभिप्रेत नाही. declass होणं म्हणजे क्रांतिकारक होणं, सर्वांगीण परिवर्तनास सज्ज होणं असा आहे.

प्रश्न : यात दलितांबरोबर दलितेतरही येतात ?

होय. फुले हे त्याचं जिवंत उदाहरण आहे. गावाबाहेरचा आणि गावातला, यांच्यामध्ये व्यवस्थेनं जातीच्या नावाखाली एक सांस्कृतिक भिंतच उभी केलेली आहे. वेशीच्या आतलेही एक प्रकारे दलितच आहेत. पण या दलितांना आपल्या न्याय्य मूल्याचं भान नाही. आज ना उद्या या भिंती जातील. अहंकारानं निर्माण केलेल्या या भिंती कोसळाव्या म्हणून तर ही दलित जाणीव सक्षम झाली. ती जसजशी व्यक्त होत जाईल तसतशी माणसाची म्हणून एक ' जात ' निर्माण होईल. आजवर हे होऊ शकलं नाही. कारण परंपरा फार powerful होती, त्यामुळे सारे शोषित एकाच बोटीत असूनही त्यांना ही जाणीव नव्हती–नाही. शोषित म्हणून साऱ्यांनी एकत्र झालं पाहिजे.

प्रश्न : या एकत्र येण्याच्या आड काय येतं ?

prejudice. परंपरा. हा prejudice आता कमी होत आहे. लक्ष्मण माने किंवा नारायण कुलकर्णी कवठेकर यासारखी मंडळी आता हे prejudices सोडून पुढे येत आहेत.

प्रश्न : तुमच्या मते ही process कशी वाढेल ?

दृष्टिकोनात बदल करून हे साधेल असं वाटतं. माणूस म्हणून एक होण्याचं ठरविल्यास प्रारंभी काही अडचणी येतील. काही वेळा काही प्रश्नांचं स्वरूप वेगळं राहील. काही ' नको ' असलेल्या गोष्टी सहज नाकारल्या जातात. काही नाकारावयाचा मुद्दाम प्रयत्न करावा लागतो. माणसाला त्याच्या वागण्याच्या ज्या सूचना मिळतात त्या त्याच्या अनुभवातून, पूर्वसंस्कारातून मिळतात नाही का ? पूजेला जावयाचं म्हणजे अनवाणी चालावयाचं हे ठरून गेल्यासारखंच असतं. देवाचा प्रसाद घेताना किंवा पैसे घेताना हिंदू माणूस उजवाच हात पुढे करतो. डावा हात हा शूद्राचं काम करतो. म्हणून तर त्याला प्रसादापासून, धनापासून वंचित ठेवलं नसेल ना ? तेव्हा यातील गुंतागुंतीचा विचार करावाच लागेल. अडचणी येतील. मुख्य म्हणजे निश्चय असला म्हणजे हे होईल; असं विचाराची

केवळ दिशा बदलली, नवा दृष्टिकोण अंगिकारला म्हणजे हे होईल असं नाही; त्याचा अंशतः उपयोग होईल, पण मुख्य म्हणजे आपल्या sub-conscious मध्ये जे लपून बसलेलं असतं त्याचा निचरा व्हावयास पाहिजे. विंदा करंदीकर जेव्हा विलायतेत कविता लिहितात, तिथल्या निसर्गाच्या संदर्भात बोलतात, तेव्हा त्याच्या sub-couscious मध्ये त्यांच्या येथील भारतीय परंपरांचीच गर्दी झालेली असते. आणि हे स्वाभाविकही आहे. विंदा करंदीकर मार्क्सवादी असले तरी त्यांचं मत पारंपरिक हिंदूचं आहे. म्हणून विलायतेतील क्लब व नृत्य बघून त्यांना राधाकृष्णाची आठवण येते.

प्रश्न : तुम्ही म्हणता तो sub-conscious मधील बदल कशानं होईल ?

त्यासाठी creative art forms चा सर्वात अधिक उपयोग होईल असं मला वाटतं.

प्रश्न : ही जाणीव ग्रामीण साहित्यातील जाणिवेहून वेगळी का ? कशी ? गरिबी, दुःख, विषमता हे घटक येथेही नाहीत का ? 'दलितत्वा'चा व्यापक अर्थ का घ्यावयाचा नाही ?

सांस्कृतिक पातळीच्या दृष्टीनं ग्रामीण साहित्य व दलित साहित्य ही दोन साहित्यविश्वं वेगवेगळी आहेत. ग्रामीण साहित्याची बैठक दलित साहित्या-प्रमाणे मूलगामी, original नाही. ग्रामीण साहित्याला आमूलाग्र परिवर्तन अभिप्रेत नाही. ग्रामीण साहित्याचा झगडा ग्रामीण विरुद्ध नागर असा आहे. ग्रामीण साहित्य लिहिणारा वर्ग परंपरावादी आणि भूतकालीन इतिहासाचा भोक्ता आहे. ग्रामीण लेखक शहरात आल्यानंतर परत खेड्याकडे जात नाही. तो split होतो. ग्रामीण साहित्याला dimensions नाहीत. ते उथळ, मनोरंजनवादी आहे. फार तर ते शहरी साहित्यातील आकृतिबंध निर्माण करण्यावर खूष आहे. त्यातील शिवीचा भाग नवीन. खरं ग्रामीण वास्तव यामुळे विकृत किंवा उदात्त केलं जातं.

प्रश्न : तुम्ही तुमचं हे म्हणणं एखादं उदाहरण देऊन मांडाल का ?

आनंद यादवांची 'गोतावळा' ही कादंबरीच आपण उदाहरणादाखल घेऊ. या कादंबरीचा नायक रोजंदारी करणारा एक मजूर आहे. तो ग्रामीण वातावरणातील निसर्गाबद्दल, पशुपक्ष्यांबद्दल खूप बोलतो. सांगतो. पण या त्याच्या मजूरदारीमागं असलेल्या आणि त्याच्या दुःखाला मूलभूतपणे कारण असलेल्या मालक–मजूर संबंधाबद्दल मात्र अवाक्षरही का उच्चारीत नाही ? मालक किंवा मालकीण त्याला कोणती 'पायरी' देत होते. याचं चित्रण का नाही ?

प्रश्न : म्हणजे लेखकानं प्रचारकी झालंच पाहिजे, असं तुम्हाला सुचवावयाचं आहे काय ?

प्रचारकी होण्याचा हा प्रश्न नसून जीवनातील total-relationship कडे पाहण्याचा हा प्रश्न आहे. उदा. 'कप एक चहाचा' ही प्रल्हाद चेंदवणकर यांची कविता पाहा. कवितेच्या एक एक ओळीत तुम्हास कवितेची लय, घाट, प्रतिमा सापडणार नाही, पण सर्व कवितेचा आकृतिबंधच एक सामर्थ्यशाली प्रतिमा घेऊन येतो आणि याची जाणीव होणारं सामाजिक मन हवं असतं. मला असं दिसतं की, मराठीत मध्यंतरी जन्माला आलेल्या 'पुरोगामी साहित्या'च्या चळवळीनं जो मार खाल्ला, त्याचा धसका घेऊन मराठी साहित्यिक एकांडपणे कलावादी बनले. आपल्या मूळच्या मध्यमवर्गीय कोषातच अधिक गुरफटून गेले. हिंदीत असं झालं नाही. उदाहरणार्थ प्रेमचंदचे साहित्य पाहा.

प्रश्न : मर्ढेकरी साहित्याबद्दल मग तुम्ही काय म्हणाल? तेही एक प्रकारे मध्यमवर्गीयच नाही का? आणि असं असूनही ते प्रभावी का ठरलं?

मर्ढेकरांची संज्ञा तशी मूळची मध्यमवर्गीय असली तरी तिनं जीवनाच्या basic प्रश्नांना वारंवार स्पर्श केलेला आहे. एखाद्या लेखकाची संज्ञा मुळात मध्यमवर्गीय आहे म्हणून तो त्याज्य ठरत नाही. त्या संज्ञेलाही अंतर्गत dimensions असतात, त्या dimensions ना त्यानं स्पर्श करावा अशी अपेक्षा असते; पण मराठीतील बहुसंख्य लेखनात हे होत नाही. चित्रण वरवरचं होतं. उदा० 'चक्र' किंवा 'माहीमची खाडी' ही कादंबरी पाहा. त्याचा आपल्यावर कितपत सखोल परिणाम होतो. परिणामक्षमता ही एक नाजुक गोष्ट असून ती प्रत्यक्ष पडताळूनच पाहावी लागते. 'चक्र' किंवा 'माहीमची खाडी' मधील झोपडपट्ट्या दुर्बिणीतून पाहिल्यासारख्या वाटतात.

प्रश्न : आपला मूळ मुद्दा ग्रामीण साहित्याबद्दलचा आहे. हे ग्रामीण साहित्य वास्तवाला बिलकूल स्पर्शच करीत नाही असं तुम्हाला म्हणावयाचं आहे का?

केवळ असंच नाही. अहो, अधूनमधून ते वास्तवाला स्पर्श करते. पण हे वास्तवदर्शन फार ढोबळ असते. या ग्रामीण साहित्याला कोणत्याही idealogy चा पाया नाही. ग्रामीण जीवनातील काहीं बेतीव स्वप्नांवर किंवा फरफटीवर हे साहित्य आधारलेलं असतं. हे साहित्य भारतीय जीवनातील अवजड परंपरांचं ओझं जसंच्या तसं अद्यापीही खांद्यावर वागवितं. या साहित्यात व्यापक सामाजिक जाणिवांचा अभाव आहे. औद्योगिकरणानं खेड्यात होत चाललेल्या बदलाचं चित्र या साहित्यात क्वचितच येतं. आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा त्याला स्पर्श झालेला नाही. तेथील दैन्य, दुःखाबद्दल या साहित्यातून पुष्कळदा टवाळीच्या सुरात बोललं जातं. ते cheap वाटतं. एखाद्या सुसज्ज फ्लॅटमध्ये राहणारानं चाळीत राहणाराची टवाळी करावी तसा हा प्रकार वाटतो. शैलीतूनही हा टवाळीचा सूर

दृष्टीनं उपयोग होतो. कारण दलित मनाची जडणघडण भूतकालीन घटितांवर आधारलेली असते. त्यामुळे त्याचं वर्तनही विशिष्ट दिशेनं होत. दलित विद्यार्थ्याला scholarship मिळाल्यास तो तिचा पहिला हप्ता चैनीत उधळील. कारण त्याचं पूर्व–दारिद्र्य, वखवख त्याला कारणीभूत असते. मध्यमवर्गीय विद्यार्थी तसं करणार नाही. हे एक ढोबळ उदाहरण झालं. पण व्यक्ती–परिस्थिती तदनुषंगिक वर्तन यातील ताण यातून स्पष्ट होईल. या साऱ्याचा माणसाच्या आंतरजीवनावर परिणाम होतो. हा social-anthropological approach दलित जीवनातील sex चा घटक समजून घेण्यासही उपयोगी पडतो.

प्रश्न : दलित साहित्यावर घेण्यात येणाऱ्या आक्षेपात ते प्रचारी आहे असा एक आक्षेप आहे. तुमचं काय मत आहे ?

काही काळ प्रचारकी राहणं स्वाभाविक; पण हे प्रचारकीपण आता कमी होत आहे. उदा० ‘ आठवणींचे पक्षी ’ हे प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांचं पुस्तक पाहा.

प्रश्न : ते एकसुरी आहे असा आणखी एक आक्षेप आहे.

कोंडी फुटते आहे. progamme literature सारखं ते बंदिस्त झालेलं नाही. त्याच्या विकासाची चिन्हं दिसतात. अहो, त्याचा रबर स्टॅम्प झालेला नाही. प्रत्येक दलित कवी किंवा लेखक आपापल्या शैलीत लिहितो, आपापल्या दृष्टिकोणातून लिहितो. उदा. वामन निंबाळकरांची ‘ आई ’ व इतरांची ‘ आई ’ कविता पाहा. ‘ आई ’ प्रमाणेच ‘ पाण्या ’ ची प्रतिमा पाहा. ती वेगवेगळी आहे. नामदेव ढसाळ आणि दया पवार ‘ पाणी ’ या प्रतिमेचाच वापर करतात, पण वेगवेगळ्या प्रकारे. आता चांगल्या बरोबर एकसूरीपणाचा, दुय्यमपणाचाही दलित साहित्यात काही भाग आहे. सर्वत्रच चांगल्याबरोबर वाईटाचाही महापूर येतोच.

प्रश्न : तिच्यात व्यक्ती येत नाही असाही एक आक्षेप आहे.

व्यक्ती स्वतःबद्दल लिहिताना ती समूहात्मक होत असेल तर ते चांगलंच नाही का ? स्वागतार्ह नाही का ? व्यक्तीचा अनुभव समूहाला आपलासा वाटणं हे त्या कलाकृतीचं यशच नाही का ?

प्रश्न : व्यक्तित्वाचा स्पर्श असणं, कोणत्याही साहित्याच्या दृष्टीनं चांगलंच...

अनुभवाकडे जाताना personality cult येतोच. ‘ आठवणींचे पक्षी ’ पाहा. पण या personality cult बरोबरच mass ही येतो. त्याला social dimensions प्राप्त होतात. व्यक्तीच social होते. personal experience शिवाय हे घडणंच शक्य नाही. चांगल्या दलित साहित्यात हा व्यक्ती–समाज संबंध तुम्हाला दिसेल. तेव्हा दलित साहित्यात mass येतो, व्यक्ती येत नाही, हा दलित साहित्य नीट समजून न घेताचं केलेला आरोप वाटतो.

प्रश्न : तिच्यातल्या आक्रस्ताळेपणाच्या आक्षेपाबद्दल...

पुष्कळदा आढळतो.

प्रश्न : तुमच्या मते याची कारणं कोणती ?

संस्कृतनिष्ठ शैलीलाच मध्यवर्ती शैली मानण्याची आपली परंपरा याला कारणीभूत आहे. ग्रामीण साहित्यिकाला प्रतिष्ठित, मध्यमवर्गीय norms च अद्यापि प्रिय आहेत. ग्रामीण साहित्यिकाच्या या संकुचित दृष्टिकोणामुळे ग्रामीण साहित्याची कथेखेरीज अन्य क्षेत्रात वाढ झालेली नाही.

प्रश्न : दलित साहित्याला वेगळे निकष लावावेत ?

वाङ्मयात कायमचे, ठराविक असे निकष असतात असं मला वाटत नाही. त्या त्या कलाकृती आपापले निकष घेऊनच जन्माला येतात असं मी मानतो. भारतात तर आस्वादनाच्या भिन्न भिन्न पातळ्या, प्रक्रिया फार मोठ्या प्रमाणात आढळतात. कारण येथे संस्कृतिदृष्ट्या अनेक बेटं आहेत. एकाला जे आस्वादनीय वाटेल ते दुसऱ्याला वाटेलच असं नाही. अशा परिस्थितीत ठराविक निकषाचा ठाम आग्रह धरणं योग्य वाटत नाही.

प्रश्न : दलितांचंही वेगळं साहित्यशास्त्र ...

वेगवेगळी साहित्यशास्त्रे -मग पाहू. अभिरुचीभिन्नतेमुळे ती मानावयाची का ? असा प्रश्न आहे. माझ्या मते बदलत्या जाणिवेतील फरक लक्षात घ्यावयास हवा.

प्रश्न : साहित्यात काही चिरंतन स्वरूपाचं–अक्षर स्वरूपाचं असतं असं तुम्ही मानता की नाही ?

तुम्ही ज्याला चिरंतन, अक्षर मानता, ते अक्षर, चिरंतन असतं असं नाही. जे आज चिरंतन, महत्त्वाचं वाटतं, ते उद्या वाटेलच असं नाही. तुकारामाचं उदाहरण घ्या. काल तुकाराम ज्या कारणाकरिता मान्यता पावला होता, त्या कारणाकरिता तो आज मान्यता पावेलच असं नाही.

प्रश्न : मग आजही तो मोठा वाटत नाही का ?

वाटतो. पण वाटण्याच्या 'जागा' वेगळ्या झालेल्या आहेत. कोणत्या 'जागे' ला किती महत्त्व द्यावयाचं हे त्या त्या काळातील संस्कृतीवर अवलंबून असतं. काळाप्रमाणे यात बदल होतो. म्हणून चिरंतनत्वाचा मुद्दा फारसा ताणण्यात अर्थ नाही. हे सारं तारतम्यानंच विचारात घ्यावं लागेल.

प्रश्न : 'दलितत्वा'चा या संदर्भात काय अर्थ करायचा? अपूर्वत्व ? श्रेष्ठत्व ?

दलितत्वाचा या संदर्भातील अर्थ म्हणजे अपूर्वत्वच मानावयास हवा. श्रेष्ठत्व नव्हे.

प्रश्न : 'सोशल अँथ्रापॉलॉजिकल अॅप्रोचची गरज आहे का ? साहित्यास्वाद असा अॅप्रोच न घेताही घेता येणार नाही का ?

Social-anthropological approch चा दलित मन समजून घेण्याच्या

दृष्टीनं उपयोग होतो. कारण दलित मनाची जडणघडण भूतकालीन घटितांवर आधारलेली असते. त्यामुळे त्याचं वर्तनही विशिष्ट दिशेनं होत. दलित विद्यार्थ्याला scholarship मिळाल्यास तो तिचा पहिला हप्ता चैनीत उधळील. कारण त्याचं पूर्व–दारिद्र्य, वखवख त्याला कारणीभूत असते. मध्यमवर्गीय विद्यार्थी तसं करणार नाही. हे एक ढोबळ उदाहरण झालं. पण व्यक्ती–परिस्थिती तदनुषंगिक वर्तन यातील ताण यातून स्पष्ट होईल. या साऱ्याचा माणसाच्या आंतरजीवनावर परिणाम होतो. हा social-anthropological approach दलित जीवनातील sex चा घटक समजून घेण्यासही उपयोगी पडतो.

प्रश्न : दलित साहित्यावर घेण्यात येणाऱ्या आक्षेपात ते प्रचारी आहे असा एक आक्षेप आहे. तुमचं काय मत आहे ?

काही काळ प्रचारकी राहणं स्वाभाविक; पण हे प्रचारकीपण आता कमी होत आहे. उदा० ‘ आठवणींचे पक्षी ’ हे प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांचं पुस्तक पाहा.

प्रश्न : ते एकसुरी आहे असा आणखी एक आक्षेप आहे.

कोंडी फुटते आहे. progamme literature सारखं ते बंदिस्त झालेलं नाही. त्याच्या विकासाची चिन्हं दिसतात. अहो, त्याचा रबर स्टॅम्प झालेला नाही. प्रत्येक दलित कवी किंवा लेखक आपापल्या शैलीत लिहितो, आपापल्या दृष्टिकोणातून लिहितो. उदा. वामन निंबाळकरांची ‘ आई ’ व इतरांची ‘ आई ’ कविता पाहा. ‘ आई ’ प्रमाणेच ‘ पाण्या ’ ची प्रतिमा पाहा. ती वेगवेगळी आहे. नामदेव ढसाळ आणि दया पवार ‘ पाणी ’ या प्रतिमेचाच वापर करतात, पण वेगवेगळ्या प्रकारे. आता चांगल्या बरोबर एकसूरीपणाचा, दुय्यमपणाचाही दलित साहित्यात काही भाग आहे. सर्वत्रच चांगल्याबरोबर वाईटाचाही महापूर येतोच.

प्रश्न : तिच्यात व्यक्ती येत नाही असाही एक आक्षेप आहे.

व्यक्ती स्वतःबद्दल लिहिताना ती समूहात्मक होत असेल तर ते चांगलंच नाही का ? स्वागतार्ह नाही का ? व्यक्तीचा अनुभव समूहाला आपलासा वाटणं हे त्या कलाकृतीचं यशच नाही का ?

प्रश्न : व्यक्तित्वाचा स्पर्श असणं, कोणत्याही साहित्याच्या दृष्टीनं चांगलंच…

अनुभवाकडे जाताना personality cult येतोच. ‘ आठवणींचे पक्षी ’ पाहा. पण या personality cult बरोबरच mass ही येतो. त्याला social dimensions प्राप्त होतात. व्यक्तीच social होते. personal experience शिवाय हे घडणंच शक्य नाही. चांगल्या दलित साहित्यात हा व्यक्ती–समाज संबंध तुम्हाला दिसेल. तेव्हा दलित साहित्यात mass येतो, व्यक्ती येत नाही, हा दलित साहित्य नीट समजून न घेताचं केलेला आरोप वाटतो.

प्रश्न : तिच्यातल्या आक्रस्ताळेपणाच्या आक्षेपाबद्दल…

दलित कवितेत सूज आहे; पण दलित साहित्यावर total आक्रस्ताळेपणा लादणं बरोबर नाही. सर्व लेखन न पाहताच केलेला हा आरोप दिसतो. उदा० केशव मेश्रामच्या कवितेत आक्रस्ताळेपणा कुठं आहे? या दृष्टीनं दलित कथासंग्रहही पाहा. म्हणजे आक्रस्ताळेपणाचा आरोप बरोबर नसल्याचंच दिसेल. अलीकडची दलित आत्मचरित्रं आक्रस्ताळेपणापासून मुक्त आहेत.

प्रश्न : दलित साहित्य हे केवळ नकारात्मक आहे.

Negative मध्ये positive गृहीत असते. Negative पद्धतीत न लिहिता positive पद्धतीनं लिहिलं असतं तर तुम्ही त्याला कंठाळी प्रचार असं म्हटलं असतंत. जे तुम्हाला आज नकारात्मक वाटतं, ते काहीतरी नवं आपल्यासाठीच आहे. लेखकानं अमुकच सांगावं, असा आग्रह का? सध्याचा दलित लेखक केवळ प्रश्नच निर्माण करतो, आणि त्या दृष्टीनंच त्याच्याकडे पाहिलं पाहिजे.

प्रश्न : काही विशिष्ट ठरवून सांगितल्यानं समाज बदलतो का ?

केवळ चांगल्या लेखनानं समाज बदलतो, या भ्रमात लेखक नसतो. पण चांगल्या साहित्यातून positive content सूचित होतो. तो poetic quality चा असल्यास त्याचा एक प्रभाव असतो, सूक्ष्म गतीनं का होईना जाणिवा रुंदावतात.

प्रश्न : दलित जाणीव कायम, निरंतर राहणारी ?

'दलितत्व' याचा अर्थ मागासलेपण असा केल्यास हे मागासलेपण लवकर दूर होण्याची शक्यता कमी. शिवाय दलित याचा अर्थ 'शोषित' असाही आहे. प्रश्न एक मध्ये याचं सविस्तर उत्तर आलं आहे.

प्रश्न : जातिसंस्था बदलत गेल्यावर काय ?

जातिसंस्था जरी बदलत गेली, तरी समाजाचं होणारं विविध प्रकारचं शोषण संपेलच असं नाही. सत्ता–संपत्ती काही ठराविक लोकांच्या हाती केंद्रित होण्याची प्रक्रिया समाजात सातत्यानं चालू राहते. या साचलेपणाविरुद्ध बंड करण्याची सतत निकड असते. या दृष्टीनं 'दलित जाणीव' चातुर्वर्ण्यव्यवस्था गेली तर कायम राहील. परंपरागत मूल्यकल्पनेच्या संदर्भातही विद्रोह कल्पनेला महत्त्व आहेच.

प्रश्न : 'शहरी दलित साहित्य' आणि 'ग्रामीण दलित साहित्य' वेगळं मानावयाचं ?

काही दलित मंडळी शहरात राहतात. चांगल्या फ्लॅटमध्ये राहतात. त्यामुळे ती खेड्यापासून वेगळी झाल्यासारखी वाटतात. पण त्यांची बरीच कौटुंबिक मंडळी खेड्यात असतात; त्यामुळे शहरात राहणारा लेखकही हा ग्रामीणतेपासून मुक्त होऊ शकत नाही. त्याची नाळ एकच असते. अजून तरी ती तुटलेली नाही. त्यामुळे शहर घेतलं काय किंवा खेडं घेतलं काय, दलित जाणिवांच्या संदर्भात तपशील वेगळता सारखेपणा आढळतो.

प्रश्न : दलित अस्मिता ठेवणं यात vested interest आहे ?

दलितत्व कायम ठेवण्यात vested interest आहे असं लेखकाच्या किंवा कलावंताच्या संदर्भात तरी म्हणता येणार नाही. इतर कशात गुंतण्यापेक्षा लेखकाला स्वतःची अशी identity असते. सामाजिक identity वेगळी, कलावंताची identity वेगळी, लेखक म्हणून individual identity जपणं मला महत्त्वाचं वाटतं.

प्रश्न : तुम्ही काय लिहिता ? तोच फॉर्म का ?

मी कविता लिहिलेल्या आहेत. आणि 'बलुतं' हे माझं आत्मचरित्रपर पुस्तक प्रसिद्ध झालेलं आहे, हे तुम्हाला माहीत आहेच. माझं काही कथासाहित्य हिंदीत प्रसिद्ध झालेलं आहे. कथांचा मराठी संग्रह प्रसिद्ध झाला आहे. अलीकडे मी काही 'लोकगीतं'ही लिहू लागलो आहे. 'तात्पर्य' मासिकातून मी 'जागल्या' या टोपणनावानं काही political social satire ही लिहिली आहे. 'चावडी' या नावानं ती प्रसिद्धही झाली आहे. या प्रकारचं लेखन मराठीत कमी आहे. साप्ताहिक 'दिनांक' मधूनही मी काही लेखन करतो. मी या ना त्या कारणानं भारतभर प्रवास केलेला आहे. तेव्हा त्यावर आधारित विस्तारानं प्रवासवर्णन लिहिण्याचाही इरादा आहे. अमुकच एक लेखनप्रकार मी निश्चित केलेला आहे असं नाही. सुचेल–स्फुरेल तसं मी लिहितो. माझ्या 'कोंडवाड्या'तील कवितात बरेच स्वानुभव आहेत असं मला नंतर आढळून आलं. त्यातूनच 'बलुतं' सारखं आत्मचरित्र लिहिण्याची मला कल्पना सुचली. 'बलुतं' लिहिल्यानंतर मला का कोण जाणे 'लोकगीतं' रचण्याचंही स्फुरण होऊ लागलं. माझ्या लेखनाचा प्रवास हा असा आहे. अमूकच फॉर्मला चिकटून राहावं असं मला अजून तरी वाटत नाही. एका फॉर्मकडून दुसऱ्या फॉर्मकडे मी सहज जातो.

प्रश्न : तुमच्या साहित्यात भर कशाला ? स्वानुभव ? कल्पना ? इंटरप्रिटेशन ?

भर स्वानुभवावरच. कल्पनामिश्रण तसं कमी. Interpretation ची भूमिका जरूर आहे. आपल्याला येणाऱ्या अनुभवाचं स्वरूप सामाजिकदृष्टया पडताळून पाहावं, विचारात घ्यावं असं मला वाटतं. मात्र अनुभवांवर सिद्धांतांची कुरघोडी होऊ नये; याचीही मी काळजी घेतो. अनुभव आणि idealogy यांच्या संघर्षात मी अनुभवांनाच प्राधान्य देतो.

प्रश्न : इतर जातींचं चित्रण करावंसं वाटतं काय ?

पुष्कळ विषयांना स्पर्श करावा असं वाटतं. उदाहरणार्थ, मुंबईतील महारोगी, त्यांच्यामार्फत होणारा दारूचा पुरवठा. तमासगिरांचे फड. या फडाबरोबर मुक्तपणे हिंडावं असंही वाटतं.

प्रश्न : तुमचं इतर साहित्याशी नातं काय ? ते अर्थशून्य वाटतं ? का पोचतच नाही ? (उदा. नागरी वैफल्य, एकाकीपण, सांस्कृतिक जीवन) दलितेतर अनुभवक्षेत्राबद्दल तुमचं काय म्हणणं आहे ?

इतर साहित्य मी अर्थशून्य मानीत नाही. तेही मी स्वागतशीलपणे वाचतो. हिंदीतील नवे लेखन मला विशेष जवळचे वाटते. लेखन किंवा लेखक कुठल्या जातीचा, कुठल्या प्रकारचा हे मला महत्त्वाचं वाटत नाही. त्यातील अनुभव मला महत्त्वाचे वाटतात.

इतर विषयांवर मलाही लिहावंसं वाटतं. थोडंफार लिहिलंही आहे. त्या संबंधात या आधी बोललो आहेच.

दलितेतर अनुभवाबद्दलही खूप आत्मीयता वाटते, स्त्री–पुरुष, आई–मुलगा, मनुष्य–निसर्ग यांच्या संबंधाबद्दल, एकंदर मानवाबद्दल, त्याच्या विविध अनुभवांबद्दल ओढ वाटते. स्वतःत साचलेल्या अनुभवांचा निचरा व्हावा, इतरांना आलेले अनुभव आपलेसे करावेत, असं खूप वाटतं. अजून असं फारसं लिहिलं नसलं तरी दलितेतर अनुभवावरही लिहिता येईल असा मला विश्वास आहे.

प्रश्न : तुमच्या अडचणी ? तक्रारी ? व्यथा ? आग्रहाचा विशेष मुद्दा ?

सुरवातीचा काळ सोडला तर तशा काही अडचणी आल्या नाहीत. माझं तसं खूप कौतुकच झालं आणि ते दलितांपेक्षा दलितेतरांनीच केलं, याचा आनंद आहे. कुठल्याही कलाकृतीमध्ये एक परंपरागत नायक असतो. समाजापासून तो दशांगुळं वर असलेला दाखविला जातो. तो आदर्शवादी असतो. ही आदर्शवादी भूमिका परंपरागत साहित्याप्रमाणे पुरोगामी साहित्यातही आढळते. या नायकाद्वारे मार्गदर्शकाचा पवित्रा घेतला जातो. यामुळे घडतं काय की जीवनदर्शनात एकांगीपणा येतो. जे वक्र लपलेलं असतं ते व्यक्त होत नाही. अंतर्विरोध तसेच राहतात. तेव्हा या प्रकारचं glorification टाळून असेल तसं जीवनदर्शन साहित्यानं घडविलं पाहिजे, असं मला आग्रहानं सांगावंसं वाटतं.

प्रश्न : दलित साहित्यानं मराठीला नेमकं काय दिलं ?

दडपलेलं अनुभवविश्व मुक्त केलं. या नव्या अनुभवविश्वाला सामोरं जाण्याचं धाडस दलित चळवळीनं दिलं आहे. आजपर्यंतच्या साहित्यात जी relationship दाखविली जात होती, ती 'रोमँटिक' किंवा काल्पनिक होती. घटना किंवा व्यक्तिचित्राला ठराविक दिशेनं फाटे फोडले जात होते. आकळलेल्या माणसांना बाहुल्यांचं रूप येत होतं. नवसाहित्यानं हे बदलण्याचा प्रयत्न केला. पण नवसाहित्यानं शून्यवादी सूर लावला. हा सूर बदलला तो दलित साहित्यामुळे. कार्यकारणभावाची जी एक ठराविक साखळी होती, ती तोडून तिला वेगळे संदर्भ दिले.

प्रश्न : फॉर्मबद्दल काय ?

फॉर्म वेगळा नसतो. अनुभवाप्रमाणे तो रूप धारण करतो. अनुभवच आपला फॉर्म शोधतो. आजवरच्या कवितेत प्रतिमेचा एका ठराविक दिशेनंच वापर केला जात होता. दलित कवितेनं प्रतिमेचा हा संदर्भ बदलला. नव्या प्रतिमा जन्माला घातल्या. उदा. 'कान नसलेली कविता' ही सकपाळे यांची प्रतिमा पाहा. केशवसुतांनी यापूर्वी हे थोडंफार केलं होतं. Total कविताच येथे एक प्रतीक होतं.

भाषेच्या संदर्भातही पुष्कळ शब्द, म्हणी, वाक्प्रचार नवीन आले. ग्रांथिक मराठीला अपरिचित असलेले बरेच नवे शब्द आले. उदा. 'गबागबा खा' हा भाषेचा feel वेगळा आहे. मराठीत ज्या शब्दांचा उच्चारही होत नव्हता, ते सर्रास उपयोजिले जाऊ लागले. बोलीभाषेचं सौंदर्य प्रकट केलं. आणि असं कितीतरी.

●

वस्तुस्थिती पाहता चातुर्वर्ण्यविरोधी चळवळीला अग्रक्रम दिला जाणे, हे परिस्थिती-प्राप्तच आहे.

प्रश्न : मार्क्सवादी किंवा साम्यवादी विचारांना तुमचा काही तात्त्विक विरोध आहे काय ?

नाही. माझा रोष तत्त्वतः मार्क्सवादविरोधी नाही. माझे चुलतेच कॉमरेड मेश्राम मार्क्सवादी होते. तक्रार आहे ती इथल्या मार्क्सवादी म्हटल्या जाणाऱ्या व कम्युनिस्ट म्हणविणाऱ्या मंडळींविरुद्ध. या मंडळींनी दलितांसाठी तसं काहीही केलेलं नाही. त्यांचं cause, तेवढं उचलून धरलं नाही. उलट, प्रसंग आले त्यावेळी आंबेडकरांना, आणि आंबेडकरांच्या चळवळींना विरोधच केल्याचा इतिहास आहे. तत्त्वतः मार्क्सवाद मला मान्य आहे. पण त्याचा येथील व्यवहार अमान्य आहे. म्हणून दलित चळवळीनं मार्क्सवादापेक्षा आंबेडकरवादाची कास धरणं आज इष्ट आहे. कारण आंबेडकरवाद हाच या चळवळीचा आरंभापासून खरा spokesman आहे. डॉ. आंबेडकर आणि त्यांचे विचार हेच येथील दलित चळवळीला मार्क्सवादापेक्षा आज तरी अधिक उपकारक आहेत.

प्रश्न : असं असूनही पूर्वाश्रमीच्या महार मंडळींखेरीज मांग, चांभार, ढोर ही अस्पृश्यमंडळी आंबेडकर चळवळीत मनापासून सामील झालेली का दिसत नाहीत ?

महार समाजानं आंबेडकरांच्या आदेशाप्रमाणं जसं धर्मांतर केलं, तसं मांग, चांभार वगैरेंनी केलं नाही. तसं ते केलं असतं तर त्यांना हे नवं भान आलं असतं. धर्मांतरामुळं आपण हिंदूधर्मीय नसल्याची जी जाणीव दिली, ती मानसिक परिवर्तनाच्या दृष्टींनं फार महत्त्वाची आहे. धर्मांतर न केल्यामुळं मांग, चांभार, ढोर वगैरे मंडळीत हे मानसिक परिवर्तन झालं नाही. तो जुन्यालाच अधिक चिकटून राहिला.

प्रश्न : धर्मांतर न करताही नव्या शिक्षणानं, बदलत्या परिस्थितीनं, औद्योगीकरणानं अस्पृश्य नसलेल्या इतर अनेकांना जर दलितविषयक चळवळीची निकड वाटते, तशी दलित असलेल्या पण पूर्वाश्रमी महार नसलेल्या वर्गाला ती तेवढी वाटू नये, त्यासाठी त्यांच्याकडून जोरदार प्रयत्न होऊ नयेत, हे चमत्कारिक नाही का ?

चमत्कारिक आहे खरंच. पण हा प्रश्नच तसा गुंतागुंतीचा आहे. मनुष्यस्वभावातील हेवेदावेही याला फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत. या चळवळीत शिरलेलं राजकारण, डॉ. आंबेडकरांनंतर दलित पुढाऱ्यांत निर्माण झालेली भांडणं हाही एक भाग आहे. धर्मांतरानंतर डॉ. आंबेडकर लौकरच निधन पावले. ही धर्मांतराची चळवळ कोणी नेटानं पुढं चालविली नाही. निर्माण झालेलं अनुकूल

वातावरण नष्ट होत गेलं. आंबेडकरांच्या निधनानंतरची ही वर्षं आपण फुकट दवडली.

प्रश्न : दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य ही परस्परसन्मुख का होत नाहीत ?

आजचं ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य यांच्या प्रेरणाच भिन्न आहेत. ग्रामीण साहित्याचा emphasis वाङ्मयीन आविष्कारावर अधिक आहे. वर्णाश्रमविषमतेचा तो फारसा विचार करीत नाही. प्रचलित गावगाड्याच्या चित्रणातच तो समाधान मानतो. दलित साहित्याचा emphasis सर्व नव्या जाणिवांवर आहे. हे साहित्य नव्या जाणिवांचाच एक भाग आहे. ग्रामीण साहित्याप्रमाणं ते sophistication कडेच लक्ष पुरवीत नाही. ही प्रबोधनाची चळवळ आहे. तीत पुढील सर्व प्रकारच्या प्रबोधनाची बीजं आहेत. पुढील सर्व नाट्याचं हे backstage आहे. त्याला सर्वांनी हातभार लावला पाहिजे.

प्रश्न : दलित जीवनाचं चित्रण अदलित लेखकांना जमणारच नाही असा एक सूर आहे. तुम्हाला काय वाटतं ?

जमेल. सहानुभूतीचं मोल मी कमी मानीत नाही. खोल सहानुभूतीनं लेखकाला पुष्कळच गोष्टी आत्मसात करता येतात. प्रा. माटचांची या दृष्टीनं contribution महत्त्वाची आहे. पण आजच्या दलितेतरांनी केलेल्या दलितचित्रणात अशा खोलवर सहानुभूतीपेक्षा स्वप्नरंजनाचा, decoration चा भाग अधिक आढळतो. उदा. 'चक्र', 'मुंबई दिनांक', 'कालचक्र' यासारखं मुंबईच्या परिसरावर आधारलेलं साहित्य घ्या. दलित जीवनात खोल शिरण्याऐवजी मराठीतील वाचकांना आपण काही नवीन देतो, यावरच हे साहित्य तृप्त आहे. जीवनाला हे साहित्य साक्षातपणं भिडत नाही. दलित–दलितेतर या विभागणीपेक्षा दलित वा दलितेतर लेखकाच्या समर्थतेचा, क्षमतेचा हा प्रश्न आहे. दलित जीवनावर लेखन करणारा समकालीन दलित जीवनाशी ज्या प्रमाणात तादात्म्य होईल, त्या प्रमाणात ते साहित्य बळ घेईल.

प्रश्न : जन्मानं दलित असूनही दलित स्वरूपाचं लेखन न करणाऱ्या 'ग्रेस'-सारख्या लेखकाबद्दल तुमचं काय म्हणणं आहे ?

लेखकाचं स्वातंत्र्य मी मानतो. ग्रेसना दलित जीवनाचा अनुभव असूनही त्यावर न लिहिता वेगळ्या पद्धतीनं लेखन करण्याचा जरूर हक्क आहे. त्यांनी आपले दलितविषयक अनुभव supress केले आहेत. आणि संवेदनांच्या वेगळ्या पातळीवरून लेखन केलं आहे. ते लेखन त्या पातळीवरून मलाही आस्वाद्यच वाटतं. ग्रेसप्रमाणे हिं. गो. बनसोडे हेही याच प्रवृत्तीनं लेखन करतात. दलित लेखकानं दलित अनुभवच व्यक्त केले पाहिजेत, अशी त्यावर सक्ती करता येणार नाही. पण दलित

वस्तुस्थिती पाहता चातुर्वर्ण्यविरोधी चळवळीला अग्रक्रम दिला जाणे, हे परिस्थिती-प्राप्तच आहे.

प्रश्न : मार्क्सवादी किंवा साम्यवादी विचारांना तुमचा काही तात्त्विक विरोध आहे काय ?

नाही. माझा रोष तत्त्वतः मार्क्सवादविरोधी नाही. माझे चुलतेच कॉमरेड मेश्राम मार्क्सवादी होते. तक्रार आहे ती इथल्या मार्क्सवादी म्हटल्या जाणाऱ्या व कम्युनिस्ट म्हणविणाऱ्या मंडळींविरुद्ध. या मंडळींनी दलितांसाठी तसं काहीही केलेलं नाही. त्यांचं cause, तेवढं उचलून धरलं नाही. उलट, प्रसंग आले त्यावेळी आंबेडकरांना, आणि आंबेडकरांच्या चळवळींना विरोधच केल्याचा इतिहास आहे. तत्त्वतः मार्क्सवाद मला मान्य आहे. पण त्याचा येथील व्यवहार अमान्य आहे. म्हणून दलित चळवळीनं मार्क्सवादापेक्षा आंबेडकरवादाची कास धरणं आज इष्ट आहे. कारण आंबेडकरवाद हाच या चळवळीचा आरंभापासून खरा spokesman आहे. डॉ. आंबेडकर आणि त्यांचे विचार हेच येथील दलित चळवळीला मार्क्सवादापेक्षा आज तरी अधिक उपकारक आहेत.

प्रश्न : असं असूनही पूर्वाश्रमीच्या महार मंडळींखेरीज मांग, चांभार, ढोर ही अस्पृश्यमंडळी आंबेडकर चळवळीत मनापासून सामील झालेली का दिसत नाहीत ?

महार समाजानं आंबेडकरांच्या आदेशाप्रमाणं जसं धर्मांतर केलं, तसं मांग, चांभार वगैरेंनी केलं नाही. तसं ते केलं असतं तर त्यांना हे नवं भान आलं असतं. धर्मांतरामुळं आपण हिंदूधर्मीय नसल्याची जी जाणीव दिली, ती मानसिक परिवर्तनाच्या दृष्टींनं फार महत्त्वाची आहे. धर्मांतर न केल्यामुळं मांग, चांभार, ढोर वगैरे मंडळीत हे मानसिक परिवर्तन झालं नाही. तो जुन्यालाच अधिक चिकटून राहिला.

प्रश्न : धर्मांतर न करताही नव्या शिक्षणानं, बदलत्या परिस्थितीनं, औद्योगीकरणानं अस्पृश्य नसलेल्या इतर अनेकांना जर दलितविषयक चळवळीची निकड वाटते, तशी दलित असलेल्या पण पूर्वाश्रमी महार नसलेल्या वर्गाला ती तेवढी वाटू नये, त्यासाठी त्यांच्याकडून जोरदार प्रयत्न होऊ नयेत, हे चमत्कारिक नाही का ?

चमत्कारिक आहे खरंच. पण हा प्रश्नच तसा गुंतागुंतीचा आहे. मनुष्यस्वभावातील हेवेदावेही याला फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत. या चळवळीत शिरलेलं राजकारण, डॉ. आंबेडकरांनंतर दलित पुढाऱ्यांत निर्माण झालेली भांडणं हाही एक भाग आहे. धर्मांतरानंतर डॉ. आंबेडकर लौकरच निधन पावले. ही धर्मांतराची चळवळ कोणी नेटानं पुढं चालविली नाही. निर्माण झालेलं अनुकूल

वातावरण नष्ट होत गेलं. आंबेडकरांच्या निधनानंतरची ही वर्ष आपण फुकट दवडली.

प्रश्न : दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य ही परस्परसन्मुख का होत नाहीत ?

आजचं ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य यांच्या प्रेरणाच भिन्न आहेत. ग्रामीण साहित्याचा emphasis वाङ्मयीन आविष्कारावर अधिक आहे. वर्णाश्रमविषमतेचा तो फारसा विचार करीत नाही. प्रचलित गावगाड्याच्या चित्रणातच तो समाधान मानतो. दलित साहित्याचा emphasis सर्व नव्या जाणिवांवर आहे. हे साहित्य नव्या जाणिवांचाच एक भाग आहे. ग्रामीण साहित्याप्रमाणं ते sophistication कडेच लक्ष पुरवीत नाही. ही प्रबोधनाची चळवळ आहे. तीत पुढील सर्व प्रकारच्या प्रबोधनाची बीजं आहेत. पुढील सर्व नाट्याचं हे backstage आहे. त्याला सर्वांनी हातभार लावला पाहिजे.

प्रश्न : दलित जीवनाचं चित्रण अदलित लेखकांना जमणारच नाही असा एक सूर आहे. तुम्हाला काय वाटतं ?

जमेल. सहानुभूतीचं मोल मी कमी मानीत नाही. खोल सहानुभूतीनं लेखकाला पुष्कळच गोष्टी आत्मसात करता येतात. प्रा. माटयांची या दृष्टीनं contribution महत्त्वाची आहे. पण आजच्या दलितेतरांनी केलेल्या दलितचित्रणात अशा खोलवर सहानुभूतीपेक्षा स्वप्नरंजनाचा, decoration चा भाग अधिक आढळतो. उदा. 'चक्र', 'मुंबई दिनांक', 'कालचक्र' यासारखं मुंबईच्या परिसरावर आधारलेलं साहित्य घ्या. दलित जीवनात खोल शिरण्याऐवजी मराठीतील वाचकांना आपण काही नवीन देतो, यावरच हे साहित्य तृप्त आहे. जीवनाला हे साहित्य साक्षातपणं भिडत नाही. दलित–दलितेतर या विभागणीपेक्षा दलित वा दलितेतर लेखकाच्या समर्थतेचा, क्षमतेचा हा प्रश्न आहे. दलित जीवनावर लेखन करणारा समकालीन दलित जीवनाशी ज्या प्रमाणात तादात्म्य होईल, त्या प्रमाणात ते साहित्य बळ घेईल.

प्रश्न : जन्मानं दलित असूनही दलित स्वरूपाचं लेखन न करणाऱ्या 'ग्रेस'-सारख्या लेखकाबद्दल तुमचं काय म्हणणं आहे ?

लेखकाचं स्वातंत्र्य मी मानतो. ग्रेसना दलित जीवनाचा अनुभव असूनही त्यावर न लिहिता वेगळ्या पद्धतीनं लेखन करण्याचा जरूर हक्क आहे. त्यांनी आपले दलितविषयक अनुभव supress केले आहेत. आणि संवेदनांच्या वेगळ्या पातळीवरून लेखन केलं आहे. ते लेखन त्या पातळीवरून मलाही आस्वाद्यच वाटतं. ग्रेसप्रमाणे हिं. गो. बनसोडे हेही याच प्रवृत्तीनं लेखन करतात. दलित लेखकानं दलित अनुभवच व्यक्त केले पाहिजेत, अशी त्यावर सक्ती करता येणार नाही. पण दलित

लेखकानं दलित अनुभव व्यक्त करावयाचे म्हटल्यास त्याची दिशा काय असावी याबद्दल मी बोलत होतो.

प्रश्न : दलित साहित्याच्या संदर्भात प्रचलित साहित्यनिकष निरुपयोगी आहेत असा एक मतप्रवाह आहे. तुमचा दोन्ही साहित्यविश्वाशी निकटचा संबंध आहे. तुम्हाला काय वाटतं ?

निकषांची ही समस्या व्यामिश्र आहे. दलित साहित्य चळवळच गुंतागुंतीची आहे. या बाबतीत विचार करता आमचा आज साहित्यविचार एकंदरीनं फार academic आहे. एक ठराविक फूटपट्टीच आपण साहित्याला लावतो. या बाबतीत काही वेगळे संदर्भ आहेत, संघर्ष आहेत, विचारधारा आहेत, जे unchallenged होतं, ते challenge झालेलं आहे. त्याकडं असावं तेवढं आपलं लक्ष नाही. वेगळेपण मान्य करण्यास आपण खळखळ करतो. मळवाट सोडून नव्या दृष्टीनं विचार करण्यास आपण तयार नसतो. एका वेगळ्या जाणिवेतून जे नव्यभावनांचं तांडव दलित साहित्यात सुरू झालेलं आहे, त्याला एकच एक फूटपट्टी लावण्याचा प्रयत्न करतो. हे सोडून दिलं पाहिजे. नवीन जाणिवा आत्मसात करून विचार केला पाहिजे याबाबतीत touchy किंवा sentimental होता कामा नये. What is Literature ? चं एकच एक उत्तर नाही. या बाबतीतील पुस्तकीपण सोडलं पाहिजे. उत्तम कलाकृतीचं मर्म त्या त्या कलाकृतीतच असतं.

प्रश्न : याचा अर्थ वेगवेगळी साहित्यशास्त्रं मानावीत असा घ्यावयाचा का ? तुम्ही तर वाङमयाचेच प्राध्यापक आहात. अशी वेगवेगळी साहित्यशास्त्रं अस्तित्वात असतात का ?

वेगवेगळी साहित्यशास्त्र नसतात का ? ग्रीक नाट्यशास्त्र आणि संस्कृत नाट्यशास्त्र ही वेगवेगळी नाहीत का ? लोकनाट्य वेगळं नाही का ? असा यावर प्रतिप्रश्न करता येणार नाही का ? समाजात जाणिवेचं आकलन, आस्वादनाचे अनेक स्तर असतात, वेगवेगळ्या बोली असतात, त्यांना वेगवेगळी रुची, गंध असतो. प्रतिमा–प्रतीकांबद्दलही हेच म्हणता येईल. सध्या जो निरनिराळ्या प्रकारचा cheos समाजात चालू आहे, त्यात दलित साहित्यही सापडलं आहे. उद्या जी मोठी इमारत बांधली जाणार आहे, तिचा हा एक प्रकारे कच्चा मालच आहे. दलित साहित्य समजून घेण्यास ठराविकापेक्षा एका वेगळ्या वैचारिकतेची, वेगळ्या mode of thinking ची मला गरज वाटते.

प्रश्न : म्हणजे वैश्विक, सार्वकालिक असं काही नसतंच का ?

वैश्विकता मी मानतो. पण काही वेळा काही साहित्य, ते contemporary असतं त्याला challenge देण्यासाठी जन्माला येतं. दलित साहित्य हे तसं आहे. अशावेळी आत्मावलोकनाची अधिक गरज असते. दलित साहित्याच्या बाबतीत

समीक्षक सामान्यतः असा विचार करीत नाहीत. त्यामुळे काही व्याजप्रश्न उपस्थित केले जातात.

प्रश्न : दलित साहित्य विचारात 'सोशल अँथ्रॉपॉलॉजिकल अ‍ॅप्रोच' चं स्थान काय ?

सोशल अँथ्रॉपॉलॉजिकल अ‍ॅप्रोचची आस्वादनालाच नव्हे तर निर्मितीलाही एक लेखक म्हणून मला गरज वाटते. अन्यथा लेखकात आत्मसंतुष्टतेची भावना निर्माण होण्याची शक्यता असते. दलित साहित्यातील जाणिवेची वर्गीय–वंशीय पाळंमुळं पाहण्याचा प्रयत्न केल्यामुळं जाणीव समृद्ध आणि व्यापक होण्यास मदतच होते. या दृष्टीनंच मी माझ्या काही साहित्यातून हा शोध घेण्याचा प्रयत्न चालविला आहे.

प्रश्न : दलित साहित्यावर घेण्यात येणाऱ्या आरोपांबद्दल तुमचं म्हणणं काय ? हे साहित्य प्रचारकी आहे, एकसूरी आहे, आक्रस्ताळं आहे, नकारात्मक आहे, केवळ समूहात्मक आहे इत्यादी.

काही काळ हे त्या अर्थानं प्रचारकी राहणारच. पण याही बाबतीत वर्गवारी केली पाहिजे. तारतम्य बाळगलं पाहिजे. सरसकटपणे असं विधान करणं बरोबर नाही. दलित साहित्यातील दुय्यम साहित्याकडे लक्ष देऊन, अशा प्रकारची विधानं केली जातात. त्यामुळं होतं काय, की त्यातील चांगल्या भागाकडं दुर्लक्ष होतं. उदा- 'आठवणींचे पक्षी' मध्ये प्रचार कुठं आहे ?

दुसरं असं की, साहित्य हे एकसूरी असणं किंवा नसणं हे लेखकाचा स्वतःवरचा पहारा किती जागरुक आहे किंवा नाही, यावर अवलंबून असतं. दलित साहित्यात पहारा असावा तेवढा जागरुक नाही. दुसरं असं की, दलित साहित्यलेखकांत आज महारवर्गच आघाडीवर आहे. तो एका विशिष्ट प्रदेशातून आलेला आहे. त्याचे काही विशिष्ट preferences आहेत. त्यामुळे हे साहित्य एकसूरी वाटतं. लेखकातील जागरुकता वाढल्यास हे एकसूरीपण कमी होईल. पुष्कळदा आजचा दलित लेखक स्वमनाचा आविष्कार स्वमतप्रतिपादन, तत्त्वविचार, सुधारणा यांसारख्या गोष्टी एकाच वेळी साधू इच्छितो. त्यामुळेही त्याची धार कमी होऊन ते एकसूरी किंवा बदसूरी बनते.

आता या साहित्यात आक्रस्ताळेपणा आहे हे मर्यादित अर्थानं खरंच. हे साहित्य नवं आहे. त्यात पुरेसा poise किंवा maturity आलेली नाही. कालांतरानेच ती येते. या दृष्टीनं मराठीतील बरंचसं साहित्य immature च नाही का ? उदा. 'बळी' कादंबरी. दुसरं असं की, दलित साहित्यावरील हाही आक्षेप दुय्यम कलाकृतींच्या अनुरोधानंच केला गेलेला आहे. दलित साहित्यात इतर कोणत्याही साहित्याप्रमाणेच प्रमाणतः चांगलं साहित्य कमी आहे. पण या साहित्याचं मूल्यमापन

आहे. पण विधायक (constructive) काम करणारे मात्र थोडे आहेत. तसं नसतं तर 'एक गाव एक पाणवठा' सारख्या महत्त्वाच्या चळवळींची परवड झाली नसती. बहुतेक 'अस्पृश्य' पुढाऱ्यांचं लक्ष स्वतःचं हित साधण्यावर, संघर्ष करण्यावर किंवा वरच्या नोकऱ्या मिळविण्यावर आहे, हे स्वाभाविक असेल; पण सबंध समाजाचा दूर दृष्टीनं विचार करता हे पुरेसं नाही. 'युक्रांद' सारखे दलितेतर गट अस्पृश्यांना मदत करण्यास तयार आहेत, पण त्यासारख्यांचं साहाय्य घेण्यास फारसं कोणी उत्सुक नाही. सर्व दलितांना एकत्र करण्याचा तसा प्रयत्नच होत नाही. भटक्या जाति-जमातींकडे ह्यापैकी कोणाचं तसं लक्षही नाही. खुद्द महारांतही मतभेद आहेतच. उदा. ना. रा. शेंडेसारख्या महार दलित लेखकाला धर्मांतराची भूमिका अमान्य आहे. धर्मांतर न केलेले काही महार आहेत.

प्रश्न : मार्क्सवादी-साम्यवादी जाणिवेशी या दलित जाणिवेचा संबंध काय? सर्व शोषितांना एकत्र आणण्यासाठी आंबेडकरवादाला मार्क्सवादाची जोड द्यावी, असं म्हणणारा एक पक्ष आहे; या भूमिकेबद्दल तुम्हाला काय वाटतं?

मी काही राजकारणाचा विद्यार्थी नाही किंवा एखाद्या राजकीय पक्षाचा कार्यकर्ता नाही. पण आंबेडकर चळवळीबद्दलचं माझं जे निरीक्षण आहे, त्यावरून आंबेडकरांना मार्क्सवादाबद्दल सुतराम् आत्मीयता नव्हती असं मला दिसतं. ते वृत्तीत: 'लिबरल डेमोक्रॅट' होते. त्यांचा कटाक्ष चातुर्वर्ण्यविरोधी, समताधिष्ठित मानवतावादावर होता. मार्क्सवादातील वर्गविग्रहाची कल्पना त्यांना मानवण्यासारखी नव्हती. मार्क्सवादानं हा प्रश्न सुटेल असं त्यांना वाटत होतं, असं मला वाटत नाही.

प्रश्न : आंबेडकरांच्या पूर्ववयातील शिक्षणव्यवस्थेची एकंदर स्थिती पाहता, आंबेडकरांचा मार्क्सवादाशी परिचय झालेला नव्हता. तसा तो असता तर आंबेडकर मार्क्सवादीच झाले असते, असं मानणारा दलित विचारवंतांचा एक गट आहे, त्याचं काय?

आंबेडकरवादाचा मार्क्सवादाशी सांधा जोडण्याचा हा प्रयत्न मला अप्रस्तुत वाटतो. आंबेडकरांसारख्या विचक्षण, बुद्धिमान, व्यासंगी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र ह्यांच्या गाढ्या अभ्यासकाला त्याच्या हयातीत मार्क्सवाद परिचितच झाला नव्हता, असं मानणंच भ्रामक आहे. आंबेडकरांचा जन्म १८९२ मधला. रशियन क्रांतीच्या वेळी ते तिशीच्या आसपास होते. या क्रांतीची वार्ता त्यांच्या कानावर गेली नव्हती असं मानावयाचं का? असं पाहा, आंबेडकरांची हयात मुंबईत गेली. येथील कामगार चळवळींशी त्यांचा संबंध आलेला होता. कामगार चळवळीत १९३० पासूनच मार्क्सवादी विचाराचा गट कार्य करीत होता. डॉक्टरांचा या

मंडळींशी या ना त्या प्रकारे संबंध आला होताच. मार्क्सचा आणि मार्क्सवादाचा त्यांनी वेगवेगळ्या संदर्भात, भारतीय परिस्थितीच्या संदर्भातसुद्धा, उल्लेख केलेला आहे. तेव्हा आंबेडकरांना मार्क्सवाद अपरिचित होता, असं म्हणण्यापेक्षा हेतुतःच ते मार्क्सवादापासून दूर राहिले, असं म्हणणंच सयुक्तिक ठरेल.

प्रश्न : हा वाद सोडला तरी दलित चळवळीनं व्यापक अधिष्ठानासाठी साम्य-वादी विचारांशी जवळीक साधणं योग्य नाही का ? अन्यथा ही चळवळ isolate होणार नाही का ?

दलित चळवळीनं मार्क्सवादी चळवळीशी जवळीक साधल्यानं ऐक्यवृद्धीऐवजी या चळवळीचं विघटनच होईल, अशी मला भीती वाटते. किंबहुना तसं झालंच आहे.

प्रश्न : कारण ?

ह्या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी आपल्याला एका वेगळ्या आणि मोठ्या क्षेत्रात जावं लागेल. तूर्त एवढंच दिसतं की, दलितांपैकी काही विचारवंत आणि कार्यकर्ते मार्क्सवादी आहेत आणि काही दलितेतर मार्क्सवादी विचारवंत दलित चळवळीच्या अगदी जवळ आहेत. पण पंधरा–वीस वर्षांत दलित चळवळ मार्क्सवादी झाल्याचं दिसत नाही किंवा मार्क्सवाद्यांनी ती आपलीशी केल्याचंही दिसत नाही.

प्रश्न : या परिस्थितीत आपल्या मते पर्याय काय ?

नव्या प्रबोधनानं निर्माण झालेला मानवतावादी पुरोगामी विचारांचा कंद समाज मनात रुजविण्यावर आपण भर दिला पाहिजे. तसंच, अन्यायनिर्मूलनाबद्दल समाजाला अधिकाधिक जागरुक केलं पाहिजे. समाजातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विषमता कमी व्हावी असं मानणारा, फार मोठा म्हटलं नाही, तरी लक्षात घेण्याजोगा सुशिक्षित पांढरपेशा समाज महाराष्ट्रात आहे. या दृष्टीनं महाराष्ट्रच देशातील इतर भागांच्या तुलनेनं अग्रभागी आहे.

प्रश्न : पेशवाईमुळं येथील चातुर्वर्ण्य देशाच्या इतर भागांपेक्षा अधिक तीव्र होतं. इतिहासकाळातील येथील ब्राह्मणवर्चस्वामुळं देशाच्या इतर भागांपेक्षा ब्राह्मण–ब्राह्मणेतरवाद तदनुषंगिक स्पृश्यास्पृश्यवाद येथेच अधिक तीव्र आहे, असं मानणारे काही लोक आहेत. मुसलमानी आक्रमणामुळं उत्तर भारतात जातिभेद कमी झाला असं म्हटलं जातं. तुमचं एकंदर पर्यटन लक्षात घेता, आणि दक्षिण आणि उत्तर या दोन्ही भारतीय विभागांशी आलेला तुमचा संबंध लक्षात घेता याबद्दलचा तुमचा अभिप्राय जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.

माझ्या माहितीप्रमाणं तरी तुम्ही वर उभं केलेलं चित्र हे बरोबर नाही. आपल्यापेक्षा उत्तरेतच हे वाद अधिक प्रबळ आहेत. तिथे बिहारराज्य सोडलं तर ब्राह्मणांना विशेष महत्त्व नाही. पण जाट, रजपूत, यादव यासारखे वाद ब्राह्मणे-

करताना हा चांगला भागच अधिक लक्षात घेतला पाहिजे. आक्रस्ताळेपणाचा आरोप करणाऱ्यांनी 'आग लागलेला किंचाळणारच' हेही लक्षात घेतलं पाहिजे.

आता नकाराबद्दल. दलित साहित्य हे बोलूनचालूनच एक नकार घेऊन जन्माला आलेलं आहे. पण हा नकार एका व्यवस्थेला आहे. आणि त्यातून जीवनाचा एक पॅटर्न जन्माला येणार आहे, हेही या बाबतीत लक्षात घ्यावयास हवं. घाईघाईनं हा प्रश्न निकालात काढता येणार नाही.

प्रश्न : 'दलित जाणीव' ही निरंतरची बाब मानावी की ही एक हंगामी लाट म्हणावी? तुम्हाला काय वाटतं?

दलित जाणीव निरंतर बाळगणं कोणालाच आवडणार नाही. दलित साहित्यानं किंवा चळवळीनं काही आदर्श समोर ठेवलेले आहेत. त्यांना पोचेतोपर्यंत ही जाणीव प्रबळ राहील.

प्रश्न : उद्या जातिसंस्था बदलली तर–

जातिसंस्था जरी बदलत गेली, तरी त्यामुळं विषमतेचा, माणसानं माणसाला पिळण्याचा प्रश्न मिटेल असं नाही. संघर्ष दीर्घकाळ चालू राहीलच. दलित जाणीव मग या संघर्षास जाऊन मिळेल.

प्रश्न : दलित साहित्यात 'शहरी', 'ग्रामीण' असा भेद मानावा, असं तुम्हाला वाटतं काय?

शहरी दलित साहित्य आणि ग्रामीण दलित साहित्य यात फरक आहेच. वेगळेपणाचे बरेच घटक आहेत. उदा. 'चितळाय' सारखा काव्यसंग्रह घ्या. तो एका विशिष्ट बोलीभाषेत आहे. ती समजून घेतल्याशिवाय हे काव्य समजणार नाही. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' याच जातीचे. खेड्यातील खास अनुभव व भाषेवर आधारलेले.

प्रश्न : दलित अस्मिता बाळगणं हा एक व्हेस्टेड इंटरेस्टचा भाग आहे असं म्हटलं जातं.

दलित अस्मिता बाळगण्यात व्हेस्टेड इंटरेस्ट आहे, हा मतलबी लोकांचा प्रचार आहे. कोणाही संवेदनशील मनाला, स्वाभिमानी माणसाला या जाणिवेच्या चिखलात कायमचं राहणं आवडणार नाही. पण ती टाळून पळून जाण्यातही अर्थ नाही.

प्रश्न : लेखक म्हणून तुमचा आवडता वाङ्मयप्रकार कोणता?

कुठलाही फॉर्म ठरवून मी लेखन केलेलं नाही. मी काव्य, कथा, कादंबरी, समीक्षा, वैचारिक असं विविध प्रकारचं लेखन केलेलं आहे. आत्मचरित्रपर लेखन करावं असंही वाटतं. माझ्या व्यक्तिचित्रणाचा एक लेखसंग्रह 'रुतलेली माणसं' प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. माणूस उलगडण्यास जो जो फॉर्म उपयोगी पडेल तो तो हाताळावा असं मला वाटतं. अमुकच असा आग्रह नाही.

प्रश्न : तुमच्या लेखनात भर कशावर असतो ? स्वानुभवकथनावर, कल्पनेवर की इंटरप्रिटेशनवर ?

भर स्वानुभवावर आहे. पण कुठलाही लेखक केवळ स्वानुभवावर भर देऊन लेखन करू शकणार नाही. कल्पनेचा डोळस आश्रय त्याला करावाच लागेल. पण त्याबरोबर वास्तवाचा त्याला बेसही पाहिजे.

इंटरप्रिटेशनचा भागही आहेच. पण इंटरप्रिटेशनसाठी वास्तव ठराविक साच्यात मी ओतलेलं नाही.

प्रश्न : दलितेतर जातीबाबत लेखन करावंसं वाटतं किंवा नाही ?

इतर जातीचं चित्रण माझ्या लेखनात आलेलं आहे. करावंसं वाटतंही.

प्रश्न : मग तुमच्या लेखनात दलित जीवनावरच सर्वाधिक भर का ?

इतर विषयांचं महत्त्व मानतो. पण जवळची माणसं आधी येणंही स्वाभाविकच नाही का ?

प्रश्न : दलितेतर साहित्याबद्दलचा तुमचा अभिप्राय काय आहे ? ते तुम्हाला अर्थपूर्ण वाटतं की अर्थशून्य ?

इतर साहित्य अर्थशून्य वाटत नाही. एका लेखकाला दुसरा लेखक, दुसरा माणूस काय करतो, हे विचारात घ्यावंच लागतं. पाहावंच लागतं. ती त्याची स्वाभाविक अशी प्रक्रियाच असते.

प्रश्न : तुम्ही मराठी साहित्याचे प्राध्यापकच आहात. तुमचा दलितेतर साहित्याशी अर्थात संबंध आहेच. पण व्यक्तिशः तुम्हाला ते कितपत आस्वाद्य वाटतं ?

आपापल्या परीनं आस्वाद्य होतं, हे मी मघाशी ग्रेसच्या संदर्भात बोललो आहेच. नागरी एकाकीपण, वैफल्य इत्यादी. घटक लेखक म्हणून विचारात घ्यावेसे वाटतात. पण ते अलगपणे न घेता एकंदर आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक संदर्भात विचारात घ्यावेसे वाटतात.

दलितेतर क्षेत्रातील अनुभवही प्रक्षोभक आहेत. त्यांचाही विचार दलित लेखकानं करावयास पाहिजे, असं मी मानतो. लेखकानं कोणतेच अनुभव वर्ज्य मानू नयेत. या दृष्टीनं दलितेतर लेखकांनीही दलित अनुभवांचा विचार करावा, असं सुचवावंसं वाटतं.

प्रश्न : लेखक म्हणून तुमच्या खास अशा काही अडचणी, तक्रारी, व्यथा ?

खास अशा काही अडचणी नाहीत. तक्रारीही नाहीत.

दलित अनुभवांचा नीट विचार न होणं, त्यातील दुय्यमपणावर भर देऊन समीक्षा लिहिली जाणं, दलित जीवनाचं चित्रण इतरांनी decorative पद्धतीनं करणं

किंवा खुद्द दलित लेखकांनीही या अनुभवांच्या गाभ्यात जाण्याचा अधिक प्रयत्न न करणं, व्यवस्था व व्यवस्था हाताळणारे होशा व मधल्या फळीतील लेखकांना विशेष महत्त्व देऊन नवी फाळणी करताना दिसतात. यासारख्या व्यथा मी ओघात बोलून दाखविल्या आहेतच.

प्रश्न : दलित साहित्यानं खास करून मध्यवर्ती मराठी साहित्याला काय दिलं ?

Social enlightment बद्दल मराठी literature मध्ये इतकं कुतूहल तेराव्या शतकानंतर प्रथमच निर्माण होत आहे. Out of the track असलेल्या समाजाबद्दल जी घृणा होती, तीबद्दल या साहित्यानं कणव जागी केली आहे. विविध पातळ्यांवर माणसं कशी जगतात, याचं भान आणून दिलं आहे. दलित साहित्य हे विविध, विचित्र जाणिवांच्या रहदारीचं एक central bus station बनलं आहे. फार मोठं जनजागरण ते करीत आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री यापासून सामान्यापर्यंत एक awareness या साहित्यानं जन्माला घातली आहे. रेडिओ, टी. व्ही. मुळे ही जाणीव आता खेड्यापाड्यापर्यंत पोचत आहे. त्याला आता केवळ एक nuisance value राहिली नाही. ते एक विधायक मूल्य बनत आहे. दलित साहित्यानं दिलेली ही नवी मूल्यगर्भ जाणीव एकंदर मराठी साहित्याच्या भावी विकासाला पोषक ठरणार आहे, अशी माझी धारणा आहे.

# ६ : वामन निंबाळकर

ग्रंथालय ठाणे
३९५३
दि. २०-२-२९
निबंधकरान ४९
शाखा (स्थळ)

[ ' गावकुसाबाहेरची कविता ' लिहिणारे म्हणून मान्यता पावलेले कवी. त्यांची आईवरील कविता, कवी यशवंतांच्या कवितेप्रमाणेच खूप गाजली. त्यांची ही 'माय' सर्व दलित व्यक्तीच्या आईचे, तिच्या वेदना-व्यथांचे प्रतिनिधित्व करते. आई–मूल नाते सर्वत्र आपण सर्वात प्रेमाचे मानतो. ते बरोबरही असतं. पण यशवंताच्या आईशी वामनराव निंबाळकरांच्या आईसंबंधीच्या कवितेशी तुलना केल्यास या सनातन नात्यातही सांस्कृतिक भेदामुळे केवढे वेगळेपण निर्माण होते याची कल्पना येते.

निंबाळकर कवी म्हणून जरी आरंभकाळात पुढे आलेले असले तरी आज ते एक सार्वजनिक कार्यकर्ते आणि दलित साहित्याचे प्रकाशक या नात्याने विशेष प्रसिद्ध आहेत. ' अस्मितादर्श 'च्या संस्थापकांपैकी ते एक. अलीकडे त्यांनी नागपूर हे आपले कार्यक्षेत्र बनविले आहे. मुलाखतीच्या निमित्ताने नागपुरात मी जेव्हा त्यांच्या घरी गेलो, तेव्हा त्यांच्याकडे सातत्याने चाललेल्या माणसाच्या वर्दळीची मला कल्पना आली. त्यांच्या लोकप्रियतेचा आणि कार्यकुशलतेचाही प्रत्यय आला. आवतीभोवतीच्या भाऊगर्दीत ते मला लगेच मुलाखत देतील किंवा नाही, याबद्दल मी साशंक होतो. सकृत्दर्शनी ते थोडे उग्रही वाटतात; पण त्यांच्या बोलण्यात जो गोडवा आहे तो आश्वासक असतो. त्यांनी माझ्या प्रश्नांना दिलेली उत्तरे ठाम स्वरूपाची होती. मार्क्सवादी विचारसरणीवर ती आधारलेली आहेत, पण त्यात अधिकपणा नाही. स्वानुभवाचे, आवतीभोवतीच्या अवलोकनाचे एक बळ त्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहे. ही निश्चितार्थता किंवा स्पष्टता दलित भूमिका ठाशीव स्वरूपात समजून घेण्यास उपकारक ठरणारी. ]

---

प्रश्न : ' दलित जाणीव ' म्हणजे नेमकं काय ?

या प्रश्नाचं उत्तर देताना त्याचे दोन भाग करावे लागतील. आमचा जो भूतकाळ होता तो एक भाग व त्याविषयी वाटणारी चीड हा दुसरा भाग.

जातियतेमुळे किंवा कोणत्याही अन्य कारणानं आलेलं शोषण, याविषयी निर्माण झालेली चीड, या चिडीतून संघर्ष करावा अशी निर्माण झालेली जाणीव म्हणजे माझ्या मते ' दलित जाणीव. '

प्रश्न : पण असा भूतकाळ उकरून काढणं बरोबर आहे का ?

अहो, अजूनही अन्याय होतात. ते लोकांसमोर मांडणं आवश्यक आहे. नागपूर परिसरातील घटना पाहा. अशिक्षित व अस्वच्छ राहणारा गोंड समाज अजूनही उच्चशिक्षित व स्वच्छ राहणाऱ्या बौद्धांना महार, अस्पृश्य मानतो. जे अदलित असं म्हणतात की, दलितांनी आता भूतकाळ उकरून काढणं उचित नाही. ते धास्तावलेल्या मनाचे आहेत. डरपोक वृत्तीचे आहेत. दलितांचा भूतकाळ हा दलितांचा वर्तमानकाळही आहे. खेड्यांतच काय पण शहरातही अजून जातीयता आहे. अगदी भरपूर प्रमाणात आहे. म्हणून भूतकाळ उकरून काढण्यानंच आम्हाला वर्तमानकाळाचं भान राहणार आहे.

प्रश्न : 'दलित जाणीव' ही साम्यवादी जाणिवेहून वेगळी का मानावयाची ? तुम्ही साम्यवादी विचारधारा मानणारे, म्हणून विचारतो.

हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आर्थिक दृष्टीनं पिळलेले सर्वजणच 'दलित' असू शकतात. त्या दृष्टीनं सर्व दलितांनी एकत्र येण्यास हरकत नाही, यावयास पाहिजेच. पण जसाच्या तसा मार्क्स किंवा कोणतीही डावी विचारसरणी या देशाला लागू पडू शकत नाही. येथील जातिव्यवस्था वेगळी आहे. या देशातील जातिव्यवस्थेचा येथील अर्थकारणावर फार मोठा पगडा आहे. ठराविक लोक ठराविक धंदे करतात. कुंभार मातीचं काम करतो, चांभार चामड्याचं काम करतो. म्हणजेच येथील जातीचा आर्थिक व्यवस्थेवरही परिणाम झालेला आहे. खरं तर आम्हा सर्व शोषितांना साम्यवादाचा आणि समाजवादाचा विचार करावाच लागेल. साम्यवाद व समाजवाद यांचा व आमचा अतिशय जवळचा संबंध आहे. पण येथील आर्थिक विषमता जातीयतेवर अवलंबून असल्यानं या शोषणाचा थोडा वेगळाच विचार करावा लागतो. सगळे कामगार बोनसच्या प्रश्नावर एकत्र येतात. पण मुंबईच्या गिरणीतील शासनखात्यात शेड्यूल्ड कास्ट लोकांना ठेवत नाहीत. म्हणून साम्यवाद्यांना आधी जातिनिर्मूलनाचा विचार करावा लागेल. त्याला अग्रक्रम द्यावा लागेल. पण त्याबरोबरच साम्यवादाला डावलून चालणार नाही. प्रश्न साम्यवादाच्या स्वीकाराचा नसून अग्रक्रम कशाला द्यावा याचा आहे.

सबंध विषमतेविरुद्ध दलित साहित्याचा लढा आहे. आमचा पहिल्या नंबरचा शत्रू जातीयता व दुसऱ्या नंबरचा शत्रू भांडवलदार. इथला प्रमुख रोग जातीयता हा आहे. म्हणून जातियतेचं निर्मूलन प्रथम केलं पाहिजे. कारण आमचा असा अनुभव आहे की, आर्थिक विषमतेविरुद्ध बोलणारे जातीच्या प्रश्नावर बोलत नाहीत. आमचे काही मराठे मित्र ब्राह्मणांच्या विरुद्ध बोलतात. पण स्वजातीतील सामाजिक दोषांबद्दल बोलत नाहीत. ते संपूर्ण विषमतेविरुद्ध बोलत नाहीत. ते दलितविरोधी आहेत. म्हणून आम्हाला सगळ्या शोषितांची बाजू घ्यावी लागेल. आता

काही साम्यवाद्यांना जातीयतेचा प्रश्न कळू लागला आहे, हे या दृष्टीनं सुचिन्हच होय.

प्रश्न : ' दलित साहित्य ' आणि ' ग्रामीण साहित्य ' यात तुम्हाला काही साम्य दिसतं किंवा नाही ?

दलित साहित्य हा मराठीतल्या कुठल्याही साहित्याचा भाग नाही. आनंद यादव, बोराडे हे आमचे मित्र आहेत. त्यांनी जो मराठी साहित्यात नव्हता तो ग्रामीण भाग आणला. पण खेड्यात ग्रामीण भागात दलित वर्गावर होणारा अन्याय मांडला नाही. दलित साहित्यानं जातीयतेनं शोषित माणूस आणला. ग्रामीण साहित्य जातीयतेवर हल्ला करू शकलं नाही. ग्रामीण अंधश्रद्धांवर, चमत्कारांवर हल्ला करणाऱ्या कथा ग्रामीण साहित्यात नाहीत. ग्रामीण साहित्य व दलित साहित्य यात कोणतंही साम्य नाही. ग्रामीण कथांत काही आर्थिक शोषणाचा भाग आहे खरा; पण त्या आलेल्या कथा मर्यादित आर्थिक शोषणापर्यंतचाच विचार करतात. त्यांनी गावातील अंधश्रद्धेवर हल्ला केला नाही. किंवा त्यांनी ग्रामीण लोकांना शिक्षित करण्याच्या प्रेरणा दिल्या नाहीत. ग्रामीण साहित्याला तत्त्वज्ञान नाही, विचार नाही, मूल्य नाही, वैचारिक प्रेरणा नाहीत, जाणिवा नाहीत, ती एक टूम आहे. पण दलित साहित्याला आत्मा–परमात्मा मान्य नाही, देवही नाही. आम्ही जी काही मूल्यं, जाणिवा प्रेरणा स्वीकारल्या आहेत त्या वेगळ्या आहेत, त्यांचं स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे.

प्रश्न : दलित साहित्याला वेगळे निकष लावावेत, न लावावेत याबद्दल तुमचं मत काय ?

दलित साहित्याला वेगळे निकष लावायला पाहिजेत. साहित्याचे नेहमीचे निकष तर लावायलाच पाहिजेत, पण कलेच्या सौंदर्याच्या संदर्भात दलित साहित्याचं वेगळं मूल्यमापन झालं पाहिजे. वेगळे साहित्यशास्त्र नव्हे, पण आधीच्या साहित्याचे निकष दलित साहित्याला जसेच्या तसे लावता येत नाहीत. उदा. प्र. ई. सोनकांबळे यांचे ' आठवणीचे पक्षी.' त्याची भाषा वेगळी व विशिष्ट आहे. भाषेची नेहमीची कसोटी येथे उपयोगी पडत नाही. त्यांची शैलीही वेगळी आहे. या वेगळेपणातूनच तिचा जिवंतपणा, खरेपणा प्रकट होतो. पण त्याबरोबरच दुसरीही एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, नामदेव ढसाळ, बाबुराव बागुल आदींच्या साहित्यात क्वचित् अश्लील शब्द येतात. या शब्दांमुळे त्यांच्या लेखनात जिवंतपणाही येतो. पण हे शब्द येतात म्हणूनच जिवंतपणा येतो असं जर कोणी म्हणेल तर हे मला मान्य नाही. यशवंत मनोहरांच्या कवितेत असे शब्द यत नाहीत. पण त्यामुळे त्यांच्या कवितेत जिवंतपणा नाही असं कोणी म्हणणार नाही. दलित साहित्याला वेगळे निकष लावावेच लागतील. त्याला कारण दलितांचं अनुभवविश्व व इतरांचं अनुभवविश्व यात कमालीचा फरक आहे. हे जीवनवादी साहित्य असल्यानं त्याला त्याच कसोट्या लावाव्या लागतील.

प्रश्न : दलित साहित्यावरील काही आक्षेपांसंबंधी ते प्रचारकी आहे, असं म्हटलं जातं.

हा आरोप चुकीचा आहे. कोणतंही साहित्य हे कमी–जास्त प्रमाणात प्रचारकी असतं. संतसाहित्यदेखील लोकांनी भक्तीच्या मार्गं लागावं या उद्देशानंच लिहिलं आहे. साहित्यात प्रचार येऊ नये असं म्हणणं चूक आहे. जे प्रचारकी असतं ते कलात्मक नसतं, असं मी म्हणणार नाही. ते ढोबळ प्रचारकी असू नये, असं कोणीही म्हणेल.

प्रश्न : हे साहित्य एकसूरी आहे, असा एक आक्षेप.

हा आक्षेप मात्र थोडयाफार प्रमाणात मान्य. इथं काही काळ नामदेव ढसाळ किंवा वामन निंबाळकरांची नक्कल होत होती. पण अलीकडे परिस्थिती बदललेली आहे. दलित साहित्यातील सूर बदलत आहेत. कोणतंही साहित्य काही काळ एक-सूरी राहतं. ती अपरिहार्य अवस्था असते. दलित साहित्यात आता केवळ दुःखाचाच सूर उमटत नाही. जगण्याचा आनंदही त्यातून व्यक्त होत आहे. निसर्गाकडे पाह-ण्याच्या दृष्टिकोनातही आता वेगळंपण येत आहे. दलित साहित्य आता पुढे झेपावू लागलं आहे.

प्रश्न : दलित साहित्यात समूह येतो, पण व्यक्ती येत नाही, असंही म्हटलं जातं.

त्याचं कारण असं आहे की अन्याय, अत्याचार सबंध समाजावरच झालेला आहे. म्हणून दलित साहित्यातही सबंध समाजच अवतरतो. पण त्याबरोबरच हे सामाजिक दुःख व्यक्तीचंही असतं. माझ्या ' माय ' या कवितेत जे दुःख आहे, ते समाजाचं दुःख आहे, आणि ते माझंही आहे. वास्तवातील ती माझी माय असली तरी ती साऱ्या समाजाचं प्रतिनिधित्व करते.

प्रश्न : हे साहित्य काहीसं आक्रस्ताळं आहे, असं नाही तुम्हाला वाटत ?

तो आक्रस्ताळेपणा नाही. ती वर्षानुवर्षाची चीड आहे. पण काही लोकांचे आमच्याबद्दलचे चुकीचे समज आहेत. ते आम्हाला बरोबर समजून घेत नाहीत. माझा चेहरा थोडा उग्र आहे. मी इतरांपेक्षा अधिक मोठयानं बोलतो. मुद्दा पटवून देण्यासाठी कधी कधी आवाज चढवतोही. म्हणून मी आक्रस्ताळा ठरतो काय ?

प्रश्न : हे साहित्य अधिकतर प्रमाणात नकारात्मक नाही काय ?

पुढे हे पॉझिटिव्ह होईल. दलितांनी जसं काही नाकारलेलं आहे, तसंच काही स्वीकारलेलंही आहे. धर्मांतराच्या वेळी बाबासाहेबांनी बावीस प्रतिज्ञा दिल्या आहेत त्यासुद्धा नकारात्मकच आहेत. आजचा नकार काहीतरी स्वीकाराच्या संदर्भातील आहे. नकारात्मकता ही एक अवस्था असते, ती अपरिहार्यही असते. जेव्हा एखादी गोष्ट नाकारली जाते, त्याचवेळी नाकारणारा दुसरी बाजू स्वीकारत असतो.

प्रश्न : प्रचलित दलित जाणीव ही कायम स्वरूपाची राहील असं तुम्हास वाटतं?

नाही. प्रचलित दलित जाणीव ही कायम राहणारी बाब नाही. जसजशी विषमता संपेल तसतशी ती कमी होत राहणार. पण त्याबरोबरच ती पुढे पुढे वेगवेगळ्या विषमतेच्या संदर्भात वाढत राहील. हे अंतर लवकर आणि सहजासहजी तुटणारं नाही. दलित जाणीव ही वेगळ्या संदर्भात व्यक्त होईल. सर्व शोषणाच्या विरुद्ध ती उभी राहील. तिचे संदर्भ व अर्थ बदलतील.

प्रश्न : दलित साहित्यात 'शहरी' व 'ग्रामीण' असं काही वेगळेपण जाणवतं का?

शहरी दलित साहित्यिक जातियतेचा मुद्दा स्ट्रेस करतात. शहरातील आर्थिक दारिद्र्य, भूक इत्यादींवर भर देतात. पण खेड्यातील दलित साहित्यिक ज्यात प्र. ई. सोनकांबळे, मी, योगीराज वाघमारे वगैरे लेखक येतात. हे लेखक गावातील जातीयतेचं चित्रण करण्यावर भर देतात. म्हणूनच दलिताची व्याख्या करताना आम्ही या व्यवस्थेत जातीयता व आर्थिक विषमता अंतर्भूत करू इच्छितो.

प्रश्न : वेगळी दलित अस्मिता जपणं हा एक vested interest चा प्रकार आहे असं म्हटलं जातं. तुमचा अभिप्राय काय ?

आक्षेप चुकीचा आहे. त्याचं कारण असं की, कुणालाही आपण दलित, लाचार असणं हे आवडणार नाही. काहीसा हेतुपुरस्सर हा आक्षेप घेतला गेला आहे. आम्हाला सदा सर्वकाळ सवलती नकोत. अशक्त माणसाला सशक्त करण्याचा हा भाग आहे. खालच्या माणसाला समांतर आणण्याचा हा भाग आहे. अजूनही राखीव जागा भरल्या जात नाहीत व हे हेतुपुरस्सरपणं केलं जातं, आणि सवलतीच्या विरुद्ध खोटा प्रचार केला जातो. दलितांचं पूर्ण रिझर्वेशन भरलं जात नाही. सवर्ण लोक हे पाहात नाहीत. दलितांच्या राखीव जागांविरुद्ध आंदोलन करणं हा एक राजकीय डाव आहे.

प्रश्न : तुमचा आवडता वाङ्मयप्रकार कोणता ?

मी तिन्ही फॉर्मस् हाताळतो : कविता, कथा, कादंबरी. शिवाय समीक्षाही लिहितो. नाटकाचाही फॉर्म माझ्या डोक्यात आहे. कविता मी सुरुवातीपासून लिहितो. ती का लिहितो हे मला समजत नव्हतं. पण लिहीत होतो. मी कथा का लिहिल्या, तर कवितेत जो आशय व्यक्त करताना अडचणी यायच्या. त्या दूर व्हाव्यात म्हणून मी कथा लिहिल्या.

प्रश्न : तुमच्या लेखनामागील प्रेरणा कोणत्या ?

दलितेतरांना दलितांच्या जीवनाबद्दल जागं करणं हा त्यातला भाग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानापासून मिळालेल्या प्रेरणा.

प्रश्न : तुमच्या लेखनात भर कशावर ? स्वानुभाव, कल्पना, की इंटरप्रिटेशन ?

माझ्या कवितेमधील सगळाच आशय अनुभवातून आला आहे.

प्रश्न : दलितेतर जीवनावरही आपण लिहावं असं तुम्हाला वाटतं की नाही ?

वाटतं. कलावंत म्हणून अजूनही बरंचसं लिहिण्यासारखं राहिलं आहे. आणि हे लिहिलं गेलं पाहिजे असं वाटतं. मध्यमवर्गीय व सवर्णाबद्दलही त्यांच्या चांगुलपणावर लिहिलं पाहिजे असं वाटतं. आता दलित कलावंतांना स्वत:बद्दलचं बरंचसं लिहिण्यासारखं, सांगण्यासारखं आहे. त्यामुळे त्यावरच भर राहतो. हे संपेल तेव्हा तो इकडे तिकडे शोधेल. त्यातून नवं येईल.

प्रश्न : तुमच्या साहित्यविषयक अभिरुचीबद्दल थोडं सांगाल काय ?

दलित साहित्य म्हणून जे लिहिलं जातं त्यातलं चांगलं ते आवडतं. ज्यात खोल सामाजिक जाणीव असेल ते आवडतं. मग ती जाणीव जातियतेच्या संदर्भात असली पाहिजे असं नाही. कोणत्याही शोषणाविरुद्ध ही जाणीव असली पाहिजे. उदा. डॉ. अरुण लिमयेचं 'क्लोरोफॉर्म'. शोषणविरोधी नसलेलं असंही निखळ सौंदर्यपूर्ण साहित्य मला आवडतं. उदा. ग्रेसची कविता. जरी ग्रेसचा दलित साहित्याशी काहीही संबंध नसला तरी मला त्यांची कविता आवडते. नवसाहित्यातील चांगलेपणा आवडणारा आहे. मात्र एखाद्या प्रतिभावंतानं चांगल्या शैलीत प्रतिगामित्वाचं समर्थन केलेलं असल्यास ते मला आवडणार नाही.

प्रश्न : दलितेतर अनुभवावर लेखन करण्यात काही अडचण जाणवते ?

दलितेतर क्षेत्रातील अनुभवही महत्त्वाचे आहेत. पण माझ्या दृष्टीनं तूर्त त्यांच्याकडे लक्ष देण्यास वेळ नाही. दलितांना या घडीला स्वत:चे अनुभवच अधिक निकडीचे वाटतात.

प्रश्न : तुमच्या साहित्यव्यवहारात तुम्हाला काही अडचणी जाणवतात का ?

सुरवातीला वाटायच्या. आता वाटत नाहीत. सुरवातीला अनेक नियतकालिकं माझं साहित्य स्वीकारत नसत, पण आता घेतात.

प्रश्न : या क्षेत्रातील इतर अडचणींबद्दल काही सांगाल का ?

आमचं साहित्य अनेक लोकांकडं गेलं पाहिजे. पण ते लोकांपर्यंत नीट पोहचावं अशी यंत्रणा आमच्याकडे नाही.

प्रस्थापित पत्रिकातून फक्त दलित मान्यवर साहित्यिकांचंच लेखन छापलं जातं. तेथे नवोदितांना फारसं स्थान नाही.

सर्व प्रकारच्या चांगल्या साहित्याच्या प्रकाशनाची व्यवस्था व्हावयास पाहिजे. शासनमान्यता व अनुदान मिळणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्था व ग्रंथालयांना हे साहित्य अग्रक्रमानं विकत घेण्याचे आदेश शासनानं दिले पाहिजेत.

प्रश्न : दलित साहित्याचं एकंदर मराठी साहित्याच्या संदर्भात योगदान कोणतं?

दलित साहित्यानं मराठी साहित्याला मौलिक अशी दृष्टी दिली. आज दलित साहित्यात जो नायक उभा राहतो, तो खूप प्रभावीपणे व बेडरपणे उभा राहतो. मराठी साहित्यानं तो नायक यापूर्वी पाहिलेला नाही. ही फार मोठी देन आहे.

अभिव्यक्ती व आविष्काराच्या बाबतीत दलित साहित्यानं मराठी साहित्याला फार मोठी देन दिलेली आहे. उदा. शैली, भाषा, अभिव्यक्ती आदी.

दलित साहित्यानं नवा आशय दिला. नवी शैली दिली. दलित साहित्यातील नवा फॉर्म आत्मनिवेदनाचा.' बलुतं ', मुक्काम पोस्ट ', ' देवाचे गोठणे ',' आठवणीचे पक्षी ' इत्यादी. मात्र याबरोबर असंही वाटतं की लोककलांच्या माध्यमातून नव्या जाणिवा व्यक्त केल्या गेल्या पाहिजेत. लावणी, तमाशा या माध्यमांतून ते सामान्य लोकांपर्यन्त पोहोचेल.

प्रश्न : लोककलांच्या अवलंबामागील तुमच्या मते अडचणी कोणत्या ?

लोककलांना प्रथम सामाजिक दर्जा व मान्यता मिळावयास हवी. तसेच शासकीय व आर्थिक आश्रय व मदत मिळावयास हवी. लोककलांचा अवलंब करताना त्यातील अश्लील हीन प्रवृत्तींचा द्योतक असलेला भाग काढून टाकावयास हवा. लोककलांचा प्रसार व प्रचारासाठी ग्रामीण आणि शहरी रसिक श्रोतें व प्रेक्षक यांचा ओढा वाढेल. यासाठी कसोशीनं प्रयत्न व्हावयास हवेत.

प्रश्न : तुम्हाला स्वत:बद्दल वा दलित साहित्याबद्दल आणखी काही सांगावंसं वाटतं ?

मी स्वत:ला कलावंत म्हणून घेण्यापेक्षा सामाजिक कार्यकर्ता म्हणून घेण्यात अधिक धन्यता मानतो. कारण लिहिण्यात व कृतीत साम्य असलं पाहिजे तरच लिहिण्याला महत्त्व आहे. मी लिहिता लिहिता फील्डमध्ये उतरतो. त्यामुळं मला नवे अनुभव येतात. माझं अनुभवविश्व समृद्ध होत. प्रत्यक्ष काम व लेखन वेगळं आहे. तथापि कलावंतानं प्रत्यक्ष फील्डमध्येही उतरलं पाहिजे. कारण प्रत्यक्ष समाज बदलावयाचा असेल तर फील्डमध्ये उतरावं लागेल. त्याशिवाय वातावरणनिर्मिती होणार नाही. म्हणून कलावंताला कृतीचीही जोड पाहिजेच. जसं कागदावर काढलेल्या बंदुकीतून गोळी सुटत नाही, त्यासाठी प्रत्यक्ष हातात बंदूक घेतली पाहिजे. कृतीच्या बाबतीत माझे काही मित्र माझ्यावर नाराज आहेत. पण मला लेखन आणि प्रत्यक्ष कार्य यात एकसूत्रता असावी असं वाटतं.

●

# ७ : डॉ. गंगाधर पानतावणे

[ गंगाधर पानतावणे म्हटले की, अस्मितादर्श' ची हटकून आठवण होते, इतका या उभयतांचा अन्योन्य आणि अविभाज्य संबंध आहे, 'अस्मितादर्श' नियतकालिक आणि या नियतकालिकाच्यामार्फत भरविण्यात येणारा 'अस्मितादर्श' वार्षिक मेळवा ही आजच्या दलित साहित्यक्षेत्रातील व संस्कृतीतील एक अतिशय महत्त्वाची घटना. नव्या पिढीचे आशास्थान. नवरसिकांच्या वाङमय विचारविनिमयाचे आदान-प्रदानाचे एक प्रभावी व्यासपीठ. दलित लेखकांच्या आशा-आकांक्षा, मनोरथ, स्वप्ने फुलविण्याचे, त्यांचे संगोपन करण्याचे कार्य हे व्यासपीठ गेली काही वर्षे नियमाने करीत आलेले आहे. यात दलिताप्रमाणेच अदलित लेखक-वाचकही आनंदाने सहभागी होत असतात. या सर्वांमागे जी एक प्रमुख शक्ती वा व्यक्ती आहे ती म्हणजे डॉ. गंगाधर पानतावणे. डॉ. पानतावणे आज मराठवाडा विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करीत असले तरी त्यांचे खरे विद्यापीठ 'अस्मितादर्श' हेच आहे. त्यांनी आपल्या वाङ्मयीन कारकीर्दीचा प्रारंभ जरी ललितलेखनाने केलेला असला तरी ते आज प्रामुख्याने महाराष्ट्राला जे परिचित आहेत, ते दलित साहित्याचे व चळवळीचे एक व त्यामागील प्रेरणा प्रवृत्तीचे प्रमुख प्रवक्ते म्हणून ! अशा या महत्त्वाच्या व्यक्तीची मुलाखत प्रस्तुत स्थळी अंतर्भूत करता येत आहे, ही व्यक्तिशः मला फार समाधानाची बाब वाटते. मात्र ही मुलाखत प्रत्यक्ष भेटीतून निर्माण झालेली नसून पत्रव्यवहारद्वारा लेखी स्वरूपात प्रकट झालेली आहे.

वास्तविक डॉ. पानतावणे यांची व माझी गाठ-भेट नेहमीच होत असते. औरंगाबादला गेलो की मी त्यांची आवर्जून भेटही घेत असतो. त्यांच्या आतिथ्याचा लाभ मी घेतलेला आहे. पण असे असूनही प्रत्यक्ष मुलाखतीचा योग या ना त्या कारणाने हुकतच गेला. यामुळे या पत्रमाध्यमाचा अवलंब करावा लागला. त्यांनी आपल्या रेखीव लेखणीनें आणि पद्धतीने मांडलेले विचार पुढे दिले आहेत. ]

---

प्रश्न : 'दलित जाणीव' म्हणजे काय ?

जीवनानुभव हीच जाणीव असते. म्हणून दलित अनुभव हीच 'दलित जाणीव' होय.

दलित जाणीव ही इतर जाणीवांपेक्षा वेगळी आहे. हे वेगळेपण संस्कृती, इतिहास आणि वर्तमान ह्या संदर्भात स्पष्ट होतं. दलित लेखक हा भारतीय संस्कृतीच्या अंतर्गत असणाऱ्या शोषित व पीडित अशा उपसंस्कृतीचा घटक आहे. त्यामुळे त्याची जाणीव त्या संबंधानुरोधाने निर्माण झाली आहे.

भारतामध्ये आर्थिक शोषितांची संख्या मोठी आहे. परंतु आर्थिक व सामाजिक शोषण एकाच वेळी ज्यांचं झालं व होतं, अशांची संख्या त्याहीपेक्षा मोठी आहे. दलिताचं शोषण आर्थिक व सामाजिक असं अभिन्न आहे. मानसिक दास्य हा तर त्याचा कणाच आहे. त्यामुळे त्याचं मनुष्यत्वच नाकारलं गेलं होतं. आणि त्याला आधार राहिला धर्मविचारांचा–धर्मशास्त्रांचा. ही कृत्रिमरीत्या निर्माण केली गेलेली दासता दलित जाणिवेशी निगडित आहे. दलित जाणीव, आपलं अस्तित्व नाकारलं गेलेल्या प्रतीतीतून जन्म घेते. यामुळे इतिहास आणि वर्तमानाशी ती सतत आपलं नातं काय, अशी पृच्छा करीत असते. आणि त्याबरोबरच आपले संबंध भिन्न आहेत, वेगळे आहेत, अशी धारणाही प्रगट करीत असते आणि म्हणून भिन्न भिन्न काळी समाजस्थिती व भौतिक स्थिती बदलत असली तरी शोषक व पीडितांच्या जाणिवा कुठे ना कुठे मूळ धरून असतात, बदलत नाहीत. हे वास्तव लक्षात घेतलं की दलित जाणिवेचं अटळपणही लक्षात घ्यावं लागतं.

दलित जाणीव शोषणाच्या सर्वच संस्था नाकारते. त्यामुळं तिचं नातं वैश्विक जाणिवेशी आहे. बाह्यजीवन आणि मानसिक आवर्तबद्धता ह्यातील विसंवादाचा अर्थ शोधणारी दलित जाणीव समाज व संस्कृतीच्या पातळीवर मानवी अनुभवच प्रगट करीत असते.

आणखी एक महत्त्वाचे म्हणजे दलित अनुभव हा व्यक्तिगत असला तरी तो व्यक्तिनिष्ठ नाही. कारण तो समूहमन व्यक्त करीत असतो. म्हणून असं म्हणता येईल की दलित जाणीव ही समूहनिष्ठ आहे.

दलित जाणीव काही मूल्यं नाकारते व काही स्वीकारते हेही एक विशेष.माणसा-माणसातील विसंवाद व वैर, अस्पृश्यता, पोथीनिष्ठा,अंधश्रद्धा, प्राक्तनवाद, वर्णवाद, मानवी दास्य, पवित्र–अपवित्रतेच्या भ्रामक कल्पना ज्यावेळी दलित जाणीव नाकारते त्याचवेळी मानवी प्रतिष्ठा व स्वातंत्र्य, मानवी जीवनातील अर्थपूर्णता आणि समानता स्वीकारते, असा त्याचा अर्थ आहे. विद्रोह हा ह्या जाणिवेचा प्रकट आविष्कार होय. विद्रोह म्हणजे शत्रुत्व नव्हे, तर तो परिवर्तनाचा वाहक आहे. म्हणून विद्रोह ही जाणीव गतिमान आहे. ती बंदिस्त किंवा विध्वंसक नाही. म्हणूनच ती रचनात्मक आहे.

दलित जाणीव ही 'मनुष्यत्वा'ची जाणीव असल्यामुळं ती व्यक्त करणारं साहित्य जगातील माणुसकीच्या अनुभूतीतून मानवी स्थिती निर्देशित करणाऱ्या

साहित्याशी आपलं नातं जोडते ह्यात शंका नाही.

प्रश्न : ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य यातील तुमच्या मते साम्यभेद ?

कुणी एका ग्रामीण लेखकानं म्हटल्याप्रमाणे दलित साहित्य हे ग्रामीण साहित्याच्या एका मोठ्या वर्तुळाचं छोटं वर्तुळ नव्हे, ही कल्पना वस्तुस्थितिदर्शक नाही. कृषिकेंद्रितता हा ग्रामीण व्यवस्थेचा पाया आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य कृषीसंस्कृतीशी निगडित असणं स्वाभाविक आहे. याचा अटळ परिणाम ग्रामीण साहित्यनिर्मितीवर आहे. कृषीसंस्कृतीशी निगडित असणाऱ्या व्यवस्थेत दलितही आहे, पण तो सामाजिक व सांस्कृतिक बधीरतेचा, विषमतेचा बळी म्हणून ! ग्रामीण व्यवस्थेत आर्थिक शोषित आहे आणि प्राधान्याने सामाजिक शोषित असा दलितही आहे. आर्थिक पातळीवर ह्या दोहोंनाही समानत्व असेल; परंतु सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर नाही. म्हणून 'दलित' या व्याख्येत सरसकट सर्वच गरिबांना बसवता येत नाही. सवर्णीयांतील गरीब, कष्टकरी यांना आर्थिक कारणानं 'दलित' ही संज्ञा द्यायची तर मग अस्पृश्य स्त्रीचा कासोटा फेडणारा, तिच्यावर बलात्कार करणारा, हा दलित कसा ? तो मनानं व वागणुकीनं सवर्णच आहे. म्हणून ग्रामव्यवस्थेतील 'ग्रामीण मनुष्य' आणि 'दलित मनुष्य' ह्यांचं जग भिन्न आहे. त्यांची दुःखं वेगळी आणि त्यांची अभिव्यक्तीही वेगळी.

ग्रामीण साहित्यात गरिबी, दुःख, विषमता येत नाही असं नाही, परंतु त्याचा संबंध मुख्यत्वे आर्थिकतेशी आहे. सामाजिक बधीरता, सामाजिक विसंवाद–विषमता त्यांची चित्रंही ग्रामीण साहित्यात अपवादभूत अशीच आहेत. समाजव्यवस्था व विचारव्यवस्थेशी विद्रोह ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा नव्हे व प्रकृतीही. एक मात्र खरे की, ग्रामीण साहित्यनिर्मितीनं अधिक सामाजिक होणं जरुरीचं आहे. दलित साहित्य व ग्रामीण साहित्य या स्वातंत्र्योत्तर काळातील दोन महत्त्वाच्या घटना.

प्रश्न : अदलित लेखकाला दलित जाणिवा व्यक्त करता येतील किंवा नाही ?

जाणिवांचा संबंध सांस्कृतिकतेशी–मनुष्यत्वाच्या मूल्याशी आहे, 'अनुभवा'शी आहे. त्यामुळे अदलित लेखक दलित जाणीव व्यक्त करू शकेल का, हा मूलभूत प्रश्न आहे. पण एवढं मात्र खरं की, अदलित लेखक प्रत्यक्ष अनुभव व्यक्त करू शकला नाही तरी तो 'सहजाणिवा' व्यक्त करू शकेल. त्या 'सहजाणिवा' दलित व्यक्तीशी सहवास, साहचर्य, अनुबंध यांतून निर्माण होऊ शकतील व त्या खोट्या म्हणता येणार नाहीत. जॉन ग्रिफिथ ह्या श्वेतलेखकानं निग्रोंची दुःखं जाणून घेण्यासाठी स्वतःच्या कातडीचा रंग विविध रसायनं वापरून काळा केला. नंतर तो निग्रो समाजात वावरला. त्यानं जवळून त्यांची दुःखं पाहिली. अनेकदा त्यासाठी त्याला किंमतही मोजावी लागली. आणि मग निग्रोंचं जीवन कसं भयानक, वेदनादायी व अगतिक आहे, ह्याचं चित्र त्यानं 'ब्लॅक लाइक मी'मध्ये रेखाटलं. त्याचे हे

अनुभव खोटे म्हणता येणार नाहीत. हीच बाब आपल्याला दलितेतर लेखकांच्या ' सहजाणिवे 'विषयी म्हणता येईल. अर्थातच दलितांच्या गहिवरानं किंवा त्यांच्या विषयांच्या उद्धाराच्या भावनेनं चित्रित केलेलं दलित जीवन हे दलित जाणिवेशी तर नाहीच, पण सहजाणिवेशीही संबंधित असू शकणार नाही.

प्रश्न : दलित साहित्याला वेगळे निकष लावावेत असं तुम्हाला वाटतं ?

मराठी साहित्याचाच विचार करू जाता, भिन्न भिन्न काळात निर्माण झालेलं साहित्य एकाच मापनदंडानं मापलं गेलं आहे काय ? तर तसं दिसत नाही. संत-साहित्याची प्रेरणा, आधुनिक वाङ्मयनिर्मितीची मूल्यं ही लक्षात घेऊनच त्या त्या साहित्याचं मूल्यमापन केलं गेलं आहे. मर्ढेकरांची कविता रविकिरण मंडळाच्या निर्मितीच्या निकषांनीच मापता येईल का ? प्राचीन साहित्यशास्त्राचे निकष आधुनिक वाङ्मयाला लावता येत नाहीत. तेव्हा वाङ्मयीन कसोटचा स्थिर नसतात हे खरं आहे. जीवनवादी साहित्य कलावादाच्या तथाकथित निकषांनी मोडीत काढणं हास्यास्पद ठरेल. दलित साहित्य हे प्रयोजनमूल्य असलेलं (cause lilerature) साहित्य आहे. आशयप्रधानता हा त्याचा अविभाज्य भाग आहे. तेव्हा दलित साहित्यनिर्मितीनंच वेगळचा निकषांची गरज निर्माण केली आहे.

प्रश्न : दलित साहित्य ' अ–पूर्व ' आहे हे मान्य, पण अपूर्वत्वाचा अर्थ श्रेष्ठत्व असा घ्यावयाचा का ?

' अपूर्वत्व ' आणि ' श्रेष्ठत्व ' ह्या दोन संकल्पना वेगवेगळचा आहेत. अपूर्व अनुभव मांडण्याची ताकद एखाद्या लेखकात नसेल तर त्याचं लेखन सामान्य होईल. पण एखाद्या लेखकाची अनुभूती जितकी जिवंत, मानवी जीवनाचा खोल अर्थ आकलन झालेली, संवेद्य व जागृत असेल तितकी त्याची वाङमयीन कृती श्रेष्ठ म्हणावी लागेल. जगातील श्रेष्ठ वाङ्मय हे मानवी मूल्यांच्या आस्थेतून, अनुभूतीतून निर्माण झालं आहे. ज्याला मानवी जीवनातील संघर्ष, दुःख, पीडा जितक्या तीव्रतेनं आकलेल, एवढंच नाही तर मानवी जीवनातील आंतरविरोध ज्याला जितक्या प्रकर्षानं अनुभूत होईल त्यालाच श्रेष्ठ वाङ्मय निर्माण करता येईल. दलित अनुभवात ते सामर्थ्य आहे. त्याच्या अनेक खुणा दलित साहित्यनिर्मितीत आहेत. ' अपूर्वत्व ' आणि ' श्रेष्ठत्व ' ह्या दोन्हींचा प्रत्यय देणारे बागुलांसारखे दलित लेखक आज आहेत.

प्रश्न : दलित साहित्यावर ते प्रचारी आहे, नकारात्मक आहे, आक्रस्ताळं आहे, केवळ समूहनिष्ठ आहे, यासारखे आक्षेप आहेत, त्याबाबत तुमची प्रतिक्रिया ?

साहित्यात किंवा समाजात जेव्हा ' नवं ' उदयाला येतं तेव्हा त्यातील क्रांतीनं प्रस्थापित व स्थितिशील मनं हळवी बनतात व त्याविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया व्यक्त

करतात, असा महाराष्ट्राचा व मराठीचा इतिहास आहे. नवी बियाणं रुजू दिली जात नाहीत. केशवसुत किंवा मर्ढेकर ह्यांना अनेक आरोपांना तोंड द्यावं लागलं. आज त्यांचं साहित्य अभ्यासक्रमात आहे, प्रबंधाचा विषय झालं आहे. दलित साहि- त्यानं पूर्वसाहित्यपरंपरा नाकारली आहे. वाङ्मयीन निकषही नाकारले आहेत. त्यामुळे त्याचा tone ही loud आहे. नव्या जाणिवेतून निर्माण झालेलं हे वाङ्मय पाहून, कलेच्या किंवा वाङ्मयाच्या रूढ समर्थकांनी हे साहित्य, साहित्यच नव्हे, अशी हाकाटी केली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. दुसरं असं की, जगातील श्रेष्ठ कलाकृती ह्या प्रचारकीच असतात. त्यात मानवी स्वातंत्र्याचा, मानवी मूल्यांचा पुरस्कार असतो. त्यातून कळत वा नकळत मूल्यांचा प्रचार होतच असतो. दलित साहित्यानं प्रयोजनमूल्य स्वीकारलेलं असल्यानं व त्या साहित्यातून दास्ययुक्त माणसांचा हुंकार प्रगट होत असल्यानं, कुणी त्यावर 'प्रचारी' असा आरोप केला तर तो 'हितसंबंधदर्शक' आहे एवढंच म्हणता येईल. दलित साहि- त्यानं अंधार नाकारला आहे. कलंकित भूतकाळ नाकारला आहे. मानसिक गुलाम- गिरीतून ते मुक्त होऊ पाहात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर–तत्त्वज्ञानातून ते तेजस्वी होत आहे. तेव्हा ज्यांनी भूतकाळ लादला आणि दलितांचं 'माणूसपण' नाकारलं, त्यांनाच जर दलित साहित्य नाकारत असेल तर सांस्कृतिक हादरा बस- लेल्या वर्गाने दलित साहित्याला आक्रस्ताळी, ऊर बडवे म्हणू नये तर काय म्हणावे? ती त्यांची स्वाभाविक प्रतिक्रिया असू शकेल. मी आरंभीच म्हटलं की, या साहि- त्याचा tone हा loud आहे व तो कालोचित आणि प्रकृतिनिष्ठ आहे. तुंबून राहिलेलं पाणी तोंड उघडताच वेगानं, आक्रमकतेनं बाहेर पडणारच! आणि आपल्याबरोबर दगडधोंडे घेऊन जाणारच! स्थिर होईपर्यंत.

दुसरं असं की, 'समूहनिष्ठता' हे दलित साहित्याचं 'अपूर्वत्व' आहे. भारतीय साहित्यात व्यक्तिवादी साहित्य विपुल आहे. 'संश्लिष्ट' प्रकृतीचा संभ्रम अजूनही तसाच आहे. भारतीय साहित्यात, व्यक्तीचा अनुभव हा समूहनिष्ठ अनुभव व्यक्त करणारा साहित्यप्रकार कदाचित पहिल्यांदाच घडत असेल. त्यामुळे रूढ कल्पनांना धक्काही बसत असेल. वाङ्मयाच्या अभ्यासकांनी नव्या प्रवाहांचा गांभीर्यानं विचार करणं जरुरीचं आहे.

एकसूरीपणा किंवा पुनरुक्ती असेही दलित साहित्यासंबंधी आक्षेप व्यक्त केले जातात. खरं तर नव्या जाणिवेतून व्यक्त होणारं हे वाङ्मय पुनरुक्त होतच राह- णार. ती नव्या प्रवृत्तीची एक अवस्थाच असते. कालांतरानं ते साहित्य स्वतःचा स्वतंत्र चेहरा, नवं रूप, नवा आकार प्रगट करीत असतं. तेव्हा आजची दलित साहित्यातील पुनरुक्ती दोषार्ह नाही. (अनुकरण मात्र दोषार्ह आहे.) तसे असेल तर मग पुनरुक्ती व एकसूरीपणाच्या नावाखाली सारं संतवाङ्मय निकालात

काढावं लागेल. कारण तेथे 'ईश्वर, ईश्वरभक्ती' ह्याशिवाय दुसरं कोणतं प्रयोजन आहे ? अर्थात संतपरत्वे काही वाङ्मयीन गुण लक्षात घ्यावेच लागतात. ते नाकारता येणार नाहीत. परंतु त्यांच्या रचनेचा उद्देश व त्यातून प्रकट होणारा विषय हा पुनरुक्त वा एकसूरीत्वाचा निदर्शक नाही असं म्हणणं वस्तुस्थिती नाकारण्यासारखं होईल.

दलित साहित्यावरील 'नकारात्मकते'चा आक्षेप अवास्तव आहे. याबाबतीत यथेच यापूर्वी स्पष्टता प्रदर्शित केली आहे. दलित साहित्य हे पुराण व्यवस्थेचा, मानसिकतेचा व विचारांचा केवळ protest (निषेध) करीत नाही तर त्यांना reject (नकार) करते. ही क्रांती आहे. पण ह्या नकाराबरोबरच माणसामाणसातील सौहार्द, सामाजिक न्यायोचितता, मानवी स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा ह्यांचा पुरस्कार ते करतं. त्यामुळे दलित साहित्य हे केवळ 'नकारात्मक' आहे असं म्हणणं गैर आहे.

प्रश्न : 'दलित जाणीव' ही तात्पुरती मानायची की निरंतरची ?

हा प्रश्नच अप्रस्तुत आहे असं वाटतं. जोवर ह्या देशात अस्पृश्यता, सामाजिक व आर्थिक शोषण, मानवी दास्य आणि जातिबद्धता आहे, तोवर 'दलित जाणीव' ही अटळ आहे. जातिविहीन समाज (casteless society) जेव्हा अस्तित्वात येईल तेव्हा 'दलित जाणीव' नष्ट होऊ शकेल. पण जोवर हिंदुधर्मविचार आहे, जोवर जातिव्यवस्था आहे तोवर 'दलित जाणीव' आहे.

प्रश्न : दलित साहित्यात शहरी व ग्रामीण असा भेद करावा, असं तुम्हास वाटतं काय ?

दलित साहित्य हे दलित जाणिवांचं साहित्य आहे. शहरी व ग्रामीण असा भेद करता येणार नाही.

प्रश्न : दलित जाणीव सातत्यानं बाळगण्यात vested interest आहे, असं मानलं जातं. तुमचं मत ?

मला असं वाटत नाही. दलित जाणीव वाङ्मयातून व्यक्त होणं आणि ऊठसूठ 'दलित जाणीव' बाळगत फिरणं, ह्या दोन्ही बाबी भिन्न आहेत. राजकीय आकांक्षांतून कुणी दलित असण्याचा उपयोग करतोही. परंतु दलित लेखकानं आपल्या साहित्यातून दलित जाणीव अभिव्यक्त करणं ही त्याची पहिली आणि शेवटची अपरिहार्य अशी घटना असल्यानं तो vested interest होय, असं म्हणणं बरोबर नाही.

प्रश्न : तुमच्या साहित्यनिर्मितीचं स्वरूप काय ?

साधारणतः १९५१ ते १९६० पर्यंत मी काव्य व कथालेखन केलं. महाराष्ट्रातल्या विविध नियतकालिकांत ते प्रकाशितही झालं. ह्याच सुमारास मी लोक-

साहित्यसंबंधानं काही लेख लिहिले. १९५७ सालच्या 'लोकसत्ते'च्या दिवाळी विशेषांकात 'वैदर्भीय महारांचे लग्नविधी' हा लेख प्रकाशित झाला. त्यावेळच्या 'वसंत', 'रोहिणी', 'महाराष्ट्र' व 'युगवाणी' या नियतकालिकांत लोकगीत, लोककथा, कथागीत ह्या विषयांवर मी लेखन केलं. १९५६ साली 'माणुसकीचं बंड' नावाचं, एका क्रांतिकारी जीवनाचं–डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं–दर्शन घडविणारं नाटक लिहिलं. त्याचे अनेक प्रयोगही झाले. १९६० नंतर मी प्राधान्यानं वैचारिक व संशोधनपर लेखनाकडे वळलो. समीक्षात्मक लेखन केलं. अलीकडे काही आत्मकथनात्मक लेखन, तसेच एकांकिका प्रकाशित. आज प्राधान्यानं समीक्षात्मक व संशोधनपर लेखन करतो.

प्रश्न : दलितेतर साहित्याबद्दल तुम्हाला काय वाटतं? अर्थशून्य की साभिप्राय?

कोणतंही साहित्य पूर्णतः अर्थशून्य असतं असं म्हणणं चूक होईल. काही फोलकटं असणारच! मराठी साहित्याला सातशे वर्षांचा इतिहास आहे. परंतु त्यात श्रेष्ठतेला पोचलेलं साहित्य फार थोडं आहे. अर्थात येथे हाही मुद्दा विचारात घ्यावा लागेल की, popular literature हे दर्जेदार असतंच असं नाही. त्यामुळे मराठीतील अनेक 'प्रिय' लेखकांचं साहित्य साभिप्राय नाही.

परंतु विचारप्रवृत्त करणारं, चिंतनगर्भ आणि अंतर्मुख करणारं असं साहित्यही मराठीत आहे. -जीवनाचं भेदक दर्शन घडविणारंही काही ललितलेखन आहे. केशवसुत, कुसुमाग्रज, करंदीकर, मुक्तिबोध, सुर्वे ह्यांच्या काही कविता; फुले–आगरकर–शिंदे ह्यांचे वैचारिक लेखन; माटे, माडगूळकर ह्यांच्या काही कथा; माडखोलकर, अरुण साधु, मधु मंगेश कर्णिक ह्यांच्या काही कादंबऱ्या, यांना 'अर्थशून्य' कसं म्हणता येईल?

प्रा. गं. बा. सरदार, प्रा. दि. के. बेडेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, शरद पाटील यांचे वैचारिक लेखन पुसून टाकता येणार नाही. डॉ. वि. भि. कोलते, नानासाहेब मिराशी, डॉ. के. ल. दप्तरी, डॉ. रा. चिं. ढेरे यांचं संशोधन; कोल्हटकर चिं. वि. जोशी, पु. ल. देशपांडे ह्यांचं विनोदी लेखन मराठीला भूषणावह आहे.

प्रश्न : दलित लेखक या नात्यानं तुमच्या काही अडचणी–आग्रहाचे मुद्दे?

दलित लेखक हा 'आपला' नाही अशी भावना अनेकदा व्यक्त होताना दिसते. 'दलित साहित्या'चा आज फार मोठ्या प्रमाणात विचार होत असला तरी अजूनही काही मराठी अभ्यासक, असं साहित्य असू शकत नाही, असं आग्रहानं प्रतिपादन करतात. मला स्वतःला असं वाटतं की, दलित साहित्याचा विचार 'दलित' म्हणून करून कसं चालेल? 'साहित्य' म्हणून त्याचा विचार होणं जरुरीचं आहे. असं अनेक मराठी लेखक आहेत कीं त्यांनी मूलभूतपणे ह्या साहित्याचा विचार केला नाही. त्यामुळे आगपाखड करण्याचा प्रकार अजूनही अस्तित्वात आहे.

तेव्हा त्या दृष्टीनं विचार होणं जरुरीचं आहे. पूर्वग्रहदूषीततेनं कोणत्याही साहित्याचं मूल्यमापन होणं असंभव आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आज दलित लेखक लिहीत आहेत, परंतु त्यांच्याजवळ प्रकाशनाची साधनं नाहीत. नवोदितांना आधार वाटावा असं 'अस्मितादर्श' सारखं एखादं नियतकालिक आहे. अशा लेखकांना प्रकाशनाची अधिकाधिक साधनं उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यांचं लेखन ग्रंथरूपानं येणंही जरुरीचं आहे. आज महाराष्ट्रातील अपवादभूत असे दलितेतर प्रकाशक (वा. वि. भट, मधुकाका कुलकर्णी यासारखे) दलित साहित्य प्रकाशित करीत आहेत. दलितांच्या काही प्रकाशनसंस्था आहेत, पण त्यांच्याजवळ आर्थिक बळ नाही व दृष्टीही नाही. तेव्हा ह्या दृष्टीनं विचार होणं जरुरीचं आहे.

प्रश्न : दलित साहित्यानं मराठी साहित्यावर काय परिणाम झाला ?

नवा जीवनाशय आविष्कृत करणाऱ्या दलित साहित्यानं निश्चितच मराठी व भारतीय साहित्यात भर घातली आहे. आपल्या असं लक्षात येतं की दलित कवितेतील समृद्ध सामाजिक आशयाच्या प्रभावानं अनेक मराठी कवींनी आपल्या कवितेचा चेहरा बदलला. मराठी कवितेला सामाजिक आशय देणाऱ्या ह्या साहित्यानं, मराठी समीक्षेला पुर्नविचार करण्यासाठी प्रवृत्त केलं आहे. दलित आत्मकथेनं तर मराठी आत्मचरित्रलेखनास नवी दिशा व नवं सामर्थ्य दिलं आहे. रूढ आणि मरगळलेल्या आत्मचरित्रांना एकप्रकारे दलित आत्मकथांनी एक नवा आशयच दिला आहे. 'दलित रंगभूमी' आणि 'दलित नाटच' हे आज उपेक्षेचा विषय असले तरी उद्याची मराठी रंगभूमी म्हणून त्यांचं स्थान अमान्य करता येणार नाही.

प्रश्न : दलित साहित्याबद्दल आपलं आणखी काही म्हणणं ?

'दलित साहित्य' ही एक सामाजिक व सांस्कृतिक घटना होय. काही वष दलित साहित्याची चळवळ ही केवळ मराठी व महाराष्ट्रापुरती मर्यादित होती. परंतु आता ती पसरली आहे. भारतातील गुजराती, कानडी, हिंदी या भाषांत दलित लेखक आता मोठ्या प्रमाणात लिहीत आहेत. मराठीतील दलित लेखनाची भाषांतरेही या भाषाव्यतिरिक्त इंग्रजी व जपानी भाषांत झाली आहेत. अमेरिकेतील डॉ. एलिनार झेलिएट, डॉ. जयश्री गोखले, टर्नर आणि जपानमधील प्रा. हिदेआकी इशिदा यांना त्याचं श्रेय आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही 'दलित साहित्या' संबंधी चर्चा होऊ लागली आहे. अमेरिकेतील काही विद्यार्थ्यांनी दलित नाटक, दलित कविता, असे विषय अभ्यासासाठी घेतले आहेत. नोव्हेंबर १९८३ मध्ये न्यूयॉर्क (अमेरिका) येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत मी स्वत: 'दलित साहित्य' या विषयावर एक शोधनिबंध सादर केला. तसेच 'दलित कवितावाचन' असा स्वतंत्र कार्यक्रम सादर केला.

प्रश्न : 'अस्मितादर्श' नियतकालिक आणि 'अस्मितादर्श मेळावा' यांची फलश्रुती, याबद्दलची तुमची निरीक्षणं जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.

'अस्मितादर्श' आणि 'अस्मितादर्श साहित्य मेळावा' या संदर्भात आपण मुद्दाम पृच्छा केली आहे. तेव्हा ह्या दोहोंचं योगदान दलित साहित्य चळवळीत महत्त्वाचं आहे हे स्पष्टच आहे. 'अस्मितादर्श'चा १९६७ साली झालेला जन्म दलित लेखकांना आधार ठरला, तर १९७४ साली मी 'लेखक–वाचक मेळाव्या'चा उपक्रम अनेक लेखमित्रांच्या सहकार्यानं उभारला. आणि त्याचं यश आज सर्वत्र दिसत आहे. 'मेळावा' ही गरज होती. ते केवळ 'साहित्य संमेलना'चं अनुकरण नव्हतं. नव्या उर्मींना तगवणं व टिकवणं आणि प्रोत्साहित करणं यासाठी 'मेळावा' आवश्यक होता. त्याचे चांगले परिणाम झाले. अनेक लेखकांना दिशा गवसल्या. अनेकांना स्वत:ला चाचपडून पाहता आलं. आपण कुठवर आलो, कोणत्या दिशेनं आलो आणि कोणत्या दिशेनं जावयाचं याचा एक ताळेबंद हिशोब म्हणजे 'अस्मितादर्श साहित्य मेळावा' होय असं वाटतं. दलित आणि समान विचारक दलितेतर लेखक या मेळाव्यात, साहित्य, संस्कृती, समाज या विषयांवर चर्चा करतात, विचारांची मांडणी करतात. अजूनही मेळाव्याची आवश्यकता आहे असं माझं मत आहे. ज्या दिवशी मेळावा तांत्रिकतेत गुरफटेल आणि त्याला निव्वळ जत्रेचं स्वरूप येईल त्या दिवशी अस्मितादर्श साहित्य मेळाव्याची गरज संपलेली असेल.

दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे दलित लेखकांनी आता केवळ शहरी व ग्रांथिक भाषेकडे न वळता त्यांनी आपल्या प्रादेशिक बोलीतून लेखन करायला हवं. अनुभवधन म्हणून, 'कच्चा माल' म्हणून त्याचं अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठी साहित्य अजूनही अनेक बोलींपासून दूर आहे. दलित लेखकांनी आपलं अभिव्यक्तीचं माध्यम म्हणून 'बोली' प्रभावीपणे स्वीकारली तर मराठी अभ्यासकांना व भाषाशास्त्रज्ञांना तसेच समाजशास्त्रज्ञांना एक नवं क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल.

मराठीत 'आत्मटीका'पर व 'औपरोधिक' असं साहित्य अत्यल्प आहे. दलित साहित्यात त्याचं प्रमाण फार मोठं आहे. साहित्य हे विविधांगांनी समर्थ झालं पाहिजे असं आपण म्हणत असू तर दलित साहित्यानं दिलेलं आत्मटीकापर व उपरोधगर्भ साहित्य, वाङ्मयीन मूल्याच्या व वाङ्मयीन श्रेष्ठतेच्या दृष्टीनं नि:संशयपणे उल्लेखनीय आहे.

# ८ : श्री. माधव कोंडविलकर

[श्री. माधव कोंडविलकर यांचा आणि माझा व्यक्तिगत परिचय फारच थोडा. जवळजवळ नाहीच. पण त्यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' हे आत्मचरित्रपर पुस्तक वाचणाऱ्याला त्यांच्या व्यक्तित्वाचे खरे पदर सहजपणेच मोकळे झालेले दिसतात. श्री. कोंडविलकरांचे लिहिणे किती निष्कपट आणि प्रांजळ असते याचा हा एक पुरावाच. त्यांच्या बोलण्यातही याचा प्रत्यय येतो.

गृहस्थ दलित वर्गात जन्माला आलेला. दलित जीवनातील व्यथा-वेदना-तीव्रपणे भोगलेला पण दलितगंडापासून मात्र पूर्णपणे अलिप्त असलेला. साहित्याचा रसिक भोक्ता. भुकेला. 'साहित्य वेडा' म्हटले तरी चालेल, असा. दलित किंवा दलित साहित्यविषयक अशा विशिष्ट प्रकारच्या पूर्वग्रहापासून अलिप्त असलेल्या, सर्वच प्रकारच्या चांगल्या वाङ्मयावर मनापासून उत्कट प्रेम करणाऱ्या आणि तरीही दलित जीवनाचे चटके भोगणाऱ्या या लेखकाचे मन या मुलाखतीच्या निमित्ताने प्रकट झाले आहे. त्यांचे हे मनोगत दलितविषयक विचारांना एका वेगळ्याच पातळीवर नेतें. कारण त्यांची भूमिका शुद्ध वाङ्मयीन स्वरूपाची आहे. सदरहू मुलाखत पूर्वनियोजित वेळेनुसार महाराष्ट्र साहित्य परिषदेत ते उतरलेले असताना तेथेच घेतलेली आहे. ]

---

प्रश्न : दलित जाणीव' म्हणजे काय ?

'दलित जाणीव' ही सर्व शोषितविषयक जाणीव आहे. तीत सर्व प्रकारच्या शोषितांचा अंतर्भाव होतो. शोषणविषयक जाणीव आणि शोषणाच्या निर्मूलनाचा विचार अशी या दलित जाणिवेची दोन अंगं आहेत.

प्रश्न : समाजवादी-साम्यवादी जाणिवेशी ही संबंधित करता येईल ?

ही जाणीव समाजवादी किंवा साम्यवादी जाणिवांहून वेगळी आहे. समाजवादी जाणीव ही घट्टपणे एकाच एका तत्त्वप्रणालीला बांधलेली असते, तसं दलित जाणिवेचं नाही. साम्यवादी जाणिवेहून ती अधिक लवचिक आणि व्यापक आहे.

प्रश्न : या जाणिवेचा गाभा वर्णाश्रम धर्मविरोध असं म्हणता येईल का ?

दलित जाणीव ही केवळ वर्णाश्रमधर्मविरोधी नाही. वर्णाश्रमधर्मविरोध हे या चळवळीचं एक महत्त्वाचं अंग आहे. पण या जाणिवेत शेवटी माणूस आणि त्याचं दुःखच महत्त्वाचं.

प्रश्न : दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांत तुमच्या मते फरक ?

'दलित,' 'ग्रामीण' यातील फरकाला काही एक अर्थ आहे. दलित साहित्याचा धार्मिक अन्यायाशी संबंध येतो. ग्रामीण साहित्यात तो भाग नाही. सर्वसाधारण गरिबांची दुःखं त्यात प्रतिबिंबित होतात. पण साहित्याचा 'साहित्य' म्हणून विचार करताना या प्रकारच्या विभागणीला महत्त्व द्यावं असं मला वाटत नाही. साहित्याचा 'मार्क्सवादी' 'आंबेडकरवादी' यासारख्या 'वादांच्या' आधारे विचार करू लागल्यास वावदूकता वाढते. आणि साहित्याचा 'साहित्य' म्हणून आस्वाद घेण्यात व्यत्ययही येतो. यामुळे या प्रकारचं साहित्याचं विभाजन मला पटत नाही. चांगलं साहित्य सामान्यतः या प्रकारच्या उपाधीपासून अलिप्त असतं. हरिभाऊ आपटयांची कादंबरी मध्यमवर्गीय जीवनावर आधारलेली असली तरी ती कोणाची तरी 'बाजू' घेऊन लिहिलेली आहे, असं वाटत नाही. याउलट, पु. भा. भावे यांचं साहित्य वाचताना ते सांप्रदायिक असल्याचं जाणवतं. सांप्रदायिक साहित्यात एक अहंकारही डोकावतो. हरिभाऊंचा प्रांजळपणा पु. भा. भावे यांच्यात नाही. साहित्याच्या गुणवत्तेवरही यामुळे याचा परिणाम झालेला आहे.

प्रश्न : 'अदलितांना दलित जीवनाचं चित्रण करणं जमणार नाही' असं एक मत आहे. तुम्हाला काय वाटतं ?

हे प्रतिभेचं काम आहे. जयवंत दळवींचे 'चक्र,' मधु मंगेश कर्णिक यांची 'माहीमची खाडी' या कादंबऱ्या किंवा हरिभाऊ आपटयांची 'काळ तर मोठा कठीण आला' किंवा अरविंद गोखले यांच्या वेश्यांच्या जीवनावरील कथा ही गोष्ट, मी म्हणतो त्याचा पुरावा आहे. श्री. दा. पानवलकर यांची मी अलीकडेच झोपडपट्टीच्या वातावरणावर लिहिलेली एक कथा वाचली, पानवलकर झोपडपट्टीत राहणारे नसूनही त्या कथेत मला काही न्यून आढळलं नाही. अन् श्री. म. माटे यांच्या काही कथा आणि अगदी अलीकडचं उत्तम उदाहरण म्हणजे बालकृष्ण मु. देसाई यांची 'नायक' ही कादंबरी महारांच्या जीवनावर आधारलेली आहे. महारानंसुद्धा इतकी प्रभावी कादंबरी लिहिलेली नाही. अर्थात हे सच्च्या प्रतिभावंताचं काम आहे. संवेदनशील मन कोणाच्याही दुःखानं व्यथित होतं. पण प्रत्येक संवेदनशील माणसाला ही दुःखं शब्दबद्ध करता येत नाहीत. ज्यांना हे जमतं त्यांना आपण लेखक म्हणतो. आणि यासाठी जे कष्ट घ्यावे लागतात, ते आपल्या लेखकांना (इथं काही अपवाद आहेत) नको असतात. उदाहरण द्यायचं झालं तर मी सांगेन: कन्नडमध्ये डॉ. शिव-

राम कारंत हा मोठा प्रतिभावंत आहे. त्यांच्या चोमनदुडी (चोमा महार), यासारखी कादंबरी वाचल्यावर मी चकित झालो व प्रभावीतही झालो. तसं पाहिलं तर त्या चोमाची जीवनकथा त्यांनी कशी लिहिली, चोमाचा जीवन संघर्ष कसा उभा केला, त्यांनी ते सारं जवळून पाहिलं असणार नक्की ! डोळसपणे व सहृदयानं पाहिलं असेल. त्याशिवाय त्यांना या अनुभवांना कलारूप देताच आलं नसतं. पण दुर्दैवानं आपल्या मराठीत एवढा मोठा लेखक अद्याप झालेला नाही. कानडीत फार मोठमोठी माणसं आहेत. अगदी आपल्या शेजारी दुसरे भैरप्पा आहे– त्यांची 'गृहभंग' वाचा. स्त्रीचं केवढं दुःख त्यांनी उभं केलंय. तेव्हा ' दलित जाणीव' दलितेतर लेखकांना व्यक्त करणं जमणारच नाही, ही मला एक प्रचारकी घोषणा वाटते. दलितांच्या काही खास अनुभवांबद्दल फार झालं तर वरील विधान खरं मानता येईल. पण या मुद्द्यावर फार भर देण्यात अर्थ नाही. 'आमचं दुःख इतरांना कळणार नाही' हा दलितांचा दावा खोटा आहे. निदान माझ्यासारखा साहित्यावर प्रेम करणारा, माणसाच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवणारा माणूस असं म्हणणार नाही.

प्रश्न : दलित साहित्याचे मूल्यमापन करण्यास, साहित्यविषयक प्रचलित निकष निरुपयोगी आहेत, असं म्हटलं जातं. तुम्हाला या संदर्भात काय वाटतं ?

या मुद्द्यावर अधिकारवाणीनं मी काही बोलू शकणार नाही. पण सौंदर्यसंवेदनेत 'दलित' आणि 'दलितेतर' असे काही मूलभूत फरक असतात, असं मला वाटत नाही. सुंदरतेची 'Instinct माणसात मुळातच एक तर असते किंवा नसते. ही व्यक्तिगत बाब आहे. तिचा जातीशी काही संबंध नाही. जशी काही माणसं जात्याच क्रूर असतात आणि काही दयाळू असतात, तसाच हा प्रकार. अमुक ब्राह्मण जातीतील आहे म्हणून दयाळू आहे, किंवा अस्पृश्य जातीतील आहे म्हणून क्रूर आहे, असं म्हणणं चुकीचं आहे. सौंदर्यसंवेदनेलाही तोच न्याय लावावा लागेल.

प्रश्न : सौंदर्यास्वादनात काही भाग परिस्थितिसापेक्ष असतो, या दृष्टीनं पाहता दलित आणि दलितेतर यांच्या सौंदर्यधारणात काही वेगळेपणा असतो, असं म्हणता येणार नाही का ?

मला हा फरक गौण वाटतो. परिस्थितीपेक्षा माणसाच्या मूळ प्रकृतीवरच सौंदर्यसंवेदन असणं किंवा नसणं अवलंबून असतं. हा त्या त्या व्यक्तीच्या प्रकृतीचा धर्म असतो, असं माझं मत आहे आणि अनुभवही.

प्रश्न : दलित साहित्य विचारात सोशल ॲन्थ्रापॉलॉजिक ॲप्रोचची तुम्हाला कितपत गरज वाटते ?

पुन्हा याही बाबतीत मी काही अधिकारवाणीनं सांगू शकत नाही. पण साहित्यविचारात किंवा आस्वादनात अशा काही दृष्टिकोणाची खास गरज आहे असं मला वाटत नाही.

प्रश्न : आता दलित साहित्यावरील आक्षेपाबद्दल. ते प्रचारकी आहे, एकसूरी आहे असं म्हटलं जातं.

प्रचारकी आहे हे खरं आहे. प्रचारकी असणं स्वाभाविकही आहे. पण एकसूरी-पणाचा आरोप मात्र तेवढा खरा नाही. माझं उदाहरण मी बाजूला ठेवतो. पण अलीकडच्या दलित साहित्यात वेगवेगळ्या जाणिवा-छटा काही प्रमाणात का होईना प्रकट होऊ लागल्या आहेत. तेव्हा दलित साहित्यानं एकच एक सूर लावलेला आहे हे म्हणणे बरोबर नाही. नारायण सुर्वे यांची कविता एकसूरी म्हणता येईल काय ?

प्रश्न : दलित साहित्यात समूह येतो, व्यक्ती येत नाही. असंही म्हटलं जातं ?

नाही. हेही खरं नाही. दलित साहित्यात खूप चांगली व्यक्तिचित्रणं आली आहेत. बाबूराव बागुलांच्या कथा, पवारांचं 'बलुतं' किंवा मेश्राम यांनी रेखाटलेली काही व्यक्तिचित्रं लिहिली आहेत. अन माझ्या 'मुक्काम पोस्ट' मधील आई-वडील किंवा 'अजून उजाडायचं आहे'मधील देवजी-देवकी यांची चित्रं काय कमी प्रतीची आहेत ?

प्रश्न : 'दलित साहित्य आक्रस्ताळं आहे' असाही एक आक्षेप आहे.

आहे. खरा आहे. काही अपवाद वगळता, तुम्ही म्हणता ते खरं आहे. पण हा आक्रस्ताळेपणा कालांतरानं कमी होईल. आरंभीच्या आक्रस्ताळेपणाचा लाभ काही प्रमाणात का होईना दलित साहित्याला झालेला आहे. त्यामुळेच ते साहित्य सर्व-सामान्यांचं आपल्याकडे लक्ष वेधू शकेल. साहित्यानं अर्थात सतत आक्रस्ताळे राहणं बरोबर नाही, हे मीही म्हणतोच. आणि दुसरं असं—प्रतिभावंताच्या अंतःकरणात आगडोंब हवा—पण डोकं अगदी शांत पाहिजे. आपल्या काही दलित प्रतिभावंतांची डोकीही फिरतात—भडकतात. त्यामुळ ते ओरडतात.

प्रश्न : हे साहित्य नकारात्मक आहे, असाही एक आरोप आहे.

नकारात्मक भाग आहेच, पण नकारानं कोणतेही प्रश्न मिटतील असं मला वाटत नाही. साहित्यिकानं विशिष्ट प्रकारच्या नकारातच स्वतःला गुरफटून घेणं बरोबर नाही. त्याची दृष्टी विशाल आणि सहानुभूती व्यापक असली पाहिजे.

प्रश्न : दलित साहित्य अदलित साहित्याहून नेहमीच वेगळं राहील, असं तुम्हाला वाटतं ?

नाही. वेगळं राहणार नाही, राहू नये. वेगळी चूल कशाला ! आम्ही लिहिणार मराठीत. मग ते मराठी साहित्य नव्हे ? दलित या शब्दाचा अर्थ घाण. एकेकाळी आमची जीवनं घाणेरडी झाली. पण म्हणून काय आमचं साहित्य घाण म्हणायचं ?

प्रश्न : दलित साहित्यात 'शहरी दलित साहित्य' व 'ग्रामीण दलित साहित्य' असा काही भेद करता येईल का ?

'शहरी दलित साहित्य' आणि 'ग्रामीण दलित साहित्य' हा भेदही मला

चुकीचा, कृत्रिम वाटतो. स्वार्थासाठी ती लेबलं लावलेली आहेत. ही असलीच भेदात्मक भूमिका घ्यावयाची झाल्यास ' महार दलित साहित्य, ' भटक्यांचे दलित साहित्य ' असे त्याचे मग आणखी तुकडे करावे लागतील. मला हे मान्य नाही. साहित्य हे साहित्यच !

इथल्या व्यवस्थेनं इथल्या काही लोकांच्या माथी हे दलितपण लादलं. त्यामुळे ही माणसं दलित, मागास राहिली. पण आता काही सवलती मिळू लागल्या आहेत, पण तरीही काही माणसं घाण वाटेल असं वागतात. त्यांच्यात सच्चाई, प्रामाणिकपणा नाही. तेव्हा मला अशी शंका येते की यांची ही सवयच आहे की काय ? यांना दलितच राहायचंय की काय ? यांना ' माणूस ' व्हायचं नाही. आता तुम्ही म्हणाल, ह्याला ब्राह्मण व्हायचंय. तर ते चूक आहे. माझ्या डोक्यातून या जाती कधीच गेल्या आहेत. धर्मही गेला आहे. मला सगळी माणसं दिसतात. स्वच्छ माणसं.

प्रश्न : दलित अस्मिता वेगळी ठेवण्यात काही vested interest आहे, असं तुम्हाला वाटतं ?

दलित अस्मिता ठेवणं हे एकंदर समाजाच्या आणि साहित्याच्या दृष्टीनं मला धोक्याचं वाटतं. त्यामुळं सामाजिक ऐक्याला बाध येतो. सवर्णांनी जसं दलितांना वेगळं मानणं बरोबर नाही, त्याचप्रमाणे दलितांनीही आपल्या सवत्यासुभ्याचं वाजवीहून अधिक प्रस्थ माजविणं योग्य नाही.

प्रश्न : आता तुमच्या साहित्यनिर्मितीबद्दल काही प्रश्न. तुमचा आवडता वाङ्मयप्रकार कोणता ?

आरंभी मी कविता लिहिल्या. आजही लिहितो. माझं ' दैनंदिनी ' सारखं आत्मचरित्रही आता मान्यता पावलेलं आहे. परंतु यापेक्षा कादंबरी लेखनाकडे माझा आता अधिकाधिक कल होऊ लागला आहे. जीवनाचं विविध प्रकारचं चित्रण करण्याच्या दृष्टीनं कादंबरीसारखा दुसरा चांगला फॉर्म नाही, असं माझं मत आहे. म्हणूनच मी 'अजून उजाडायचं आहे.' 'अनाथ' किंवा 'हाताची घडी तोंडावर बोट' ( अप्रकाशित ) अशा विविध कादंबऱ्या लिहिल्या व अजून काही लिहायच्या आहेत. कादंबरीद्वाराच मी स्वतःला आणि माझ्यासकट इतरांना ( कुटुंब, समाज, आवतीभोवतीची माणसं इत्यादींना ) न्याय देऊ शकेन, असा मला विश्वास वाटतो.

प्रश्न : तुमची ही भूमिका मला स्वागतार्ह वाटते. दलित साहित्यानं अद्यापि फारशा चांगल्या कादंबऱ्या दिलेल्या नाहीत. तुमच्या एकंदर बोलण्यावरून, विचारावरून तुम्ही या वाङ्मयप्रकाराला चांगला न्याय द्याल असं मला वाटतं. तुमच्या या उपक्रमात तुम्हाला सुयश चिंतितो! आता आणखी एका मुद्द्याकडे आपण वळू...तुमच्या साहित्यात भर कशावर ? स्वानुभव, कल्पना, इंटरप्रिटेशन यांचं प्रमाण किती ?

स्वानुभवाशिवाय मी ' देवाचे गोठणे ' कसं लिहू शकलो असतो ? आणि कुठला लेखक अनुभवाशिवाय लिहितो ? लेखकाला स्वानुभवाची गरज आहेच. स्वानुभव आणि कल्पना यांचं मिश्रण करताना interpretation आलंच. हे interpretation शक्य तितकं मोकळं, प्रांजळ, निःपक्षपाती आणि सत्याला धरून असावं. जीवनात काही वाईट भाग आहे, तसा चांगलाही भाग असतो.व्यक्ति-व्यक्तींत भिन्नता असते. त्यांचं म्हणूनही काही वेगळेपण, वैशिष्टय असतं. हे सारं चित्रित व्हावं असं मला वाटतं.

प्रश्न : तुमच्या लेखनात दलितेतरांच्या चित्रणाचं स्थान काय ?

इतर जातींचं चित्रण मी वर्ज्य मानीत नाही. स्वकीयांप्रमाणं इतरांचं चित्रण करण्यात, त्यांची भूमिका समजून घेण्यात मला रस आहे. माझ्या आत्मचरित्र-लेखनातूनही तुम्हाला त्याचा प्रत्यय येईल. माझ्या कादंबरीतही तुम्हाला इतर जातीची चित्रणं आलेली आढळतील आणि ती मी समरसून केलेली आहेत. त्यात प्रचाराचा किंवा प्रतारणेचा भाग येऊ नये यासाठी मी प्रयत्नशील आहे. प्रचारापेक्षा मला माणसाकडं ' माणूस ' म्हणून पाहावंसं वाटतं.

प्रश्न : आणखी कोणते विषय हाताळावे असं तुम्हाला वाटतं ?

इतर बरेचसे विषयही हाताळावेसे वाटतात. मला नाटक लिहायचं आहे. माझ्या ' मु. पो. ' वरचं नाटक लिहायचंय पण सध्या कादंबरीलेखनात गुंतल्यामुळं ते कधी जमेल ते पाहायचं.

प्रश्न : दलितेतर साहित्याबद्दल तुम्हाला आस्था आहे हे मला माहीत आहे. पण काही दलित लेखक दलितेतर साहित्याला अर्थशून्य मानतात. म्हणून तुमची या बाबतीतील भूमिका जाणून घ्यावयाची आहे.

दलितेतर साहित्य अर्थशून्य नसून मी ते अतिशय मोलाचं मानतो. त्यावर तर माझा पिंड पोसलेला आहे. मी मुळातच साहित्यावर विलक्षण प्रेम करणारा आहे. मिळतील तेथून मी पुस्तकं मिळवितो आणि त्यांचा रसास्वाद घेतो. जेवढं साहित्य वाचावयास पाहिजे, तेवढं मिळत नाही व वेळ अपुरा पडतो ही माझी खंत आहे. दलितेतर साहित्याचं मला वावडं नाही. दलितेतर अनुभवही मला मोलाचे वाटतात, अन मुख्य असं की तीही माणसं आहेत. तेव्हा मनुष्य जीवनाचा शोध घेणं हे मला मोलाचं वाटतं.

प्रश्न : लेखक म्हणून तुमच्या खास काही अडचणी ?

साहित्यात गटबाजी फार आहे. हे गट, काही ठराविक लोकांना हाताशी धरतात व चांगल्या लेखकांना झोडपतात किंवा त्यांची कोंडी करतात. दुसरं, लेखनात योग्य ते मानधन मिळत नाही. खरं म्हणजे काही न मिळता काही अक्षरशः गंडवले

जातात. त्यामुळं लेखकामध्ये चीड किंवा नैराश्य येतं. एक उदाहरण सांगतो. माझंच आहे. एका प्रकाशकानं माझ्याकडे एक कादंबरी मागितली.मानधनाची रक्कम ठरली. मी कादंबरी लिहून दिली. हस्तलिखित त्याच्या हातात दिल्यानंतर पैसे द्यायचं तो म्हणे ना.शेवटी चारपाच खेपा मारल्या तेव्हा जेमतेम निम्मे पैसे देऊ लागला. म्हणाला, एवढंच ठरलं होतं. मी खूप भांडलो. पण काही उपयोग झाला नाही. आणि दुसरं म्हणजे प्रसिद्ध झालेल्या साहित्याचं योग्य त्या प्रकारे मूल्यमापन होत नाही. काही वृत्तपत्रीय अभिप्राय अधूनमधून येतात. पण एक तर ते त्रोटक असतात, ते पुष्कळदा पूर्वग्रहदूषित तरी असतात किंवा त्यात आकलनाचा अपुरेपणा तरी असतो. काही प्राध्यापकांना माझे अनुभवच खोटे वाटतात. वृत्तपत्रीय अभिप्राय वाचणाऱ्यांसमोर मूळ पुस्तक नसतं. या अभिप्रायावरून तो त्या पुस्तकाबद्दल आपलं मत बनवितो. ते पुष्कळदा चुकीचं असतं. त्यातून त्या पुस्तकाबद्दलचा अपप्रचार फैलावतो. पत्रकर्ते परीक्षणासाठी ते पुस्तक योग्य त्या माणसाकडे देतातच असं नाही. त्यामुळं आणखीनच घोटाळे होतात. ही स्थिती बदलली पाहिजे. पण हे अवघड आहे.

प्रश्न : तुमच्या मते दलित साहित्यानं मराठी साहित्याला नेमकं काय दिलं ?

दलित साहित्याबद्दल समाजात काय भलीबुरी मतं प्रस्तुत झालेली असतील ती असोत; पण या साहित्यानं समाजाला नवं भान दिलं, यात शंका नाही. दलितांना व दलितेतरांनाही आपण आजच्या या जीवनात कुठे आहोत, याची कल्पना दिली. मराठी साहित्याला त्यातून एक वेगळी गती प्राप्त झाली. समाज आणि साहित्य या दोहोंच्याही दृष्टीनं ही घटना महत्त्वाची आहे.

प्रश्न : दलितसाहित्यविषयक प्रचलित वादविवादाबाबत तुम्हाला खास काही म्हणावयाचं आहे काय ?

साहित्यात सांप्रदायिकता नसावी. साहित्याचा 'साहित्य' म्हणून विचार व्हावा. अकारण वाद टाळावेत, असं मला आग्रहानं सांगावंसं वाटतं.

●

# ९ : प्रा. अरुण कांबळे

[ प्रा. अरुण कांबळे हे सध्या कीर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई, येथे मराठीचे प्राध्यापक आहेत. त्यांनी काही लक्षणीय काव्यरचनाही केली असून ती आता संग्रहरूपानं प्रसिद्धही झालेली आहे. 'रामायणातील संस्कृतिसंघर्ष' हे त्यांचे संशोधनात्मक पुस्तकही प्रसिद्ध झालेले आहे. पण कवी किंवा लेखक या नात्यापेक्षा दलित चळवळीतील एक तळमळीचे कार्यकर्ते, दलित पँथरचे आघाडीचे नेते, तडफदार वक्ते इत्यादी नात्यांनीच ते आज लोकांसमोर आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे आणि निष्ठायुक्त व्यासंगामुळे अल्पावधीतच ते तरुण दलित मंडळींत लोकप्रिय झाले आहेत.

दलितविषयक प्रश्नांवर बोलताना त्यांना विलक्षण चेव येतो, स्फुरण चढते. त्यांचं एरवीचं सौम्य व्यक्तित्व अशा वेळी धगधगीत होतं. धारदार बनतं. मतप्रदर्शनात तीव्रतेचा, तिखटपणाचा संचार होतो. पण त्यांच्या या अवसानपूर्ण बोलण्यातूनही एक विचक्षण प्रांजळपणा, प्रश्नाच्या गाभ्याला भिडण्याची उत्कट तळमळ जाणवते. प्रत्यक्ष मुलाखतीतही याचा प्रत्यय आला.

दलित साहित्यविषयक मते जाणून घेण्याची उत्कंठा होतीच. पण प्रा. कांबळे यांच्या धावपळीच्या विविध कार्यक्रमांमुळं हे जमणं अवघड होतं. त्यांना भेटण्याचे यापूर्वीचे एक-दोन प्रयत्न व्यर्थच झाले होते. अखेर मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात हा योग काही काळापूर्वी जुळून आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या आवारातच दोन बैठकींत ही मुलाखत घेतली आहे. मध्यंतरी ही मुलाखत घेऊन दीर्घकाल लोटल्यामुळे प्रसिद्धीपूर्वी ती त्यांच्याकडे पाठविली होती. ती येथे आता त्यांनी केलेल्या दुरुस्त्यांसह किंवा जोडलेल्या पुस्त्यांसह प्रसिद्ध होत आहे.

प्रा. कांबळे यांच्या दलित साहित्याच्या बाजूनं केलेल्या खंबीर मतप्रतिपादनामुळे या साहित्याची एक बाजू भक्कमपणे उभी राहण्यास ही मुलाखत मदत करते. ]

---

प्रश्न : 'दलित जाणीव' म्हणजे नेमकं काय ?

नकारातून जन्माला आलेली जाणीव, ती दलित जाणीव. हा नकार कोणता ? तर प्रस्थापित व्यवस्थेला, प्रस्थापित व्यवस्थेखाली सामाजिक, धार्मिक, आर्थिक,

राजकीय व सांस्कृतिकदृष्टया दडपला गेलेला, तळागाळातील मानवसमूह म्हणजे केवळ दलित समाजच किंवा केवळ पारंपरिक अर्थानं 'अस्पृश्य' गणलेलेच लोक नव्हेत, तर काही स्पृश्य जातीतील(touchables)ही यात येतात. यामध्ये आदिवासी, भटक्या विमुक्त जाति–जमाती, इतर मागासलेले वर्ग (OBC) यांचाही समावेश होतो.

प्रश्न : तुमची 'दलित साहित्या'ची व्याख्या कोणती ?

माझी दलित साहित्याची व्याख्या अशी आहे : प्रस्थापित व्यवस्थेखाली सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्टया दडपलेला, तळागाळातील माणूस म्हणजे दलित. या माणसाच्या व्यथा-वेदनांचं चित्रण करणारं, त्याच्या आशा–आकांक्षा व जीवन-जाणिवा व्यक्त करणारं मानवमुक्तीचं साहित्य म्हणजे 'दलित साहित्य.'

'दलित साहित्य' ही संज्ञा केवळ वर्णनात्मक नाही, ती गुणात्मक आहे. दलितत्वाच्या अस्तित्वानं या साहित्यात एक दुःखभाव, करुणेची वैश्विक जाणीव व्यक्त होतेच; परंतु त्याबरोबरच हे साहित्य पारंपरिक साहित्यापासून आपलं मूल्यात्मक वेगळेपण व्यक्त करतं. म्हणजे या साहित्यापासून बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ, इहवादी, स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची मूल्यात्मक जाणीव व्यक्त होते. फुले–आंबेडकरांचा वैचारिक वारसा हे साहित्य सांगते. तोच या साहित्याचा प्रेरणास्रोत आहे.

दलित साहित्य हे दलित माणसाच्या मुक्तीचं साहित्य आहेच; परंतु अंतिमतः ते मानवाच्या मुक्तीचं साहित्य आहे. तोच या साहित्याचा केंद्रबिंदू आहे.

प्रश्न 'दलित साहित्य' नकारावर अधिक भर देतं, असं म्हटलं जातं. तुम्हाला काय वाटतं ?

दलित जाणिवेत एका नकाराबरोबर एक होकारही संलग्न आहे. केवळ नकार शून्याकडे जातो. आमच्या या नकारात एक होकारही भरलेला आहे. या होकाराची एक प्रबल जाणीव बाबासाहेबांच्या द्वारा व्यक्त झाली म्हणून दलित जाणीव म्हणजे आंबेडकरी जाणीव, असं समीकरण मांडावं लागतं. नकाराचा नवा डोळा घेऊनच हा दलित माणूस आलेला आहे.

प्रश्न : तुम्ही नकारात एक होकार आहे असं म्हणालात. या होकाराचा आशय काय ?

विषमता नको. समता, स्वातंत्र्य, बंधुता हवी हा या होकाराचा भाव.

प्रश्न : स्वातंत्र्य, समता, बंधुता या संकल्पना तशा जुन्याच नाहीत का ? आगरकरांनी त्या घोषित केल्याच होत्या. आगरकरी प्रेरणांचाच डॉ. आंबेडकर पुनरुच्चार करतात, असं मानावयाचं का ?

आगरकरी विद्रोहाहून आंबेडकरी विद्रोह वेगळा आहे. आगरकरांचा विद्रोह हिंदुधर्मांतर्गत आहे. आंबेडकर हिंदुधर्माच्या मर्मावरच जसा आघात करतात, तसा आगरकर करीत नाहीत. दुसरं असं की, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांसारखी तत्त्वं शाब्दिक पातळीवरच राहिली तर त्याचा उपयोग काय? आगरकरांनी स्वातंत्र्य, बंधुता वगैरे तत्त्वं घोषित केली खरी; पण त्यांची व्यावहारिक मजल उच्चवर्णियांतील सुधारणावादापलीकडे गेली नाहीच. संमतिवयाचा कायदा, प्रौढ-विवाह, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, केशवपन यांसारख्या घटनांवरच आगरकर अधिक बोलत होते. ब्राह्मण्य हे केंद्र कल्पून आपले विचार मांडीत होते. इष्टानिष्टतेचा, रूढींचा, कुलाचारांचा विचार करीत होते. त्यांच्या डोळ्यांसमोर अस्पृश्य (S.C.), आदिवासी (Scheduled Tribes), गुन्हेगार गणले गेलेले, भटक्या जमातीतले लोक नव्हते. त्यांच्या विमोचनाचे प्रश्न नव्हते. त्यामुळे त्यांच्या समाज-सुधारणेच्या प्रयत्नांना फार मोठ्या मर्यादा होत्या. लोकहितवादींची स्थितीही हीच. हिंदू हा चातुर्वर्ण्याच्या चौकटीबाहेर राहून स्वतंत्र विचार करूच शकत नाही. आपल्याकडील तत्त्वदर्शनाचं, ब्राह्मणप्रदर्शन आणि अब्राह्मणदर्शन असे दोन भाग पडतात. सारी ब्राह्मणदर्शनं एकसाथ चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणारी आहेत. तर चार्वाक, बौद्ध, जैन ही अब्राह्मणदर्शनं चातुर्वर्ण्यविरोधात उभी आहेत. अब्राह्मण दर्शनाचा पराभव झाला. तेव्हापासून ब्राह्मणदर्शनं अधिक 'rigid' बनली.

प्रश्न : दलित जाणीव ही एक दलितांपुरती 'आयसोलेटेड' जाणीव मानावयाची की सर्वच प्रकारच्या विषमतेशी ती संबद्ध आहे?

विषमता मग ती वर्णावर, धर्मावर, स्त्री–पुरुष भेदावर किंवा कशावरही आधारलेली असो, त्याविरुद्धचा हा दलितविद्रोह आहे, असं मी मानतो. विषमतेची भारतीय जननी धर्मावर आधारलेली व्यवस्था ही आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' यासारखे दंडक या धर्मव्यवस्थेत आहेत. चातुर्वर्ण्यव्यवस्था श्रमविभागावर आधा-रलेली नसून श्रमिकांच्या विभाजनावर आधारलेली आहे. अर्थव्यवस्थेशी तिची सांगड घातली गेली आहे. दलित हा एक प्रकारे social proletariat आहे. त्याला त्या दृष्टीनं काहीच गमवावयाचं नाही. 'Nothing to loose but his chains.'

प्रश्न : दलितत्व निर्मूलनात तुमच्या मते अग्रक्रम (प्रायॉरिटी) कशाला?

तळातील टोकाच्या माणसाला केंद्रबिंदू कल्पून समाजव्यवस्थेत संपूर्ण बदल घडवून आणणं, याला मी अग्रक्रम देतो. असं जेव्हा होईल तेव्हाच खरी क्रांती झाली असं म्हणता येईल. आज भारतीय समाजात सामाजिक–शैक्षणिक–आर्थिक-दृष्ट्या मागासलेला वर्ग ७५ टक्के आहे. मंडल आयोगानं हे पुराव्यासह सिद्ध केलेलं आहे. (अस्पृश्य, आदिवासी यांची संख्या २२.५ टक्के तर इतर मागास-

लेल्या वर्गांची लोकसंख्या ५२ टक्के, शिवाय स्त्रिया ). म्हणजे समाजात अल्पसंख्याकांचं बहुसंख्याकांवर जोखड आहे. हे सर्व शोषित बहुसंख्य असूनही जातीनं पाडलेल्या कप्प्यांमुळे एकत्र येऊ शकत नाहीत. जातिबाह्य नेतृत्वासही त्यांचा विरोध असतो. वास्तविक या साऱ्या शोषितांचे हितसंबंध एकच आहेत. पण जातिव्यवस्थेमुळे ते संघटित होत नाहीत. यामुळे तत्त्वतः ऐक्य असलेल्या मुद्द्यांवरही व्यवहारात फुटीरता आढळते. जातीचं एक मानसशास्त्र असतं. आपल्या समाजात जातिगंड तयार झालेला आहे. कलेच्या क्षेत्रातही हा जातिगंड आहे. ' महाराच्या घरी गाणं आणि बामणाच्या घरी लिवणं ' ही म्हणच घ्या. गाणं फक्त महाराच्या घरीच का ? Aptitude असलेल्या कोणाच्याही घरी का नाही ? हेच ब्राह्मणाच्या बाबतीत–ब्रामणाच्याच घरी ' लिवणं ' का ? या जातवारीमुळे कलेचाही विकास खुंटतो.

प्रश्न : या जातवार व्यवस्थेमुळे स्पेशलायझेशनला मदत झाली असा एक युक्तिवाद आहे.

तो खरा नाही. सबंध जातच्या जात एका विशिष्ट aptitude चीच असते, असं कुठलंही शास्त्र सांगत नाही. स्पेशलायझेशनचं हे समर्थन लंगडं आहे. या जातिनिष्ठ कल्पनांमुळे कलेची देणगी असलेल्या सर्वांवर अत्याचार–बलात्कार होतो.

प्रश्न : पण आता हा दृष्टिकोण बदलून दलितांबद्दल आत्मीयतेचा भाव जागृत झालेला नाही का ? भूतकाळातील उणीदुणी उगाळीत बसण्यापेक्षा वर्तमानाकडे लक्ष देणं अधिक उचित नाही का ?

वर्तमानकाळात झालेले बदल तसे फार वरवरचे आहेत. सूक्ष्मपणे शहरांत आणि अगदी उघडपणे खेड्यांत तुम्हाला सवर्ण समाजात दलितांबद्दलची तिरस्कार भावना जागृत असलेली दिसेल. शहरात हा भाग थोड्याफार प्रमाणात कमी आहे. पण हा वरवरचा मुलामा आहे. राखीव जागांच्या विरोधात जे आंदोलन उभं राहिलं आहे, त्यातून हीच गोष्ट दिसून येत नाही का ?

प्रश्न : यावर तुम्ही कोणती तोड सुचविता ?

जागृत बुद्धिवादी वर्गानं, राजकारण्यांनी आणि सदसद्विवेकबुद्धी शाबूत असणाऱ्या सर्वांनी मिळून वर्णव्यवस्थेचा नाश करण्यास सज्ज झालं पाहिजे. लोकहितवादी, आगरकर, फुले, छत्रपती शाहू, वि. रा. शिंदे यांची परंपरा वर्धिष्णू केली पाहिजे. या साऱ्या अनवस्थेचं मूळ शोधलं पाहिजे. समाजाची आज स्पृश्य आणि अस्पृश्य अशी दोन शकलं झालेली आहेत. एका राष्ट्रात दोन भिन्न राष्ट्रं नांदत आहेत. त्यात ऐक्य कसं होईल हे पाहिलं पाहिजे. यादवीचा धोका टाळला पाहिजे. भारतीय घटनेचं पहिलं पान अंमलात आलं पाहिजे.

प्रश्न : आता एक थोडा वेगळ्या पातळीवरचा प्रश्न विचारतो. सवर्ण लेखकाला दलित अवर्णाचं दुःख जाणता येईल किंवा नाही ? प्रतिभावंत कल्पनेनं इतरांचं दुःख जाणू शकेल की नाही ?

सामान्यतः ज्याचं जळतं त्यालाच कळतं. दलिताचं दुःख अनुभवलेलाच माणूस दलिताबद्दल लिहू शकेल. फुलेंना जी वेदना कळू शकली, ती इतरांना का कळू शकली नाही ? कारण फुलेंनी हे दुःख प्रत्यक्ष अनुभवलेलं होतं.

उच्च कोटीचा प्रतिभावंत कल्पनेच्या पातळीवर एखादा अनुभव घेऊ शकतो. पण दलित जीवनावर अदलितांनी आजवर जे लिहिलं आहे त्यात हे दिसत नाही. प्रतिभेनं न अनुभवलेलं दुःख कितीही प्रभावीपणे मांडलं तरी त्यात अनुभवाच्या तुलनेनं कमीपणा राहतोच. स्त्रीला बलात्कारानंतर होणाऱ्या वेदना, पुरुषांना कळणार नाहीत. हरिभाऊंनी स्त्रियांची दुःखं मांडली. पण विभावरी साहित्यातील स्त्रीदुःखं त्यांना स्पर्शली नव्हती. विभावरी शिरुरकरांना दलित स्त्रीची दुःखं आकलन करणं कठीण आहे. दोन्ही ठिकाणी स्त्रियांचीच दुःखं, पण दुःखाचं स्वरूप मात्र अगदी भिन्न भिन्न.

प्रश्न : साहित्यदृष्टया हे दुःख कलेच्या पातळीवर आज किती प्रमाणात जाते ?

साहित्य हे मूलतः साहित्य असलं पाहिजे हे जितकं खरं आहे तितकंच ते परिस्थितिसंबद्ध असतं हेही खरं आहे. अगदी आपण ज्याला 'काल्पनिक' म्हणतो तेही जाती–जातीनुरूप वेगवेगळं असतं. जे केवलस्वरूपी सौंदर्यशास्त्रीय निकष वाटतात तेही व्यवस्थेशी संबंधित असतात. काळा रंग सुंदर न मानता गोरा रंग सुंदर मानणं, हे व्यवस्थेशीच संबंधित नाही का ? दलितांची रूप, रंग, गंधसंवेदना सवर्णांच्या या प्रकारच्या संवेदनेहून वेगळी असते. मला बोंबिलाचा वास सुंदर वाटेल. तुम्हाला तो तसा वाटणार नाही. पौर्णिमेचा चंद्र पाहिला की उपाशी माणसाला सौंदर्यसंवेदना होण्यापेक्षा चंद्राच्या आकारावरून भाकरीचीच अधिक आठवण होईल. जातिव्यवस्थेनंच अस्पृश्यांना प्रेतावरील वस्त्रं अंगावर घेण्यास आणि गळ्यात मडकं बांधून हिंडण्यास सांगितलं आहे. इथे सौंदर्याचा कुठं विचार झाला ?

प्रश्न : वेगळ्या सौंदर्यशास्त्राची दलितांची मागणी यातूनच पुढे आली का ?

व्यवस्थेचं आणि सौंदर्यसंवेदनेचं हे नातं लक्षात घेतल्यास दलितांकडून वेगळ्या निकषांची मागणी का येते हे लक्षात येईल. जातिसंबद्ध मूल्यांनीच आजवर उच्चवर्णियांचा साहित्यविचार झालेला आहे. काही ठराविक मूल्यसंकल्पना, सुंदर असुंदराच्या धारणा त्यांनी समाजमनात रुजविलेल्या आहेत. त्याबाहेर पाहण्यासच ते तयार नाहीत. या दृष्टिकोणाचा साहित्यसमीक्षेवरही मग परिणाम होतो. दलित साहित्य हे एक नवं कल्चरल रेव्हॉल्यूशन घडवून आणू इच्छित असल्यामुळे प्रचलित

कल्चरची तथाकथित मूल्यं त्याला नाकारावयाची आहेत. म्हणून ही वेगळ्या सौंदर्यशास्त्राची मागणी.

प्रश्न : तुम्ही सर्वच परंपरा, मूल्यव्यवस्था नाकारावयाची म्हणता, पण माणसानं कितीही विद्रोह केला तरी तो विद्रोह करणारा माणूस एकंदर परंपरेचाच एक घटक असत नाही का ? ती त्याला पूर्णपणे टाळता येईल ?

परंपरेचा सर्वच भाग त्याज्य असतो असं नाही. केशवसुतांनीसुद्धा ' जुने जाऊ द्या मरणालागुनि । जाळुन किंवा पुरूनि टाका ' असं म्हटलं असलं तरी, ' जुन्यातून जी उत्पत्ती नवी । काय नव्हे ती श्रेयस्कारक ?' असंही म्हटलं आहे.

आम्ही भारतीय परंपरा सर्वार्थानं नाकारतो असं नव्हे. तीमध्येही पुरोगामी परंपरा आहेत. बुद्ध, चार्वाक हे भारतीय परंपरेचाच भाग आहेत. आगरकर, फुले हाही एक आपल्या सांस्कृतिक परंपरेचा भाग आहे. परंपरेतील जे त्याज्य आहे ते टाकून देऊन नवसमाजधारणेस जे योग्य आहे, त्याचा स्वीकार करावयास हरकत नाही.

खरं म्हणजे हा एक प्रकारे माझ्याशीच माझा विद्रोह आहे. मी या साऱ्या परंपरेचा घटक आहे. तिचा अंश माझ्या रक्तात आहे आणि तरीही मला तीविरुद्ध उठाव करावयाचा आहे, करणं भाग आहे.

प्रश्न : तो कितपत शक्य आहे ? उदा. तुम्ही मराठी ही आपली भाषा मानता या भाषेला काही एक परंपरा आहे. त्या परंपरेत तुम्ही म्हणता त्याप्रमाणे चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे काही घटकही आहेत. मराठी संतपरंपराही याचाच भाग आहे. ही संतपरंपरेतून आलेली भाषासरणी पूर्णपणे नाकारून मराठीचा वापर हे तुम्ही कसा करू शकता ? त्यातील काहीच तुम्हाला स्वीकरणीय वाटत नाही का ?

संतपरंपरेबद्दल किंवा काव्याबद्दल हा प्रश्न नेहमीच आम्हाला विचारण्यात येतो. संतांची दैववादी, चातुर्वर्ण्याधिष्ठित फिलॉसॉफी टाकून काव्यदृष्टचा तीतील काही भाग मान्य करावयास हरकत नाही.

प्रश्न : हे तारतम्य ठरविताना संतांचा चातुर्वर्ण्यपुरस्कार हा इतिहासक्रमाचा एक भाग आहे, हे तुम्ही तारतम्य का बाळगीत नाही ?

संतांचा चातुर्वर्ण्यपुरस्कार हा इतिहासक्रमाचा एक भाग आहे असं तुम्ही म्हणालात. परंतु मला ते मान्य नाही. मी या संबंधात आपल्याला असं विचारतो की, २५०० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या गौतमबुद्धानं समता हे मूल्य म्हणून स्वीकारलं नाही का ? आणि जातिव्यवस्थेवर कठोर प्रहार केले नाहीत का ? संत तर सातशे वर्षांपूर्वी होऊन गेले. महावीर, चार्वाक, बसवेश्वर या संतपूर्वकाळातील व्यक्ति-

पंथांनी समतेची भूमिका मांडली नाही का ? ही काळाची मर्यादा नव्हती तर संतांचीच मर्यादा होती.

तुमची व आमची संतांकडे पाहण्याची भूमिकाच वेगळी आहे. तुम्ही संतांच्या मर्यादांकडे कानाडोळा करून त्यांच्या गुणवर्णनात रंगता, आम्हाला त्यांची चातुर्वर्ण्य-विषयक भूमिका विशेषत्वानं खुपते. मुंगीचं मनोगत ओळखावं, तारुण्यात पावल लपवून चालावं असा आदेश देणाऱ्या ज्ञानेश्वरांना दलितांच्या आतल्या दुःखाला स्पर्शही होऊ नये, याला काय म्हणावयाचं ? ब्राह्मणानं तो उपाशी असला तरी शूद्राच्या घरचं पंचपक्वान्न ग्रहण करू नये असं ज्ञानेश्वर सांगतात. (ज्ञानेश्वरी–३–२१६).

प्रश्न : एकनाथांच्या अस्पृश्याविषयीच्या कळवळ्याचं काय ?

एकनाथांनी अस्पृश्याचं मूल कदाचित कडेवर घेतलं असेल. पण या पापाचं क्षालन गंगास्नानानं होतं अशी त्यांची खात्री होती.

अंत्यजाचा विटाळ ज्यासी । गंगास्नाने शुद्धत्व त्यासी ।
ते गंगास्नान अंत्यजासी । शुद्धत्वास अनुपयोगी ।

म्हणजे गंगास्नानानं सवर्ण शुद्ध होतो, पण तेच गंगास्नान अस्पृश्यानं केलं तरी तो शुद्ध ठरत नाही. हे ॲबसर्ड लॉजिक आम्हाला कळूच शकत नाही.

प्रश्न : संतांनी काहीच विधायक कार्य केलं नाही, असं तुम्हाला म्हणावयाचे आहे काय ?

संतांनी केलेल्या कार्याचं स्वरूप ध्यानात घेता आध्यात्मिक क्षेत्रातील समता संतांनी स्वीकारली होती असं आढळतं. ऐहिक पातळीवरील समता, संतांनी मान्य केली आहे असं दिसत नाही. 'भजनात एकी आणि भोजनात बेकी' अशी या संबंधातील संतांची भूमिका होती. ज्ञानेश्वरांनीसुद्धा गीतेची पुनर्निर्मिती केली आणि ब्रह्म हे सर्वत्र आहे, हे तत्त्व मान्य केलं. ब्रह्म हे जर सर्वत्र आहे, तर ज्ञानेश्वर त्यांना ब्रह्मवृंदाने बहिष्कृत केल्यानंतर अस्पृश्य वस्तीत जाऊन का राहिले नाहीत ? उलट, त्यांनी शूद्र सिंहासनावर बसला तर तो अजगरे स्थाणू गिळावा, असा दिसतो, अशी शूद्रांची अवहेलनाच केली आहे.

संतांनी चातुर्वर्ण्यव्यवस्था, पूर्वजन्म, पुनर्जन्म, कर्मविपाक या सर्व विषमताजन्य गोष्टींचा स्वीकार केला आहे, असं दिसतं. परंतु संतांची वाङमयीन दृष्टया एक गोष्ट मला महत्त्वाची वाटते ती ही की, संतांनी मराठी भाषा समृद्ध केली, स्त्रीजातीतून संत जन्माला आले. विविध जातींची शब्दकळा, प्रतिमा, त्यांचे जीवनानुभव, संतसाहित्यात व्यक्त झाले आहेत. ही मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनं त्यांनी घातलेली मोलाची भर आहे. संतांनी काही एका प्रमाणात साहित्यिक लोकशाहीच आस्तित्वात आणण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट स्वीकारावयास हरकत नाही.

संत हे काही प्रमाणात उदारमतवादी आहेत, त्याचं कारण बुद्धदर्शनाचा संतांवर परिणाम झाला आहे, असं आढळतं. खरे म्हणजे उरलसुरल्या बौद्धमताचे क्षीण पडसाद संतसाहित्यातून उमटले आहेत. तुकारामांनीच म्हटलं आहे–

'कलियुगी पांडुरंग बुद्धरूपे बैसला ।'

प्रश्न : दलित साहित्याच्या विचाराच्या दृष्टीनं 'सोशल अँन्थ्रापॉलॉजिकलचा अँप्रोच'चा मुद्दा मांडला जातो तुम्हाला काय वाटतं?

'सोशल अँन्थ्रापॉलॉजिकल अँप्रोच' घेतल्याखेरीज दलित साहित्याचा अन्वयार्थ योग्य प्रकारे लावता येणार नाही, असं मला वाटतं. भारतात नाना जाती, नाना वेष इत्यादींचा इतका गजबजाट आहे की त्या त्या घटकाला न्याय द्यावयाचा असल्यास त्या त्या घटकाची जडणघडण पाहणं आवश्यक आहे.

प्रश्न : आता आपण दलित साहित्यावरील काही आक्षेपांकडे वळू. दलित साहित्य हे 'प्रचारी आहे' असा एक आक्षेप आहे.

कोणतंही साहित्य घेतलं तरी त्यातून सुप्त, अर्धसुप्त वा प्रकटपणे 'प्रचार' हा होतच असतो. उदा. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेतून माणसाकडे पाहण्याची जी एक दृष्टी आहे, तीतून माणसाबद्दलची एक धारणा सुप्तपणे का होईना पण जी. ए. प्रसृत करीत नाहीत काय? आपण त्यांच्या कथेतला हा भाग संस्कार म्हणून स्वीकारलेला असल्यामुळे तो आपल्याला प्रचारात्मक वाटत नाही इतकंच. ज्याला आजपर्यंत बोलूच दिलं नव्हतं त्याचा कंठ मोकळा झाल्यामुळं ते बोलणं तीव्र होतं. अंतरीचं स्वाभाविकपणेच बाहेर येतं. संतसाहित्यालाही या प्रकारे कुणी प्रचारात्मक म्हणू शकेल? 'हाकारूनी सांगे तुका । नाव घेतल्याविण राहू नका ।' हा प्रचारच नाही काय?

प्रश्न : पण त्याला असा आक्रस्ताळा सूर लावलाच पाहिजे का?

भारतीय तत्त्वज्ञानात मुरलेल्या पिंडाला जागृत करावयाचं म्हटलं म्हणजे ही तीव्रता, आक्रमकता येणारच. टिपेचा सूर लागणारच. या क्षेत्रात नांगरल्याविण बरीच भूमी आहे. कालांतरानं ती संस्कारित होईल. शोकातून श्लोक, क्रोधातून क्रांती निर्माण होत नाही का?

प्रश्न : दलित साहित्य 'एकसूरी' असतं, असाही एक आक्षेप आहे. यावर तुमचं काय म्हणणं आहे?

तसं कोणतंही साहित्य 'गट' म्हणून एकसूरीच असतं. 'नवसाहित्य' किंवा 'बिटनिक' साहित्य तरी काय आहे? ते एकसूरीच नाही काय? शिवाय जे आज दलित साहित्य प्रसिद्ध होत आहे, त्यापेक्षा अप्रकाशित असं खूपच दलित साहित्य आहे. ते सारं उजेडात आलेलं नाही. ते प्रकाशित होण्यास अनेक अडचणी आहेत. सवर्ण प्रकाशकांचा दृष्टिकोण हाही याला कारणीभूत आहे. दलित लेखक आता कुठे लिहू

लागलेले आहेत आणि तरीही बंधुमाधव, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, बाबूराव बागुल, केशव मेश्राम, योगिराज वाघमारे यांच्या कथा एकमेकींहून मांडणीच्या दृष्टीनं वेगळ्या नाहीत का ? ढसाळांची कविता आणि वामन निंबाळकरांची कविता वेगवेगळी नाही का ? दलित जीवनातला आशयच एकसूरी आहे, असं म्हणत असाल तर एकंदर साऱ्या जीवनावरच एकसूरीपणाचा आरोप करावा लागेल. जीवनात तोचतोचपणा सर्वत्रच नाही का ? दलित साहित्याचा उदय अगदी अलीकडे झालेला असल्यामुळे त्यात अनुकरणप्रधानता काही प्रमाणात आहे, पण हे म्हणताना या साहित्याच्या पोटेन्शिअॅलिटीकडेही दुर्लक्ष होता कामा नये.

प्रश्न : एकसूरीपणाच्या जोडीनं दलित साहित्यावर व्यक्तिनिरपेक्षतेचाही आरोप केला जातो.

भारतीय समाजात व्यक्ती नाहीच. जे आहे ते सर्वांचे आहे. सर्वांचे एकत्रित होऊन समाजरूपानं उभं राहिलेलं आहे. भारतीय समाजात व्यक्ती अशी नाहीच. ज्याचं विभाजन करता येत नाही ते इनडिव्हिजेबल; परंतु येथे तर सर्वत्र डिव्हिजन–चिरफाळ्या झालेला माणूस आहे. त्याला एकसंध असं व्यक्तिमत्त्व नाहीच. अशी व्यक्तित्वाच्या चिरफाळ्या झालेली माणसं जेव्हा समान दुःखामुळे एकत्रित होतात तेव्हा त्या दुःखाला एक व्यक्तित्व प्राप्त होतं. दलित साहित्यात व्यक्ती दिसत नाही, टाईपच दिसतो, असं म्हटलं जातं, त्याचं हेही एक कारण असू शकेल.

प्रश्न : दलित साहित्याचा सूर एवढा आक्रस्ताळा का ? सौम्यता, सूक्ष्मता, सूचकता हेही चांगल्या साहित्याचे घटक नाहीत का ?

घर जळत असलं तरी आस्तेकदम विझवू चला, असं सांगणं जेवढं विसंगत तेवढंच दलित साहित्यानं आक्रमक असू नये असं म्हणणं विसंगत आहे. हा त्यातील अंगाराचा भाग आहे. हा अंगार, हा वणवा संपूर्ण विषमताप्रधान संस्कृती जाळून टाकल्याशिवाय थांबणार नाही. दलित साहित्य ही केशवसुतांच्या भाषेत बोलावयाचं तर जग उलथून टाकण्याची प्रक्रिया आहे, केशवसुतांनी नाही का शब्दांच्या धोंड्यांनी हाणाहाण केली ? दलितांना शब्दांचा बंदुकीच्या गोळीसारखा उपयोग करावयाचा आहे, फुलांसारखा नाही. यात कसलीच लपवाछपवी नाही. वेदना, विद्रोहाचा, संतापाचा हा खुलाखुला आक्रोश आहे.

प्रश्न : ' दलित जाणीव ' ही निरंतर चिरंतन मानावयाची की परिवर्तनशील ?

सर्व विश्व हे परिवर्तनशील आहे. कालची महाकाव्यं आज महत्त्वाची वाटत नाहीत. कालची संस्कृती, कालचे देव आता धुळीत लोळताना दिसतात. जे काल देवासारखे वाटत होते ते आज दैत्यासारखे वाटू लागले आहेत. शंबूकाचा शिरच्छेद करणारा राम किंवा खांडववनदहनास मदत करणारा कृष्ण आमच्या दृष्टीनं ' व्हिलन ' ठरतात. तेव्हा उद्या काय होईल याबद्दल आज कोण आणि कसं सांगणार ?

एवढं निश्चित की शोषित माणूस आज जागा झाला आहे आणि क्रोधाविष्ठ माण-सांचं बळ त्याच्या पाठीमागे आहे. त्याचा विजय अवश्यभावी आहे.

प्रश्न : दलित साहित्याचं 'शहरी' व 'ग्रामीण' असं विभाजन केलं जातं. तुमचा या बाबतीतील अभिप्राय काय ?

एक पिढी गावात वाढते. दुसरी झोपडपट्टीत. दोन्हीकडे तीव्रपणं जाणवणारं समान सूत्र एकच आहे, ते म्हणजे आर्थिक शोषण आणि अस्पृश्यतेची जाणीव. त्याचं रूप खेड्यांहून शहरात थोडं वेगळं होतं, म्हणूनच बाबूरावांची कथा आणि शंकरराव खरातांची कथा यात फरक आढळतो. शंकररावांच्या कथेतून ग्रामीण अस्पृश्यांचं दुःख भळभळतं, तर बाबूरावांच्या कथेतून आर्थिक पेचांचं अधिक दर्शन होतं. ढसाळांच्या कवितेतून शहरनिष्ठ वैताग, दुःख, औद्योगीकरणातील पेच अधिक प्रमाणात व्यक्त होतात, तर वामन निंबाळकरांची कविता गावकुसाबाहेरचं ग्रामीण जग साकार करते. ग्रामीण मजुरांची दुःखाची जात आणि शहरी कामगारांची दुःखाची जात थोडी वेगवेगळी असते. दुःख हे दोन्हीकडे समानच. कारण हिंदू जातीयतेचा—सामंतशाहीचा उपसर्ग दोन्हीकडे सारखाच. परंतु मूलभूत दुःखभाव सारखाच असला तरी परिस्थितीमुळे त्याचं आविष्करण वेगवेगळ्या पद्धतीनं होतं. सवर्ण संतप्त पिढीचं दुःख आणि दलितांचं दुःख या अर्थानं वेगवेगळं ठरतं.

प्रश्न : ही वेगळेपणाची दरी कशी भरून निघेल ?

काही प्रमाणात औद्योगीकरणानं. या औद्योगीकरणाची आजची गती फार मंद आहे. घटनेतील मूलभूत हक्कांची कलमंही अजून प्रभावीपणं व्यवहारात येत नाहीत. ती आणावी लागतील. इतरही अनेक गोष्टींचा विचार करावा लागेल.

प्रश्न : दलित अस्मिता जागविण्यात दलितांचं व्हेस्टेट इंटरेस्ट आहे असं म्हटलं जातं. काही प्रमाणात तरी यात तथ्य आहे असं तुम्हाला वाटत नाही काय?

तिरस्कृत ठरविणारा डाग (stigma) अखंड बाळगावा असं कोणाला वाटेल? तो घेऊन वावरणं हे विदारकपणे दुःखदायी नाही काय ? दलितत्व हे मानव समाजाच्या अपमानाचं सर्टिफिकेट आहे. ते मिरवण्यात आनंद कसला ? वस्तुतः त्याची लाज सवर्णांना वाटावयास हवी. पण जोवर सवर्ण समाजाची मनोवृत्ती बदलत नाही, तोवर दलितत्वाची जाणीवही अस्तित्वात राहणारच. उदा., आज एखाद्या विद्यार्थ्याचं मेरिट मोजताना त्याच्या परीक्षेतील गुणांची टक्केवारी लक्षात घेतली जाते. पण प्रस्थापित सवर्णाचा मुलगा आणि सामान्य दलितातील मुलगा परिस्थितिभिन्नतेमुळे बौद्धिक विकासाच्या समान पातळीवर येणं अवघड आहे, हा मुद्दा लक्षात घेतला जात नाही. अस्पृश्य वा मागासलेला गणल्या गेलेल्या विद्यार्थ्याच्या गुणांचं मोजमाप करताना त्याचा प्रतिकूल परिस्थितीचा भाग लक्षात

घ्यावयास हवा. यातून वर येण्याच्या त्याच्या प्रयत्नाबद्दल काही गुण ठेवले पाहिजेत. पण आज तरी हे सर्व बारकाईनं लक्षात घेतलं जात नाही.

प्रश्न : दलित साहित्यात 'कविता' या फॉर्मवरच अधिक भर का? इतर वाङ्मयप्रकारही तितकेच महत्त्वाचे नाहीत का?

दलित लेखकांनी लिहिताना फॉर्मचा विशेष विचार करू नये, असं माझं मत आहे. हे साहित्य आपला फॉर्म आपण ठरवील.

प्रश्न : तुमचं अदलित साहित्याबद्दलचं मत काय? ते तुम्हाला अर्थशून्य वाटतं की ते तुमच्या मनापर्यंत पोचतच नाही?

इतर साहित्य अर्थशून्य नाही. पण बेताचं आहे. कागदी फुलांसारखं आहे.

ते मनापर्यंत पोचत नाही असं नाही, पण त्यात रमावं असं वाटत नाही. दलितेतरविषयींचं मला एक लेखक म्हणून भान असतं. (नागरी एकाकीपणा, वैफल्य, इत्यादी) ते समजून घेतलं पाहिजे असंही वाटतं.

प्रश्न : दलित अनुभवांइतकेच दलितेतर अनुभवही तुम्ही महत्त्वाचे मानता तर!

दलितेतर अनुभवही मला महत्त्वाचे वाटतात. जीवन समजून घेण्यास तेही उपयोगी पडतात. या दृष्टीनं त्या संदर्भात त्यांचं महत्त्व आहेच.

प्रश्न : आता एकच प्रश्न. दलित साहित्यामुळे एकंदर मराठी साहित्यात काय बदल झाला? दलित साहित्यानं मराठी साहित्याला काय दिलं?

या साहित्यानं मराठीला खूप दिलं. आशय आणि अभिव्यक्तिदृष्टचा विशेषत: भाषेची आजपर्यंत अपरिचित असलेली अनेक रूपं दलित साहित्यानं प्रकट केली. युगांचे उपेक्षित समर्थ साहित्य लिहू शकतात, हे सिद्ध केलं. प्रचलित मराठी साहित्यावर हे या साहित्याचे उपकार आहेत. दलित साहित्याचं केन्द्र निखळ मानवता हे असल्यामुळे या साहित्यात आज ना उद्या प्रचलित साहित्याहून वेगळं मूल्य, वेगळी आशयघनता, जाणिवेची वेगळी रूपं, अभिव्यक्तीची नवी तंत्रं निर्माण होतील, असा विश्वास निर्माण केला. मराठीला जर 'नोबल प्राइझ' मिळणारच असेल तर ते या प्रकारच्या साहित्यालाच मिळेल. कारण ते समग्र मानवाचं साहित्य असेल!

●

# १० : श्री. नारायण सुर्वे

[ श्री. नारायण सुर्वे : मुलाखत स्थळ : साहित्य परिषद, पुणे, दिनांक २१ मार्च १९८१, संध्याकाळी ६–३० वाजता.

आजचे एक अग्रगण्य मार्क्सवादी कवी म्हणून विख्यात आहेत. ‘ पीपल्स पब्लिशिंग हाऊस’ या संस्थेचा प्रकाशन विभाग ते पाहतात. त्यांना ‘ दलित साहित्यिक’ असे औपचारिक अर्थाने मानले जात नसले तरी दलित कवींच्या कवितेवर, सुर्वे यांच्या कवितेचा फार मोठा प्रभाव आहे. दलित कवींनी तो आनंदाने मान्यही केलेला आहे. समाजाभिमुखता आणि कलात्मकता यांचे रसायन सुर्वे यांच्या कवितेत जेवढे उतरले आहे तेवढे अन्य कोणा नवकवीत क्वचितच् उतरलेले आढळते. सुर्वे हे कवी असले तरी एक कार्यकर्तेही आहेत. त्यामुळे ते सदैव धावपळीत असतात. त्यांचा माझा चांगला परिचय असूनही त्यांची मुलाखतीसाठी गाठ घेणे मुष्किलीचे ठरले. म्हणून ते कामानिमित्त पुण्यात आले असताना त्यांची मी वेळोवेळी भेटण्याची संधी घेतली. पत्रव्यवहार केला. तसा वेळ नसताही मनमोकळी मुलाखत त्यांनी दिली. ती दोन–तीन हप्त्यांत घेतली आहे. दलित साहित्याची चळवळ त्यांना महत्त्वाची वाटते. स्वत:ला ते या चळवळीचे एक सहप्रवासीही मानतात. पण दलित साहित्यिकांचे आता केवळ औपचारिक कौतुक किंवा निषेध करण्यापेक्षा त्यांना योग्य ते मार्गदर्शन लेखनदृष्टया केले पाहिजे. त्यांच्या गुणांबरोबर त्यांच्यातील दोषांचीही डोळसपणे चर्चा, चिकित्सा केली पाहिजे, असेही ते मानतात. या चिकित्सेच्या दृष्टीने पी. पी. एच.तर्फे नवे साहित्य प्रकाशित करण्याचा त्यांचा मनोदय दिसला. डॉ. म. सु. पाटील यांचे ‘दलित कविता’ हे समीक्षात्मक पुस्तक या भूमिकेतूनच त्यांनी प्रकाशित केलेले आहे. ]

---

प्रश्न : ‘ दलित जाणीव ’ म्हणजे नेमकं काय ?

आज जी दलित जाणीव आहे ती आम्हाला गावकुसाबाहेर लोटलेलं आहे, आम्ही बहिष्कृत आहोत, या भूमिकेतून पुढे आलेली आहे. तिचं आजचं स्वरूप मुख्यत: वर्णाश्रमधर्मविरोधी असं आहे. मला जी जाणीव अभिप्रेत आहे ती याहून फार व्यापक

आहे. तीत राजकीय–सामाजिक–आर्थिक–सांस्कृतिक किंबहुना मानसिक दृष्टया मागासलेल्या, अपंग अशा सर्वच व्यक्तींचा समावेश होतो आणि या प्रकारच्या जाणिवेला 'दलित जाणीव' म्हणायला पाहिजे. आणि दलितांचा लढा हा केवळ वर्णाश्रमविरोधी लढा न राहता हा लढा सर्व शोषित वर्ग आणि वर्ण यांची सांगड घालून उभा केला पाहिजे. त्याची अंतिम परिणती समाजवादाकडे जाण्यात झाली पाहिजे.

प्रश्न : हा लढा एकदम मार्क्सवादी वळणावर न नेता एकंदर भारतीय पद्धती लक्षात घेता या लढ्याचं लक्ष्य चातुर्वर्ण्यविरोधावरच मुख्यत: आणखी काही काळ केंद्रित केलं पाहिजे असं म्हणणारा एक दलितांचा वर्ग आहे. वाटल्यास आपण त्यांना 'आंबेडकरवादी' म्हणू. तेव्हा या संदर्भात तुमची भूमिका काय आहे ?

हा लढा चातुर्वर्णाविरुद्धच मुख्यत: लढला गेला पाहिजे, हे म्हणणं खरं नाही. कारण चातुर्वर्णाश्रम पद्धतीचा तुम्ही अधिक खोल विचार केल्यास त्यापाठीमागे तुम्हाला आर्थिक विषमताच आढळेल. हा लढा सोशिओ–इकॉनॉमिक–पॉलिटिकल स्वरूपाचा आहे. राखीव जागेच्या आग्रहापाठीमागेही हाच प्रश्न उभा आहे. म्हणून या लढ्याची दिशा समाजवादी असली पाहिजे आणि त्यासाठी दलित आणि दलितेतर यांनी एकत्र आलं पाहिजे, असं मी म्हणतो.

प्रश्न : दलित वर्ग आर्थिकदृष्टया सुधारला तरी अदलित मंडळी त्याला जवळ करीत नाहीत, असा दलितांचा अनुभव आहे. अशा परिस्थितीत आर्थिक संदर्भात दलित–अदलित एकत्र येतील, या म्हणण्याला आधार काय ?

अनुभव व इतिहास हाच आधार. एखाद्या गिरणीतील किंवा उद्योगसमूहातील कामगार आर्थिक किंवा तत्सम मागण्यांसाठी एकत्रपणे संप पुकारतात, जातपात विसरून एकत्र येतात, असा अनुभव नाही काय ? काही दिवसांपूर्वी मुंबईतील कापड-गिरणी कामगारांनी संप करून एकत्रितपणे तेरा महिने लढा दिला, त्याची येथे आठवण होते. अर्थात केवळ एवढ्यामुळे दलित आणि दलितेतर यातील दरी मिटेल असं नाही. ही एक दीर्घकाळपर्यंत चालणारी प्रोसेस आहे. अनेक विधायक उपायांतून हळूहळू हे होत जाणार आहे. दलित व दलितेतर यांना समान आर्थिक हितसंबंधाची डोळस जाणीव येणं, हा यातला एक महत्त्वाचा भाग. या प्रकारची डोळस दृष्टी व त्यासाठी संघटित होण्याची प्रेरणा माझ्या मते, मार्क्सवादच देऊ शकतो.

प्रश्न : दलित हे मुख्यत: स्वत:ला 'आंबेडकरवादी' म्हणवून घेतात आणि बऱ्याच आंबेडकरवाद्यांना आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद या परस्परभिन्न तत्त्वप्रणाली आहेत, असं ठामपणे वाटतं. सकृत्‌दर्शनी तरी त्यांचं म्हणणं

बरोबर वाटतं. आंबेडकरांच्या व्यक्तित्वाच्या जडणघडणीचा संबंध रशियन राज्यक्रांतीशी नसून फ्रेंच राज्यक्रांतीशी आहे. या राज्यक्रांतीतील व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वं भारतीय विचारवंतांनी शिरोधार्य मानलेली आहेत. आंबेडकरही या व्यक्तिस्वातंत्र्यवादी उदार मानवतावादाचेच प्रवक्ते नाहीत काय ? 'धर्मांतराचा' त्यांनी केलेला पुरस्कार काय दाखवितो ?

डॉ. आंबेडकर तत्त्वत: मार्क्सवादाला जवळ होते किंवा नाही, हा वादाचा मुद्दा म्हणून सोडून देऊ. पण आंबेडकरांनी दलित विमोचनासाठी जे लढे उभारले, ते साऱ्याच पददलितांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. ते साऱ्याच प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणारे आहेत. त्यांनी स्वतंत्र भारताची घटना तयार करताना जी दृष्टी बाळगली तीत साऱ्याच पददलितांचा विचार आढळत नाही का ? अशा परिस्थितीत डॉ. आंबेडकर हे मार्क्सवादाला जवळचे होते किंवा नव्हते ? या प्रश्नाचा ॲकॅडेमिक कीस काढीत बसण्यापेक्षा आंबेडकरांचं कर्तृत्व साऱ्याच पददलितांच्या विमोचनाच्या दृष्टीनं उपकारक होतं, असा दृष्टिकोण स्वीकारणं अधिक योग्य होईल. स्वत:ला मार्क्सवादी म्हणविणाऱ्यांनीही या दृष्टीनं आंबेडकरांना आपलं मानलं पाहिजे.

प्रश्न : ओघात आलं म्हणून तुम्हाला विचारतो ? तुम्ही स्वत: मार्क्सवादी आहातच. दलित लेखकांतील काही अग्रगण्य लेखकही वृत्तीनं मार्क्सवादी आहेत. बाबूराव बागुल आणि तुम्ही तर 'तात्पर्य' मासिकांशी संबंधितही आहात. स्वत:ला 'आंबेडकरवादी' म्हणविणारी बरीच मंडळीही तत्त्वत: मार्क्सवादीच आहेत.पण असं असूनही ही दलित मंडळी सरळपणे मार्क्सवादाचा पुरस्कार करण्यास का कचरतात ?

येथील मार्क्सवादी मंडळींनी केलेल्या चुकांचा हा परिणाम आहे. येथील मार्क्सवादी मडळींनी येथील परंपरा, माती, पाणी, वृत्ती यांचा विचार न करताच सरधोपटपणे मार्क्सवाद रुजविण्याचा प्रयत्न केला. येथील परिस्थितीची योग्य ती दखल त्यांनी घेतली नाही, त्याचा हा परिणाम आहे. कोणतीही विचारसरणी येथे नव्यानं रुजविताना येथील प्रगत परंपरांचा विचार केला पाहिजे. त्या परंपरा डावलून चालणार नाही. या बाबतीत अजूनही आपण पूर्वीच्याच चुका करीत आहोत असं मला वाटतं. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद हा परस्परांना पुरकच आहे असं माझं मत आहे. इतिहास या दोन्ही प्रवृत्तींना जोडल्याशिवाय राहणार नाही.

प्रश्न : 'परंपरा डावलून चालणार नाही, या बाबतीत आपण पूर्वीच्याच चुका करीत आहोत,' असं तुम्ही म्हणता. त्याचा थोडा अधिक खुलासा कराल का ?

मला असं म्हणावयाचं आहे की, येथील मार्क्सवादी मंडळी बऱ्याच वेळा, भारतीय इतिहासाचा संदर्भ लक्षात न घेता, मार्क्सवादाचा पोथिनिष्ठ पद्धतीनं विचार व उच्चार करतात. भारतीय परिस्थितीचा नीट विचार न करताच एखाद्या व्यक्तीवर वा विचारावर प्रतिगामित्वाचा शिक्का मारतात. अन्यथा मार्क्सवादी चळवळ येथे रुजवू इच्छिणाऱ्यांना फुले, आंबेडकर, आगरकर, महर्षी शिंदे. कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादींच्या कार्याचा विसर पडला नसता. त्यातील पुरोगामी आशयाकडे दुर्लक्ष झालं नसतं. या दृष्टीनं वासुदेव बळवंत फडके, क्रांतिवीर चाफेकर यांच्या कृतींचाही विचार झाला पाहिजे. थोडक्यात ज्ञानेश्वर–तुकारामापासून ते न्या. रानडे–गांधींपर्यंत येथे पुरोगामी विचारांचं वारं वाहू लागलं. त्या साऱ्यांचे संदर्भ 'परंपरा' या शब्दानं मला सूचित करावयाचे आहेत.

प्रश्न : आजच्या ग्रामीण साहित्याबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

ग्रामीण साहित्यही माझ्या कल्पनेप्रमाणे या सर्वंकष लढ्याचा एक भाग व्हावयास पाहिजे. पण आज चालू असलेल्या ग्रामीण साहित्याला कोणतीही आयडियॉलॉजी नाही. ते मचूळ आहे. त्याचा एकंदर दृष्टिकोन, आवाका मर्यादित आहे मूलभूत ग्रामीण प्रश्नांकडे ते लक्ष देत नाही.

ग्रामीण साहित्य माझ्या कल्पनेप्रमाणे या सर्वंकष ( दलितमुक्तीसह ) परिवर्तनाच्या लढ्याचा एक भाग व्हावयास पाहिजे. बदलत्या खेड्यातील बदलता माणूस नुसता पोशाख किंवा ट्रॅक्टर आला म्हणून नव्हे, तर तो काय विचार करतो यासह चित्रित झाला पाहिजे. त्याचं सरंजामी प्रवृत्तीचं मन बदलत असताना उठणाऱ्या प्रतिक्रिया व नव्या बदलांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही व्यक्त व्हावयास हवा आहे. त्याच्या मानसिक वाढीचा प्रगत आलेख, जिवंतपणे चित्रित केला गेला पाहिजे. केवळ एस. टी. गेली अथवा रेल्वेचा नवा फाटा आला किंवा एखादं कॉलेज निघालं तर ही जशी स्वागतार्ह बाब ठरेल, तसेच किंबहुना जास्तच तो या सर्व घडामोडींशी, त्याच्या जीवनाशी, मनाशी, सर्व खेड्यांशी व देशाशी जोडला जात असताना कोणता विचार करील, हेही यावयास हवं आहे. म्हणजेच या बदलाविषयी लिहिणारा लेखकही नव्या मनोवृत्तीनं व प्रगत–वैचारिक भूमिकेनं जोडला जातो किंवा नाही, हेही या प्रसंगी महत्त्वाचं ठरतं. केवळ स्थिरचित्रण म्हणजे साहित्य नव्हे. किंवा कृतिमपणे पात्रांवर अथवा कथांवर लादलेला बदल म्हणजेही ग्रामीण साहित्य नव्हे. पर्ल बकच्या कादंबऱ्या चांगल्या कलात्मक चित्रणाचं जिवंत उदाहरण आहेत.

प्रश्न : दलित जीवनाचं चित्रण अदलित लेखकांना करता येणार नाही, असा एक सूर आहे. तुम्हाला काय वाटतं ?

निश्चितच करता येईल. मुद्दा व्यक्तीपेक्षा दृष्टीचा, कलात्मक संवेदनेचा, वस्तुनिष्ठतेचा आहे.

प्रश्न : दलित साहित्याच्या संदर्भात वेगळ्या निकषांची निकड तुम्हाला कितपत जाणवते ?

महाराष्ट्रात सौंदर्यशास्त्राबद्दल जो विचार झाला आहे, तो कितपत मूलगामी आहे ? सारं सौंदर्य–संवेदन घेऊन तो उभा आहे का ? असा एक प्रश्न माझ्यासमोर या संदर्भात उभा राहतो. मराठीतील सौंदर्यशास्त्राच्या या कोतेपणामुळेच दलित साहित्यिक वेगळ्या सौंदर्यशास्त्राची मागणी करतात, असं मला वाटतं. आजच्या प्रचलित मराठी सौंदर्यशास्त्राचा पाया पश्चिमी आहे. कुठलंही शास्त्र त्या त्या समाजाला तेथील स्थिति-गतीतून व्यापून उरणारं असलं पाहिजे. माणसाच्या प्रगत जीवनाबरोबर वाढणारं व विकसित होत जाणारं, असं पाहिजे.

प्रश्न : ' पश्चिमी ' या शब्दाचा अधिक खुलासा कराल काय ?

' पश्चिमी ' याचा अर्थ क्रोचे–रिचर्डस्‌सारख्या सौंदर्यमीमांसकांचा येथे शालेय पद्धतीनं केला जाणारा स्वीकार. आमची कविता आमची माती घेऊन जन्माला येते. ती टिपून घेण्यासाठी वेगळ्या जीवनदृष्टीची गरज आहे.

प्रश्न : मग येथील साहित्यविचारातून ' पश्चिमी ' कल्पना वगळाव्यात, असं तर तुमचं म्हणणं नाही ?

बिलकूल नाही. चांगलं कोठूनही घ्यावं. पण ते तारतम्यानं घ्यावं. अन्यथा फार घोटाळे माजतात. उदाहरणार्थ मर्ढेकर घ्या.

प्रश्न : मर्ढेकरांचं काय ?

मर्ढेकरांची कविता आणि मर्ढेकरांचं समीक्षाशास्त्र यात एक मोठा विसंवाद मला जाणवतो. मर्ढेकरी कवितेला येथील अस्सल मातीचा वास आहे. म्हणून त्या प्रभावी झाल्या आहेत. पण मर्ढेकरी सौंदर्यशास्त्र मात्र पाश्चात्य सौंदर्यकल्पनेवर आधारलेलं आहे. त्यामुळे कवी मर्ढेकरांनी समीक्षक मर्ढेकरांचा पराभव (डिफीट) केलेला आढळतो. संवेदनाक्षम कवी मर्ढेकर मला आवडतात तर त्यांची समीक्षा शिंप्यानं मापं बेतावीत तशी वाटते. समीक्षकांच्या आराखड्यांना उत्तम कलेनं नेहमीच हुलकावण्या दिलेल्या आहेत, असा इतिहास आहे. आज मराठीत समीक्षेचं जे दारिद्र्य वाढीला लागलं आहे, त्याचंही कारण हेच आहे.

प्रश्न : पश्चिमी वा पौर्वात्य कोणतंही सौंदर्यशास्त्र घेतलं तरी त्यात काही कॉमन फॅक्टर नाहीत का ?

आहेत ना ! सौंदर्यसंकल्पनांत एक कॉमन फॅक्टर सार्वत्रिकता हा आहे. पण

त्याचा विचार करताना इतर बरेच घटक लक्षात घेतले पाहिजेत, असं माझं म्हणणं आहे. एकत्वाबरोबरच वेगळेपणाचाही विचार झाला पाहिजे. दलित साहित्य कशातून उभं राहिलं हे पाहिलं पाहिजे.

प्रश्न : दलित साहित्य विचारात घेताना ‘ सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच ’ ची गरज आहे, असं तुम्हाला वाटतं काय ?

‘ सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच ’ दलित साहित्याच्या आकलनाच्या दृष्टीनं उपयोगी पडेल. तो मूल्यमापनाचा निकष असणार नाही.

प्रश्न : दलित साहित्यावरील आक्षेपांकडे आता थोडं वळू. ते प्रचारी आहे, एकसूरी आहे असं म्हटलं जातं.

प्रचारी आहे हे खरं आहे. समाज जेव्हा आपले मतभेद तीव्रतेनं बोलून दाखवितो, प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्यात प्रचार डोकावणारच. मात्र हा प्रचार आवश्यक तेवढा कलापूर्ण नाही, तो कलेचं रूप घेऊन आला पाहिजे एवढीच माझी तक्रार आहे.

आजचा दलित लेखक प्राधान्यानं शहरी आहे. खेड्यातील अस्पृश्य जीवनाशी त्याचा जिव्हाळ्याचा संबंध राहिलेला नाही. त्यामुळे तो ठराविक सूर आळवतो. त्याच्या सामाजिक जाणिवा पुरेशा मॅच्युअर नाहीत. राजकीय व अर्थशास्त्रीय जाणिवाही स्पष्ट नाहीत. त्यामुळेच चातुर्वर्ण्यावर हल्ला करण्यात किंवा ‘ मला मनूनं मारलं ’ असे ओरडून सांगण्यात तो समाधान मानतो. उत्तम कला ही उत्तम जाणिवांमधून व संवेदनांतून जन्माला येते हे आपण विसरू लागलो की काय, असं मला वाटतं.

प्रश्न : दलित साहित्य हे मुख्यत: दलितांच्या दु:खावर आधारलेलं असल्यामुळे, दु:खाच्या ठराविकपणामुळे तर हे एकसूरीपण आलेलं नसेल ?

दु:ख खरं, पण दु:खालाही अनेक पदर असतात. त्यांचा उलगडा आजचे हे दलित साहित्य करीत नाही. त्यासाठी मानवी मनाचा सामग्र्यानं अभ्यास केला पाहिजे, चिंतन केलं पाहिजे, कष्ट केले पाहिजेत. Rhetoric वर भर देऊन चालणार नाही. दलित साहित्यात या दृष्टीनं stagnation आलं आहे, असं मला वाटतं. त्यात ‘ ह्यूमन टच ’ कमी आहे. ब्रॉड आउटलुक नाही.

प्रश्न : ‘ या साहित्यात व्यक्ती येत नाही. हे साहित्य आक्रस्ताळे आहे ’ असाही एक आक्षेप आहे.

व्यक्ती येत नाही, ती ढोबळ होते, हे खरं आहे. व्यक्ती न येता समूह आला म्हणून काही बिघडत नाही. कारण लेखकाला समूहही चांगल्या रीतीनं ‘ पेंट ’ करता येतो. पण ‘ गोलपीठा ’सारखा अपवाद वगळता दलित साहित्यात हे समूहचित्रणही प्रभावीपणं येत असल्याचं मला दिसत नाही.

आक्रस्ताळं आहे, हे खरं आहे. पण काही काळ तरी ते तसं राहणारच. कारण आताशा कुठे आपले हे मित्र बोलू, लिहू लागले आहेत. आत्मभान आलं की ते अंतर्मुख होतीलच, त्यांना व्हावंच लागेल.

प्रश्न : हे साहित्य नकारात्मक आहे असंही म्हटलं जातं.

नकारात्मक आहे असं मलाही वाटतं. आणि जोवर या साहित्याचा भर केवळ चातुर्वर्ण्याच्या निषेधावर राहील, तोपर्यंत हे साहित्य नकारात्मक राहण्याची शक्यताच अधिक आहे. माझी तक्रार नकारविरोधी नाही, हा नकारही समर्थपणे उभा राहात नाही. केवळ Rhetoric म्हणून उभा राहतो, ही माझी मुख्य तक्रार आहे. इतिहासातही काही चांगल्या बाबी स्वीकारणीय आहेत, त्याकडे लक्ष जाईल तेव्हा हा विरोध मावळेल, असा मला भरवसा आहे. मात्र वर्णव्यवस्था मोडली पाहिजे हे खरंच आहे.

प्रश्न : दलित साहित्याचं 'शहरी' व 'ग्रामीण' असं वर्गीकरण केलं जातं, ते तुम्हाला कितपत बरोबर वाटतं ?

'शहरी दलित' आणि 'ग्रामीण दलित' हा फरक मला कृत्रिम वाटतो. बाबूराव बागुल आणि योगीराज वाघमारे यांच्या कथेचा Core एकच आहे. फक्त चौकट वेगळी आहे. फरक असलाच तर बाह्य वातावरणाचा, भाषेचा आहे. स्पष्ट बोलावयाचं तर शहर विरुद्ध खेडं हा वादच मला भंपक वाटतो. कारण येथील अपुऱ्या औद्योगीकरणामुळे देशाचं पुरेसं शहरीकरणच झालेलं नाही. शहरात राहणाऱ्या अनेक कामगारांची नजर त्यांच्या खेड्याकडं असते. त्यांची Roots खेड्यातच असतात. उपजीविकेपुरता तो शहरात वावरतो, पण मनानं त्याचं लक्ष खेड्याकडं असतं. शहरात वर्गणी गोळा करून तो आपल्या खेड्यात शाळा बांधण्याचे मनसुबे रचतो. रजा मिळताच किंवा संपकाळात कोकणात पळतो. मुंबईवर त्याचं पोट अवलंबून असलं तरी त्याचे हितसंबंध खेड्यातच असतात. आपला देश पूर्णत: भांडवलशाहीमुक्त झाला नाही किंवा सरंजामशाहीही राहिलेली नाही. त्यामुळे शहर-खेडं हा वाद माझ्या मते उपरा आहे.

प्रश्न : दलित जाणीव टिकविण्यात एक 'व्हेस्टेड इंटरेस्ट' आहे असं म्हटलं जातं, तुमचं मत काय ?

दुर्दैवानं अशी काहीशी परिस्थिती आहे खरी. आपण कितीही तात्त्विक भाषा वापरली तरी वस्तुस्थिती अशी आहे की आजचा दलित लेखक स्वत: सेमी-मिडल क्लासचा बनला असून त्याचे डोळे मिडल क्लास बनण्याकडे लागलेले आहेत. पण या लेखकांचे पाय वर्णवादामध्ये अडकलेले आहेत. त्यामुळे त्यांची स्थिती त्रिशंकूसारखी झालेली आहे. त्यात एक संधीसाधूपणा शिरलेला आहे. स्वत:ची वेगळी आयडेन्टिटी टिकविण्याकडे व या आयडेन्टिटीचे फायदे उठविण्याकडे त्याचा कल

आहे. (येथे बोलण्याच्या ओघात सुर्वेनी काही उदाहरणं दिली. या परिस्थितीबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.)

प्रश्न : आता थोडे तुमच्या साहित्याकडे वळू. तुमचा आवडता वाङ्मयप्रकार कोणता ?

मी कवितेवर मनापासून प्रेम करतो. पण मी काही कथाही लिहिल्या आहेत. आत्मचरित्र लिहावं असा इतरांचा आग्रह आहे. मी अजून विचार केलेला नाही. इतर पुष्कळ लिहावंसं वाटत. पण तूर्त तरी कवितेवर भर आहे खरा !

प्रश्न : तुमच्या लेखनाचा भर कशावर – अनुभव, कल्पना का इंटरप्रिटेशन ?

अनुभव तर आहेतच. पण कविता ही केवळ अनुभवानं सिद्ध होत नाही, तिला कल्पनेचे पंख लावावे लागतात. पण हे पंख लावले तरी मूलत: मी वास्तववादी लेखक आहे. ते मी सोडणार नाही. शिवाय समोरच्या वस्तुस्थितीच्या बदलांकडे मी डोळसपणे पाहतो. यातूनच मला नव्या नव्या गोष्टी, घडामोडी, माणसं दिसतात. नुसतं वास्तव टिपण्यापेक्षा वास्तवातील बदलती स्थिती व बदलासाठी होणारे संघर्षही मी टिपतो. माणसं आपली स्थिती बदलणारच यावर माझा पूर्ण विश्वास आहे. ही संघर्षरत माणसंच माझ्या कवितेचा कणा आहेत.

प्रश्न : तुमचं इतर विषयांशी नातं ?

इतर जातींचं मी खूप चित्रण केलं आहे. मार्क्स–नेहरूपासून पोर्टर–पोस्टरवाला, वेश्या इत्यादींचाही अंतर्भात होतो. लेखकानं कोणताही अनुभव वर्ज्य मानू नये. इतर अनेकांचं चित्रण करावं असे खूप मूडस् येतात.

प्रश्न : तुम्हाला दलितेतर साहित्याबिषयी काय वाटतं ?

इतर साहित्याशी संबंध ठेवले पाहिजेच असं माझं मत आहे. प्रचलित साहित्याला नकार देताना तुम्ही त्यातील चांगलं काय ते हेरलं पाहिजे. उदा. व्यंकटेश माडगूळकर किंवा पु. ल. देशपांडे यासारखे लेखक घ्या. ते मला आवडतात. त्यांना बूर्झ्वा म्हणून दूर लोटण्यात अर्थ नाही. त्यांचीही एक कॉन्ट्रिब्युशन आहे. ती लक्षात घेतली पाहिजे. मराठी साहित्याची परंपरा लक्षात घेतली पाहिजे. ज्ञानेश्वरांचं ' पसायदान ' मला फार आवडतं.

प्रश्न : आजच्या नागरी एकाकीपणावर लिहावं, असं तुम्हाला कधी वाटत नाही ?

उत्तर वर आलंच आहे. मी गुणवत्ताही हेरतो. जपतो. नागरी एकाकीपणाचंही मी आपल्या परीनं चित्रण केलं आहेच. दलितेतर अनुभवक्षेत्राबद्दल मला आस्था असल्यामुळेच मी विविध प्रकारचं जीवनचित्रण केलं आहे.

प्रश्न : दलित साहित्यानं मराठी साहित्याला काय दिलं ?

उपेक्षित जीवनाकडे लक्ष वेधलं. आजपर्यंत मूक असलेल्यांना एक व्हॉईस दिला.

[ श्री. नारायण सुर्वे यांची दलित साहित्यविषयक प्रश्नांच्या निमित्ताने घतलेली

मुलाखत संपल्यानंतर त्यांच्या साहित्यनिर्मितीबाबत माझ्या मनात जे काही खास प्रश्न घोळत होते, तेही या निमित्ताने विचारून टाकावेत, असे मला वाटले. ते प्रश्न आणि त्यांची उत्तरे पुढे दिली आहेत. हे प्रश्न किंवा त्यांची उत्तरे सर्वसाधारणपणे जरी दलित साहित्याशी संबंधित नसली तरी पर्यायाने ती संबंधित आहेत असे वाटल्यावरून येथे ती अंतर्भूत केली आहेत. ]

प्रश्न : प्रबल सामाजिक जाणीव आणि त्याचा कलापूर्ण आविष्कार यांची नाळ मराठीत तरी दीर्घकाल तुटल्याचं जाणवतं, पण याला तुमची कविता अपवाद आहे. आजच्या मराठी साहित्यात दुर्मिळ ठरलेली ही किमया तुम्ही कशी काय साधू शकलात ?

माझ्या मते १९२० पर्यंतचा एकूणच भारतीय इतिहासाचा कालखंड हा नवजागरणाचा कालखंड होता. आधुनिक भारतीय साहित्याच्या या सुरवातीच्या कालखंडात– यात मराठीचाही कालखंड आलाच– जीवनाच्या सर्वच स्तरांवर विविध घडामोडी व हालचाली चालू असल्याचं दिसतं. ज्ञानविज्ञान, भाषा, नवी शैक्षणिक गरज, समाजसुधारणा, राजकारणातील संघटित एकोपा, स्व–अस्मितेचा शोध इत्यादी. यात सुशिक्षित मध्यमवर्गीयांचा सिंहाचा वाटा होता. मात्र टिळकपर्वानंतर महाराष्ट्रातला मध्यमवर्ग गांधीयुगाला तितक्या उत्साहानं सामोरा गेलेला दिसत नाही. तो भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही तितक्याशा उत्साहानं आला नाही, किंबहुना नाहीच. तो समोरच्या सर्वच उपस्थित प्रश्नांपासून अलिप्त झाला आणि स्वतःच्या कोषातच राहणं आनंदाचं मानू लागला.

याउलट इतर भारतीय प्रांतात घडलं. उदा. बंगालमध्ये शरश्चंद्र चटर्जी, गुरुदेव टागोर, बंकिमचद्र आदी थोर लेखक उपस्थित प्रश्नांना भिडले. त्यांनी जीवनाच्या तळागाळाचा शोध घेतला व त्यातून नव्या प्रेरणा, नवे कलात्मक आविष्कार शोधले. हिंदीतही हेच दिसतं. मुन्शी प्रेमचंद, जयशंकर प्रसाद, आचार्य रामचंद्र शुक्ल, माखनलाल चतुर्वेदी, जैनेन्द्रकुमार, यशपाल, मुक्तिबोध इत्यादी. ही यादी अनेक पटींनी लांबविता येईल. तेलगू, तामीळ, पंजाबी, कन्नड, उर्दू, साहित्यातही अशीच प्रगत परंपरा आहे. सुब्रह्मण्यम भारती, बालातोल, अमृता प्रीतम् अशी केवढी तरी नामावली देता येईल. आपण आपल्याच कुंपणात राहायला शिकलो आणि केवळ युरोपीयनांचं अनुकरण करीत राहिलो.

नाही म्हणावयाला केशवसुत, हरिभाऊ, समस्यांना भिडले. कुसुमाग्रजांनी हा ध्वज अधिक उंचावर नेला. मर्ढेकरांनी महायुद्धोत्तर प्रश्नांना आध्यात्मिक कवच घालून भिडण्याचा प्रयत्न केला आणि माणसाला भवितव्य नाही, हे सांगून ते मोकळे झाले. धामधूम झाली असेल तर ती एवढीच. हां, एक झालं. कलावाद की जीवनवाद यावर घणाघाती चर्चा झाली. पण ती करायला काय जातं ? तिच्यातलाही

पोकळपणा पुढे सिद्ध झाला.

आता मराठीत दुर्मिळ असलेली गोष्ट मला कशी साधली असं विचारता, हे मला माहीत नाही. कदाचित वर मी जो त्रोटक प्रपंच मांडलेला आहे, त्यातून हे जमलं असावं.

प्रश्न : बोलीभाषेला जवळ असलेली तुमची जी विशिष्ट काव्यशैली आहे तीही मराठीत प्रमाणतः कमी आहे. ती तुम्ही कशी कमावलीत ?

विद्यमान कवितेतील ग्रांथिक भाषा मला समजण्यासारखी नव्हती. ती पूर्णतः मला अपरिचितच होती. या भाषेतून स्वतःला व्यक्त करण्याचं सामर्थ्य मला मिळण्यासारखं नव्हतं. सगळेच सत्य पांघरून बोलत. सूचकता व कलात्मकता यांचं इतकं जबर भान असे की, त्यातून सांगायचं असेल ते सहजी निसटून जात असे. शिवाय, मराठी कवितेतून जे व्यक्त होत असे, ते सर्वथा माझं नव्हतंच. त्यातील काही भावभावनांच्या जवळ जाण्याइतपतच मी पोचू शकत असे. मात्र खोलवर आत शिरून काही हाती लागेल म्हटलं तर तसं काहीच लागत नव्हत.

मी एका निराळ्या जगात उभा होतो. तेथे प्रतिमा, भाषा, विषय व त्यातील जिवंत रसरशीतपणा प्रचंड होता. तो केवळ साधेपणानं मांडला तरी अभूतपूर्वच होता. मी हे सर्व उचलावयाचं ठरविलं. या जगात श्रम होते. श्रमातील अभूतपूर्व सौन्दर्य मला जाणवायचं. लोखंडाला आकार द्यावा तशी भाषा तेथे वापरली जात असे. जगण्यातले सर्व पराभव पत्करूनही माणसं आपला आत्मा व उमेद हरवत नसत. सहजपणेच त्यांच्या भाषेला एक वजन प्राप्त होई. शेकडो विषय माझ्या दारावर येऊन उभे राहात व आपली हकीकत सांगत. या सर्वांनाच मी जसं आहे, तसंच मांडायचं ठरवलं. त्यातूनच या शैलीचा उगम झाला असावा. असं मला वाटतं. खूप अर्थपूर्ण व खूप खोलवर जाऊन हे चित्रण करायला हवं, कष्ट घ्यायला हवेत. तरच ते जसं हवं तसं यथार्थपणे साकार होऊ शकेल, हे माझ्या लक्षात आलं. हे सोपं नाही, ते नम्रतापूर्वक लिहिलं पाहिजे. या माणसांच्या कष्टाला व संघर्षाला एक इतिहास आहे व तो आपला खरा प्रगत वारसा आहे, हे मी जाणलं. शैली जीवनाच्या घुसळणीतून जन्मते, असा माझा नम्र समज आहे. बोली भाषेच्या व सामान्य माणसाला समजेल या शैलीच्या जवळ जो मी पोचलो त्याचं कारणही हेच असावं असं मला वाटतं.

प्रश्न : तुम्ही एक प्रभावी काव्यवाचक / गायक आहात, म्हणून विचारतो, सभासंमेलनातून काव्यगायनाला तशी खूप गर्दी जमते. पण व्यक्तिशः काव्यवाचन करणाऱ्यांची संख्या थोडीच राहते, असं का घडत असावं ? कविता जनसामान्यांपर्यन्त पोचवण्यासाठी काय करता येईल ?

गेली वीस वर्षे मी काव्यवाचन (गायनही) करीत असतो. समाजातल्या सर्वच

थरांत मला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. लोकांपर्यंत कविता पोचविण्याची ही एक उत्तम संधी असते, असं मी मानतो. रसिक कवितेला विटलेले नाहीत, हे मला जागजागी प्रत्ययास आलेलं आहे. लोकांच्या व कवीच्या तारा जुळल्या पाहिजेच. लोकांना तुच्छ किंवा अरसिक लेखता कामा नये. उलट, कवींनीच अंतर्मुख होऊन विचार करायला पाहिजे. एखाद्या कवीच्या तारा लोकमानसाशी जुळल्या नाहीत, म्हणजे तो कवी कमी प्रतीचा आहे, असं मी मानीत नाही. रसिकांनीही त्याला नीट समजाऊन घ्यायला पाहिजे.

मात्र वारंवारच असं घडू लागलं तर कवींनी स्वतःच आत्मशोध घ्यायला पाहिजे. काव्यवाचन ही एक शैलीही आहे, व ती ज्याच्या त्याच्या रचनाधर्मानुसार घडत गेलेली असते. खोटं नाटचीकरण व खोटा आत्मवाद आणि आवेश कवितेला मारक ठरतो. उलट, प्रत्येक कवितेच्या रचना व शैलीनुसार आपण गेलो तर ती कविताही– सूक्ष्मदेखील– लोकांपर्यंत पोचविता येते. हा कवीच्या अभ्यासाचाही विषय आहेच. मराठीतील काही नामवंत कवींनी काव्यवाचनाचे खूपच सुंदर आणि प्रभावी पायंडे पाडलेले आहेत व कविता रसिकांपर्यंत नेलेली आहे. हे त्यांचे ऋणच आहे.

प्रश्न : आता एक शेवटचा प्रश्न सर्वसाधारण स्वरूपाचा–साहित्याच्या क्षेत्रात आज जी एक प्रकारची मरगळ जाणवते, तिची कारणं तुमच्या मते काय असावीत ?

साहित्यात मरगळ येणं, हे पुढची झेप घेण्यापूर्वीचे लक्षण असतं, जीवनाचा रथ अखंडपणे चालूच असतो. कधी सावकाश तर कधी वेगानं, थांबत कधीच नाही· कारण गती हा जीवनाचा नियमच आहे परंतु लेखक, कवी मात्र कधीकधी थकलेले दिसतात हे खरंच ! त्याची विविध कारणं आहेत. आणखीही एक आहे– आपल्या भारतीय जनमानसात अस्मितेचा शोध चालू आहे. काही वाटा सापडतात तर काही निसरडचा होताना दिसतात. आजचं वास्तव अधिक गुंतागुंतीचं व अधिक भयाण होत चाललेलं आहे. लोकांना बदल हवा आहे व मार्ग तर खुंटलेले दिसतात. ही ती सामाजिक व राजकीय अशी जनजीवनाची घुसळण आहे. त्या घुसळणीशी आमचा संपर्क कमी होत चालला की काय, असं मला वाटतं. बदलणारं आंतरराष्ट्रीय जग व आपण किंवा समोरच्या उपस्थित प्रश्नांची उकल व त्याला भिडणं बदल मागू पाहणारे सर्व वर्ग व थर, बदलती स्त्री व तिचं इप्सित, बदलता बहुजन समाजाचा समुद्रच्या समुद्र व त्यांच्या इच्छा–आकांक्षा जाणून घेण्याची आपली कुवत वगैरे शंभर गोष्टींचा शोध घेतल्याखेरीज हे काही कळणार नाही.

म्हणून जीवनाच्या बदलत्या प्रवाहाबरोबर सतत आपणही बदलत रहावं. किंवा जमल्यास आहे त्यापेक्षा अधिक चांगल्या जीवनासाठी लिहिणं व कलात्मक लिहिणं लोकमानसाबरोबर कायम राहणं आवश्यक आहे. ●

# ११. शरच्चंद्र मुक्तिबोध

[ 'शरच्चंद्र मुक्तिबोध' हे लेखकाचे नाव व त्यांचे साहित्य त्यातील विशिष्टतेमुळे नेहमीच लक्षात राहणारे. त्यांच्या गोष्टींची ओढ लावणारे. तथापि प्रा. मुक्तिबोध नागपूर सोडून सहसा बाहेर न जाणारे. त्यामुळे भेटीगाठीं एकंदर कठीणच. पण या मुलाखतीच्या निमित्ताने त्यांची नागपुरास जाऊन मुद्दाम मी भेट घेतली(५-२-८१). भर दुपारी त्यांच्या शंकरनगरमधील वास्तव्यस्थळात पूर्वसूचना न देताच दत्त म्हणून उभा राहिलो. त्यांनी थोडे बिचकतच दार उघडले, पण ओळख पटवून देताच आणि भेटीचे प्रयोजन स्पष्ट करताच त्यांनी विलक्षण आस्था दाखविली. त्यांची प्रकृती ठीक नसते, असे ऐकले होते. त्यामुळे त्यांच्या सोयीने मुलाखतीची वेळ निश्चित करण्याबद्दल मी त्यांना विनंती केली. पण माझी अडचण ओळखून आणि प्रकृतीचे अस्वास्थ्य असताही त्यानंतर लगेच त्यांनी मुलाखत देण्यास मान्यता दिली. त्यांचे हे वागणे मला सुखद धक्का देऊन गेले. प्रारंभीचे त्यांचे बोलणे काहीसे अस्पष्ट व अडखळल्यास्वरूपाचे होते. पण पुढेपुढे बोलण्याच्या ओघात हे अडखळणे दूर होऊन त्याला अस्खलित स्वरूप प्राप्त झाले. तत्त्वचिंतकाच्या अनुषंगाने इतरही पुष्कळ बोलणे झाले. एका विदग्ध केलेल्या सुखसंवादाचा आनंद मला या मुलाखतीच्या निमित्ताने भरपूर मिळाला. मुक्तिबोधाची वैचारिक आणि साहित्यविषयक बैठक कोणत्या अधिष्ठानावर आधारलेली आहे, याची प्रतीतीही या मुलाखतीच्या निमित्ताने आली.

मुलाखत लिहून काढल्यानंतर अवलोकनासाठी त्यांच्याकडे पाठवून दिली. त्यांनी त्यावर काही संस्करणही केले. त्यानंतर थोड्याच दिवसात त्यांच्या निधनाचे वृत्त वाचले. हे वृत्त आकस्मिक होते. या मुलाखतीच्या पुस्तकाची प्रत भेटीला पाठवून त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याची पुनर्भेटीची शक्यता यामुळे कायमची दुरावली. ]

---

प्रश्न : 'दलित जाणीव' म्हणजे नेमकं काय ? समतेचा आशय असलेल्या सर्व जाणिवांहून वेगळी ? सर्व शोषित तीत अंतर्भूत होत नाहीत काय ?

दलितत्वाचा व्यापक अर्थ का घ्यावयाचा नाही ? उदा. मार्क्सवादी जाणीव. ही जार्ण व दलितविषयक जाणीवच नव्हे काय ?

दलित जाणीव ही आधुनिक भारतातील दलितवर्गाच्या जीवनव्यापारामधून उद्भवलेली जाणीव होय. भारतीय समाजेतिहासाचा विशेष असा की येथे वर्ग-व्यवस्था जातिव्यवस्थेच्य रूपानं स्थिर झाली. आणि त्यातल्या त्यात दलितवर्गाचा विशेष असा की आर्थिक शोषणाबरोबरच अस्पृश्यतेचा शाप मिळून ह्या वर्गाच्या मनुष्यपणालाच लांच्छित व्हावं लागलं त्यामुळं ऐतिहासिक वेदनाविद्ध प्रक्षोभ हा दलित जाणीवेतील एक महत्त्वाचा धागा आहे.

प्रश्न : धर्माचा व्यापक अर्थ का घ्यावयाचा नाही ? दलितपण जपण्यात ' व्हेस्टेड इंटरेस्ट ' नाही का ?

धर्माचा व्यापक अर्थ का घ्यावयाचा नाही ? अशा प्रश्नानं दलित संतप्त न झाले तरच नवल ! ' धर्म ' हा दलितांच्या बाबतीत बौद्धिक शोधाचा प्रश्न नव्हे. धर्माचे चटके पूर्वी आणि बऱ्याच अंशी आजही बसत असल्यामुळे अशा धर्माविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया प्रकट होणे स्वाभाविकच होय. दलितवर्ग बौद्ध धर्माच्या विरुद्ध दिसत नाही. उलट, ह्या धर्माचा तर दलितांनी बहुसंख्येनं स्वीकार केला आहे. धर्माच्या बाबतीत विचारला तसाच दलितपणाचा व्यापक अर्थ का घ्यायचा नाही, असा प्रश्नही बरोबर वाटत नाही. जगाच्या पाठीवरील इतर सर्व शोषित वर्गा-पेक्षा दलितांचा अनुभव वेगळा आहे. दलितांचा ऐतिहासिक अनुभव फक्त त्यांचाच आहे. इतर कोणाचाही नाही. दलिताचं स्वप्न फक्त त्यांचंच आहे, इतर कोणाचंही न'ही. म्हणून दलितपणाचा व्यापक अर्थ त्यांना घेता येत नाही, तसा त्यांचा अनुभव नाही.

अमूर्त (abstract) विचारांकडून मूर्ताकडे असा दलित जाणिवेचा प्रवास नाही. एखादी वैचारिका (ideology) बुद्धीला पटून ध्येयनिष्ठ व्यक्ती जेव्हा चळ-वळीत उतरतात, तेव्हा त्यांना असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. उदा. मध्यम-वर्गीय मार्क्सवाद्याला असे प्रश्न विचारता येतील. दलितांना तसे प्रश्न विचारणं मात्र योग्य वाटत नाही कारण दलितांच्या जाणिवेचा वेगळेपणा दलितपणाच्या प्रत्यक्ष वस्तुस्थितीमध्ये आहे. ती त्यांच्या मनावर खोलवर कोरली गेलेली दिसते. ही वस्तुस्थिती दलितांनी निर्मिलेली नव्हे; म्हणून संकुचित विचारसरणीचा तो परिणाम नव्हे. आणि ही गोष्ट सहज कळण्यासारखी आहे.

इंग्रज भारतात आल्यावर त्यांनी ज्या परिवर्तनाच्या प्रक्रिया सुरू केल्या व जो नवा आधुनिक विचार दिला त्याच्या आधारे दलितवर्गाला आपला दलितपणा मनुष्यनिर्मित आहे हे कळलं. जुन्या सरंजामी व्यवस्थेतील दलितपणाचा वास्तवार्थ कळला आणि मनुष्यपणाचा हक्क म्हणून त्यांनी सामाजिक संघर्ष सुरू केला.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भौतिक व वैचारिक प्रगतीची साधनं ह्या संघर्षाला प्राप्त होऊन दलितांचा जो अटीतटीचा संघर्ष वरीष्ठ वर्गीयांशी / वर्णीयांशी झाला आहे, त्यातून दलित जाणीव घडविली गेली आहे. दलितपणात 'व्हेस्टेड इंटरेस्ट' आहे असं म्हणणं म्हणजे, उपाशी माणसाला 'तुझ्या अन्नात व्हेस्टेड इंटरेस्ट आहे' असं म्हणण्यासारखं आहे. आज उद्या भांडवलशाही समाजव्यस्थेच्या अंतर्गत दलित वर्ग स्पर्धेत उतरला आहे. त्यात पुन्हा पांढरपेशा वर्गांच्या उच्च स्थानाला शह बसत असल्याचं स्पष्ट दिसतं व त्या भूमिकेमधून कधी कधी असे प्रश्न विचारले जातात. दलितांना विचारावयाच्या प्रश्नांची मांडणी वेगळ्या प्रकारे झाली पाहिजे, असं म्हणणं योग्य ठरेल.

मार्क्सवादी जाणीव ही दलित जाणिवेपेक्षा मूलतः भिन्न अशी जाणीव आहे. पृथ्वीतलावरील मानवजातीच्या स्थितिगतिनियतीचे ते दर्शन आहे. समाजांतर्गत उत्पादनाच्या साधनांची मालकी व उत्पादनाचे संबंध ह्यामधील विसंगतीमधून शोषिक–शोषित वर्गाचं द्वंद्व उद्भवतं व कायम राहतं. उत्पादनाचं नवं प्रगत साधन उपस्थित झाल्यावर जुनी वर्गव्यवस्था मोडते, आणि नवी वर्गव्यवस्था उदयाला येते. कोणत्याही काळातले विचार हे त्या त्या काळातली सत्ताधारी वर्गाला अनुकूल असेच असतात व नवी वर्गव्यवस्था पुढे आल्यावर तिला अनुकूल असे नवे विचारही स्थिर होऊ लागतात. ही समाजाची प्रगती असते, भौतिक व नैतिक प्रगती. विज्ञानाचा विकास होतो तेव्हाच नवी प्रभावी उत्पादनाची साधनं पुढे येतात. ही उत्पादनाची साधनं अशी असतात की त्यासाठी मागच्या अवस्थेतील जे मानवसंबंध असतात तेच नव्या वर्गव्यवस्थेला अडथळ्यासारखे बनतात व तिला अनुकूल जे मानवसंबंध आकाराला येतात ते मानुषव्यापाराला अधिक वाव देणारे असतात. अशा प्रकारे मार्क्सदर्शन हे मानवजातीच्या भौतिक / नैतिक विकासाचं दर्शन आहे.

आजच्या भांडवलशाही समाजव्यवस्थेचं शोषक स्वरूप स्पष्ट करून श्रमिक कामगारवर्गाच्या एकजुटीतून भांडवलशाहांची खाजगी मालकी नष्ट करून शोषणमुक्त स्वतंत्र समाजाकडे वाटचाल करण्याच्या प्रक्रियेला आज मार्क्सवाद गतिमान करीत आहे. अमूर्त मूल्याचा फक्त प्रसार, वा व्यक्तिशः वा समूहशः भांडवलशाहीच्या चौकटीतच राहून त्यासाठी सुधारणावादी संघर्ष असा हा मार्ग नसून श्रेष्ठ जीवनमूल्यांना वास्तवात आणण्यासाठी वर्गविरहित समाजव्यवस्था निर्मिण्याचा हा एकमेव मार्ग आहे; व हीच मार्क्सवाद्यांची जाणीव होय. दलित वाङ्मयाच्या संदर्भात दलित आंदोलनाचा अन्वयार्थ मार्क्सवाद आजच्या भारतातील वर्गीयजातीय स्थितिगतीच्या विश्लेषणातून स्पष्ट करतो. भारताच्या विशिष्ट परिस्थितीमुळे शोषक–शोषितांचे निकाली संघर्ष भारतात कधीच होऊ शकलेले नाहीत. आजच्या काळात, जुन्या सरंजामी संबंधाची तोडमोड करीत नवे दलित

सुशिक्षित वर्ग (भांडवलशाही स्पर्धेच्या व्यवस्थेत) आधुनिक पांढरपेशा वर्गात दाखल होत आहेत; ह्या प्रक्रियेत ते जुन्या सांस्कृतिक परंपरेचा धि:कार करीत मनुष्यमूल्याच्या प्रेरणेनंच प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली शोषित वर्गाची आकलन प्रकट करीत आहेत. जुन्या सरंजामी जन्मसिद्ध श्रेष्ठ–कनिष्ठतेच्या मानवसंबंधांना नाकारणारी ही प्रक्रिया भारतीय जीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीनं व नैतिक निकोप-पणाच्या दृष्टीनंही शुभ अशी गोष्ट आहे. जुन्या पांढरपेशा वर्गाच्या हितसंबंधावर आक्रमण झाल्यासारखं वाटत असल्यामुळं आर्थिक हितसंबंधांना जातीय स्वरूप आल्यासारखं दिसत आहे.

मार्क्सवादी जाणीव ही मानुषमूल्याधिष्ठित वर्गीय आंतरराष्ट्रीय जाणीव आहे व मुख्यत: आजच्या भांडवली व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणारी आहे, तर दलित जाणीव ही मानुषमूल्याधिष्ठितच परंतु भारतातील एका वर्गाच्या जाणिवेचा आवि-ष्कार आहे. मार्क्सवादी जाणीव ही भारतीय समाजव्यवस्थेत आमूल वर्गीय क्रांती करू पाहणारी जाणीव आहे, तर दलित जाणीव ही व्यक्तिस्वातंत्र्यवादाच्या आधारावर आधुनिक मध्यमवर्गात पदार्पण करणाऱ्या वर्गाची सुधारणावादी जाणीव आहे. मार्क्सवादी वैचारिकतेचे / जाणिवेचं स्वरूप नेहमी आर्थिक–राजकीय संघर्षात्मक असतं. तर दलित जाणिवेचं स्वरूप सामाजिक–सांस्कृतिक असतं. जुन्या सांस्कृतिक जाणिवेविरुद्ध नवी प्रतिक्रिया, व नव्या वास्तवतेबाबत जुनी प्रतिक्रया, अशा स्वरूपाचं दिसतं. ऐतिहासिकतेचा धागा दोन्ही जाणिवांमध्ये समान दिसतो. परंतु मार्क्सवादी जाणिवेची ऐतिहासिकता ही समग्र मानवजातीची ऐतिहासिकता आहे व शोषणमुक्त स्वतंत्र मानव हे तिचं स्वप्न आहे, तर दलितसृष्टीची ऐति-हासिकता भारतीय जीवनातील एका जातीची / वर्गाची ऐतिहासिकता आहे व ती दलित जीवनाच्या शापमुक्तीचं स्वप्न पाहणारी आहे. मार्क्सवादी जाणीव ही निरंतर पुरोगामी राहू शकणारी आहे, तर दलित जाणिवेस मध्यमवर्गात स्थिर होण्याच्या प्रक्रियेमुळे वर्गचरित्राच्या मर्यादा पडण्याची शक्यता आहे. मात्र दलित लेखकांमध्ये मार्क्सवादी विचारसरणीचे लेखक आहेत, हे विसरून चालणार नाही.

प्रश्न : दलित साहित्याला साहित्याचे नेहमीचे निकष न लावता वेगळे निकष लावले जावे असं म्हटलं जातं, आपलं या बाबतीतील मत काय आहे ?

चालू कलात्मक म्हणून गणलं जाणारं वाङ्मय व दलित वाङ्मय ह्यामध्ये स्वरूप–भेद आहे. त्यामुळे आपल्या वाङ्मयाला नवी कलात्मक मूल्यं आवश्यक आहेत, असं दलित लेखकांना वाटतं असल्यास नवल नाही. त्यात हास्यास्पद असं काही नाही. उलट, नवी जीवनविषयक जाणीव ही नवी कलामूल्यं नेहमीच अपेक्षित असते. दलित वाङ्मयामध्ये आज अनेक समर्थ लेखक आहेत व ते 'आमच्या अकलात्मक वाङ्मयाला कलात्मक माना' असा हट्ट धरून बसल्याचं ऐकिवात नाही.

संतवाङ्मय आपली कलामूल्यं घेऊन आलं. पंतांनी पारंपरिक मूल्यंच आपली मानली. केशवसुतांनी नव्या जाणिवेला अनुसरून नवं रोमँटिक काव्यशास्त्रच मांडलं. हरिभाऊंनी आपल्या कलात्मक उद्दिष्टांना धरून जीवनानुकृतिवाद सांगितला. रविकिरण–मर्ढेकर मिळून रचनानिष्ठ मूल्यं पुढं आली. तेव्हा 'आमच्या वाङ्मया-साठी नवी कलामूल्यं हवीत, त्याचं मूल्यमापन तुमच्या सौंदर्यनिष्ठ कलामूल्यांनी होणं अशक्य आहे.' असं म्हणणं म्हणजे दलित कलावंत स्वतःच्या कलाविषयक उद्दिष्टांबाबत जागरुक आहेत असं सिद्ध करणंच होय. दलितांची कलामूल्यं ही डिकन्स, बॅलझाक, टॉलस्टॉय, गॉर्की, प्रेमचंद, हरिभाऊ ह्यांची वास्तववादी परं-परेतील राहू शकतील. अर्थात दलितांनीच आपली कलामूल्यं स्वतःच्या कलात्मक उद्दिष्टांच्या बाबतीत जागरुक होऊन शोधावयाची आहेत

प्रश्न : साहित्यशास्त्र म्हटलं की त्यात एक सर्व साहित्यव्यापी मूल्यव्यवस्था नसते का ? वेगळं असं काही साहित्यशास्त्र असतं ?

वेगळं साहित्यशास्त्र असतं ? –ह्या प्रश्नातच 'नसतं' असं उत्तर गृहीत दिसतं. पण ते चूक आहे. ज्या ज्या वेळी विशिष्ट मूलात्म परिवर्तनं समाजात घडतात किंवा घडू पाहात असतात त्या त्या वेळी 'सत्य' व 'शिव' विषयक आकलनं बदलून कलाविषयक दृष्टीही मूलभूतपणे बदलते; आणि नवं साहित्यशास्त्र उभं राहतं. अशी मूलात्म तत्त्वदृष्टी आपणाजवळ आहे काय, किंवा संपूर्ण मूल्यार्थच बदलून जावा असं आपल्या जाणिवेचं स्वरूप आहे काय, ह्या गोष्टीचा मात्र दलित कला–विचारकांनी प्रामाणिकपणे शोध घेतला पाहिजे प्रस्तुत लेखकाच्या दृष्टीनं दलित संघर्षाच-व्याकुळतेच–समर्थन (ह्यामधून प्रकट होणारा मूल्यभाव) मानुषतेचं आहे. जीवननिष्ठ सर्व वाङ्मयाच्या मुळाशी हेच मूलतत्त्व असतं. 'मानुषता' ह्या मूल्यभावाला कलाकृतीचा प्राणभूत धर्म बनविणारं, किंबहुना तसा तो धर्म आहे हे तर्कदृष्ट्या सुसंगतपणे करून देणारं एखादं साहित्यशास्त्र असल्यास ते दलितांनी त्याचा निर्दोषपणा पडताळून स्वीकारलं पाहिजे; किंवा त्यापुढे गेलं पाहिजे. मार्क्स-वादी साहित्याविषयक विचार त्यांनी निश्चितपणं समजून घेतला पाहिजे. 'वेगळं साहित्यशास्त्र असतं ?' ह्या प्रश्नातून मात्र साहित्यशास्त्र इतिहासनिरपेक्ष असतं, असं मानलं गेलं आहे व तसं मानणं मात्र चुकीचं ठरतं.

कलानिर्मितीमागे जीवनविषयक आस्था असते. ती आस्था एकीकडे विश्वसत्याचा शोध घेऊ पाहते व दुसरीकडे त्याचा मानुषार्थ ओळखू पाहते. अशा प्रकारे ज्ञानाचा व जीवनार्थाचा संबंध येतो. पुढे तेच आकलन कलानिर्मितीमागं उभं राहतं.

प्रश्न : साहित्यास्वादात 'अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच'ची अपरिहार्य गरज आप-ल्याला वाटते का ? असल्यास का ?'

साहित्यस्वादातील 'अॅन्थरापॉलॉजिकल अॅप्रोच'चा पुढील धोरणानं विचार

करता येईल. एखादी 'कलाकृती' मुलं देहभान विसरून पाहतील, वाचतील, पण प्रौढांना मात्र ती आस्वाद्य होत नाही, असा नेहमीचा अनुभव असतो. असं का घडतं ? मुलांच्या बाबतीत आस्वादप्रक्रिया निश्चितपणे घडलेली असते. आस्वाद्यतेच्या किमान अटी पूर्ण झालेल्या असतात. परंतु प्रौढांना त्या 'कलाकृती'चा आस्वाद घेणं अशक्य होऊन बसतं. असं का घडतं ?

प्रौढांचा जीवनविषयक–जीवन न्यायविषयक समज मुलांपेक्षा प्रगल्भ असतो व हा समजच आस्वाद–विघ्न बनून उपस्थित होतो. एखादी गोष्ट 'भावुक' 'हळवी' वगैरे आहे असे आपण म्हणतो. म्हणजे आपण त्या गोष्टीला कलाकृतीचा दर्जा देत नाही. आता दुसरं उदाहरण घेऊ. पुष्कळदा एखाद्या कालखंडात काही कलाकृती फार लोकप्रिय होतात. प्रौढ मनावर त्यांचं राज्य चालतं. पुढे काळ बदलतो. जीवनाची नवी स्वप्नं–नवे व्यापक अर्थ सर्वांच्या समोर येतात की सर्वांनाच पूर्वीच्या कलाकृतीला आधारभूत असलेले प्रश्न व दृष्टिकोण उथळ वाटू लागतात व त्यामुळे त्या कलाकृती सर्वांनाच पोकळ वाटू लागतात. आजच्या सामान्य वाचकाची जाणीवसुद्धा मध्यंतरीच्या काळात अनुभवांच्या राशीच्या राशींची भर पडून इतकी प्रगल्भ झालेली आहे की पूर्वीच्या वाचकांच्या गळ्यातील ताईत असलेले फडके–खांडेकरांसारखे लेखक उथळ वाटू शकतात. त्यामुळे त्यांच्या कलाकृतींच्या बाबतीत आस्वाद–प्रक्रिया अशक्य होऊ शकते व सामान्यांचं जीवनविषयक ज्ञानच आस्वाद–विघ्न होऊन बसतं, कलास्वादाच्या किमान अटी पाळल्या जाऊनदेखील एकाला आपण कलाकृती म्हणून मान देतो तर दुसऱ्या निर्मितीला देत नाही. असा समीक्षा-व्यवहार प्रत्यक्षात चालू असूनही, आपण अमूर्त पातळीवर सत्यशिवनिरपेक्ष असा कलाकृतीचा विचार करू पाहतो आणि त्यामुळे वरील प्रकारचे प्रश्न विचारले जातात.

काही वर्षांपूर्वी C. P. Snow ह्या प्रसिद्ध इंग्रजी शास्त्रज्ञ–कादंबरीकारानं 'Two Cultures' ह्या विषयावर भाषणं देऊन विज्ञान आणि कलेची फारकत किती घातक असते ह्याबाबत आपले विचार मांडले होते व त्यामुळे इंग्रजी भाषिक विश्वात एकच वादंग माजलं होतं. त्याची खबरबात अर्थात आपणाकडे नव्हती. आपण 'औदुंबर', 'चाफा' ह्यासारख्या प्रश्नांची चर्चा करण्यात गुंतलो होतो. (वास्तविक 'औदुंबर' ही तत्त्वानुभवाची कविता नव्हे, आणि 'चाफा' हे भावगीत नव्हे.) मुख्य मुद्दा असा की कलावंताच्या शोधाचा विषय मानवी जीवन असतं व ते माणसाला स्वतःला जसं समजतं–वाटतं त्यापेक्षा ते कसं असतं ह्याचा शोध कलावंत घेत असतो. मर्ढेकरांची कविता मौलिक का ठरली ? विज्ञानाच्या प्रकाशात अनंतकोटिब्रह्मांड हे मानवार्थशून्य वाटतं. ह्या बैठकीवरून मर्ढेकरांनी माणसाकडे पाहिलं व त्यांना माणसाच्या धडपडीचा एक अर्थ कळला व त्यांची अनुभूती मौलिक



संग्रहालय ठाणे
39539

ठरली. विज्ञानाच्या आधारे मानवासह विश्वाचा जो प्रत्यय–मानुषसापेक्ष प्रयत्य येतो (अर्थाच्या अपेक्षेशिवाय अर्थशून्यतेचा प्रत्यय येऊ शकत नाही, म्हणून 'मानुष-सापेक्ष') तो मर्ढेकरांना आला. त्याशिवाय त्यांच्या कवितेला जी मौलिकता व उंची आली ती येऊ शकली नसती. थोडक्यात, कलावंताच्या व्यक्तित्वाला जे निर्मितीचं अंग असतं (प्रतिभा) त्याबरोबरच त्याची सत्यशोधकाची वृत्ती (प्रज्ञा) हीही निरंतर जागृत असावी लागते. मनुष्यविज्ञान ही अत्यंत प्रगल्भ व महत्त्वाची अशी ज्ञानशाखा असून त्याची आम्हा सर्वच लेखकांना अत्यंत आवश्यकता आहे, असं म्हणावंसं वाटतं.

दलित लेखकांना प्रश्नकर्ते समजतात त्याहून वेगळ्या व त्यांना अनपेक्षित परंतु अनुकूल अर्थानं अ‍ॅन्थ्रापॉलॉजीच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. ते अशाकरिता की ज्या संस्कृतीनं वा धर्मानं दलितांवर अन्याय केला आहे ती संस्कृती वा धर्म काही दुष्ट बुद्धीच्या विवक्षित लोकांनी एके दिवशी बसून अमानुष कट म्हणून निर्माण केलेला नाही. तो भारतासारख्या विवक्षित देशातील विवक्षित प्रदीर्घ ऐतिहासिक प्रक्रियेचा परिपाक आहे. हे तारतम्य दलित कलावंतांना अ‍ॅन्थ्रापॉलॉजीच्या अध्ययनामुळे येऊ शकेल व कलावंत ह्या नात्यानं जीवनाच्या जटिलतेचा प्रत्यय त्यांना अधिक येऊ लागेल व जीवनाचे अनेक न दिसणारे घटक दिसू शकतील. त्यामुळे त्यांची कला अधिक प्रगल्भ होऊ शकेल. सर्वच लेखकांनी अर्थात ह्या व अन्य विषयाचं ज्ञान प्राप्त केलं पाहिजे असं म्हणण्यात कोणाचा अवमान करण्याचा हेतू नाही, हे कृपा करून लक्षात घ्यावं.

प्रश्न : दलित साहित्यावर घेण्यात येणाऱ्या आरोपांबद्दल आपला अभिप्राय.

प्रस्तुत लेखक मोठा ज्ञानी आहे अशातला भाग नाही. दलितांवर घेतले जाणारे आक्षेप दलितसामान्यांनाच लागू होणारे आहेत. दलित साहित्याचा उदय वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीनं एक मोठी घटना आहे. हे 'वाक्सृष्टी एकेवेळे । देखतु माझे बुद्धीचे डोळे'–ह्या भूमिकेवरून पाहिलं तर हे पटण्यासारखं आहे. सामान्य कविता तर सर्वच कवी लिहीत असतात. सर्वसामान्य दलित कवीचा सामान्यपणा दलित–विशिष्ट सामान्यपणा असतो, ही खरी अडचण आहे. म्हणूनच तो विशेष खटकतो. एकीकडे व्यक्तिपुरतेपणाचा सामान्यपणा आहे, तो खटकत नाही. परिस्थितीपुरतेपणाचा सामान्यपणा लक्षात येतो, ही गोष्ट आपण अवश्य लक्षात घेतली पाहिजे. सर्वसामान्य दलित वाङ्मयाबाबत ज्या प्रतिक्रिया व्यक्त होतात त्याही एका मर्यादित पूर्वग्रहदूषित जाणिवेतून निर्माण होत असतात ह्यात शंका नाही.

एक असं सुचवावंसं वाटतं की बदलत्या भारतीय जीवनात, आजची दलित जाणीव ही मानुषतेची दुखावलेली प्रक्षुब्ध नैतिक जाणीव आहे ही गोष्ट लक्षात घेऊन, ती मानवी स्वातंत्र्याच्याच प्रेरणेनं संघर्ष करणाऱ्या इतर वर्गांशी / त्यांच्या

जाणीवांशी संवादी राहील ह्याची काळजी दलित लेखकांनी घेतली पाहिजे. मध्यमवर्गाच्या वा उच्च मध्यमवर्गाच्या प्रकृतीचा वा मानसिकतेचा नकळत स्वीकार केला गेल्यास दलित वाङ्‌मयांतर्गत प्रखरता नष्ट होऊन ती केवळ भावनेची एक शैली ठरेल व त्याचमानान कलाकृतीलाही हलकेपणा यईल; कारण तिचे घटक जे अनुभव ते आपला अस्सलपणा गमावून बसतील.

परंतु हेही खरंच, की दलित वाङ्‌मयाच्या आविर्भावाने (१) भारतीय जीवनविषयक, संस्कृतिविषयक, कलाविषयक चिंतनाला प्रेरणा मिळाली; (२) मराठीच्या बहुतांशी बंदिस्त वाङ्‌मयाला सामाजिकतेचं प्रभावी अंग लाभून व्यापक जाणिवेचं–क्रियाप्रतिक्रियात्मक जागृतीचं चैतन्य निर्माण झालं. (३) ज्यांच्या कथा कलादृष्टचा उत्कृष्ट आहेत असे कथाकार, ज्यांच्या कविता कलादृष्टचा उत्कृष्ट आहेत असे कवी, ज्यांची चरित्रं समाजजीवनाच्या अंगावर प्रकाश टाकणारी आहेत असे चरित्रकार मराठीला लाभले. आणि हे सर्व गेल्या वीस–बावीस वर्षांत घडलं आहे.

दलित लेखकांवर आज मोठी जबाबदारी आहे. कलाकार या नात्यानं त्यांनी आता जाणिवेच्या आत राहून चालणार नाही, तर जाणिवेच्या बाहेर राहून मानुषतेच्या भूमिकेवरून भारतीय व दलित जीवनाच्या परिवर्तन प्रक्रियेतील सर्व भौतिक व मानसिक अंतर्विरोधांचे आकलन करून घेत, त्या पार्श्वभूमीवर त्या जाणिवेची अंतर्रचना अधिकाधिक सुस्पष्ट करून घेत गेलं पाहिजे व ह्या जाणिवेला मूल्यार्थदृष्टचा क्षीण करणाऱ्या सर्व प्रवृत्तीविरुद्ध जागरुक संघर्ष केला पाहिजे. व ह्या प्रक्रियेस सर्व पुरोगामी संघर्षांशी एकात्मतेचं नातं स्थापित केलं पाहिजे. अर्थात ही प्रक्रिया राजकीय पक्षांनी एकत्र येण्यासारखी नाही. ती कलावंताची आंतरिक प्रक्रिया आहे. ज्ञानाच्या पातळीवर विश्व–प्रश्नांबद्दल उद्‌बुद्ध होत भारतीय जीवनप्रवाहाचं वस्तुनिष्ठ सम्यक् आकलन करीत आणि आपला मनुष्यपणा आंतरबाह्य संघर्षाद्वारे सखोल करीत त्या अंतर्निष्ठ प्रक्रियेतून हे व्हावयाचं आहे हे मुक्कामाचं उद्दिष्ट डोळ्यासमोर न ठेवलं गेल्यास हळूहळू एखाद्या निर्जिव संप्रदायाची कळा दलित चळवळीला व म्हणून दलित वाङ्‌मयाला आल्याशिवाय राहणार नाही, हेही तितकंच खरं आहे. दलितांच्या अग्रणी लेखकांसमोर हा खरा प्रश्न आहे. दलित वाङ्‌मयाच्या शक्यता लक्षात घेऊनच हे मी म्हणत आहे.

प्रश्न : दलित साहित्यामुळे मराठी साहित्यावर एकंदर कोणता परिणाम झाला ?

आम्ही आत्यंतिक व्यक्तिवादी लेखक होतो, आमच्या आविष्काराला अपुरी पडते म्हणून आम्ही भाषेची खूप मोडतोड केली. मोडतोडीमुळे भाषेचा जिवंतपणा कमी झाला. दलित साहित्यानं 'नेटिव्ह' भाषेचा वापर केल्यामुळे मराठी भाषेला पुन्हा जिवंतपण आलं. जागृत भाषेचं सामर्थ्य अनंत असतं. दलित साहित्यानं बोली-

भाषेचा सकसपणा पुन्हा मराठीत आणला. हा सकसपणा आमच्या लेखनात नव्हता. आम्ही भाषेवर aesthetics चे प्रयोग करीत होतो. जिवंतपणा जीवनात असतो याची आम्हाला जाणाव नव्हती कलेच्या रचनात्मक अंगातच आम्ही गुंतून पडलो होतो. हा क्रिया दलित साहित्यनिर्मितीमुळे थांबली. भाषेला परत जिवंतपणा आला. चैतन्य आलं सामाजिक जाणीव व्यक्तिनिष्ठ होती, ती सामाजिक झाली. तिच्या तीव्रपणे अनुभूत अशा अंगांचा प्रत्यय आला. विषयदृष्टचा मराठी वाङमयाच्या इतिहासातच जे जीवनानुभव आलेले नव्हते, ते जीवनानभव वाङ्मयात येऊ लागले. अशा प्रकारे दलित वाङ्मयानं अनुभवदृष्टचा, भाषादृष्टचा मराठी साहित्याला समृद्ध केलं. जुन्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी साहित्यात तो dead end होता, तो संपवून उद्याच्या थोर वास्तववादी वाङ्मयाचं प्रस्थान ठेवलं. त्यातून येत्या दहा वर्षांत थोडचा जरी उत्तम कलाकृती निर्माण झाल्या तरी त्यानं मराठी वाङ्मयाच्या दिशा बदलण्याचं मोठंच कार्य सिद्धीला जाईल.

प्रश्न : दलित साहित्य व ग्रामीण साहित्य निर्मितीमागील प्रेरणा–प्रक्रिया आपण एकच मानता की भिन्न ? दोन्हींमागे विषमतेचा, दुःखाचाच संदर्भ आहे ना ?

माझ्या मते, दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य या वेगळचा 'कॅटेगरीज' आहेत. ग्रामीण साहित्यावर middle class वृत्तीचा पगडा आहे. ग्रामीण साहित्य केवळ पेंटरची भूमिका घेते. ग्रामीण मन, ग्रामीण वास्तव पूर्णपणे ओळखण्याची क्रिया ग्रामीण साहित्यात नाही. उदा. 'बनगरवाडी'. विषय ग्रामीण आहे, पण ग्रामीण आंतरव्यवस्थेला तीत स्पर्श नाही. ग्रामीण जीवनाचं सारं चलनवलन वस्तुनिष्ठ दृष्टीनं पाहता आलं पाहिजे. त्यासाठी ग्रामीण व्यवस्थेचं पुरेसं भान असण्याची गरज आहे. पण आजच्या ग्रामीण साहित्यात साकल्याने सारा ग्रामीण समाज विचारात घेतला जात नाही. खरी ग्रामीण जाणीव मार्क्सवादी तरी असेल किंवा दलितांची तरी असेल. दलित consciousness ग्रामीण असू शकेल. पण मध्यमवर्गीय आकलनातून व्यक्त होणारा ग्रामीण consciousness दलित असेलच असे नाही. आजच्या दलित साहित्याचं स्वरूप वेगळं आहे. कारण दलित वेदनेचं स्वरूप आणि ग्रामीण वेदनेचं स्वरूप एक नाही.

दलित किंवा ग्रामीण चळवळीला मार्क्सवादी दृष्टीचं अधिष्ठान आवश्यक आहे. त्याशिवाय कोणत्याही प्रकारच्या दलित क्रांतीची जाणीव यशस्वी होऊ शकणार नाही. आर्थिक क्रांती ही मानवी संबंधात खरी क्रांती घडविते; या दिशेनं जेव्हा समाजाची पावलं पडू लागतील त्यावेळी जीवनाच्या विविध क्षेत्रांतील परस्परसंबंधात अधिक सामंजस्य येईल. या सामंजस्याचं जाती व जाणीवा दूर होण्यास साह्य होईल. सर्व शोषित isolate न होता एकत्र येतील.

प्रश्न : दलित साहित्यनिर्मितीत दलितेतरांना सहभागी होता येईल किंवा नाही? 'दलित जाणिवांचं चित्रण फक्त दलितच करू शकतील' असं म्हटलं जातं. आपल्याला काय वाटतं ?

दलित जाणिवांचं चित्रण कल्पक सहानुभूतीनं दलितेतरांनाही करता येईल; पण दलित जाणीव ज्या व्यक्तिगत agony मधून आली आहे तिचं चित्रण करणं दलितेतरांना कितपत जमेल याची शंका आहे. जी दलित जाणीव आहे, ती त्या दलितवर्गाच्या अनुभवांशीच अधिक संबंधित आहे. तिचाच तो अविभाज्य भाग आहे. त्यामुळे दलितेतरांपेक्षा दलितच या अनुभवाचं चित्रण अधिक चांगल्या प्रकारे करू शकतील. दलितेतरांना ते जमणारच नाही, असं तत्त्वत: म्हणता येणार नाही.

●

# १२. प्रा. रा. भ. जोशी

[ प्रा. रा. भि. जोशी यांची ललितरम्य प्रवासवर्णनं न वाचलेला मराठी रसिक वाचक शोधूनही सापडणे कठीण. रा. भि. नी केवळ प्रवासवर्णनात्मक लेखनच केलेले आहे असे नाही. लघुकथा, आत्मचरित्र, साहित्यसमीक्षा अनुवाद, वैचारिक निबंध असे बहुविध स्वरूपाचे त्यांचे साहित्य आहे. वाचन, अवलोकन, चिंतन, प्रवास इत्यादींमुळे त्यांची मूळची विचक्षण वृत्ती अधिकच चतुरस्र बनलेली आहे. मराठीप्रमाणे ते उर्दूचेही जाणकार आहेत. इंग्रजीचे तर ते दीर्घकाल प्राध्यापक होते. डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक संस्थांशी त्यांचा दीर्घकाल संबंध आलेला आहे. आज त्यांच्या वयाला ऐंशी वर्षे होऊन गेलेली असली तरी त्यांच्या वृत्तीतील व विचारातील टवटवीतपणा पूर्वीइतकाच कायम आहे. आजच्या कार्यरत मराठी लेखकांत वयाच्या दृष्टीने ते सर्वांत वडील आहेत. जाणकारीनेही. कारण त्यांनी नव्याइतके जुने जगही पाहिले आहे. अनुभवले आहे. यामुळे त्यांच्या सहवासात येणे, संवाद साधणे, ही नेहमीच एक अपूर्वाई असते.

दलित चळवळीच्या दृष्टीने तर रा. भि. चे विचार समजून घेणे अधिकच अगत्याचे बनते. कारण आंबेडकरी शिक्षणसंस्थांशी विविध नात्यांनी त्यांचा आलेला घनिष्ट संबंध दलितांचे हे विश्व त्यांनी बाहेरून आणि आतूनही पाहिलेले–अनुभवलेले. दलित आणि दलितेतर विश्वाशी या प्रकारे संबंधित असलेला हा एकमेव लेखक, विचारवंत, अभ्यासक. यामुळे त्यांची ही मुलाखत अनेक प्रकारे उद्‌बोधक ठरते. त्यांच्या सौजन्याचा मी खूपच फायदा घेतला. नाना प्रकारचे प्रश्न विचारून त्यांना सतावून सोडले. पण त्यांनी माझ्या सर्वच प्रश्नांचा यथायोग्य असा परामर्श आपल्या पद्धतीने घेतला. या निमित्ताने त्यांचे विचार जेवढे ऐकता येतील तेवढे ऐकावेत म्हणून पुष्कळदा प्रस्तुत मुलाखतीच्या कक्षेत काटेकोरपणे न येणारेही काही प्रश्न त्यांना मी विचारले. त्या सर्वांचाच अंतर्भाव, हे विचार महत्त्वाचे वाटल्याने, प्रस्तुत मुलाखतीत केलेला आहे. मुलाखतीचा बराचसा भाग रा. भि. च्या वास्तव्यस्थळी सिद्ध झालेला आहे. पत्रव्यवहाराद्वारे साधलेल्या संपर्काचाही काही भाग यात आहे. या मुलाखतीच्या निमित्ताने रा. भि. च्या प्रसन्न मोकळ्या मनाचा आणि

सौजन्यशील वृत्तीचा मला पुन:प्रत्ययही आला आणि नवा प्रत्ययही.]

---

प्रश्न : 'दलित जाणीव' म्हणजे काय ?

'दलित जाणिवे'चा उगम डॉ. आंबेडकरांच्या प्रभावानं प्रशिक्षित झालेल्या मुख्यत: महार समाजातील चातुर्वर्ण्यविरोधी नवजागृत जाणिवेत आहे. डॉ. आंबेडकर यांनी १९४५ मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' ही संस्था स्थापली. १९४६ मध्ये मुंबईत सिद्धार्थ कॉलेज स्थापन केलं आणि औरंगाबाद येथे १९५० मध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. खेडी सोडा, वतनांचा त्याग करा, उच्च शिक्षण घ्या, विचार सुधारा, राहणी सुधारा, वर्तन सुधारा, चांगल्या नोकऱ्या पत्करा, असा स्वकीयांना सतत उपदेश केला. या लोकांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून वरीलसारख्या उच्च शिक्षणाच्या संस्था स्थापन केल्या. वसतिगृहे काढली. या साऱ्यांतून स्वत:च्या वेगळेपणाची, अस्मितेची जी जाणीव दलितांत आली, हिंदुधर्मातल्या पिळवणुकीचा जीतून बोध झाला, तदनुषंगिक वेदनांचा आणि विद्रोहाचा भाव ज्वलंत झाला, त्या साऱ्या जाणिवेला साकल्यानं 'दलित जाणीव' म्हणता येईल. या दलित जाणिवांनी युक्त असलेल्यांचे आज दोन–तीन गट दिसतात– १) आंबेडकरवादी, २) मार्क्सवादी आणि ३) ढसाळ–ढाले वगैरे स्वत:ला पॅन्थर म्हणविणाऱ्यांचा. या दलित चळवळीत पूर्वाश्रमीचे जेवढे महार आहेत तेवढे इतर 'अस्पृश्य' लोक (उदा., चांभार, ढोर, मांग वगैरे) नाहीत. ते तसे थोडे दूरच आहेत. दलितांतील अगदी नव्या पिढीतील काही तरुणांना उग्र प्रतिकारिता किंवा भूतकाळातील अन्याय उगाळीत बसण्याची क्रिया मान्य नाही. आपलं वेगळंपण विसर्जित करून इतर घटकांत मिळावं असं या पिढीतल्या काही लोकांना वाटतं.

प्रश्न : हे असं का व्हावं ? तुमच्या मते याची कारणं काय ? चांभार वर्गाला मुळातच स्वत:चा एक व्यवसाय आहे. नव्या जमान्यात तो अधिक सधन झालेला आहे. यामुळे चांभार परंपरेला धरून असतात, असा युक्तिवाद केला जातो. तुम्हाला तो कितपत बरोबर वाटतो ?

तो मला तेवढा बरोबर वाटत नाही. कारण सगळा चांभारवर्ग तसा सधन नाही. ज्या जातीचा पुढारी त्या जातीचा अनुयायी अशी सामान्यत: आपल्याकडे स्थिती असते. त्यामुळे आंबेडकर चळवळीत महार मंडळी पुढे असावीत, हे स्वाभाविक होतं. वास्तविक स्वहिताच्या दृष्टीनंही त्या चळवळीत महारेतर 'अस्पृश्यां'नी सामील व्हावयास पाहिजे. पण तसं अजून तरी तेवढं घडत नाही. कारण असं होण्याला जी व्यापक दृष्टी लागते ती कोणाजवळच नाही. पुढारीपण सर्वांना पाहिजे

आहे. पण विधायक (constructive) काम करणारे मात्र थोडे आहेत. तसं नसतं तर ' एक गाव एक पाणवठा ' सारख्या महत्त्वाच्या चळवळींची परवड झाली नसती. बहुतेक ' अस्पृश्य ' पुढाऱ्यांचं लक्ष स्वतःचं हित साधण्यावर, संघर्ष करण्यावर किंवा वरच्या नोकऱ्या मिळविण्यावर आहे, हे स्वाभाविक असेल; पण सबंध समाजाचा दूर दृष्टीनं विचार करता हे पुरेसं नाही. ' युक्रांद ' सारखे दलितेतर गट अस्पृश्यांना मदत करण्यास तयार आहेत, पण त्यासारख्यांचं साहाय्य घेण्यास फारसं कोणी उत्सुक नाही. सर्व दलितांना एकत्र करण्याचा तसा प्रयत्नच होत नाही. भटक्या जाति–जमातींकडे ह्यापैकी कोणाचं तसं लक्षही नाही. खुद्द महारांतही मतभेद आहेतच. उदा. ना. रा. शेंडेसारख्या महार दलित लेखकाला धर्मांतराची भूमिका अमान्य आहे. धर्मांतर न केलेले काही महार आहेत.

प्रश्न : मार्क्सवादी–साम्यवादी जाणिवेशी या दलित जाणिवेचा संबंध काय ? सर्व शोषितांना एकत्र आणण्यासाठी आंबेडकरवादाला मार्क्सवादाची जोड द्यावी, असं म्हणणारा एक पक्ष आहे; या भूमिकेबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

मी काही राजकारणाचा विद्यार्थी नाही किंवा एखाद्या राजकीय पक्षाचा कार्यकर्ता नाही. पण आंबेडकर चळवळीबद्दलचं माझं जे निरीक्षण आहे, त्यावरून आंबेडकरांना मार्क्सवादाबद्दल सुतराम् आत्मीयता नव्हती असं मला दिसतं. ते वृत्तीतः ' लिबरल डेमोक्रॅट ' होते. त्यांचा कटाक्ष चातुर्वर्ण्यविरोधी, समताधिष्ठित मानवतावादावर होता. मार्क्सवादातील वर्गविग्रहाची कल्पना त्यांना मानवण्यासारखी नव्हती. मार्क्सवादानं हा प्रश्न सुटेल असं त्यांना वाटत होतं, असं मला वाटत नाही.

प्रश्न : आंबेडकरांच्या पूर्ववयातील शिक्षणव्यवस्थेची एकंदर स्थिती पाहता, आंबेडकरांचा मार्क्सवादाशी परिचय झालेला नव्हता. तसा तो असता तर आंबेडकर मार्क्सवादीच झाले असते, असं मानणारा दलित विचारवंतांचा एक गट आहे, त्याचं काय ?

आंबेडकरवादाचा मार्क्सवादाशी सांधा जोडण्याचा हा प्रयत्न मला अप्रस्तुत वाटतो. आंबेडकरांसारख्या विचक्षण, बुद्धिमान, व्यासंगी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र ह्यांच्या गाढ्या अभ्यासकाला त्याच्या हयातीत मार्क्सवाद परिचितच झाला नव्हता, असं मानणंच भ्रामक आहे. आंबेडकरांचा जन्म १८९२ मधला. रशियन क्रांतीच्या वेळी ते तिशीच्या आसपास होते. या क्रांतीची वार्ता त्यांच्या कानावर गेली नव्हती असं मानावयाचं का ? असं पाहा, आंबेडकरांची हयात मुंबईत गेली. येथील कामगार चळवळींशी त्यांचा संबंध आलेला होता. कामगार चळवळीत १९३० पासूनच मार्क्सवादी विचाराचा गट कार्य करीत होता. डॉक्टरांचा या

मंडळींशी या ना त्या प्रकारे संबंध आला होताच. मार्क्सचा आणि मार्क्सवादाचा त्यांनी वेगवेगळ्या संदर्भात, भारतीय परिस्थितीच्या संदर्भातसुद्धा, उल्लेख केलेला आहे. तेव्हा आंबेडकरांना मार्क्सवाद अपरिचित होता, असं म्हणण्यापेक्षा हेतुतःच तें मार्क्सवादापासून दूर राहिले, असं म्हणणंच सयुक्तिक ठरेल.

प्रश्न : हा वाद सोडला तरी दलित चळवळीनं व्यापक अधिष्ठानासाठी साम्यवादी विचारांशी जवळीक साधणं योग्य नाही का ? अन्यथा ही चळवळ isolate होणार नाही का ?

दलित चळवळीनं मार्क्सवादी चळवळीशी जवळीक साधल्यानं ऐक्यवृद्धीऐवजी या चळवळीचं विघटनच होईल, अशी मला भीती वाटते. किंबहुना तसं झालंच आहे.

प्रश्न : कारण ?

ह्या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी आपल्याला एका वेगळ्या आणि मोठ्या क्षेत्रात जावं लागेल. तूर्त एवढंच दिसतं की, दलितांपैकी काही विचारवंत आणि कार्यकर्ते मार्क्सवादी आहेत आणि काही दलितेतर मार्क्सवादी विचारवंत दलित चळवळीच्या अगदी जवळ आहेत. पण पंधरा–वीस वर्षांत दलित चळवळ मार्क्सवादी झाल्याचं दिसत नाही किंवा मार्क्सवाद्यांनी ती आपलीशी केल्याचंही दिसत नाही.

प्रश्न : या परिस्थितीत आपल्या मते पर्याय काय ?

नव्या प्रबोधनानं निर्माण झालेला मानवतावादी पुरोगामी विचारांचा कंद समाज मनात रुजविण्यावर आपण भर दिला पाहिजे. तसंच, अन्यायनिर्मूलनाबद्दल समाजाला अधिकाधिक जागरुक केलं पाहिजे. समाजातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विषमता कमी व्हावी असं मानणारा, फार मोठा म्हटलं नाही, तरी लक्षात घेण्याजोगा सुशिक्षित पांढरपेशा समाज महाराष्ट्रात आहे. या दृष्टीनं महाराष्ट्रच देशातील इतर भागांच्या तुलनेनं अग्रभागी आहे.

प्रश्न : पेशवाईमुळं येथील चातुर्वर्ण्य देशाच्या इतर भागांपेक्षा अधिक तीव्र होतं. इतिहासकाळातील येथील ब्राह्मणवर्चस्वामुळं देशाच्या इतर भागांपेक्षा ब्राह्मण–ब्राह्मणेतरवाद तदनुषंगिक स्पृश्यास्पृश्यवाद येथेच अधिक तीव्र आहे, असं मानणारे काही लोक आहेत. मुसलमानी आक्रमणामुळं उत्तर भारतात जातिभेद कमी झाला असं म्हटलं जातं. तुमचं एकंदर पर्यटन लक्षात घेता, आणि दक्षिण आणि उत्तर या दोन्ही भारतीय विभागांशी आलेला तुमचा संबंध लक्षात घेता याबद्दलचा तुमचा अभिप्राय जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.

माझ्या माहितीप्रमाणं तरी तुम्ही वर उभं केलेलं चित्र हे बरोबर नाही. आपल्यापेक्षा उत्तरेतच हे वाद अधिक प्रबळ आहेत. तिथे बिहारराज्य सोडलं तर ब्राह्मणांना विशेष महत्त्व नाही. पण जाट, रजपूत, यादव यासारखे वाद ब्राह्मणे-

तर मंडळींतच तीव्र आहेत. तसेच ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद आणि स्पृश्यास्पृश्यवाद तामीळनाडूत फारच तीव्र आहे, त्या मानानं महाराष्ट्राची स्थिती पुष्कळच बरी म्हणावयास पाहिजे. येथील ब्राह्मणवर्गही त्या मानानं पुरोगामी आहे. इथल्या सामाजिक सुधारणेच्या चळवळींत ब्राह्मणांनी पुढाकार घेतला आहे. तो पारंपरिक जातिभेद न मानता अनेक व्यवसायांत स्वखुषीनं शिरला आहे. जातपात तोडण्याचं, मिश्र. विवाह करण्याचं प्रमाणही वाढतं आहे. आकडेवारी दुर्दैवानं उपलब्ध होत नाही. पण माझ्या माहितीप्रमाणं ब्राह्मण-महार विवाहही महाराष्ट्रात बरेच घडले आहेत. दलित समाजही अधिकाधिक सुशिक्षित होत आहे. माझ्याजवळ पीपल्स एज्युकेशन सोसायटीपुरते दलितातील शिक्षणप्रसाराचे काही आकडे आहेत, ते मी तुम्हाला वाचूनच दाखवतो. यांत विदर्भ वगैरेचा भाग नाही, हे लक्षात घ्या. (येथे प्रा. रा. भी. नी आपल्या दप्तरातील काही तक्ते काढून मला दाखविले. त्यावरून कॉलेजात जाणाऱ्या शेडयूल्ड कास्ट विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या १९४६–४७ मध्ये ४ होती ती १९७३–७४ साली ४०० झाली आणि शेडयूल्ड कास्ट शिक्षकांची संख्या १९४६–४७ साली शून्य होती ती १९७३–७४ साली १०४ झाल्याचं दिसतं.) शिक्षणामुळं विचार वाढत आहे, उद्योगधंद्यांचं वाढतेपणही याला पोषक होत आहे. तेव्हा उत्तरोत्तर ही assimilation ची प्रक्रिया वाढत जाईल. प्रसंगानुरोधानं काही प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली जात असली तरी आक्रस्ताळ्या मार्गांचा अवलंब उपयोगी नाही, ही जाणीवही दिसते.

प्रश्न : आर्थिक बाबींचं काय ?

उद्योगधंद्यांची वाढ लक्षात घेता हा प्रश्नही हळूहळू मिटेल असं मला वाटतं. या दृष्टीनं समानतेला पोषक होणारे कायदे वाढविले पाहिजेत आणि त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. कॉटेज इंडस्ट्रीजची वाढ झाली पाहिजे. जाति–जमातींत व्यावसायिक सहकार्य वाढलं पाहिजे. कोणताही धंदा घृणास्पद वाटता कामा नये. जातीची लाज गेली पाहिजे.

प्रश्न : ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य यांत आपल्याला काही गुणात्मक वेगळेपणा वाटतो की यातील फरक हा केवळ संज्ञात्मक स्वरूपाचा आहे ?

ग्रामीण साहित्याहून दलित साहित्य वेगळं आहे, ही गोष्ट उघड आहे. दलित साहित्य गावाबाहेर राहणाऱ्या, बहिष्कृत केलेल्या exploit झालेल्या लोकांबद्दल बोलतं. आता exploitation कदाचित नसेल, पण दुरावा आणि बहिष्कार ग्रामीण भागात अजूनही तीव्र आहे. ग्रामीण साहित्यातही उपेक्षित जीवनाचं एक चित्र येतं, तें स्वागतार्हच आहे. कारण साचलेलं, साकळलेलं व्यक्त होणं, त्याचा निचरा होणं, आरोग्यदृष्ट्या हितकारकच असतं. पण दलित साहित्यातील जाणि-

वांचं केंद्र आणि स्वरूप आणि ग्रामीण साहित्यातील जाणिवाचं केंद्र आणि स्वरूप एक नाही.

प्रश्न : दलित ग्रामीणता हा भारतीय ग्रामीणतेचाच भाग नाही का ? तेव्हा दलित साहित्य हा ग्रामीण साहित्याचा भाग का मानू नये ?

दलित साहित्य हा ग्रामीण साहित्याचा एक भाग प्रादेशिकदृष्टया मानता येईल. पण दलितांचं दुःख सर्वसामान्य दलितेतरांहून काही बाबतींत वेगळं, खास त्यांचंच असं आहे. गावचा भाग असूनही ते गावाबाहेरचे आहेत. ह्या गावाबाहेरच्यांचा विचार प्रचलित ग्रामीण साहित्यात नाही. ग्रामीण साहित्य प्रचलित, वरिष्ठ ब्राह्मणी साहित्याचं अनुसरणच म्हणता येईल. ब्राह्मण लेखकांना कुणबी दुःखाची कल्पना नव्हती. त्यातलाच हा एक प्रकार. म्हणून ग्रामीण साहित्यही एका वेगळ्या अर्थानं 'सदाशिव पेठी'च म्हणावं लागेल. भटक्या जमाती, गावाबाहेरची मंडळी यांची दखल हे ग्रामीण साहित्य कितपत घेतं? याबद्दलची ग्रामीण लेखकांची भूमिका स्पष्ट नाही. ग्रामीण काय किंवा दलित लेखक काय, दोघेही खेड्यांपासून दूरच चालले आहेत. येथे कोणावर दोषारोप करण्याचा इरादा नाही. वस्तुस्थिती अशी आहे. 'उपरा' सारखं वंचित समाजाचं चित्र जितकं जितकं मराठीत येईल तितकं तितकं मराठी साहित्य समृद्ध होईल, यात शंका नाही. मराठी साहित्यावर या दृष्टीनं जीवनवादाचा परिणाम होत आहे.

प्रश्न : जीवनवादी साहित्य हे कलादृष्टया सुमार असतं. असा एक ग्रह मराठीत प्रचलित आहे. आपला अभिप्राय ?

'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' असा एक वाद पन्नास वर्षांपूर्वी मराठी साहित्याच्या क्षेत्रात चालू होता आणि त्या त्या विचारसरणीनुसार साहित्यही निर्माण होत होतं. आणि निरनिराळ्या प्रकारांनी गेली पन्नास वर्षे तो चालूही आहे. त्याचा आढावा इथं घेता येणार नाही आणि जीवनवादी साहित्य म्हणजे काय ह्याची सविस्तर चर्चाही करता येणार नाही. स्थूलमानानंच बोलावं लागेल. न्याय, माणूसकी, समता, समाजहित ह्यांच्या संदर्भात वेळोवेळी जे प्रश्न समाजातल्या विचारवंतांना जाणवतात, बोचतात, ज्यांची उकल झालीच पाहिजे असं त्यांना वाटतं त्यासंबंधी साहित्यिकांनी लिहावं अशी काही लोकांची अपेक्षा असते. दलित, शोषित, पीडित, वंचित ह्यांच्या दीनवाण्या, दुःखी, दरिद्री जीवनाचं त्यांनी चित्रण करावं, त्यांच्या दारिद्र्याचं, दैन्याचं, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचं कारण काय आहे ते दाखवावं, ज्या समाजव्यवस्थेमुळे त्यांना ही दशा प्राप्त झाली, त्या व्यवस्थेविरुद्ध लोकमत तयार करावं, लोकांना प्रवृत्त करावं, अशी एकूण अपेक्षा असते. जे साहित्य ह्या गोष्टी करतं ते जीवनवादी साहित्य. सगळी सामाजिक दुःखं विषमता, अन्याय, आर्थिक शोषणावर आधारलेल्या समाजव्यवस्थेमुळेच

निर्माण होतात असं मानणाऱ्यांचं ह्या व्यवस्थेविरुद्धचं मार्क्सवादी लेखन गेली पन्नास वर्षं, कधी भरती कधी ओहोटी असं, मराठीत निर्माण होत आहे. ते जीवनवादी साहित्य आहे. मार्क्सवादी नसलेल्या पण अन्याय-विषमताविरोधी अशा इतरांनीही जीवनवादी साहित्य निर्माण केलं आहे. त्यांना सुधारणावादी-मानवतावादी म्हणता येईल.

गेल्या वीस एक वर्षांत निर्माण झालेल्या दलित साहित्यानं त्यात एका वेगळ्या जोरदार प्रवाहाची भर घातली आहे. वर्ण-जातिभेदावर आधारलेल्या समाजव्यवस्थेतून अत्यंत अमानुष, अन्याय्य अशी सामाजिक विषमता (हिच्याच पोटात आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विषमताही आहे) निर्माण झाली आहे. दलित साहित्य हा ह्या विषमतेविरुद्ध आणि ती निर्माण करणाऱ्या वर्ण-जातिभेदाधिष्ठित समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह आहे, उद्रेक आहे. ह्या साहित्याचा उद्देश ह्या समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करून ती नष्ट करणं, आणि तिच्या जागी समता, न्याय, माणुसकी ह्यांवर आधारलेली अशी एक नवी समाजव्यवस्था निर्माण करणं, हा आहे. अर्थात हे साहित्य जीवनवादी आहे. ही नवी समाजव्यवस्था मार्क्सवादाचा अवलंब केल्यानं निर्माण होईल की दुसऱ्या एखाद्या वादानं, ह्यावर चर्चा चालू आहे.

सामाजिक अन्याय, विशिष्ट वर्गावर अन्याय, स्त्रियांवर अन्याय ह्यांकडे लक्ष वेधणारं, त्याचं निवारण करण्याचा मार्ग प्रत्यक्ष--अप्रत्यक्षपणे सुचविणारं साहित्य गेली सव्वाशे वर्षे मराठींत निर्माण होत आहे. त्यातलं बरंचसं विसरलं गेलं आहे. सामाजिक विषमतेकडें, अन्यायाकडे लक्ष वेधणाऱ्या साहित्यात पुष्कळदा भडक, क्षोभक आणि ढोबळ तपशिलावर भर देण्यात येतो. त्यामुळे त्या प्रश्नाकडे लक्ष वेधलं जातं. पण भावनांच्या, अनुभवांच्या, परिस्थितीच्या, व्यक्ती-व्यक्तीतील संबंधाच्या गुंतागुंतीत, त्यांच्या विविध छटांत वाचकाचा खोल प्रवेश करून दिला जात नाही. त्यामुळं त्यात एक प्रकारचा ठोकळेबाजपणा, ठराविकपणा येतो. जिवंतपणा येत नाही. हीच गोष्ट निव्वळ करमणूक करणाऱ्या वास्तवसदृश रोमँटिक साहित्यातही दिसते.

केवळ करमणूक करणारं साहित्य जसं त्यावेळेपुरतं वाचकांची करमणूक करून विसरलं जातं तसंच बरंचसं समाजजागृती करू पाहणारं साहित्यही त्यावेळेपुरतं वाचकाला अस्वस्थ करून विसरलं जातं. त्या अर्थानं ते सुमार असतं. 'यमुनापर्यटन'-पासून आजतागायतच्या मराठी साहित्यावरून ओझरती नजर फिरवली तरी असं विसरलं गेलेलं 'कलावादी' किंवा 'जीवनवादी' साहित्य कोणतं ते दिसून येईल.

प्रश्न : दलितेतर लेखकाला 'दलित जाणीव' व्यक्त करता येणार नाही, असं म्हटलं जातं. ते कितपत युक्त म्हणता येईल ?

दलितेतर लेखकाला 'दलित जाणीव' व्यक्त करता येईल, हे शक्य आहे. एका

लेखकाला दुसऱ्या जातीची जाणीव व्यक्त करणं, तत्त्वत:च अशक्य असेल तर अनवस्थाच प्रसंग येईल. मग कोणत्याही पुरुष लेखकाला स्त्रीजीवनाकडे वळताच येणार नाही. पण असं होत नाही. सहानुभूतीनं असं लेखन शक्य होतं. 'सहानुभूतीचा' अर्थ 'दया' असा नाही. 'दुसऱ्याच्या अंतरंगात शिरण्याची शक्ती' असा अर्थ अभिप्रेत आहे. 'काळ तर मोठा कठीण आला' दुष्काळग्रस्त शेतकऱ्यावरील गोष्ट एका 'सदाशिवपेठी' लेखकानं लिहिली आहे, म्हणून ती कमी प्रभावी मानावयाची का?

आता हे खरं आहे की, ज्या जीवनाचा मला सुतराम परिचय नाही, त्यावर मी फार कल्पना लढवू शकेन असं मला वाटत नाही. 'एस्किमो' च्या जीवनाचा मला जर काही परिचय नसेल तर त्यावर मी कल्पना तरी काय लढविणार? पण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव नसला तरी अप्रत्यक्षरीत्या तो घेऊनही काही लेखन करता येतं, हे 'चक्र', 'माहीमची खाडी' यांसारख्या कादंबऱ्यांवरून दिसेल. अर्थात हे लेखन खोटं आहे, असं म्हणणारे लोक आहेत हे मला माहीत आहे.

प्रश्न : पण जिवंत अनुभवानं, आतल्या पोटतिडकीनं लिहिलेल्या लेखनाची सर केवळ सहानुभूतीनं केलेल्या लेखनाला येईल का? असा प्रश्न उपस्थित होतो, केला जातो.

त्याचं असं आहे की, कोणत्याही लेखकाला सारेच अनुभव व्यक्तिगत पातळीवर अनुभवणं केवळ अशक्य आहे. तेव्हा त्याला कोणत्या ना कोणत्या पातळीवर कल्पनेचा, सहानुभूतीचा अवलंब करणं प्राप्तच आहे. वाटलं तर आपण 'परानुभूती' हा शब्द वापरू. तेव्हा एखादं लेखन स्वानुभवाधिष्ठित आहे की सहानुभूतीवर आधारलेलं आहे, या प्रश्नापेक्षा या लेखकानं निर्माण केलेलं साहित्य अस्सल आहे की नकली? हे साहित्य खोटी सहानुभूती निर्माण करतं की खरी? ते भडक आहे की उत्कट? उथळ-वरवरचं आहे की खोल जाणारं? हे साहित्य 'साहित्य' या पदवीला पात्र आहे का? यासारखे प्रश्न साहित्यगुणविचारात लक्षात घेणं योग्य ठरेल. केवळ स्वानुभवानं चांगलं लेखन होत नाही. आणि प्रत्यक्ष अनुभव नसताही कल्पनेच्या, सहृदयतेच्या बळावर चांगलं लेखन करता येतं, ही वस्तुस्थितीही या बाबतीत लक्षणीय आहे. शेक्सपियरच्या शोकांतिका त्याच्या स्वत:च्या अनुभवांवर आधारलेल्या आहेत का?

प्रश्न : स्वानुभवनिष्ठ लेखनाप्रमाणं दलित साहित्याबाबत उपस्थित होणारा आणखी एक विवाद्य मुद्दा म्हणजे दलित साहित्याबाबत वेगळे निकष वापरावेत का, हा. आपल्याला काय वाटतं?

वेगळे निकष वापरावेत असं मला वाटत नाही. कारण तसं एकदा करावयाचं ठरविल्यास कालांतरानं त्या साहित्यातून निर्माण झालेले किंवा त्यात व्यक्त झालेले सामाजिक प्रश्न मिटल्यानंतर या साहित्याचं कोणत्या निकषानं मूल्यमापन करा-

वयाचं हा प्रश्न उपस्थित होईल. त्या त्या काळातील गरजांवर साहित्याचं मोजमाप करावयाचं ठरविल्यास ते त्या साहित्याचं साहित्यिक मोजमाप ठरणार नाही. ते त्या काळातील विचारांचं, मतांचं मोजमाप ठरेल. दुसरं असं की, दोन दलित कादंबऱ्या किंवा कथासंग्रह समोर असतील तर त्यात सरस–निरस कोणत्या निकषांवर ठरविणार ? ते निकष अंतर्गतच असतील.

प्रश्न : पण कधी कधी साहित्यशास्त्रच बदलून गेल्याचा आपल्याला अनुभव येत नाही का ? संस्कृत नाट्यशास्त्र ग्रीक नाट्यशास्त्राहून वेगळं नाही का ?

जव्हा साहित्याचं स्वरूप किंवा हेतूच बदलून जातो, साहित्यचित्रणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो तेव्हा अभिव्यक्त–पद्धतीतही तदनुषंगिक बदल होतो आणि मग परंपरागत साहित्यशास्त्र थिटं वाटू लागतं. कारण साहित्याच्या आस्वादनपद्धतीतच बदल झालेला असतो. त्यामुळे तुकारामाच्या किंवा रामदासांच्या साहित्याचा आस्वाद घ्यावयाचा झाल्यास आपल्याला संस्कृत साहित्यशास्त्र बाजूला ठेवावं लागतं. कारण तिथं नवं व्यवस्थापन झालेलं असतं. त्यामुळं वर्ण्यवस्तूच्या आस्वादनाचं स्वरूपही बदलतं. पाश्चात्य साहित्याचा परिचय आणि अभ्यास झाल्यानंतर गेल्या शंभर वर्षांत जे साहित्यप्रकार मराठीत आले त्यांनाही संस्कृत साहित्यशास्त्राचे निकष अपुरे पडू लागले.

प्रश्न : याचा अर्थ साहित्यात किंवा एकंदर सौंदर्यसंवेदनेतच ' युनिव्हर्सल ' असं काही नसतंच असं मानावयाचं का ? मग देश–काल–परिस्थितींनं पूर्णतया भिन्न असलेल्या काही साहित्याचं आपण आस्वादन कसं करतो ?

ज्या त्या साहित्यविश्वाला एखाद्या द्वीपाप्रमाणं त्या त्या देशकालाच्या काही स्वाभाविक मर्यादा असतात. पण त्याबरोबरच मानवी मनात देश–कालापलीकडचं असं काही युनिक, असामान्य, युनिव्हर्सल तसंच विश्वात्मक असं काही असतं. या युनिव्हर्सलला जर त्या साहित्यात स्पर्श असेल तर ते साहित्य त्या संदर्भात देशकालातीत, युनिव्हर्सल ठरतं. असं होतं म्हणूनच गटेला ' शाकुंतल ' डोक्यावर घेऊन नाचावंसं वाटलं. त्यातील एका श्लोकानंही तो भारावून गेला. ' मेघदूत ' आपल्याला जे आस्वाद्य वाटतं तेही यामुळंच ! सामान्यत: ज्या साहित्यात उत्कट लिरिकल एलिमेन्ट असतं किंवा मूलभूत भावनांना हेलावणारं काही असतं तिथं ही किमया (चार्म) अधिक प्रमाणात घडते.

प्रश्न : आपण साहित्यातील देशकालसापेक्षता लक्षात घेता, साहित्यशास्त्र परिवर्तनशील आहे, असंही मानता आणि त्याचबरोबर दलित साहित्याला वेगळे निकष लावू नयेत, असंही म्हणता. तेव्हा अधिक खुलासा केल्यास बरं होईल.

दलित साहित्याला वेगळे निकष लावण्याइतके प्रचलित साहित्याहून ते भिन्न

झालेलं आहे असं मला वाटत नाही. दलित साहित्यातील भावनांची तीव्रता, क्षोभ आणि त्या निमित्तानं त्यांनी उपयोजिलेली भाषा जर वगळली, तर त्याचं स्वरूप इतर प्रचलित मराठी साहित्यासारखंच आहे. या प्रचलित साहित्याच्या पिंडावरच ते पोसलं आहे. त्यातूनच त्यानं प्रेरणा, रचनाशैली उचललेली आहे. प्रचलित साहित्य-शास्त्राचे निकष लावूनच आपण बागुल–ढसाळांना चांगले लेखक ठरविले नाही काय ? वर सांगितलेल्या दोनचार गोष्टी सोडल्या तर दलित साहित्याची जातच (काईण्ड) बदलली असं म्हणता येईल काय ? दलित लेखकही आपापसांत साहित्याचं जे मूल्यमापन करतात, बरेवाईटपणा ठरवितात, ते कशाच्या आधारावर ? प्रचलित निकष वापरूनच नाही काय ? तेव्हा निकष न बदलण्याइतका आपला वेगळेपणा दलित साहित्यात आहे असं नाही. साहित्याचा वर्ण्य–विषय मध्यमवर्गीय जीवनाऐवजी दलितांचं जीवन झालं म्हणजे त्याची जात बदलली नाही किंवा दलित साहित्याची निवेदनपद्धती ही काही वेगळी झाली नाही. दलित लेखक जेव्हा बदलत्या निकषाची भाषा बोलतात तेव्हा त्यांना दलित साहित्याकडे पाहणाऱ्या काहींच्या पूर्वदूषित वृत्तीकडे लक्ष वेधावयाचं असतं असं मला वाटतं.

प्रश्न : या अनुषंगानं एक प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे ' सोशल ॲन्थ्रापॉलॉजिकल ॲप्रोच ' चा. दलित साहित्यविचारात वरील ॲप्रोचला महत्त्व दिलं जावं, असं म्हणण्यात येतं. हे कितपत युक्त म्हणता येईल ?

साहित्याकडे अनेक दृष्टिकोनांतून पाहता येतं. समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, ऐतिहासिक, भाषाशास्त्रीय अशा भिन्न भिन्न दृष्टींनी पाहिल्यानं साहित्याचं आकलन अधिक सखोल किंवा चौरस होण्याची शक्यता आहे. पण त्या साहित्याची गुणवत्ता मोजण्यास या दृष्टिकोनांचा उपयोग होईल असं नाही. उदाहरणार्थ, हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांच्या आधारे १८८५–१९१७ पर्यंतच्या कालात मध्यमवर्गीय मराठी समाजात कोणते सांस्कृतिक बदल झाले, याचा आलेख काढता येईल. तो इतर दृष्टचा उपयोगीही पडेल. पण साहित्याचं साहित्यपण पाहण्याला त्याचा उपयोग नाही. दलित साहित्याबाबतच्या 'सोशल-ॲन्थ्रापॉलॉजिकल ॲप्रोच'बद्दलही हेच म्हणावं लागेल. शिवाय दलितांच्या ॲन्थ्रापॉलॉजीचा विचार कितपत समर्थनीय आहे हाही प्रश्न आहे. कारण दलित मानववंशशास्त्रदृष्टचा सवर्णांपेक्षा वेगळे ठरलेले नाहीत. त्यांच्या काही वेगळ्या मेथडस् असतील. त्यांचा त्या साहित्यात संबंध दिसल्यास विचार करता येईल.

प्रश्न : आता दलित साहित्यावरील काही आक्षेपांबाबत. आरोप नं. १– ते प्रचारी आहे ?

प्रचारी आहे, कारण हेतूच प्रचाराचा आहे. पण असं असलं तरी या साहित्यात प्रचाराची पातळी ओलांडून जाणारा काही भागही आहेच.

प्रश्न : ते एकसुरी आहे ?

एकसुरी आहे. पण तसं असणं अपरिहार्य आहे. दलित समाज ज्या जाणिवा व्यक्त करतो, जे जीवन जगतो, त्यातच या एकसुरीपणाची बीजं आहेत. या जीवनाला विविधता नाही किंवा विविध पातळयाही नाहीत हे दलितांची आत्मवृत्तं, त्यांचं साहित्य वाचल्यावर जाणवतं.

प्रश्न : समाज येतो, पण व्यक्ती उभी राहात नाही ?

हे पूर्णपणे खरं नाही. कथावाङ्मयात व्यक्ती येते. पण हेही खरं आहे की, दलित साहित्यात तसं व्यक्तिवैशिष्टच कमी आहे. कारण दलितजीवनातच तशी व्यक्तिवैशिष्टचं कमी आहेत, किंवा व्यक्तिवैशिष्टचाला वावच कमी आहे, म्हणून युनिफॉर्मिटी अधिक आहे. रस, रूप, गंधांची वैचित्र्यं कमी आहेत. या संदर्भात त्यांच्या संवेदनाविश्वावर जे आघात होतात, त्यांत एक तीव्र प्रतिक्रियात्मकता असते. त्यांत सूक्ष्मता संभवत नाही. ह्या वर्गातले लोक जसे शिक्षित होऊन आर्थिकदृष्टचा सुस्थित होतील, पूर्वीपेक्षा वेगळं जीवन जगू लागतील, तशी त्यांची व्यक्तिमत्त्वं विकसू लागतील, उमलू लागतील.

प्रश्न : हे साहित्य आक्रस्ताळं आहे ?

आक्रस्ताळं आहे आणि हेही स्वाभाविकच वाटतं. मात्र कधी कधी आक्रस्ताळेपणाचा पवित्रा जाणूनबुजून डिवचण्याचा प्रयत्न आहे असंही वाटतं.

प्रश्न : ते नकारात्मक आहे ?

केवळ नकारात्मक आहे असं नाही. तो नुसताच नकार नाही. कशाला तरी नकार आहे. त्या नकाराला विधायक अशी एक बाजूही आहे, ती म्हणजे माणुसकी, समता, न्याय यांची जाणीव करून देणं ही. तशी दलित साहित्याची प्रेरक भूमिका विधायकच आहे. पण त्यातील आविष्कार मात्र आज नकारात्मक वाटतो. तो तसा काही काळ राहणं स्वाभाविकही म्हणावं लागेल.

प्रश्न : दलित साहित्यामुळं मराठी साहित्यावर आपल्या मते काय परिणाम झाला ?

पुष्कळच. पण तो काही अंशी साहित्यिक आणि काही अंशी सामाजिक आहे. आपल्याला अज्ञात असलेल्या जीवनाची दालनं उघडी झाली. या साहित्यानं आपलं सामाजिक भान तीव्र केलं. आपल्या इंद्रियसंवेदनांचं, अनुभवांचं विश्व मर्यादित होतं, ते व्यापक झालं. त्यातील विविधता, विचित्रता, विकटता या साहित्यानं ध्यानी आणून दिली. काही भावनांची उत्कटता किंवा क्षोभ किती प्रचंड आहेत, याची जाणीव आपल्या मध्यमवर्गीय साहित्यात नाही, हे लक्षात आलं. दलित जीवनातील भावनांना, जाणिवांना अभिव्यक्ती देणारी जी भाषा किंवा शैली वापरली जाते,

तीमुळे मराठी शब्दसंपत्तीत भर पडली आहे. मराठी शैलीला एक जोमदारपणा प्राप्त झाला आहे.

पूर्वीच्या आपल्या राष्ट्रीय कवितेत शैलीचा एक जोमदारपणा होता. त्याप्रकारचा जोमदारपणा किंवा जोष पुन्हा दलित साहित्यानंच निर्माण केला आहे.

विशेष म्हणजे आजपर्यंत पीडित असूनही मूक असलेला हा समाज या निमित्तानं बोलका झाला. ही आपल्या समाजजीवनाच्या दृष्टीनं फार महत्त्वाची घटना आहे. तुम्ही या साहित्याच्या आजच्या आविष्कारावर वाटल्यास अवश्य टीका करा; पण कोणत्या का कारणानं होईना दलित–समाज बोलका झाला, ही एकंदरीत फार फार स्वागतार्ह घटना आहे. यामुळं समाजातील उपेक्षित भागही यापुढे बोलका होत राहणार आहे.

●

# १३. श्री. वसंत पळशीकर

[ आजच्या महाराष्ट्रीय विचारवंतातील एक अग्रणी. वसंतराव पळशीकर काही काळ ' समाजप्रबोधन पत्रिके 'चे संपादक होते. तथापि वैचारिक आणि तात्त्विक पातळीवरून लेखनद्वारा समाजप्रबोधन करण्याचे श्री. वसंतराव पळशीकर यांचे कार्य अव्याहतपणे आणि व्रतस्थ बाण्याने चालूच आहे. त्यांचे हे प्रबोधनविषयक विचार कधीच प्रचारात्मक पातळीवरील नसतात. त्यामागे ऐतिहासिक दृष्टी आणि मूलगामी स्वरूपाचे जीवनचिंतन असते. त्यामुळे त्यांच्या विचारात भरडपणा प्रविष्ट होत नाही.

अव्वल दर्जाच्या आजच्या कोणत्याही भारतीय विचारवंतावर एका बाजूने समाजवाद आणि दुसऱ्या बाजूने गांधीवाद यांचा कमी-अधिक प्रभाव असतोच, तसा तो पळशीकर यांच्यावरही आहे. त्यातल्या त्यात ते गांधीवादाकडे अधिक झुकलेले दिसतात. तथापि त्यांना सांप्रदायिक गांधीवादी म्हणता येणार नाही. कोणत्याही आधुनिक विचाराचा, संकल्पनेचा किंवा जीवनविषयक धारणेचा विचार ते खुल्या मनाने करतात. त्यातील फोले पाखडून निके सत्व शोधण्याचा त्यांचा कसोशीचा प्रयत्न असतो. त्यामुळे त्यांचे कोणत्याही विषयावरील विवेचन नेहमीच उद्बोधक ठरते. त्यांची दलित साहित्यासारख्या प्रक्षोभक विषयावरील मते जाणून घेण्याचा मी यासाठीच आवर्जून प्रयत्न केला. त्यांनीही त्याला तत्परतेने प्रतिसाद दिला, याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच ! ]

---

प्रश्न : दलित जाणीव असणे म्हणजे काय ?

पूर्वकालीन अस्पृश्यांना उद्देशून दलित हा शब्द रूढ झालेला आहे. ही गोष्ट लक्षात घेता, आर्थिक व राजकीय दृष्टया शोषित वा दडपलेला असण्याची जाणीव म्हणजे ' दलित जाणीव ' असं म्हणता येणार नाही. समाज हा स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात विभागलेला आहे; यातल्या स्पृश्यांच्या दृष्टीनं, त्यांना आपला स्पर्श व्हावा, आपली सावली त्यांच्यावर पडावी एवढीही आपली पात्रता नाही; आणि ज्या

प्रकारच्या मलीनपणामुळं आपल्या स्पर्शानं वा सावलीनं स्पृश्यांना आपला विटाळ होतो ते मलीनपण जन्मत: आपल्या ठायी ओतप्रोत असून ह्यासह आपणास जन्म काढावयाचा आहे, याची सदोदित जाणीव असणं म्हणजे दलितपणाची जाणीव असणं, असं म्हणायला लागेल.

पण आपण ज्या संदर्भात ‘ दलित जाणीव ’ हा शब्दप्रयोग करीत आहोत त्या संदर्भामुळं दलित जाणीव असणं याचा अगदी वेगळा, एका अर्थी विरुद्ध टोकाचा अर्थ होतो असंही ध्यानात येईल. पूर्वीच्या काळी जातपातीच्या मागची धारणा केवळ स्पृश्यांच्याच ठायी होती असं नव्हतं; अस्पृश्यांचीही मनोमन तीच धारणा होती, स्पृश्यांकडून आपल्याला होत असलेल्या दडपणुकीची, मिळणाऱ्या अन्याय्य व विषम वागणुकीची जाण, वा तीबद्दलचा रोष अस्पृश्यांच्या मनात नसे, असं म्हणणं अवास्तव होईल. पण, आपण ज्याअर्थी दलित (अस्पृश्य) जन्माला आलो त्याअर्थी हे जिणं हाच आपला भोग आहे, आणि तो तसा असणंच उचित आहे, अशी श्रद्धा त्या काळी होती, असं म्हणता येईल. जातिव्यवस्थेमागील धार्मिक, तात्त्विक युक्तिवाद अस्पृश्यांनीही आपलासा केलेला होता. हा सारा युक्तिवाद एक निव्वळ थोतांड आहे, दडपणूक व पिळवणूक करण्याच्या उद्देशानं ते सवर्णांनी, त्यातही ब्राह्मणांनी, रचलेलं थोतांड आहे, आणि ते मुळासकट मनातून उपटून काढलं पाहिजे, ही जाणीव म्हणजेच ‘ दलित जाणीव ’ असं म्हणणं शक्य आहे. ते अधिक अर्थपूर्णही आहे.

व्यवहारात या शब्दप्रयोगाचा वापर हा उभयअर्थी होताना आढळतो. दलित जाणीव म्हणजे अस्पृश्यांचं जिणं जगलेल्या व्यक्तीच्या ठायी समाजानं लादलेलं अस्पृश्यपण मनोमन स्वीकारण्यातून उत्पन्न होणारी; तसेच ते मनोमन झुगारून देण्यातून उत्पन्न होणारी जाणीव.

प्रश्न : साम्यवादी वर्गीय जाणिवेपासून ही जाणीव कोणत्या बाबतीत वेगळी आहे ? सर्व शोषित तीत अंतर्भूत होतात की नाही ?

दलित व्यक्ती विद्रोहानं पेटून उठते, ती ‘ दलित जाणिवे ’नं संपन्न बनते तेव्हा स्पृश्यांकडून आजवर जी दडपणूक व पिळवणूक झाली तिच्याविषयीचं भान हा त्या जाणीवेचा एक महत्त्वाचा व मध्यवर्ती भाग असतो, यात काही शंका नाही. पण कोणती सामाजिक संरचना व विचारप्रणाली (आयडियालॉजी) तिला दडपणूक-पिळवणूक यांच्या मुळाशी दिसते ? तर, मनुस्मृतिप्रणीत जातिव्यवस्था असं आपण सामान्यपणे म्हणू शकू. म्हणजे, समाजाची विभागणी जातींनुसार झालेली आहे, असं विद्रोही दलित जाणीवेचं आकलन असतं. ही जाणीव उत्पन्न झालेल्या व्यक्ती कोणत्या पायावर संघटित होतात ? वर्गीय पायावर नाही, तर जातीय पायावरच त्या संघटित होताना आढळतात. जातिव्यवस्थेचा उच्छेद करण्याची प्रतिज्ञा केलेल्या, विडा उचललेल्या, दलित तरुणांची जातीय अस्मिता अधिकच टोकदार, कडवी व

आक्रमक झालेली आपण अलीकडच्या काळात अनुभवीत आहोत.

आधुनिक उत्पादनव्यवस्थेतील स्थानविशिष्ट जीवनानुभवांनी, हितसंबंधांनी, आशा-आकांक्षांनी आपण आपणाचसारख्या इतरांशी, इतर सर्व गोष्टींतल्या संबंधापेक्षा जास्त घनिष्टपणे व वास्तविकपणे जोडले जात आहोत, ही अनुभूती हा साम्यवादी वर्गीय जाणिवेचा गाभा व पायाहीपण.

वर्गीय जाणीव आणि दलित जाणीव या, अशा रीतीनं, उघडच वेगळ्या आहेत, आणि दलित जाणीव ही वर्गीय संघटनेला बाधा आणणारी आहे.

दलित पॅन्थरची चळवळ फोफावली त्यावेळी दलितत्वाची व्यापक व्याख्या करून सर्व शोषितांचा दलितांमध्ये समावेश करण्याचा प्रयत्न केला गेला. पण या प्रयत्नात यश आलं नाही. इतकंच नाही तर, दलित जाणीव ही जातीय अस्मितेचा परिपोष करीत असल्याकारणानं भिन्नभिन्न जातींच्या पूर्वास्पृश्यांचेही एकचएक दलित संघटन दलित जाणिवेच्या आधारे उभारण्यात अपयश येणं स्वाभाविक होतं.

प्रश्न : ही जाणीव फक्त वर्णाश्रम विरोधी मानावयाची का ?

जातिव्यवस्था ही पुरातन रचना आहे, गेल्या दोन (की चार ?) हजार वर्षांपासून सवर्ण अमानुष दडपणूक व पिळवणूक करीत आले आहेत, हा युक्तिवाद परिचित आहे.

आजच्या अर्थानं आर्थिक–सामाजिक न्याय व समता यांवर अधिष्ठित असण्याचा दावा जातिव्यवस्था व जातिव्यवस्था गाभ्याशी असलेला हिंदू धर्म व भारतीय संस्कृती अर्थातच करू शकत नाहीत. माणुसकीच्या आजच्या व्याख्येनुसार स्पृश्य–अस्पृश्य हा भेद अमानुष आहे हेही मान्यच करण्याला हवं. अशी अन्याय्य, विषम व अमानुष समाजव्यवस्था जाणूनबुजून उच्चवर्णियांनी (त्यातही ब्राह्मणांची जबाबदारी सर्वाधिक) प्रस्थापित केली असा निष्कर्ष काढला जातो. मनुस्मृती हा पुरावा म्हणून पुढे केला जातो. भारतीय इतिहासाचं व समाजपरंपरेचं हे विश्लेषण हा दलित जाणिवेचा आज अविभाज्य भाग बनला आहे.

याचा एक स्वाभाविक परिणाम असा की, केवळ जातिव्यवस्थाच नव्हे तर, हिंदू धर्म, भारतीय समाज परंपरा व इतिहास, भारतीय संस्कृती आणि कधी कधी भारत हे राष्ट्र, या सर्वांचा सरसकट व पूर्ण अव्हेर करण्यात दलित जाणीव परिणत होते. आजवरचा सारा वारसा 'ब्राह्मणी' म्हणून धिक्कारण्यात अलीकडच्या काळात दलित जाणिवेला आत्मगौरव वाटताना दिसतो.

पण यामुळं दलित जाणीव विशाल बनल्याचा मात्र प्रत्यय येत नाही. आजवरचा वारसा नाकारून एक नवा भारतीय समाज, एक नवा इतिहास साऱ्यांसाठी घडविण्याची क्षमता दलित जाणिवेचा अंगभूत भाग बनत आहे असा अनुभव येत नाही. प्रत्येक क्षेत्रात आपली वेगळी चूल मांडण्याचा, आपला वाटा वेगळा व स्वतः-

पुरता पदरात पाडून घेण्याचा, सवतासुभा उभारण्याचा आग्रह आढळतो. याचाच अर्थ असा की, जातिव्यवस्था नाकारण्याची भूमिका ही व्यवहारात संकुचित जातीय अस्मिता व आकांक्षेपोटी घेतली जात आहे. म्हणूनच जात्युच्छेद घडवून आणण्याच्या प्राथमिक उद्दिष्टातही दलित चळवळ फारशी प्रभावी ठरत नाही. महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर, स्वतःच्या अस्तित्वानं इतरांच्या ठायी जातीय अस्मितेचा आग्रही, आक्रमक व संघटित आविष्कार घडवून आणण्यासच, दुर्दैवानं, तिचा आजच्या घडीला अधिक हातभार लागला आहे.

दलित जाणिवेचा आशय संकुचित जातीय बनण्यात व तसा राहण्यात तिची सत्तासंपादनाच्या राजकारणातली गुंतणूकही कारणीभूत आहे. प्रचलित लोकशाही राजकारण हे मतदारांच्या वर्तमान जाणिवा, अस्मिता व निष्ठा यांचा कुशलतेनं वापर करून केलं जातं. आपल्याच देशात नाही, तर प्रगत पाश्चिमात्य देशातही. जात, जमात, धर्म, प्रांत व भाषा अशा भेदांचं अस्तित्व स्वीकारून पण त्या भेदांपलीकडे सर्वांना घेऊन जाणारं राजकारण स्वातंत्र्यपूर्वकाळी कॉंग्रेसनं केलं. जातिभेदातीत सर्वधर्मसमभावाधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या दृष्टीनं त्या राजकारणाची पोच त्या काळी फार दूरवर जात नव्हती, व आजही जात नाही, ही वस्तुस्थिती खरीच. पण, ब्रिटिशांनी त्यांच्या स्वतःच्या स्वार्थाच्या दृष्टीनं ज्या प्रकारच्या जातजमातनिष्ठ फुटीर, अलगतावादी राजकारणास प्रोत्साहन दिलं व खतपाणी पुरविलं त्या जातकुळीच्या राजकारणाची तर जातिभेदातीत सर्वधर्मसमभावी समाज निर्माण करण्याची दिशाच नसते; पोच कमी की अधिक हा प्रश्नच अप्रस्तुत ठरतो. कटू असलं तरी हीदेखील सत्य गोष्ट आहे की, आजची राजकारणी दलित चळवळ ही या जातजमातनिष्ठ फुटीर, अलगतावादी परंपरेतली आहे.

दलित साहित्याच्या चळवळीतही या गोष्टीचं प्रत्यंतर मिळतं. दलित साहित्यिकांना गेल्या पाचसहा वर्षांमध्ये मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात, संस्थेमध्ये आणि उपक्रमांमध्ये कौतुकमिश्रित सन्मानानं आमंत्रित केलं जात आहे. त्यांच्या विद्रोहीपणाचं कौतुक केलं जात आहे. उद्या दलित रंगभूमीचंही याच प्रकारे स्वागत होईल. ही स्वीकृती व मान्यता मिळाल्यानंतर, मराठी साहित्य व रंगभूमी यांच्याशी समरस होऊन साऱ्याच मराठी साहित्य व रंगभूमीला नवं वळण देण्यात ' दलित साहित्य ' व ' दलित रंगभूमी ' या चळवळींनी सार्थकता मानली पाहिजे. आजवरच्या मराठी साहित्य, रंगभूमी, व एकंदरच संस्कृती या गोष्टी 'साडेतीन टक्क्यां' च्या होत्या अशी टीका करणाऱ्यांना त्या सर्वांच्या करण्याची संधी व आव्हान उपस्थित आहे. या संधीचा लाभ घ्यावयाचा, हे आव्हान पत्करावयाचं तर आजवरची अलगतावादी भूमिका व पवित्रे सोडून देण्याची गरज आहे. पण या दलित साहि-

त्यिक व रंगभूमीच्या क्षेत्रातील चळवळी दलितांच्या राजकारणी चळवळींचा एक विस्तार (बाय–प्रॉडक्ट) म्हणून आकारास आलेल्या असल्यानं दलितत्वाची जाणीव संकुचित व फुटीर राखण्याचा आग्रह राखला जात असल्याचं आढळतं.

दलित जाणीव ही वर्णाश्रमविरोधीच काय, एका अर्थी जे जे परंपरागत व प्रस्थापित भारतीय त्या त्या सर्वांच्या विरोधी असूनही, व्यापक आमूलाग्र समाज-क्रांतीचं सामर्थ्य तिच्या ठायी आढळत नाही.

प्रश्न : दलितांनी अंतिमदृष्टया अदलित घटकांशी एकात्म बनलं पाहिजे हे खरं असलं तरी दलित चळवळीला धार येण्याच्या दृष्टीनं आजच्या परि-स्थितीत बृहत् समाजात हरवून न जाता आपले वेगळेपण जपलं पाहिजे असं म्हटलं जातं, यावर तुमचं काय म्हणणं आहे ?

एक अपरिहार्यता म्हणून आपलं वेगळेपण दलितांनी काही काळ जपलं पाहिजे असं मानलं तरी, अखेरीस एकात्म समाज निर्मिण्याची जबाबदारी आपणावरही आहे. याची जाणीव या चळवळीला जेवढी असावयास हवी तेवढी नाही. आपलं वेगळंपण जपण्याबाबत ही चळवळ जेवढी जागरूक आहे तेवढी या मुद्द्याबाबत ना ी.

प्रश्न : आणि दलित चळवळ त्यामुळे जर एकाकी पडत असेल तर... हे टाळ-ण्याचे काही उपाय ?

दलित समाज हा भारतीय समाजव्यवस्थेच्या एकदम तळाशी असलेला समाज आहे, राजकीय, आर्थिक व सामाजिक तिन्ही दृष्टींनी. या अंगानं विचार केल्यास, दलितांच्या मुक्तीमधून साऱ्या समाजाची मुक्ती साधली जाऊ शकते, हे ध्यानात येईल. ही मांडणी अंशतः तरी मार्क्सला अनुसरून केलेली मांडणी आहे, असं म्हणायला हरकत नाही. दलित मुक्तीची चळवळ, वा संग्राम म्हणा हवं तर, ही अशी साऱ्या समाजाच्या मुक्तीची, त्याचवेळी उत्थानाची व नवनिर्मितीची चळवळ झाली तर तिचं एकाकीपण आपोआपच संपुष्टात येईल.

पण यासाठी आजच्या दलित चळवळीतील कार्यकर्ते व पुढारी यांच्या मनाची क्षितिजं रुंदावण्याची, दृष्टी व भूमिका विशाल होण्याची गरज आहे. 'दलित' हा शब्द वापरल्यानं सारे पूर्वाश्रमीचे अस्पृश्य जातीय, त्यांच्याही पलीकडील भटके व विमुक्त जातीय, आणि आदिवासी जमातीयदेखील आपोआप एकत्र होऊनच जातात असा समज दलित चळवळीत जोपासला गेलेला आहे. पण कितीही नाही म्हटलं तरी; आज जिला आपण दलित चळवळ म्हणतो ती, महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर, बव्हंशी एकजातीय चळवळ आहे; ती पूर्वीच्या महार व आताच्या नवबौद्धांची चळवळ आहे. ती केवळ एका आंबेडकरांना मानणारी चळवळ आहे. डॉ. बाबा-साहेबांच्या उत्तुंग व्यक्तित्वाचा व अविरत कार्याचा परिणाम म्हणून पूर्वीच्या महारांमध्ये अभूतपूर्व राजकीय जागृती व संघटन घडून आलं, शिक्षणाविषयी आग्रह

व आस्था उत्पन्न झाली, आणि परिणामी इतर पूर्वास्पृश्य जाती, भटक्या व विमुक्त जातींच्या तुलनेत आज नवबौद्ध आघाडीवर आहेत. नेतृत्वाची आकांक्षा त्यांच्यात प्रबळ आहे, व नेतृत्वगुणही तुलनेनं अधिक आहेत. साऱ्या दलितांच्या चळवळीचं नेतृत्व करण्याची आकांक्षा त्यांनी बाळगावी यात गैर काहीच नाही. पण दलित चळवळीस व्यापक स्वरूप द्यावयाचं असेल तर आजच्या चळवळीचं संकुचित स्वरूप त्यांनी प्रथम मनोमन स्वीकारलं पाहिजे, त्याची ऐतिहासिक व समाजशास्त्रीय तसेच मानसशास्त्रीय मीमांसा परखडपणे केली पाहिजे.

नवबौद्धांखेरीज इतरांना बरोबर घेऊन चळवळ करावयाची तर इतरांच्या धार्मिक भावनांची कदर न करण्याची वृत्ती, चळवळीचं नेतृत्व मक्तेदारीनं करण्याचा आग्रह, जागृत व संघटित व शिक्षित असण्याचा फायदा उठवून जास्तीत जास्त लाभ स्वतःच्या जातीच्या पदरात पाडून घेण्याचं समर्थन, एक डॉ. आंबेडकर सोडता इतरांचं ऋणच काय पण अस्तित्व अनुल्लेखानं वा तुच्छतेनं नाकारण्याचा आग्रह, यांसारख्या गोष्टी जाणीवपूर्वक त्यागाव्या लागतील. दलित विरुद्ध उच्चवर्णीय असा वर्गयुद्धसदृश संघर्ष कल्पिला तरी, असं एक दूरवरचं आंतरिक परिवर्तन आजच्या दलित चळवळीत घडून यावं लागेल.

काही विधायक बदलांची जोडदेखील याला आवश्यक आहे. कोणत्याही समाजातील विविध समूहांना एका चळवळीत एकत्र आणल्याखेरीज व्यापक समाजपरिवर्तनाची ती चळवळ बनू शकत नाही. भिन्न इतिहास, परंपरा, धर्म व संस्कृती असलेल्या अनेकविध जातिजमातींना केवळ आर्थिक वा सामाजिक हितसंबंधी मागण्यांच्या राजकारणावर दीर्घकाळ एकत्र आणता व ठेवता येत नाही. हितसंबंधाच्या पलीकडे घेऊन जाणारं उच्चतर विशाल ध्येय व दर्शन (व्हिजन) माणसांची मनं प्रभावित करतं तेव्हाच ही गोष्ट घडून येते. जे केवळ कोणत्या तरी एका जातिजमातीचं ध्येय नाही, ज्यात अनेक जातिजमाती सहभागी होऊ शकतात असं ध्येय असं दर्शन आजची दलित चळवळ समोर ठेवीत नाही. येऊन जाऊन सगळ्यांना, डॉ. बाबासाहेबांच्या नावानं, स्वतःच्या पुढारीपणाच्या व सत्तासंपदनाच्या राजकारणाच्या दावणीला बांधण्याचा अट्टाहास इतरांच्या अनुभवाला येतो.

उदाहरणार्थ, परंपरागत हिंदू धर्मासकट जातिव्यवस्था समूळ नष्ट करण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यात दलित चळवळ आपली इतिकर्तव्यता मानते. क्षणभर ही मान्यता योग्यच आहे, असं आपण समजू. त्यासाठी सारा भारत बौद्धमय करण्याची आकांक्षा कोणी बाळगली तर तेही योग्य असंही आपण समजू. सर्व अन्यधर्मीयांचं शिरकाण करून वा बळजबरीनं धर्मांतर करून ही गोष्ट घडून येऊ शकणार नाही, हे तर उघड आहे. म्हणजेच मग हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीही बौद्ध धर्माची

अशी मांडणी करावी लागेल, आणि इतर धर्मीयांशी असा व्यवहार करावा लागेल, जेणेकरून पारंपरिक हिंदूधर्माची व इतर धर्मांची मनावरील पकड सैल होईल, आणि विशाल व उन्नत अशा धर्माची ओढ उत्पन्न होईल. 'बौद्ध भारता'चं असं उदात्त, दिव्य दर्शन (व्हिजन) दलित चळवळीमधून समोर उभं ठाकलेलं नाही. दलित असूनही दलितपणाच्या संकुचित तटबंदी फोडून, सहानुभूती, करुणा व प्रेम याद्वारे साऱ्यांना कवेत घेऊ शकणारी दृष्टी व व्यक्तित्व यांची जोपासना आजच्या दलित चळवळीत होऊ शकत नाही असंच खेदानं म्हणावं लागतं.

साऱ्यांसाठी असलेल्या एका नव्या भारताच्या क्रांतदर्शी मांडणीनं व कार्य-क्रमानं, मग ती बौद्ध आशयाची व नावारूपाची का असेना, भारावून टाकण्याचं सामर्थ्य दलित चळवळ प्रकट करीत नाही तोवर तिचं आजचं एकाकीपण संपुष्टात येणार नाही.

आणखी एक मुद्दा. स्वातंत्र्यपूर्वकाळी मुस्लिम, अँग्लो–इंडियन, ख्रिश्चन, शीख, ब्राह्मणेतर, दलित अशा अलगतावादी फुटीर चळवळी ब्रिटिश सत्तेच्या भरवशावर व आश्रयानं जोपासता येणं शक्य होतं. भारत हे एक राष्ट्र नाही, कधीच नव्हतं, हा ब्रिटिश राज्यकर्त्यांपैकी एका समर्थ पक्षाचा आवडता युक्तिवाद होता. फुटीर-वादी चळवळींचा एकाकीपणा हा राजकारणीदृष्टचा फायद्याचा होता. आपल्यापुरता जास्तीत जास्त वाटा मागण्याच्या दृष्टीनं, ब्रिटिश असेतोंवर, फुटीर चळवळीच्या नेत्यांना, वेगळं राष्ट्र नाही तरी, सत्तेचं अलग मक्तेदारीचं क्षेत्र वेगळं तोडून मिळ-वता येईल अशी आशा बाळगता येत होती. ब्रिटिशांनी या आशेला जाणीवपूर्वक खतपाणी घातलं. डॉ. बाबासाहेबांच्या राजकारणाचा व चळवळीचा आकृतिबंध या वळणाचा होता. त्यांना निष्ठेनं अनुसरणाऱ्या दलित चळवळीलाही एक दिवस ही गोष्ट जाणावी लागणार आहे. ब्रिटिश सत्तेचा आधार असल्यानं फुटीरवादी भूमिका एकाकी पडत नसे; ब्रिटिश राज्यकर्ते, त्यांच्या स्वतःच्या सोयीनं, अशा साऱ्या चळ-वळींना राष्ट्रीय पातळीवर महत्त्व देत असत. आज संदर्भ बदलला असला तरी, मतांच्या गठ्ठ्याचे सौदे करणाऱ्या बड्या राजकीय पक्षांना दलितांची राजकीय चळवळ अलगतावादी व एकाकी राहणं सोयीचं आहे. मुस्लिम, ख्रिश्चन, आदिवासी अशा इतर चळवळींबद्दलही हीच गोष्ट खरी आहे. जागांचं आमिष दाखवीत राहून मतं मिळवायची, पण चळवळ एकाकी पाडून आपल्या कह्यात ठेवावयाची हा खेळ चाळीस वर्षं चालला आहे. समाजाची एकात्मता, स्वास्थ्य त्यामुळे धोक्यात येत असलं तरी, अद्यापिही राजकारणी नेत्यांचा स्वार्थ (अलगतावादी चळवळीतल्या व बड्या पक्षातल्या, दोघांचाही) मात्र याच राजकारणात अधिक आहे.

दलितांची व पर्यायानं साऱ्या समाजाची मुक्ती साधण्याचं ध्येय उराशी बाळग-णाऱ्या दलित कार्यकर्त्यांना विचार करावयाचा आहे तो असा की, सत्ता, संपत्ती,

कीर्ती, मानसन्मान या स्वरूपाच्या वैयक्तिक लाभांसाठी, सत्ताधारी जातींच्या / वर्गांच्या / पुढाऱ्यांच्या सोयीखातर आपण अलगतावादी आशयाचं राजकारण करीत राहून फुटीर एकाकीपण (व सोबत येणारे तटबंदीआडचे जातीय / जमातीय कोंडलेपण) कायमचं जोपासत, सांभाळत राहावयाचं की, दलितपण व ते निर्माण करणारी समाजव्यवस्था कायमची निकालात काढण्यासाठी तात्कालिक लाभांवर पाणी सोडून चळवळीचा स्वातंत्र्यपूर्वकालीन आकृतिबंध व त्यामागील भूमिका धैर्यानं अव्हेरावयाची ?

दलित पँथरचा उदय झाला तेव्हा काही काळ अशी आशा उत्पन्न झाली होती, की दलित चळवळ जुन्या तटबंदी फोडून खऱ्या अर्थानं तळागाळातील साऱ्यांची चळवळ बनण्याच्या वाटेवर आहे. तात्कालिक लाभांचं राजकारण ती ठोकरते आहे. पण ते आश्वासन साकार झालं नाही. हे परिवर्तन एका दमात होणारं नव्हतंच असं म्हणू या ! आणखी पुन्हा अशाच जबरदस्त लाटांचे तडाखे बसावे लागतील, किंवा आतूनच होणारे विस्फोट पुन्हा घडून यावे लागतील.

प्रश्न : प्रेरणादृष्टचा ' ग्रामीण ' साहित्य आणि ' दलित ' साहित्य असा भेद करता येईल का ? आज तसा तो केला जातो.

समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह करण्याच्या भूमिकेमधून ' ग्रामीण ' साहित्यनिर्मिती होत नाही. तर 'दलित' साहित्यनिर्मितीमागे मात्र विद्रोह व्यक्त करण्याची भावना मुख्य आहे, असं म्हणता येईल. या भेदास फार जास्त महत्त्व द्यावं असं मात्र नाही. कारण विद्रोह व्यक्त करण्याच्या हेतूनं निर्माण केलेल्या वाङमयातून बहुतेक वेळा लेखकाची विद्रोहाची भावना तेवढी प्रकट होते, पण साहित्यनिर्मिती त्याला साधत नाही.

' ग्रामीण ' आणि ' दलित ' साहित्यिक चळवळी व व्यासपीठं या साहित्याच्या प्रांतातील सत्तासंपादनाच्या राजकारणी चळवळी व व्यासपीठं आहेत; हे दोन दबाव गटच आहेत. समाजातील दोन भिन्न समूहांमध्ये त्यांची बैठक आहे.

दलित साहित्य चळवळीला एक अनिवार्य व स्वाभाविक असं व्यापक सामाजिक परिमाण आहे. साहित्याच्या कसोटीला न उतरणारं लेखनही समाजपरिवर्तनाच्या चळवळीत अल्प योगदान करीत असतं. ग्रामीण साहित्याला आज तरी असं व्यापक परिमाण नाही.

प्रश्न : दलित जीवनाचं चित्रण अदलित लेखकालाही करणं शक्य आहे की नाही ?

कमालीचं अवघड आहे, पण अशक्यच आहे असं नाही.

यातही एक गंमत आहे. आज ज्या प्रकारचं विद्रोही दलित साहित्य लिहिलं जात आहे तसं साहित्य निर्माण करणं अदलित लेखकाला फारसं कठीण नाहीच. पारं-

परिक समाजातील अस्पृश्यांच्या समाजस्थितीचं समाजशास्त्रीय विश्लेषण व नैतिक निवाडे वाङमयीन साज चढवून विशिष्ट सांकेतिक परिभाषेत, ठराविक पवित्रे घेऊन सादर करण्याचाच तो प्रामुख्यानं तांत्रिक प्रश्न आहे. समाजशास्त्रीय विश्लेषण काय व नैतिक निवाडे कोणते या गोष्टीही ठरलेल्या आहेत. मुद्दा असा की, आजचा दलित लेखकही सामान्यत: विशिष्ट दृष्टिकोन व विचारप्रणालीच्या साहाय्यानं दलितांची स्थिती व मानस यांची बाहेरूनच कल्पना करतो आणि चळवळ लेखकाकडून ज्या स्वरूपाच्या अभिव्यक्तीची अपेक्षा बाळगते, नव्हे आग्रह धरते, तशी अभिव्यक्ती साधणारं लेखन करतो. आता, अदलित लेखकास यात अवघड असं काही नाही.

दलित जीवनाचं प्रत्ययकारी चित्रण अदलित लेखकाला करता येतं यासाठी प्रा. माटे यांचं उदाहरण घेता येईल. अस्पृश्यांच्या स्थितीचं, त्यांच्या मानसाचं दर्शन त्यांना जवळून व प्रत्यक्षपणं घडलेलं होतं. मानवधर्माच्या भूमिकेमधून अत्यंत सहृदयतेनं त्यांनी वाङ्मयनिर्मिती केली. आजच्या दलित साहित्य चळवळीला अपेक्षित विश्लेषण, निवाडे व भाषा त्यात नाही, व म्हणून त्याचा अस्वीकार होतो. पण एका कोटीतलं दलितविषयक साहित्य अदलित लेखक नक्कीच निर्माण करू शकतो, ही गोष्ट माटयांच्या एका उदाहरणावरूनदेखील पुरेशी सिद्ध झालेली आहे.

पण—आणि हा पण उल्लंघून जाणं फारच अवघड आहे—परंपरागत समाजव्यवस्थेत अस्पृश्य हे स्वत:च्या एका वैशिष्टचपूर्ण सांस्कृतिक व सामाजिक विश्वात जगत आले आहेत. जातिव्यवस्थेमधील त्यांच्या स्थानामुळे व व्यवसायामुळे एका बाजूनं ते बृहत् व्यवस्थेशी जोडलेले होते, आणि त्यांच्यावर प्रभुत्व गाजविणाऱ्या या व्यवस्थेशी जुळवून घेऊन जगणं त्यांनी पत्करलं होतं ही गोष्ट खरी. त्याचवेळी प्रत्येक जातीला स्वत:चा धर्म, संस्कृती, इतिहास व परंपरा होत्या, आणि त्याद्वारा परिपुष्ट झालेली वैशिष्टचपूर्ण अस्मिता पण होती. दडपणूक–पिळवणूक सहन करीत असतानाही, एका पातळीवर जातिव्यवस्थेची विचारप्रणाली आत्मसात केलेली असूनही, त्याचवेळी दुसरीकडे स्वत:ची म्हणून एक स्वतंत्र अस्मिता जपलेली–जोपासलेली होती. या जागी उभं राहून समाजव्यवस्था व व्यवहार यांकडे स्वत:च्या वैशिष्टचपूर्ण कोनामधून ते बघत होते, निवाडे करीत होते, संधीचा हुशारीनं लाभ उठवीत होते. पूर्वीच्या महार जातीयांबद्दल तर ही गोष्ट विशेषत्वानं खरी आहे. उच्चवर्णियांशी, सत्ताधाऱ्यांशी वर्तणूक करतेवेळी प्रकट होणारी जाणीव (सेन्सिबिलिटी), अंतर्यामी जागृत असलेली दुसरी एक पारंपरिक 'जातीय' जाणीव, आणि त्याच्याही पलीकडील आतल्या वर्तुळात, काहीं समर्थ व्यक्तींच्या बाबतीत तरी निर्माण होणारी, पहिल्या दोन जाणिवांच्या विसंवादाचा ताण झेलणारी, खास स्वत:ची म्हणून एक जाणीव, असं एक अत्यंत गुंतागुंतीचं व्यक्तित्व व मन घेऊन, एकाच वेळी किमान दोन विश्वांमध्ये (बृहत् समाज व स्वत:ची जात ही दोन

विश्व) अस्पृश्यांना जगावं लागत होतं. बृहत् समाजात वावरत असताना, उच्चवर्णियांशी व अन्य जातीयांशी व्यवहार करीत असताना दृष्टीस पडणारं व्यक्तित्व व अभिव्यक्त होणारी जाणीव, या पातळीच्या पलीकडे जाणं, जातीबाहेरील लेखकास कमालीचं अवघड आहे. जवळपास अशक्यप्राय आहे.

तरी पण, प्रतिभा आणि सहृदय तादात्म्य यांच्या बळावर कलावंत ते शक्य करून दाखवतो, हाही आपला थोर, अक्षर वाङमयकृतींच्या संदर्भातला अनुभव आहे.

खेदाची गोष्ट अशी की, दलित लेखक दलित जीवनाचं चित्रण क्वचितच करीत असतात. ते बव्हंशी एका राजकीय विचारप्रणालीला वाङ्मयीन साज चढविण्यात धन्यता मानतात. तसं करण्यासाठी बाह्य जीवनातील वास्तववादी तपशीलांचा ते कौशल्यानं वापर करून घेतात. त्यांची तथाकथित आधुनिकता, क्रांतिकारकता, पुरोगामित्व त्यांना स्वतःच्या जातीच्या विश्वापासून, जाणिवेपासून तोडून टाकते; किंवा असं म्हणा की, ते स्वतःला आग्रहानं वेगळे करतात व आपला वारसा नाकारतात. आणि मग, तेही उपऱ्या निरीक्षकाच्या भूमिकेतून व सुधारकी वा 'क्रांतिकारक' बुद्धिजीवी पवित्रा घेऊन साहित्य प्रसवतात.

दलित लेखकांची आत्मचरित्रंही याला अपवाद नाहीत, ही गोष्ट पुष्कळ काही सांगून जाते.

प्रश्न : दलित लेखक दलित जीवनाचं क्वचितच चित्रण करतात, ते एका राजकीय विचारप्रणालीलाच वाङ्मयीन साज चढविण्यात धन्यता मानतात, हा तुमचा दलित साहित्यावरील आक्षेप वाजवीहून कडक नाही का ? दलितांनी काही चांगलं साहित्य निर्माण केलेलं नाही का ? विशेषतः आत्मचरित्रांबाबत तर फारच गौरवानं बोललं जातं. आणि तुम्ही या आत्मचरित्रांवरही आक्षेप घेता. आत्मचरित्रात्मक साहित्याबद्दल तुमच्या मनात काही पूर्वकल्पना असतील त्याचा तर हा परिणाम नाही ? दलितांच्या आजच्या जागृतीची स्थिति–गती लक्षात घेता, दलितांचं लेखन आज विशिष्ट प्रकारचंच राहणार हे मान्य करण्यास काय हरकत आहे ?

दलित साहित्याबाबतचं तुमचं म्हणणं मान्य केलं तरी, विशिष्ट परिस्थितीत एखादी घटना अपरिहार्य म्हणून स्वीकारणं वेगळं आणि त्याचं अवाजवी पद्धतीनं समर्थनच करीत राहणं वेगळं. आत्मचरित्रपर दलित साहित्य त्यातील माहितीच्या नाविन्यामुळे अदलितांना आकर्षक वाटतं. माहितीच्या दृष्टीने त्यातील हा नवीनतेचा भाग महत्त्वाचाही आहे. पण त्याची पातळी साहित्यदृष्ट्या वरची होण्याच्या दृष्टीनं ही 'फोटोग्राफिक' अवस्था बदलली पाहिजे.

आत्मचरित्र लिहिणारे पूर्वास्पृश्य लेखक हे संस्कारांद्वारा लहानपणी जी जाणीव

(सेन्सिबिलिटी) घऊन वाढले तिची, तिच्यात काळाच्या व अनुभव चिंतनाच्या ओघात जे परिवर्तन घडत गेलं त्या परिवर्तन प्रक्रियेची समर्थ अभिव्यक्ती का घडत नाही ? उच्चवर्णीय समाज त्यांना उपरा मानीत आला यापेक्षा, प्रचलित मध्यमवर्गीय पुरोगामी बुद्धिजीवी भूमिकेच्या स्वीकारातून जोपासलेलं उपरेपण ही अधिक मोठी शोकांतिका आहे. केवळ साहित्यनिर्मितीच्या संदर्भात नव्हे तर एकूणच भारतीय समाजाच्या एकात्म पुनरुत्थानाच्या संदर्भात. कारण या जातिजमातींचा जो प्राचीन समृद्ध वारसा आहे, पूर्वपरंपरेनं चालत आलेल्या त्यांच्या ज्या वैशिष्टय-पूर्ण जीवनदृष्टी, जाणिवा, व विचारव्यूह आहेत त्यांचं योगदान एकूण समाजाच्या वाटचालीत घडण्याची शक्यता आज दुरावलेली आहे. भारतीय समाजाच्या पुनरुत्थानासाठी त्याची गरज आहे.

आज जग एकात्म वैश्विक संस्कृतीच्या दिशेनं वाटचाल करीत आहे. ज्यू माणसं, इंग्लिश माणसं वा जपानी माणसं या संस्कृतीच्या निर्मितीमध्ये आपल्या वैशिष्टयपूर्ण यहुदी, इंग्लिश वा जपानी वारशासह योगदान करीत आहेत. हे करीत असतानाच ती स्वत: बदलत पण आहेत. वैश्विक संस्कृतीचे नागरिक बनत आहेत. मात्र आपले सत्त्व राखण्याबद्दल ती अधिक जागरूक डोळस व संवेदनशील बनत आहेत असं दिसेल. निग्रो / आफ्रिकी समाजांबद्दल तर ही गोष्ट प्रकर्षानं जाणवते. त्यांची साहित्यिक – सांस्कृतिक निर्मिती त्यामुळे अधिक समर्थ व संपन्न बनत आहे असाही अनुभव येतो.

पण आपल्याकडे लक्ष्मण माने आत्मचरित्र लिहितात त्या आधी त्यांनी स्वत:च्या संदर्भात आपलं कैकाडीपण जाणीवपूर्वक त्यागलेलं असतं; त्याचा त्याग करून झाल्यावर मग ते बाहेरून, एखाद्या अव्वल दर्जाच्या छायाचित्रकाराप्रमाणे कुशलतेनं, बारकाव्यांसह कैकाडी जीवन टिपतात. स्वत:च्या जवळच्या नात्यातील व्यक्तीं-विषयचेच हे ' टिपणे ' असल्यामुळे ते हृद्य व अस्सल बनते. पण ते प्रा. माटे यांच्या लेखनाच्या कोटीतलेच वाङ्मय आहे ही गोष्ट कशी दुर्लक्षिता येईल ?

प्रश्न : दलित साहित्याला वेगळे निकष लावावेत, वेगळ्या कसोटया लावाव्यात, या भूमिकेबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

साहित्य, मग ते ' ग्रामीण ' असो की ' दलित ', साहित्याचे म्हणून जे निकष असतात तेच लावायला हवेत. आजच्या प्रतिष्ठित व मान्यवर समीक्षकांनी जे निकष रूढ केले आहेत ते स्वीकारले पाहिजेत, असा मात्र याचा अर्थ होत नाही. साहित्याचं प्रयोजन व स्वरूप काय आहे याविषयी आज शिष्टमान्य व वरचढ असलेली रूप-वादी भूमिका साहित्याला दुबळी करणारी आहे, ही गोष्ट गेल्या तीस–चाळीस वर्षांच्या मराठी वाङ्मयनिर्मितीतून अनुभवाला आलेली आहे. गेल्या दोन पिढयांच्या काळात रूपवादाच्या प्रभावाखालीच मराठी लेखकांनी आपलं लेखन बव्हंशी केलं,

आणि तुरळक अपवाद सोडले तर, त्यात वाङ्मयीन महात्मतेचा आढळ होत नाही याविषयी शंका नाही. तेव्हा, दलित साहित्यिकांनी या भूमिकेस व आजच्या समीक्षेच्या मानदंडांना झुगारून देण्याची गोष्ट केली तर ती ठीकच होईल.

पण दलित साहित्य चळवळ असं काही करीत असल्याचं दिसत नाही. या क्षेत्रातही त्यांचा खरा आग्रह विशेष सवलतीची वागणूक मिळावी या स्वरूपाचा अधिक आहे. आशय विद्रोही, परिवर्तनवादी, पुरोगामी, क्रांतिकारक, इत्यादी इत्यादी असला की इतर कोणतेच निकष लावण्याची गरज नाही; किंबहुना, तसे ते लावणे हा ब्राह्मणी कावा आहे, असं त्यांचं प्रतिपादन राहिलेलं आहे. ही भूमिका खुद्द दलित साहित्यालाही उपकारक ठरलेली नाही.

साहित्य आणि साहित्यसमीक्षा यांविषयी नवी दृष्टी वा जाण आघाडीवरील मान्यवर दलित लेखकांच्या ठायी खरोखर नाही. तशी असती तर एव्हाना मराठी साहित्य व समीक्षेच्या प्रांतात त्यांचं अधिराज्य अगदी सहजपणं प्रस्थापित झालं असतं. दमदार साहित्य निर्मितीमधील ठळक अपयशामुळेच आज दलित साहित्यासंबंधीची चर्चा आत्मचरित्रपर लेखनाभोवती केंद्रित व सीमित होताना दिसते आहे. ब्राह्मणी वळणाच्या बुद्धिजीवी मध्यमवर्गाला अपरिचित असलेल्या लोकजीवनाचं वर्णन त्यात स्वानुभवाधारित येत असल्यानं, स्वाभाविकच, रोज तेच ते खाऊन तोंडाची चव गेलेल्यांना ही आत्मचरित्रं चटकदार वाटल्यास ते समजू शकतं. पण या मध्यमवर्गीय बुद्धिजीवी समीक्षकांनी या आत्मचरित्रपर लेखनाचं जे कौतुक चालविलं आहे त्यात साहित्याच्या अंगानं खोलवर समीक्षा कोठेच नाही. साहित्यविषयक नवी दृष्टी वा नवे मानदंड प्रस्थापित होत आहेत असं कोठे दिसत नाही.

साहित्यातील आशयाचं स्वरूप आणि त्या आशयाचं रूप या दोन्हींविषयी मूलतः अधिक सखोल व गंभीर विचार करण्याची गरजदेखील दलित साहित्य चळवळ प्रस्थापित करू शकलेली नाही. हे काम मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात घडण्यास आज सुरुवात झाली आहे, पण त्याचं श्रेय दलित साहित्य चळवळीस वा साहित्यिकांना नाही.

साहित्यविषयक ज्या 'ब्राह्मणी' भूमिकांविरुद्ध आणि वर्तुळाविरुद्ध टीकेची झोड उठविली गेली त्याच वर्तुळाकडून आणि त्याच भूमिकेतून मान्यवर म्हणून प्रस्थापित होण्याचं राजकारण आज यशस्वी झालं आहे. याविषयी खंत बाळगण्याचं कारण नाही. पण निदान आता तरी दलित साहित्यिकांनी दलित साहित्याचं सुरक्षित पण संकुचित वर्तुळ सोडून, साहित्याच्याच एकंदर विशाल प्रवाहात उडी घ्यावी, आणि साहित्याचं व समीक्षेचं सर्वांसाठीच काही वेगळं शास्त्र निर्माण करण्यात आपला वाटा उचलावा.

मूलत: साहित्याचं शास्त्र जीवनाशयाच्या रूपासंबंधीचं शास्त्र आहे. जीवन व त्याचा आशय यांच्यापासूनही ते तोडता येत नाही आणि रूपविहीन आशयाचीही गोष्ट ते करू शकत नाही. जीवनाचं सत्य, जीवनाची व्यवस्था काय आहे याचा शोध आणि रूपाचा वेध या दोन गोष्टी एकच आहेत.

प्रश्न : दलित साहित्याच्या अभ्यासाला सोशल अँथ्रापॉलॉजिकल ॲप्रोचची गरज तुम्हाला वाटते का ?

आपणास अगदी अपरिचित अशा स्थलकाल परिस्थितीतल्या साहित्यातले बारकावे व तपशील समजण्यासाठी, ज्या समाजातल्या माणसांविषयी ते साहित्य आहे त्या समाजाच्या समाजव्यवस्थेची, संस्कृतीची, इतिहास परंपरेची जाण असायला लागते. पण, दुसरीकडे, अक्षरसाहित्यकृतींच्या आस्वादाला या स्वरूपाच्या अपरिचयाचा अनुल्लंघनीय अडथळा होतो असा आपला अनुभव नाही. एका पातळीवर माणसं सगळीकडे व सगळ्या काळांमध्ये तीच एक असतात, कारण ती अखेर शेवटी माणसंच असतात; आणि माणसं माणसांना जाणून घेऊ शकतात. 'सोशल ॲन्थ्रापॉलॉजिकल ॲप्रोच' ही सबब वा बागुलबोवा तर नाही ना, असं मनात येतं.

प्रश्न : आता आपण दलित साहित्यावरील आक्षेपांकडे वळू. आक्षेप नंबर एक–ते प्रचारी आहे.

दलित समाजकारण–राजकारण यांचं एक अंग म्हणूनच प्रचलित दलित साहित्य चळवळ वाढविली गेली असल्यानं बहुतेक दलित लेखनात एक भूमिका लावून धरण्याचा अभिनिवेश आढळणं स्वाभाविकच आहे.

– हे साहित्य एकसूरी आहे.

जोवर ते एका राजकीय–सामाजिक चळवळीचं हत्यार म्हणून वापरण्याची कल्पना प्रभावी आहे तोवर एकसूरीपणाही आढळणारच.

– या साहित्यात 'व्यक्ती' येत नाही.

दलित साहित्यातील दलित वा अन्य व्यक्ती या जातीच्या, प्रवृत्तीच्या, भूमिकांच्या, प्रवाहांच्या प्रतिनिधी म्हणून, नमूना म्हणून कल्पिलेल्या असतात आणि त्यांच्याकडून लेखक एक भूमिका दर वेळी वठवून घेत राहतो असं जेथे जेथे व जोवर असेल तेथे-तेथे व तोवर व्यक्तीचं व्यक्ती म्हणून अंतरंगदर्शन कसं घडणार ?

– हे साहित्य आक्रस्ताळं आहे.

बघण्याचा कोन जर वेगळा असला तर त्याच वैशिष्टयाचं वर्णन 'ज्वलज्जहाल' असं अभिमानपूर्वक करता येणं शक्य आहे, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. दलित

साहित्यिक हा, एका अर्थी, साहित्यनिर्मितीच्या द्वारे सवर्णांशी युद्धच खेळण्याच्या भूमिकेत असतो. स्वत:विषयीची त्याच्या मनातील प्रतिमा योद्धयाची असते.

हे साहित्य नकारात्मक आहे.

नकारात फार मोठे सामर्थ्य तर असू शकतंच, पण काही परिस्थितीत नकार हा विधायकही असतो.

दलित साहित्यिकांविषयीच्या मित्रत्वाच्या नात्यानं आपली खरी तक्रार वेगळीच असायला हवी. दलित राजकीय चळवळ व तिची विचारप्रणाली ही जीवनाचं अधिष्ठान बनण्याच्या दृष्टीनं फार कोती आहे. इतकंच नाही तर, त्या चळवळीच्या व विचारप्रणालीच्या प्रभावामुळे दलितांचं जीवन व व्यक्तित्व बिनबुडाचं बनलेलं आहे. ' उथळ पाण्याला खळखळाट फार ' अशी आपल्याकडे म्हण आहे. बौद्ध धम्म हे नव्या जीवनाचं व व्यक्तित्वाचं समर्थ व विधायक अधिष्ठान होऊ शकतं. पण बुद्धाचा स्वीकारही आज तरी वरवरचाच राहिलेला दिसतो. दलित समाजाला राजकीयदृष्टया अधिक घट्टपणे बांधून घेण्याला उपयोगी दोरी म्हणूनच त्याचा आज जास्त करून वापर केला जात आहे.

प्रश्न : 'दलित जाणीव' ही निरंतर राहणारी की नष्ट होणारी ?

अस्पृश्य म्हणून वागणूक मिळत राहील तोवर ही जाणीव टिकून राहील ही गोष्ट तर उघड आहे. ग्रामीण भागात आजही स्पृश्यास्पृश्यता पाळली जाते. उत्पादन साधनस्रोतांची मालकी व वाटप आणि व्यवसाय, त्यातही शेतमजुरी, यांच्याशी ग्रामीण भागातली स्पृश्यास्पृश्यता घनिष्टपणे निगडित असल्यानं तिचं निर्मूलन सोपं नाही. ग्रामीण जनमानसात आध्यात्मिक-नैतिक उन्नयनाची म्हणण्यासारखी चळवळही आज क्रियाशील व प्रभावी नाही. त्यामुळे नजिकच्या भविष्यकाळात दलित जाणीव ही दूर होण्याची शक्यता नाही.

भरीला ' दलित जाणीव' ही राजकीय स्वरूपाची जाणीव आहे ही गोष्टही लक्षात घ्यायला हवी. तिच्या आधारेच दलित राजकारण चालविलं जात आहे. ज्यांना दैनंदिन जीवनात अस्पृश्य म्हणून वागणूक मिळत नाही अशांकडूनही राजकारणी हेतूंसाठी दलित जाणीव जोपासण्याचे पद्धतशीर प्रयत्न होत आहेत. राजकारणी हितसंबंध निर्माण झाला असल्याकारणानं दलित जाणीव दूर होणं आणखी कठीण होऊन बसलं आहे.

या जाणीवेच्या संदर्भात आणखी एक पैलू लक्षात घ्यायला हवा. सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक जमातीय वेगळेपणाची जाणीव शतकानुशतके मुरलेली असते तेव्हा तिचा निरास चटकन होण्याची अपेक्षा बाळगणंही गैर ठरतं. जातीपातीच्या पद्धतीची समाजरचना नसलेल्या आधुनिक व प्रागतिक पश्चिमी समाजांमध्येही अशा पृथक् जाणिवा आजही प्रभावी आढळतात. बेटीव्यवहारांमध्ये खुलेपणा

असूनही आढळतात. स्पृश्यास्पृश्य भेद खोटे आहेत ही गोष्ट व्यवहारात उतरल्यानंतरही जातीय व जमातीय अस्मिता दीर्घकाळपर्यंत टिकून राहतील ही गोष्ट मोकळ्या मनानं स्वीकारली जाण्याची गरज आहे. मी ब्राह्मण आहे, आम्ही मराठे आहोत, असं म्हणणारी सर्व माणसं स्पृश्यास्पृश्यता मानणारीच आहेत, उच्चनीच असा भेद करणारीच आहेत, असा आरोप करणं चुकीचं ठरेल. स्वतःच्या मुलांची लग्नं आंतरजातीय ज्यानं केलेली नाहीत, विशेषतः पूर्वास्पृश्य जातींमधील मुलामुलींशी केलेली नाहीत त्या सर्व व्यक्ती मनातून स्पृश्यास्पृश्यता व जातीयता पाळतात याचाच तो पुरावा आहे असं प्रतिपादन अनेकदा आग्रहानं केलं जातं. हा युक्तिवादही गैर आहे.

प्रश्न : जातिसंस्थाच बदलत गेली तर ?

जातींचा उगम, म्हणजेच जातिधिष्ठित समाजरचनेंचा उगम कसा झाला हा अद्यापि एक कूट प्रश्न आहे. त्याचं उत्तर अनेकपदरी असण्याची शक्यता सर्वात जास्त दिसते. मुळात वेगळ्या असलेल्या टोळी–समाजांची वांशिक – सांस्कृतिक पृथगात्मता कायम राखून त्यांची एका बृहत्तर, गुंतागुंतीच्या समाजात एकात्म स्वरूपात बांधणी करण्याच्या ओघात जातिधिष्ठित समाजरचनेचा आकृतिबंध विकसित होत गेला अशी माझी धारणा आहे. पोषाख, आहार, सामाजिक चालीरीती, दैवतं व धार्मिक आचार, अशा महत्त्वाच्या बाबतींमध्ये आपापल्या स्वायत्त संस्कृती व परंपरा, जीवनमार्ग जतन करण्यावर भर राहिला. त्या त्या जातीचाही आणि एकंदर समाजाचाही. यामुळे परिपुष्ट झालेली व खोलवर हाडीमांसी रुजलेली अस्मिता ज्या त्या जातीला प्रिय राहिलेली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात, लोकशाही राजकारणाच्या स्वभावगत रेट्यामुळे, प्रभावी जातीय राजकारण करण्याच्या ओघात जातिसंस्थेच्या पारंपारिक स्वरूपात फार मोठं परिवर्तन घडून आलं आहे. दैनंदिन व्यवहाराच्या पातळीवर पूर्वी जात हा सामान्यतः एका लहान क्षेत्रापुरता सीमित व बंदिस्त असा समूह असे. बारीकसारीक भेदांवरून जातीचे पृथक् व स्वायत्त तुकडे पडण्याकडे कल असे. मराठी भाषिक ब्राह्मण घेतले तरी देशस्थ, कऱ्हाडे, कोकणस्थ, चित्पावन, गौड सारस्वत अशा, बेटी व्यवहारांच्या बाबतीतही, स्वायत्त व पृथक् अशा जाती व्यवहारात आढळत होत्या. आज प्रदेश, देश व समाजव्यापी अशा जातीय संघटना उभ्या राहिल्या आहेत. अशा संघटनांची बांधणी करण्यासाठी विभिन्न संस्कृती व परंपरा असणाऱ्या अनेक जातींना एक करण्याची प्रक्रिया गतिमान करावी लागली आहे. हे एक मोठं परिवर्तन आहे.

या मोठ्या परिवर्तनानं जातीय अस्मिता क्षीण न होता त्या जास्त उठावदार व आक्रमक बनल्याचा अनुभव येतो आहे. म्हणजे आज तरी, पारंपरिक जातिसंस्थे-

तील परिवर्तनामधून जातीय अस्मिता नष्ट होईल असं लक्षण दिसत नाही.

प्रश्न : यावर उपाय ?

आपली जात कोणती, धर्म कोणता या प्रश्नाचं उत्तर परंपरागत पद्धतीनं देता येणं अशक्य व्हावं इतपत आंतरजातीय विवाह सार्वत्रिक होणं हा प्रभावी उपाय म्हणायला हवा. त्या खालोखालचा प्रभावी उपाय दिसतो तो असा की, सर्वच जातिजमातींच्या पारंपरिक जीवनमार्गापेक्षा मूलतः वेगळाच जीवनमार्ग जास्तीत जास्त लोकांकडून अंगीकारला जायला हवा.

आधुनिकीकरणाच्या व पाश्चात्यीकरणाच्या प्रभावाखाली ही दुसरी गोष्ट घडून येत आहे. उच्च मध्यमवर्गीय सधन कुटुंबांमध्ये रुजत चाललेल्या जीवनमार्गानं त्या कुटुंबामध्ये वाढणाऱ्या मुलांच्या जातीय जाणिवेचा आधारच उखडला जात आहे. हे वर्तुळ अगदी सीमित आहे, आणि या वर्तुळातील बहुढगी कॉस्मॉपॉलिटन संस्कृती एकंदर देशाच्या नि समाजाच्या हितावह नाही ही गोष्ट वेगळी. पण या उदाहरणानं मुद्दा स्पष्ट होईल.

प्रश्न : साहित्याला यात काही भूमिका आहे का ?

एका अंगानं पाहिलं तर साहित्यनिर्मिती व आस्वाद ही समग्र समाजव्यवस्थेच्या पोटातली एक उपव्यवस्था आहे, आणि या नात्यानं कोणतंही मोठं परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता साहित्याच्या अंगी अपेक्षिणं योग्य होणार नाही. पण ही समज एकांगी आहे. सर्वच साहित्य, ते साहित्य वाचणाऱ्यांचं मन संस्कारित करीत असतं, माणसांना घडवीत असतं. पुष्कळसं साहित्य प्रस्थापित चाकोऱ्याच दृढ करीत असत ही गोष्ट खरी; पण तोही साहित्याच्या शक्तीचाच पडताळा आहे.

अक्षरसाहित्याचं वा सत्साहित्याचं व्यवच्छेदक लक्षण असं की मानवी स्वभावप्रकृती, मानवी स्थिती आणि मानवी नियती यांविषयी असं साहित्य आपली जाण वाढवतं, आपल्या ठायी काही एक दृष्टी बिंबवतं. स्थलकालबद्ध, समाज व संस्कृतिबद्ध, धर्म, वर्ग व जातिबद्ध विवक्षित व्यक्तींच्या विषयी सांगत असतानाच, त्याच वेळी, ते आपणास या सर्वांपलीकडे घेऊन जातं. आपलं विशिष्टपण बाजूस न ठेवता आणि तरीही त्याच्या अतीत जाऊन माणूस म्हणून आपण इतर सर्व माणसांशी माणूसकीच्या नात्यानं जोडले जातो.

समताधिष्ठित माणुसकीसंपन्न समाजाच्या निर्मितीसाठी माणसामाणसामध्ये माणूस म्हणून हे जे नातं आहे ते दृढतर होण्याची गरज आहे. सत्साहित्याची निर्मिती जितकी अधिक, व त्याचे संस्कार जेवढे अधिक प्रभावी तेवढी ही गोष्ट लवकर घडून येईल.

दुर्दैवानं, साहित्यिकांच्या बांधिलकीविषयी आग्रह बाळगणारी साहित्यिक मंडळी,

बहुधा, बांधिलकीचा अर्थ राजकारणी विचारप्रणालीच्या अनुरोधानं लावीत असतात. बांधिलकीसंपृक्त वाङ्मय वाचकांची मनं विशाल बनविण्याऐवजी संकुचितच बनवीत राहतं.

प्रश्न : 'बांधिलकी' हा शब्द मराठीत आज बराचसा बदनाम झालेला आहे. 'बांधिलकीमुळे साहित्य हे साहित्य न राहता ते प्रचाराचं एक साधन बनतं.' असा बांधिलकीवर आक्षेप घेतला जातो. याबाबत तुम्हाला काय वाटतं ?

बांधिलकी प्रचारात्मक पातळीवर जर रहात असेल तर हा दोष बांधिलकीचा नसून लेखकाच्या कच्चेपणाचा आहे. कळत वा नकळत प्रत्येक माणूस कुठल्या ना कुठल्या जीवनदृष्टीला बांधलेला असतो किंवा संबंधित होतो. तो त्याच्या जीवनधारणेचा व व्यवहाराचा भागच असतो. आपण बांधिलकी मानीत नाही, अशी घोषणा करणारा लेखकही कळत न कळत बांधिलकीपासून अलग राहात नाही. 'आपण बांधिलकी मानीत नाही' असं जेव्हा तो म्हणत असतो, त्यावेळी याचा खरा अर्थ तो प्रचलित व्यवस्थेला मान्यता देत असतो असाच होतो. आपल्या या बांधिलकीचं त्याला भान नसतं. समाजपरिवर्तनाची स्पष्ट दृष्टी असलेल्या लेखकाचं बांधिलकीचं भान अधिक स्पष्ट असतं. तिची दिशा त्याला जाणवत असते. पण पुष्कळदा हे भान उथळ पातळीवरच राहतं आणि त्यामुळे साहित्यात ही बांधिलकी उपरेपणानं प्रकट होते. साहित्याला गौणत्व आणते, ठराविक प्रश्नांना ठराविक पद्धतीने उत्तर देत राहते. या ऐवजी बांधिलकीचं लेखकाचं भान ज्यावेळी मानवी जीवनव्यवहाराशी खऱ्या आस्थेनं संबंधित होतं, जीवन व्यवहाराच्या अंगोपांगाशी सावयवीपणानं संलग्न होते, त्या वेळी बांधिलकीचं उपरेपण लुप्त होऊन ते त्या लेखकाच्या जीवनजाणीवेचं एक स्वाभाविक अंग बनतं. त्याच्या निर्मितीत ते मुरून गेलेलं असतं. आणि यामुळे ते जीवनाचं दर्शन अधिक चांगल्या प्रकारे घडवू शकतं.

प्रश्न : दलित साहित्यानं मराठीला नेमकं काय दिलं ?

मराठी साहित्यामध्ये काही अव्वल दर्जाच्या साहित्यकृतींची भर पडली. पण मराठीतल्या वाङ्मयनिर्मितीचं, समीक्षेचं वा साहित्याच्या तत्त्वज्ञानाचं वळणच पार बदलून टाकलं, असं मात्र म्हणता येणार नाही.

दलित साहित्य चळवळीनं असंख्य दलित तरुणांना लिहितं केलं, त्यांच्यात एक आक्रमक आत्मविश्वास उत्पन्न केला, हे या चळवळीचं योगदान सगळ्यात महत्त्वाचं आहे.

पूर्वास्पृश्य जातिजमातींच्या जनजीवनाविषयी, अज्ञान होतं, ते दूर झालं, ही महाराष्ट्रीय समाजजीवनाच्या निकोप वाटचालीच्या दृष्टीनं मोठी सिद्धी आहे. दलित साहित्याच्या चळवळीनं महत्त्वपूर्ण असं अभिसरण सुरू झालं. त्याचे इष्ट परिणाम

दिसण्यासाठी आणखी काही काळ जावा लागेल, पण असे परिणाम होतील यात काही शंका नाही.

प्रश्न : या साहित्याच्या संदर्भात तुम्हाला आणखी काही सांगावयाचं आहे ?

'दलित' साहित्याची निर्मिती करण्यावरील भर सोडून देऊन सत्साहित्य निर्मितीत दलित समाजातून येणाऱ्या साहित्यिकांनी यापुढील काळात रस घ्यावा. आज त्यांचे व त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचे जे अ-चिकित्सक वृत्तीनं उत्साही कोडकौतुक होत आहे ते त्यांच्या हिताचं नसून ते त्यांना वस्तुतः दुबळं करणारं आहे, ही गोष्टही त्यांनी जाणावी, असं सुचवावंसं वाटतं.

●

# १४. डॉ. भालचंद्र नेमाडे

[डॉ. नेमाडे यांचे साहित्य किंवा समीक्षा वाचून जो सकृत्‌दर्शनी ग्रह होतो तो फारसा अनुकूल नसतो. त्यात एक उग्रता डोकावते. या गृहस्थाशी संवाद कितपत साधता येईल, हा गृहस्थ आपली खिल्ली तर उडवणार नाही ना, अशी शंकाही स्पर्शून जाते.

पण प्रत्यक्ष परिचयात, सहवासात, संवादात जो अनुभव येतो तो उलट टोकाचा. परिचय जसजसा वाढत जाईल तसतसा त्यांच्या आस्थेचा, स्नेहार्द्रतेचा अधिकाधिक प्रत्यय येत जातो. त्यांच्या विचारांच्या व्याप्तीचे व खोलीचेही दर्शन घडते.

साहित्य या संस्कृतिविषयक नेहमीच्या मतांहून नेमाडे यांची मते नेहमीच वेगळी असतात. प्रसंगी विक्षिप्त वा टोकाची वाटावी अशी ती असतात. पण या मताचा जसजसा आपण मागोवा घेत जातो तसतसे त्यातील सत्य अधिकाधिक प्रकट होत राहते. त्यांची सर्वच मते सारख्याच प्रमाणात मान्य होतील असे नव्हे; पण त्यात कोणत्या ना कोणत्या प्रकारची साभिप्रायता असते, यात शंका नाही.

त्यांच्या इतर अनेक मतांप्रमाणे त्यांची दलित साहित्यविषयक मतेही प्रचलित मतप्रवाहाहून बरीच वेगळी आहेत. पण या प्रश्नाच्या काही अनोख्या बाजूवर मर्मज्ञपणे बोट ठेवणारीही आहेत. म्हणूनच त्यांचे अगत्य विशेष वाटते.

प्रस्तुत मुलाखत त्यांच्याशी वेळोवेळी झालेल्या भेटीगाठीतून, प्रश्नोपप्रश्नांतून साकार झाली आहे. चर्चा, चिकित्सा, शंका, पत्रव्यवहार इत्यादींचाही काही हातभार या मुलाखतीला लागला आहे. त्या साऱ्यांची साकल्याने येथे नोंद आढळते.]

---

प्रश्न : दलित जाणीव म्हणजे काय ?

काही संकल्पना वेळोवेळी नवनवीन नावं धारण करून किंचित आधुनिक प्रस्तुतता व्यक्त करीत राहतात. अशा संकल्पनांचे अर्थ निश्चित करताना त्यांचा संपूर्ण इतिहास लक्षात घ्यावा लागतो. ‘ दलित ’ हे नाव ज्या जाणिवेला अलीकडे वर्तमानपत्री समीक्षेनं केवळ जातिनिष्ठ म्हणून दिलं, तो अर्थ गंभीर चर्चेत थोडवेळही टिकणारा नाही. वाङ्मयीन समीक्षेत दलितत्व हा गोगोलप्रणीत अर्थ (दि

ओव्हरकोटपासून) दोस्तोयवस्कीनंतर एक वाङ्मयीन मूल्य म्हणून मान्य झालेला आहे. हिंदुस्थानातही दलितत्वाची जाणीव करून देणारे साहित्य शुनःशिप, एकलव्यादी उपकथांमधून आजतागायत निर्माण होत आलेलं दिसतं. मुद्दा असा की, आपण ह्या विषयावर चर्चा करताना केवळ वर्तमानपत्री संकल्पना बाजूला ठेवून तिच्या मागच्या सर्व ऐतिहासिक संदर्भांसह ती वापरावी तरच दलितत्वावरची चर्चा प्रस्तुत ठरेल, असं मला वाटतं.

दलित जाणीव म्हणजे महाराष्ट्राच्या विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीतून निर्माण झालेली व्यष्टी–समष्टी संबंधाच्या निरोगी संकल्पनेसंबंधीची जाणीव होय. ह्या जाणिवेला मराठीत ऐतिहासिक पाठबळ आहे. ती तेराव्या शतकापासून विकसित झालेल्या सर्व जातिजमातींवरील संकल्पनेमुळे आज प्रकर्षानं पुढे आली आहे. आधुनिक लोकशाहीच्या प्रभावानं ही जाणीव आक्रस्ताळेपणा धारण करीत असली तरी तिचा गाभा व्यष्टी–समष्टीच्या निरोगी संबंधांची संकल्पना हाच आहे.

प्रश्न : दलित जाणिवेला तुम्ही म्हणता तसं ऐतिहासिक अधिष्ठान असल्याचं मानता येईल. पण 'आधुनिक लोकशाहीच्या प्रभावानं ही जाणीव आक्रस्ताळेपणा धारण करीत आहे,' असं तुम्ही म्हणता, त्याचा मतलब नीट लक्षात येत नाही.

महाराष्ट्रात तेराव्या शतकात भाषिक अस्मितेबरोबर ज्या जाणिवा व्यक्त झाल्या, त्यांच्यामध्ये मराठी समाज सर्व पोटसमूहांचा असून प्रत्येक समूहाला आपलं स्थान मिळालं पाहिजे, अशी जाणीव नामदेवप्रणीत वारकरी संप्रदाय आणि चक्रधरप्रणीत महानुभाव संप्रदाय, या संप्रदायांनी विद्रोहाच्या वेगवेगळ्या पद्धतींनी स्पष्टपणे मांडली. त्यानंतर आजपर्यंत वेळोवेळी हा विद्रोह निरनिराळ्या स्वरूपांमध्ये प्रकट होत आला. ह्या अर्थानं दलित जाणीव समजली गेली पाहिजे. आधुनिक लोकशाही पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्काने विसाव्या शतकात रुजली. तिच्यात व्यक्तिवादाचा पाश्चात्य अतिरेक आढळतो. मूळ मराठी परंपरेशी ह्या अतिरेकी व्यक्तिवादानं जोडून न घेतल्यानं आजच्या आक्रस्ताळी दलित घोषणा, परंपरेचा अवमान आणि अविकसित विद्रोहमूल्यं आढळून येतात.

प्रश्न : परंपरेतील आवश्यक भागाचा स्वीकार व आधुनिक व्यक्तिवादातील निरोगी भाग, यांची सांधेजोड करण्याची तुमची दिशा कोणती? तुम्ही 'देशीपणावर' नेहमीच भर देता, या दृष्टीने ही दिशा स्पष्ट झाल्यास बरे होईल.

आपल्या देशात पाश्चात्य व्यक्तिवाद १९ व्या शतकाच्या मध्यानंतर रुजू लागला. त्याच्या सीमा निश्चित करण्याचे प्रयत्न अजूनपर्यंतही कोणी केलेले नाहीत, हे आधी

मान्य केलं पाहिजे. माझ्या मते आपल्या समाजाचे स्वास्थ्य ह्या व्यक्तिवादामुळ प्राय: बिघडलं असून ह्या मोहक कल्पनेमागच्या कुटुंब, समूह, जात, समाज इत्यादी आपल्या संस्कृतीच्या पायाभूत जाणिवा विसरूनच हा व्यक्तिवाद उभा राहू पाहतो, ही आपली शोकांतिका आहे. ही सांधेजोड व्यक्तिवादी लोकांच्या कक्षेतली गोष्ट नाही, तर ती आपल्या परंपरावाद्यांनी स्वतःत बदल केल्यावर, व्यक्तिवादी मूल्यं स्वतःत सामावून घेण्यासाठी करावा लागणारा त्याग सोसल्यावर प्रतीत होणारी गोष्ट आहे. असा त्याग आपल्या परंपरेत शक्य आहे. काही बाबतींत आपण तो सुरू केलाही आहे. उदा., अस्पृश्यता नष्ट करणे, स्त्री–स्वातंत्र्य, मुलांचे हक्क मान्य करणे, इत्यादी.

प्रश्न : समाजवादी, साम्यवादी जाणिवांहून दलित जाणीव वेगळी मानावयाची का ? समतेचा आशय असलेल्या इतर सर्व जाणिवांहून दलित जाणीव ही वेगळी मानावयाची का ? सर्व शोषित या जाणिवेत अंतर्भूत होतात की नाही ? या जाणिवेचा सर्व विषमतेशी संबंध नाही का ?

समाजवादी, साम्यवादी जाणिवांहून दलित जाणीव वेगळी आहे. समतेचा आशय असलेल्या अशा राजकीय विचारप्रणाली समाजाचे पुनर्रचन आंतरव्यक्तीय (inter-subjective) भूमिकेवरून करण्यास कटिबद्ध असतात. याउलट, दलित जाणीव ही भावनाप्रधान आहे. ती विचारप्रणालीच्या पातळीवर पाहता येत नाही.

प्रश्न : दलित जाणीव ही विशिष्ट विचारावर, विवेकावर आधारलेली आहे, असा तर सर्वसाधारण समज आहे, आणि तुम्ही तर हीं जाणीव मुख्यत्वे भावनाप्रधान आहे असं म्हणता, हे कसं काय ?

दलित जाणीव विवेकाच्या पातळीवर टिकत नाही. याचं कारण ही जाणीव दलित व्यक्ती किंवा दलित जाती निष्पाप, पिळल्या गेलेल्या आणि निरपराध आहेत असा मानवी स्वभावाचा भाबडा साचा कल्पून त्यावर आधारलेली आहे. वस्तुत: प्रत्येक माणूस हा स्वभावत: दुष्ट, क्रूर, इतरांना संधीनुसार पिळणारा किंवा हीन असतो. 'दलित व्यक्ती' किंवा 'दलित जात' ही एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीपुरती वर्गवारी असून हीच माणसं आपल्या कृतीतून दलितत्वाचा व्यत्यास सिद्ध करू शकतात. 'दलित' माणूस अन्याय करणार नाही असं समजणं वस्तुस्थितीला धरून नाही.

प्रश्न : माणूस मूळचा सुष्ट की दुष्ट ? हा तात्त्विक प्रश्न थोडा बाजूला ठेऊ. पण तुम्ही दर्शविलेल्या दलित जाणिवेतील भाभिबडेपणा दूर होण्याचा मार्ग कोणता ?

ह्या दलितांबद्दलच्या भाबडेपणावर उतारा हाच की, दलितांचा प्रत्यक्ष अनुभव घणं, त्यांना समान भूमिकेवर पाहणं. माणूस म्हणून सगळे सारखेच असतात, सामा-

जिक संस्था, प्रथा, रूढी ह्या सदोष असतात, किंवा अशा संस्था, प्रथा, रुढी इ. टिकवून धरणारी प्रवृत्ती नष्ट करण्याची गरज आहे, अशा प्रगल्भ विचारसरणीकडे समाज जाईल. भाबडेपणा मुळात वाईट नाही, पण सामाजिक न्यायवितरणाच्या संदर्भात तो प्रमुख अडसर ठरू शकतो. ह्याचं उदाहरण म्हणजे आपल्या भोवतालच्या १० मैलांच्या परीघात एकही अस्पृश्य माणूस राहात नाही, अशा उच्चवर्गीय वस्तीत राहून दुसरीकडे मराठवाड्यातल्या विद्यापीठाचे नामांतर झालंच पाहिजे अशी चळवळ उभारणारे भाबडे लोक स्वतःच्याच गावातल्या एका कॉलेजचं किंवा विद्यापीठाचं नामांतर करू इच्छित नाहीत.

प्रश्न : दलित जाणीव फक्त वर्णाश्रमधर्मविरोधी राहिल्यानं काय साधतं? यामुळे एकटेपणा येत नाही का ?

ही जाणीव फक्त वर्णाश्रमधर्माच्या विरोधी आहे. सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध विद्रोह करून उठणारी नाही. तिचा रोख समाजात आपल्याला माणुसकीचं स्थान मिळावं ह्याकडे आहे. ह्यामुळे एकटेपणा येत नाही, तर मुळात निर्माण होत असलेला एकटेपणा प्रकर्षानं व्यक्त होतो. दलित जाणीव समतेच्या जाणिवेचा भाग असती तर आपल्याकडे मार्क्सवादाची एकदम भरभराट झाली असती.

प्रश्न : दलित साहित्यातील जाणीव आणि ग्रामीण साहित्यातील जाणीव यात तुम्हाला कोणते साम्य-भेद आढळतात ? गरिबी, दुःख, विषमता हे घटक दोन्हींकडे समानच नाहीत का ?

ही जाणीव ग्रामीण साहित्याच्या जाणिवेहून वेगळी आहे, कारण ग्रामीण साहित्यातल्या जाणिवेत हिंदू–समाजरचनेतील अनेक आनंददायक तत्त्वांचा गौरव अभिप्रेत असतो. दलित जाणिवेत हा प्रकार नाही. गरिबी, दुःख, विषमता इ. घटक सर्वच मानवी समाजात कमी–जास्त प्रमाणात असतात. दलितत्वाची संकल्पना व्यापक करणं भोंगळपणाचं आहे. कारण वर सांगितल्याप्रमाणे ही संकल्पना एका विशिष्ट प्रदेशातील सांस्कृतिक आवरणानं बांधलेली आहे. ती प्रायः भावनिक आहे. ह्यात चक्रधर, म्हाईंभट, नागदेवाचार्य, नामदेव, ज्ञानदेव, चोखा, जनाबाई इत्यादींपासून फुले, शिंदे, आंबेडकर ह्यांच्यापर्यंत सगळ्यांच्या वेदना प्रदेश-संस्कृतिविशिष्ट म्हणून मिळालेल्या आहेत.

प्रश्न : दलित साहित्याच्या स्वतंत्र साहित्यशास्त्राच्या मागणीबद्दलचा तुमचा अभिप्राय काय ?

दलित साहित्याला स्वतंत्र दलित असे निकष लावू नयेत, कारण हे साहित्य संबंध मराठी परंपरेनं निर्माण केलेलं आहे. त्याचं वेगळं साहित्यशास्त्र कल्पिणं हास्यास्पद आहे.

प्रश्न : कारण ?

साहित्यमीमांसेत किंवा साहित्यशास्त्रात साहित्याचा इतिहास, साहित्याचं समाजशास्त्र, मानसशास्त्र, साहित्यसमीक्षा, तौलनिकता, राष्ट्रीयता इ. अनेक संदर्भामध्ये साहित्यकृतींचा विचार केला जातो. दलित साहित्य ह्या नावाखाली जी वर्तमानपत्री, ब्राह्मणी आणि संकुचित संकल्पना रूढ झाली आहे, तिच्यात हे संदर्भ कटाक्षानं टाळलेले असतात. दलितांचं साहित्य म्हणजे विशिष्ट जातीतल्या लोकांनी विशिष्ट पद्धतीनं, विशिष्ट मूल्यं प्रकट करण्यासाठी लिहिलेलं साहित्य असेल तर त्याचं साहित्यशास्त्र करता येणार नाही. एकूण साहित्यशास्त्रातच दलित साहित्यशास्त्राचा विचार होऊ शकतो.

प्रश्न : एक शंका– 'मध्यमवर्गीय' किंवा 'पांढरपेशी' संकल्पना असं जिला म्हणतात, तिला तुम्ही ब्राह्मणी म्हणता. 'ब्राह्मणी' म्हणण्यात काही खास अभिप्राय ?

'मध्यमवर्गीय', 'पांढरपेशी' ह्या संकल्पनांमध्ये फाजील नम्रपणा, थोडीशी दांभिकता आणि आर्थिक वर्गवारी (जी आपल्याकडे एक किंवा दोन महानगरांच्या हद्दीबाहेर अस्तित्वात नाही.) इ. गोष्टी अभिप्रेत असतात. त्यामुळे मी मूळ जातीचं नाव घेणं पसंत करतो. शिवाय, मराठी वर्तमानपत्रं संकुचित जातीय अर्थानं ब्राह्मणीच आहेत, याबद्दल दुमत नसावं.

प्रश्न : ठीक ! आता एका वेगळ्या प्रश्नाकडे वळतो. दलितत्वाचा संदर्भ अपूर्वतेशी लावावयाचा की श्रेष्ठत्वाशी ?

दलितत्व हे साहित्यातल्या सामाजिकतेचा एक भाग आहे. ही कोणा एका जातीतल्या मूठभर लेखकांची गरज म्हणून पाहता कामा नये. मराठी समाजात अशा पद्धतीचं साहित्य निर्माण झालं पाहिजे, अशी सबंध समाजाचीच गरज म्हणून दलित साहित्य निर्माण होतं. ते दलितांबाहेरच्या इतरांनी वाचावयाचं असतं. त्या वाचकांसाठी ते लिहिलं जातं. दलितातल्या अपूर्वत्वाशी त्याचा संबंध लावता येईल. परंतु श्रेष्ठत्वाशी automatic संबंध लावता येणार नाही. श्रेष्ठत्वाच्या तत्त्वात अनेक अ-दलित घटक आहेत.

प्रश्न : दलित साहित्याच्या संदर्भात 'सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच'ची गरज आहे असं म्हटलं जातं. तुमचा अभिप्राय काय ?

'सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच' अपरिहार्य आहे. कारण हे साहित्य एका विशिष्ट समाजाच्या रचनेशी व परंपरेशी निगडित असलेलं तत्त्व आहे. असा अॅप्रोच

न घेताही साहित्यास्वाद घेता येतो, हे गृहीतकृत्य मराठीतील अभिरूचीच्या इतिहासावरून सिद्ध होत नाही. तुरळक वैयक्तिक उदाहरणं शक्य होतील.

प्रश्न : मराठी अभिरुचीबाबतचं तुमचं हे मत अधिक स्पष्ट कराल काय ?

मराठी अभिरुची ही जाती, धर्म, व्यवसाय, लिंग इ. सर्व सामाजिक तत्त्वांनी साहित्याचा विचार करते. नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, मोरोपंत, विष्णुशास्त्री चिपळूणकर, जोतिराव फुले, आंबेडकर, बहिणाबाई चौधरी, विभावरी शिरुरकर, बाबूराव बागुल, लक्ष्मण माने, इ. साहित्यिक हे सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच घेऊनच वाचक वाचत असतो. सामाजिक संदर्भ सोडून कोणताही साहित्यास्वाद मराठीत होत नाही. एखादंच पुस्तक किंवा एखादाच लेखक अपवाद म्हणून असं वाचलं जातं की त्यावेळी केवळ पाठाचा आस्वाद घेतला जातो. उदा., अनामिक कवि-कवयित्रींची पदं, भाषांतरित कादंबऱ्या, कल्पनाप्रधान डिटेक्टिव्ह कथा, इत्यादी.

प्रश्न : ' सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच ' चे वाजवी महत्त्व मान्य करूनही हा अॅप्रोच सर्वत्र अग्रक्रमानं महत्त्वाचा ठरतो का ?

सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच हा आजच्या सर्वच सामाजिक क्षेत्रांमध्ये पॅरामीटरप्रमाणे (कमी–अधिक असला तरी कायम अस्तित्वात असलेला) स्थिर पायाभूत अंश आहे, तो टाळून अभ्यास करता येईल. परंतु अशा अभ्यासाचे निष्कर्ष निव्वळ बौद्धिक व सैद्धान्तिक ठरतील.

प्रश्न : आता आपण दलित साहित्यविषयक आक्षेपांकडे वळू. दलित साहित्य प्रचारी, एकसूरी, आक्रस्ताळं, नकारात्मक आहे, अशा प्रकारचे आक्षेप घेतले जातात. तुम्हाला काय वाटतं ?

हे सर्व आक्षेप दलित साहित्याला लागू होतात. परंतु दलित साहित्यातही आणखीही प्रामाणिक, सकस, टिकाऊ कृती आहेत. असा प्रामाणिकपणा अर्थातच कमी प्रमाणात आहे.

प्रश्न : दलित जाणीव कायम, निरंतर राहणारी आहे, असं तुम्हास वाटतं ?

दलित जाणीव ही निरंतर राहणारी आहे हे आजच्या आपल्या समाजाच्या संरचनेवरून म्हणता येईल.

प्रश्न : पण जातिसंस्था बदलत गेल्यास ?

जातिसंस्था बदलल्यास म्हणजे समानतेच्या तत्त्वानुसार समाजरचना झाली तर ती अर्थातच संपेल. परंतु आजतरी हे दिवास्वप्न आहे, असं म्हणायला सबळ कारणे आहेत.

प्रश्न : दलित साहित्यात ' ग्रामीण ' व ' शहरी ' असे भेद करणं कितपत योग्य आहे ?

मान्य केलं पाहिजे. माझ्या मते आपल्या समाजाचे स्वास्थ्य ह्या व्यक्तिवादामुळ प्राय: बिघडलं असून ह्या मोहक कल्पनेमागच्या कुटुंब, समूह, जात, समाज इत्यादी आपल्या संस्कृतीच्या पायाभूत जाणिवा विसरूनच हा व्यक्तिवाद उभा राहू पाहतो, ही आपली शोकांतिका आहे. ही सांधेजोड व्यक्तिवादी लोकांच्या कक्षेतली गोष्ट नाही, तर ती आपल्या परंपरावाद्यांनी स्वत:त बदल केल्यावर, व्यक्तिवादी मूल्यं स्वत:त सामावून घेण्यासाठी करावा लागणारा त्याग सोसल्यावर प्रतीत होणारी गोष्ट आहे. असा त्याग आपल्या परंपरेत शक्य आहे. काही बाबतींत आपण तो सुरू केलाही आहे. उदा., अस्पृश्यता नष्ट करणे, स्त्री–स्वातंत्र्य, मुलांचे हक्क मान्य करणे, इत्यादी.

प्रश्न : समाजवादी, साम्यवादी जाणिवांहून दलित जाणीव वेगळी मानावयाची का ? समतेचा आशय असलेल्या इतर सर्व जाणिवांहून दलित जाणीव ही वेगळी मानावयाची का ? सर्व शोषित या जाणिवेत अंतर्भूत होतात की नाही ? या जाणिवेचा सर्व विषमतेशी संबंध नाही का ?

समाजवादी, साम्यवादी जाणिवांहून दलित जाणीव वेगळी आहे. समतेचा आशय असलेल्या अशा राजकीय विचारप्रणाली समाजाचे पुनर्रचन आंतरव्यक्तीय (inter-subjective) भूमिकेवरून करण्यास कटिबद्ध असतात. याउलट, दलित जाणीव ही भावनाप्रधान आहे. ती विचारप्रणालीच्या पातळीवर पाहता येत नाही.

प्रश्न : दलित जाणीव ही विशिष्ट विचारावर, विवेकावर आधारलेली आहे, असा तर सर्वसाधारण समज आहे, आणि तुम्ही तर ही जाणीव मुख्यत्वे भावनाप्रधान आहे असं म्हणता, हे कसं काय ?

दलित जाणीव विवेकाच्या पातळीवर टिकत नाही. याचं कारण ही जाणीव दलित व्यक्ती किंवा दलित जाती निष्पाप, पिळल्या गेलेल्या आणि निरपराध आहेत असा मानवी स्वभावाचा भाबडा साचा कल्पून त्यावर आधारलेली आहे. वस्तुत: प्रत्येक माणूस हा स्वभावत: दुष्ट, क्रूर, इतरांना संधीनुसार पिळणारा किंवा हीन असतो. ‘ दलित व्यक्ती ’ किंवा ‘ दलित जात ’ ही एका विशिष्ट सामाजिक परि-स्थितीपुरती वर्गवारी असून हीच माणसं आपल्या कृतीतून दलितत्वाचा व्यत्यास सिद्ध करू शकतात. ‘ दलित ’ माणूस अन्याय करणार नाही असं समजणं वस्तु-स्थितीला धरून नाही.

प्रश्न : माणूस मूळचा सुष्ट की दुष्ट ? हा तात्त्विक प्रश्न थोडा बाजूला ठेऊ. पण तुम्ही दर्शविलेल्या दलित जाणिवेतील भाणिबडेपणा दूर होण्याचा मार्ग कोणता ?

ह्या दलितांबद्दलच्या भाबडेपणावर उतारा हाच की, दलितांचा प्रत्यक्ष अनुभव घेणं, त्यांना समान भूमिकेवर पाहणं. माणूस म्हणून सगळे सारखेच असतात, सामा-

जिक संस्था, प्रथा, रूढी ह्या सदोष असतात, किंवा अशा संस्था, प्रथा, रुढी इ. टिकवून धरणारी प्रवृत्ती नष्ट करण्याची गरज आहे, अशा प्रगल्भ विचारसरणीकडे समाज जाईल. भाबडेपणा मुळात वाईट नाही, पण सामाजिक न्यायवितरणाच्या संदर्भात तो प्रमुख अडसर ठरू शकतो. ह्याचं उदाहरण म्हणजे आपल्या भोवतालच्या १० मैलांच्या परीघात एकही अस्पृश्य माणूस राहात नाही, अशा उच्चवर्गीय वस्तीत राहून दुसरीकडे मराठवाड्यातल्या विद्यापीठाचे नामांतर झालंच पाहिजे अशी चळवळ उभारणारे भाबडे लोक स्वतःच्याच गावातल्या एका कॉलेजचं किंवा विद्यापीठाचं नामांतर करू इच्छित नाहीत.

प्रश्न : दलित जाणीव फक्त वर्णाश्रमधर्मविरोधी राहिल्यानं काय साधतं ? यामुळे एकटेपणा येत नाही का ?

ही जाणीव फक्त वर्णाश्रमधर्माच्या विरोधी आहे. सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध विद्रोह करून उठणारी नाही. तिचा रोख समाजात आपल्याला माणुसकीचं स्थान मिळावं ह्याकडे आहे. ह्यामुळे एकटेपणा येत नाही, तर मुळात निर्माण होत असलेला एकटेपणा प्रकर्षानं व्यक्त होतो. दलित जाणीव समतेच्या जाणिवेचा भाग असती तर आपल्याकडे मार्क्सवादाची एकदम भरभराट झाली असती.

प्रश्न : दलित साहित्यातील जाणीव आणि ग्रामीण साहित्यातील जाणीव यात तुम्हाला कोणते साम्य-भेद आढळतात ? गरिबी, दुःख, विषमता हे घटक दोन्हींकडे समानच नाहीत का ?

ही जाणीव ग्रामीण साहित्याच्या जाणिवेहून वेगळी आहे, कारण ग्रामीण साहित्यातल्या जाणिवेत हिंदू–समाजरचनेतील अनेक आनंददायक तत्त्वांचा गौरव अभिप्रेत असतो. दलित जाणिवेत हा प्रकार नाही. गरिबी, दुःख, विषमता इ. घटक सर्वच मानवी समाजात कमी–जास्त प्रमाणात असतात. दलितत्वाची संकल्पना व्यापक करणं भोंगळपणाचं आहे. कारण वर सांगितल्याप्रमाणे ही संकल्पना एका विशिष्ट प्रदेशातील सांस्कृतिक आवरणानं बांधलेली आहे. ती प्रायः भावनिक आहे. ह्यात चक्रधर, म्हाईंभट, नागदेवाचार्य, नामदेव, ज्ञानदेव, चोखा, जनाबाई इत्यादींपासून फुले, शिंदे, आंबेडकर ह्यांच्यापर्यंत सगळ्यांच्या वेदना प्रदेश-संस्कृतिविशिष्ट म्हणून मिळालेल्या आहेत.

प्रश्न : दलित साहित्याच्या स्वतंत्र साहित्यशास्त्राच्या मागणीबद्दलचा तुमचा अभिप्राय काय ?

दलित साहित्याला स्वतंत्र दलित असे निकष लावू नयेत, कारण हे साहित्य संबंध मराठी परंपरेनं निर्माण केलेलं आहे. त्याचं वेगळं साहित्यशास्त्र कल्पिणं हास्यास्पद आहे.

प्रश्न : कारण ?

साहित्यमीमांसेत किंवा साहित्यशास्त्रात साहित्याचा इतिहास, साहित्याचं समाजशास्त्र, मानसशास्त्र, साहित्यसमीक्षा, तौलनिकता, राष्ट्रीयता इ. अनेक संदर्भांमध्ये साहित्यकृतींचा विचार केला जातो. दलित साहित्य ह्या नावाखाली जी वर्तमानपत्री, ब्राह्मणी आणि संकुचित संकल्पना रूढ झाली आहे, तिच्यात हे संदर्भ कटाक्षानं टाळलेले असतात. दलितांचं साहित्य म्हणजे विशिष्ट जातीतल्या लोकांनी विशिष्ट पद्धतीनं, विशिष्ट मूल्यं प्रकट करण्यासाठी लिहिलेलं साहित्य असेल तर त्याचं साहित्यशास्त्र करता येणार नाही. एकूण साहित्यशास्त्रातच दलित साहित्यशास्त्राचा विचार होऊ शकतो.

प्रश्न : एक शंका– 'मध्यमवर्गीय' किंवा 'पांढरपेशी' संकल्पना असं जिला म्हणतात, तिला तुम्ही ब्राह्मणी म्हणता. 'ब्राह्मणी' म्हणण्यात काही खास अभिप्राय ?

'मध्यमवर्गीय', 'पांढरपेशी' ह्या संकल्पनांमध्ये फाजील नम्रपणा, थोडीशी दांभिकता आणि आर्थिक वर्गवारी (जी आपल्याकडे एक किंवा दोन महानगरांच्या हद्दीबाहेर अस्तित्वात नाही.) इ. गोष्टी अभिप्रेत असतात. त्यामुळे मी मूळ जातीचं नाव घेणं पसंत करतो. शिवाय, मराठी वर्तमानपत्रं संकुचित जातीय अर्थानं ब्राह्मणीच आहेत, याबद्दल दुमत नसावं.

प्रश्न : ठीक ! आता एका वेगळ्या प्रश्नाकडे वळतो. दलितत्वाचा संदर्भ अपूर्वतेशी लावावयाचा की श्रेष्ठत्वाशी ?

दलितत्व हे साहित्यातल्या सामाजिकतेचा एक भाग आहे. ही कोणा एका जातीतल्या मूठभर लेखकांची गरज म्हणून पाहता कामा नये. मराठी समाजात अशा पद्धतीचं साहित्य निर्माण झालं पाहिजे, अशी सबंध समाजाचीच गरज म्हणून दलित साहित्य निर्माण होतं. ते दलितांबाहेरच्या इतरांनी वाचावयाचं असतं. त्या वाचकांसाठी ते लिहिलं जातं. दलितातल्या अपूर्वत्वाशी त्याचा संबंध लावता येईल. परंतु श्रेष्ठत्वाशी automatic संबंध लावता येणार नाही. श्रेष्ठत्वाच्या तत्त्वात अनेक अ-दलित घटक आहेत.

प्रश्न : दलित साहित्याच्या संदर्भात 'सोशल ॲन्थ्रापॉलॉजिकल ॲप्रोच'ची गरज आहे असं म्हटलं जातं. तुमचा अभिप्राय काय ?

'सोशल ॲन्थ्रापॉलॉजिकल ॲप्रोच' अपरिहार्य आहे. कारण हे साहित्य एका विशिष्ट समाजाच्या रचनेशी व परंपरेशी निगडित असलेलं तत्त्व आहे. असा ॲप्रोच

न घेताही साहित्यास्वाद घेता येतो, हे गृहीतकृत्य मराठीतील अभिरूचीच्या इतिहासावरून सिद्ध होत नाही. तुरळक वैयक्तिक उदाहरणं शक्य होतील.

प्रश्न : मराठी अभिरुचीबाबतचं तुमचं हे मत अधिक स्पष्ट कराल काय ?

मराठी अभिरुची ही जाती, धर्म, व्यवसाय, लिंग इ. सर्व सामाजिक तत्त्वांनी साहित्याचा विचार करते. नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, मोरोपंत, विष्णुशास्त्री चिपळूणकर, जोतिराव फुले, आंबेडकर, बहिणाबाई चौधरी, विभावरी शिरुरकर, बाबूराव बागुल, लक्ष्मण माने, इ. साहित्यिक हे सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच घेऊनच वाचक वाचत असतो. सामाजिक संदर्भ सोडून कोणताही साहित्यास्वाद मराठीत होत नाही. एखादंच पुस्तक किंवा एखादाच लेखक अपवाद म्हणून असं वाचलं जातं की त्यावेळी केवळ पाठाचा आस्वाद घेतला जातो. उदा., अनामिक कवि-कवयित्रींची पदं, भाषांतरित कादंबऱ्या, कल्पनाप्रधान डिटेक्टिव्ह कथा, इत्यादी.

प्रश्न : ' सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच ' चे वाजवी महत्त्व मान्य करूनही हा अॅप्रोच सर्वत्र अग्रक्रमानं महत्त्वाचा ठरतो का ?

सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच हा आजच्या सर्वच सामाजिक क्षेत्रांमध्ये पॅरामीटरप्रमाणे (कमी–अधिक असला तरी कायम अस्तित्वात असलेला) स्थिर पायाभूत अंश आहे, तो टाळून अभ्यास करता येईल. परंतु अशा अभ्यासाचे निष्कर्ष निव्वळ बौद्धिक व सैद्धान्तिक ठरतील.

प्रश्न : आता आपण दलित साहित्यविषयक आक्षेपांकडे वळू. दलित साहित्य प्रचारी, एकसूरी, आक्रस्ताळं, नकारात्मक आहे, अशा प्रकारचे आक्षेप घेतले जातात. तुम्हाला काय वाटतं ?

हे सर्व आक्षेप दलित साहित्याला लागू होतात. परंतु दलित साहित्यातही आणखीही प्रामाणिक, सकस, टिकाऊ कृती आहेत. असा प्रामाणिकपणा अर्थातच कमी प्रमाणात आहे.

प्रश्न : दलित जाणीव कायम, निरंतर राहणारी आहे, असं तुम्हास वाटतं ?

दलित जाणीव ही निरंतर राहणारी आहे हे आजच्या आपल्या समाजाच्या संरचनेवरून म्हणता येईल.

प्रश्न : पण जातिसंस्था बदलत गेल्यास ?

जातिसंस्था बदलल्यास म्हणजे समानतेच्या तत्त्वानुसार समाजरचना झाली तर ती अर्थातच संपेल. परंतु आजतरी हे दिवास्वप्न आहे, असं म्हणायला सबळ कारणे आहेत.

प्रश्न : दलित साहित्यात ' ग्रामीण ' व ' शहरी ' असे भेद करणं कितपत योग्य आहे ?

'दलित साहित्य' असा साहित्याचा भेद मानणाऱ्यांना आपोआपच 'शहरी' व 'ग्रामीण' असे दलित साहित्यातील भेद मानावे लागतील. कारण भेदतत्त्व एकदा मानलं की त्याला अंत राहात नाही.

प्रश्न : दलित अस्मिता ठेवण्यात 'व्हेस्टेड इंटरेस्ट' आहे असं तुम्हाला वाटतं काय ?

दलित अस्मिता ठेवण्यात व्हेस्टेड इंटरेस्ट आज दोन विघ्नसंतोषी जातीय गटांना आहे. ते गट म्हणजे (१) अशी अस्मिता जागृत ठेवल्यानं बहुजनसमाजात दुफळी निर्माण करणारा शहरी ब्राह्मण जातीय गट, व (२) त्या वेगळेपणाचे फायदे उपटणारा सुशिक्षित महार जातीय गट जो सवलतीच्या राजकारणानं पोसला आहे. मराठी समाजाच्या पारंपरिक एकजिनसीपणाला हे दोन्ही जातीय गट आव्हान ठरतील.

प्रश्न : दलित साहित्यानं मराठी साहित्याला काय दिलं ?

दलित साहित्यानं मराठीला भाषिक समृद्धी प्राप्त करून दिली. आपल्या परंपरेत दबलेला एक शूद्रत्वाचा आविष्कार करणारा पदर स्पष्ट केला. आविष्काराचं स्वातंत्र्य, ही राजकीय समाजाची बाब नसून नागरी समाजाची बाब आहे, हे सिद्ध केलं. प्रत्येक समूहाला–घटकाला साहित्यात मानाचं स्थान असावं हे दाखविलं. मराठीत तुंबलेल्या अतिरिक्त व्यक्तिवादाला हा उत्तम उतारा ठरला.

प्रश्न : या एकंदर प्रश्नाबद्दल तुम्हाला खास असं काही सांगावंसं वाटत असल्यास सांगा ?

दलित साहित्य असा वेगळा प्रांत निर्माण करणं अशास्त्रीय आहे. तो ह्या प्रश्नावलीत गृहीत धरलेला दिसतो. त्यामुळे ह्या संकल्पतेचा स्वतंत्र विचार करावा लागतो. एरवी महानुभाव तत्त्वज्ञान, वारकरी पंथाचं तत्त्वज्ञान, तुकारामाच्या अभंगांचं विवेचन, इत्यादी वाङमयीन अभ्यासांमध्ये मी सुरवातीलाच विशद केलेलं दलितत्व अंगभूत असतंच.

प्रश्न : दलित साहित्य असा वेगळा प्रांत कल्पिणं अशास्त्रीय का मानावयाचं ? साहित्याच्या शास्त्रीय वर्गवारीची पद्धती कोणती ?

आपण विचारलेल्या उपप्रश्नाचं उत्तर असं की साहित्याच्या वर्गवारीत शास्त्रीयता खालील दोन प्रकारे ठरविता येते : (१) त्या वर्गातील ग्रंथसंपदा एका निश्चित विषयाला वाहिलेली असणं, (२) ह्या वर्गातील ग्रंथसंपदेचा अभ्यास एका निश्चित अभ्यासपद्धतीमुळं झालेला असणं, तसं करता येणं शक्य असणं. दलित साहित्याचा विषय कधीच स्पेसिफिक नाही. इतर साहित्याचे विषय तेच दलित साहित्याचेही विषय असतात. दलित साहित्याची समीक्षाही एका स्पेसिफिक अभ्यास-

पद्धतीमुळे झालेली नाही. दलित साहित्याच्या अभ्यासासाठी काही आंबेडकरी पद्धत करता येईल, असं मला वाटत नाही.

आजच्या दलित साहित्यिकांत एकच जात–महार ही जात प्रामुख्यानं आढळते. त्यामुळं ह्या प्रकारच्या साहित्यात विशाल वाङमयीन संस्कृतीचा अभाव आढळतो. वेदनेचा प्रांत संकुचित, मर्यादित आढळतो. साहित्याच्या गुणांच्या मानानं बहु-प्रसवत्व अधिक आढळतं बौद्ध संस्कृतीबद्दलही अज्ञान आढळतं.

प्रश्न : विशाल वाङ्मयीन संस्कृती आणि सोशल अ‍ॅन्थ्रापॉलॉजिकल अ‍ॅप्रोच यांची सांगड कशी घालावयाची ?

साहित्य हे समाजजीवनाचं एक अंग असल्यानं सोशल अ‍ॅन्थ्रापॉलॉजिकल अ‍ॅप्रोच हा समाजद्रव्याच्या, समूहाच्या जगण्याच्या मूल्यांच्या अभ्यासासाठी हवा. विशाल वाङमयीन संस्कृती ही अशा आशयद्रव्याला एका साहित्य मूल्यांचा व्यवहार करणाऱ्या बृहत्तर समाजाचा घटक करून घेणारी व्यवस्था असते. किंबहुना त्या त्या समूहातले साहित्यिक ह्या विशेष वाङ्मयीन संस्कृतीचे घटक बनल्याशिवाय परंपरासापेक्ष काहीही लिहू शकत नाहीत. सॅफो किंवा बहिणाबाई यांनाही काहीतरी विशाल परंपरेचं भान असतंच. थोडक्यात, म्हणजे साहित्यिकांची मुळं त्यांच्या सामाजिक परिसरात असली तरी त्यांचा विस्तार विशाल वाङ्मयीन संस्कृतीत होतो.

•

# १५. डॉ. अनिल अवचट

[ डॉ. अनिल अवचट हे वैद्यकीय पदवीधर आहेत. पण वैद्यकीय व्यवसायापेक्षा समाजाची, विशेषत: समाजातील अंतरंगाची नाडीपरीक्षा करण्यात त्यांना अधिक रस आहे. समाजातील व समाजाबाहेरील उपेक्षितांचं अंतरंग समजून घेण्यासाठी या समाजात ते मिसळतात, त्यांच्याशी संवाद साधतात, त्यांची सुखदु:खे समजून घेऊन ती ते समाजासमोर मांडतात. त्यात केवळ कोरडी माहिती नसते, त्याला सहानुभूतीतून येणाऱ्या उत्कटतेची जोड असते, कारुण्याचा पाझर असतो. ते आपल्या अनुभवांना सातत्याने चिंतनाची जोड देतात. त्यांचे 'माणसं' हे पुस्तक या संदर्भात विशेष गाजलं आहे. ते केवळ लेखकच नाहीत, तर अव्वल दर्जाचे चित्रकारही आहेत.

अशा एका समाजमनस्क निरीक्षकाची, चिंतकाची, कलावंताची विशेषत: भटक्या जमातीच्या अभ्यासकाची दलित साहित्यासंबंधीची भूमिका समजून घेण्यास मी उत्सुक होतो. त्यांनी माझ्या विनंतीला तत्परतेनं प्रतिसाद दिला. वेळ मिळेल त्याप्रमाणे आम्ही यासाठी बसलो. कधी पुणे विद्यापीठाच्या आवारात, तर कधी त्यांच्या किंवा माझ्या घरी. त्यांच्याशी वारंवार संपर्क साधूनच मुलाखतीचा हा सारा भाग पक्का केला आहे. ]

---

प्रश्न : 'दलित जाणीव' म्हणजे काय ?

जातिसंस्थेनं दबला गेलेला सारा समाज, सामाजिक चौकटीनं दडपले गेलेले सर्व घटक, माझ्या मते 'दलित' होत. यात उच्च वर्गातील दडपल्या गेलेल्या स्त्रियाही आल्या. केवळ 'आश्रित' म्हणून ज्यांना आपलं जीवन जगावं लागतं, ते सारे घटक यात आले. केवळ परंपरेनं अस्पृश्य गणले गेलेले लोकच 'दलित' न मानता सामाजिक परंपरेच्या चौकटीनं, बलुतेदारीच्या वहिवाटीनं किंवा विशिष्ट व्यवसायानं बांधलेले, हीनदीन अवस्थेला पोचलेले सर्व लोक यात अंतर्भूत होतात. सर्व भीकमागे, भटके लोकही माझ्या मते 'दलित' सदरात येतात. या साऱ्या समाजाला

दलित साहित्यात स्थान पाहिजे. केवळ पूर्वाश्रमीच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेनं अस्पृश्य गणल्या गेलेल्या समाजापुरतीच 'दलित' ही संज्ञा मर्यादित होता कामा नये. कोणत्या ना कोणत्या सामाजिक वा सांस्कृतिक कारणांनी दडपले गेलेले, न्यूनगंडानं पछाडलेले, विकासापासून वंचित झालेले असे सर्व लोक दलित आहेत.

प्रश्न : आर्थिकदृष्टचा दडपले गेलेले आणि न दडपले गेलेले असं वर्गीकरण करणं अधिक सोयीचं नाही का ?

नाही. कारण केवळ आर्थिक कसोटीवर हे वर्गीकरण केल्यास त्याला सामाजिक परंपरेनं आलेला दलितत्वाचा संदर्भ राहणार नाही. आणि हा जातीयतेचा संदर्भ तर आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणावर आहे. म्हणून तर 'दलित पँथर'-सारख्या संघटना निघाल्या. आजचे काही महत्त्वाचे दलित लेखकही या पँथर चळवळीनं दिलेले आहेत. दलित चळवळ ही मुख्यतः सामाजिक अन्यायावर आधारलेली आहे. केवळ संपन्न किंवा सुशिक्षित झाल्यानं हीन जातीचा कलंक दूर होत नाही. हा कलंक असलेल्यांनी कलंक नसलेल्यांशी कितीही बरोबरी केली तरी त्याला वेगळी वागणूक मिळते, हा अनुभव आहे. राखीव मतदारसंघासारखे उपायही या बाबतीत तोकडे ठरतात. सत्ताधारी सवर्णांकडून निरनिराळ्या प्रकारचे दबाव दलितांवर येत राहिल्यामुळं राखीव जागांसारख्या सवलतींचाही दलितांना लाभ उठविता येत नाही. तुम्हाला आज सत्ता बहुजनसमाजापर्यंत झिरपलेली दिसते, पण दलितांपर्यंत अद्यापी तरी ती पोहोचलेली नाही. आंबेडकर चळवळीचं मूळ उद्दिष्ट अजूनही सफल झालेलं नाही, त्याचं भ्रष्टीकरण मात्र वेगानं चाललेलं आहे. दलित अत्याचारांची दाद दलित नेतेही घेत नाहीत, ते यात मतलबापलीकडे स्वतःला गुंतवून घेण्यास तयार नसतात.

प्रश्न : दलितांना आपण 'दलित' असल्याचं विशिष्ट भान आज जे आलं आहे, ते पूर्वी नव्हतं. हा एक नैसर्गिक व्यवहार म्हणून त्याकडे दलित आणि दलितेतरही पूर्वी पाहात. अशा परिस्थितीत दलितेतरांनी दलितांवर सहेतुकपणे दीर्घकाळ अन्याय केला, असं ऐतिहासिकदृष्टचा म्हणता येईल का ?

आजच्या प्रकारचं दलितत्वाचं भान पूर्वी नव्हतं, असं फारतर म्हणता येईल. पण दलितांना त्यांच्या दलितत्वाचं भान सातत्यानं देण्याचा प्रकार पूर्वकाळीही होताच. दलितांच्या राहण्या-खाण्यावर, चालीरीतींवर, वेषभूषेवर, वसतिस्थळांवर लादली गेलेली कठोर बंधनं व ती मोडणाऱ्यांना करण्यात येणाऱ्या कठोर शिक्षा काय दर्शवितात ? त्या काळच्या आणि आजच्याही गावगाड्याचं स्वरूप पाहिल्यास याची कल्पना येते. विशिष्ट सामाजिक-राजकीय वा आर्थिक व्यवस्था टिकवण्यासाठी, त्या काळच्या प्रस्थापित वर्गानं स्वतःचे हितसंबंध अबाधित राखण्यासाठी या प्रकारची

व्यवस्था केली होती, असं कोणी म्हटल्यास इतिहासदृष्टचाही ते चूक म्हणता येणार नाही.

प्रश्न : ' दलित पॅन्थर ' चळवळीनं काही दलित लेखक मराठीला मिळवून दिले असं तुम्ही म्हणालात. या लेखकनिर्मितीत त्या वेळच्या ' लिटल मॅगेझिन्स ' चाही काही हात आहे, असं तुम्हाला नाही वाटत ?

लिटल मॅगेझिनच्या चळवळीनं शिष्टसंकेत झुगारणारी भाषा रूढ केली. स्त्री–पुरुष या नात्याकडे पाहण्याची एक धीट दृष्टी दिली. पण हे सारे मध्यमवर्गीय संज्ञेच्या रिंगणापुरतंच मर्यादित राहिलं. पॅन्थर चळवळीला जसा विशिष्ट सामाजिक पाया आहे, तसा तो लिटल मॅगेझिन्सला नाही. यामुळे लिटस मॅगेझिन्सची चळवळ मध्येच लटकत राहिली.

प्रश्न : आजच्या दलित साहित्यातील ' विद्रोह ' हा सर्व प्रकारच्या विषमते-विरुद्ध उभं राहिलेलं बंड आहे की हा ' विद्रोह ' फक्त वर्णाश्रमाविरोधी आहे ? तुमचा अभिप्राय काय ?

माझ्या मते हे दोन्ही विद्रोह एकत्र नांदू शकतात. यामध्ये तुम्ही सुचविता तशी काटेकोर विभागणी करता येणार नाही. उदा., दलित मजुरांचं दुःख दलित म्हणूनही असतं आणि मजूर म्हणूनही. सवर्णीयांनी दलितांकडून ज्याप्रकारे जमिनी काढून घेतल्या, त्यात दलितद्वेषाचा भाग आहेच. पण याचा अर्थ वर्णाश्रम व्यवस्थेत बसणाऱ्या मजुराला ही ऐपतदार सवर्ण मंडळी वेगळ्या तऱ्हेनं वागवितात, असा होत नाही. ' मजूर ' म्हणून त्याची जी काही पिळवणूक करावयाची ती ते करीत असतातच. म्हणून माझ्या मते दलितविषयक विषमतेचा हा प्रश्न अशा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रश्नांशी निगडित करता येईल. या सर्वांना व्यापक अशा सूत्रात गोवता येईल.

प्रश्न : ' ग्रामीण ' जाणिवेहून ' दलित ' जाणीव वेगळी मानावी का ? ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य तुम्ही वेगवेगळं मानता का ?

विशिष्ट सामाजिक स्थित्यंतरामुळे ज्या वेळेला वेगवेगळं भान येतं, त्या वेळेला साहित्यही वेगवेगळं होतं उदा., संतसाहित्य. यादृष्टीनं मला ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य ही वेगवेगळी मानावीशी वाटतात, उदा., दलितांमधला भंग्यासारखा व्यवसायातील प्रश्न ग्रामीण साहित्याशी संदर्भित नाही. तो खास दलितांचा प्रश्न आहे.

प्रश्न : विषमता, दारिद्र्य हे घटक ग्रामीण आणि दलित या दोघांनाही समान नाहीत का ? या मुद्द्यावर ते एकत्र येऊ शकणार नाहीत ?

येऊ शकतील. मात्र या दोन्ही घटकांनी समता प्रस्थापित करणं, हे मूल्य म्हणून मानलं पाहिजे. आज मात्र अशी परिस्थिती आहे की दलितांवर लिहिणारा ग्रामीण

लेखक दलित लेखक ठरत नाही आणि ग्रामीण जीवनावर लिहिणारा योगीराज वाघमारेसारखा लेखक ग्रामीण लेखक ठरत नाही. कारण साहित्यांतर्गत प्रेरणा लक्षात न घेता, केवळ जातीच्या अनुरोधानं वर्गीकरण केलं जातं. विषय किंवा जात विचारात न घेता जाणिवेच्या आधारे हे वर्गीकरण केलं गेलं पाहिजे.

प्रश्न : दलितांची दुःखं दलितेतरांना रंगविता येणार नाहीत, असा एक मतप्रवाह आहे. तुम्हाला काय वाटतं ?

सहानुभूतीच्या किंवा कल्पनेच्या बळावर काही प्रमाणात का होईना दलितांची दुःखं अदलितांना रंगवता येतील यात शंका नाही, पण अनुभवाचे काही खास प्रांत असे असतात की तेथे कल्पनेला अनुभवाची जोड मिळाल्यास ते चित्रण अधिक प्रभावशाली होतं. मूळ विषयाशी लेखकाला वाटणारी सिन्सिरीटी ही अतिशय महत्त्वाची आहे.

प्रश्न : ग्रामीण लेखक व दलित लेखक एकत्र येण्याची आवश्यकता तुम्ही मघाशी स्पष्ट केलीत. मग तुमच्या मते यात अडसर कोणकोणते आहेत ? दलित लेखकाजवळ पुरोगामी तत्त्वसूत्र आहे, ग्रामीण लेखकांजवळ ते नाही, असं म्हटलं जातं. हे तुम्हाला कितपत बरोबर वाटतं ?

ग्रामीण लेखकाची भूमिका प्रतिगामी आहे, असं मला वाटत नाही. सरंजामशाहीला त्यांचाही विरोध आहे. बहुजनसमाजाच्या उद्धाराबद्दल ग्रामीण लेखकालाही आस्था आहे. पण ग्रामीण लेखकाची दलित लेखकाप्रमाणेच समाजपरिवर्तनाविषयी स्पष्ट भूमिका नाही. या बाबतीत सावधपणे तो लिहितो, बोलतो, त्यांचं नातं प्रेरणादृष्टया सुधारकांशी, पुरोगामी गटाशी, काही प्रमाणात नवसाहित्याशी आहे. दलित साहित्याच्या तुलनेनं त्यात एकेरीपणा कमी आहे. सवर्ण बलुतेदारीसह दडपलं गेलेलं जीवन, दुष्काळग्रस्त भागातून स्थलांतरित होणारे वर्ग, शेतमजुरी करणारा वर्ग यांचं चित्रण जर हा ग्रामीण लेखक बोलकं करील. तर त्याचं कर्तृत्वही उठून दिसेल.

प्रश्न : दलित–दलितेतर या प्रकारचं वर्गीकरण साहित्यमूल्यदृष्टला तुम्हाला महत्त्वाचं वाटतं का ?

साहित्यमूल्यदृष्टया या विभागणीला तसा अर्थ नाही. पण या प्रकारची विभागणी ते ते साहित्य समजून घेण्याला उपयोगी ठरतं. साहित्याचे मूलभूत निकष मात्र दोन्हीकडे सारखेच राहतील.

प्रश्न : असं जर आहे तर दलितलेखकांकडून वेगळ्या निकषांची मागणी का केली जावी ?

माझ्यापुरतं या प्रश्नाचं उत्तर असं. कलावंतानं चित्रित केलेला माणूस, या माण-

साचं दर्शन मी साहित्याचा गाभा मानतो. माणसामाणसातील नाती हा कलेचा विषय असल्यामुळे कलेचे निकष माझ्या मते युनिव्हर्सल असतात. चांगल्या साहित्यानं मानवी मनाला, मानवी दुःखाला स्पर्श करावा अशी अपेक्षा असते. मग ते साहित्य दलितांचं असो वा अदलितांचं असो. मात्र दलित साहित्यातील काही फॅक्टस, फॅक्टस् म्हणून महत्त्वाच्या आहेत. त्या तशा स्वीकारल्या पाहिजेत. पण त्यांचं कलात्मक पातळीवरून समर्थन करू.नये. साहित्याचे वेगळे निकष नसतात. पण काही जीवनवास्त व जीवनवास्तव म्हणून जगवणं, कलेला कसदार बनविण्याच्या दृष्टीनं उप कारक ठरतं. दलित साहित्य हे तसं आहे, असं मला वाटतं 'उपरा' सारखी दलित आत्मचरित्रं मला विशेष महत्त्वाची वाटतात. कोणत्याही साहित्याची त्याकडे पाहण्याची एक दृष्टी असते. त्या दृष्टीनंच त्या साहित्याकडे पाहावं. कारागिरीला महत्त्व देणाऱ्या उच्चभ्रू (सोफिस्टिकेटेड) दृष्टीनं उत्स्फूर्त साहित्याकडे पाहणं योग्य ठरणार नाही. दलित जीवनातील करपलेली अंगं जगातील शाश्वत दुःखाची आठवण करून देणारी आहेत.

प्रश्न : दलित साहित्याच्या आकलनाला 'स्पेशल अॅन्थरापॉलॉजिकल अॅप्रोच' ची गरज आहे असं म्हटलं जातं. तुम्हाला काय वाटतं ?

'सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच' हा आकलनाच्या दृष्टीनं महत्त्वाचा. मी भटक्या जमातीचं उदाहरण घेतो. भटक्या जमातींच्या जीवनातील आंतरिक गुंतागुंत कळण्यानं त्याची परिमाणं अधिक प्रमाणात आत्मसात होऊ शकतात. 'जाणकारी' वाढते.

प्रश्न : तुमचा भटक्या जमातींचा विशेष अभ्यास आहे, त्यावर तुम्ही उद्‌बोधक लेखनही केलेलं आहे. म्हणून मुद्दाम विचारतो. या साऱ्या दलित चळवळीत या भटक्या जमातींचं स्थान काय ?

भटक्या जमाती मागासलेल्या असूनही आज तरी त्यांची गणना मागासवर्गीयात होत नाही. महाराष्ट्रात वसंतराव नाईकांच्या कारकीर्दीत या जमातीकडे थोडं तरी लक्ष दिलं गेलं. पण इतरत्र या बाबतीत पूर्ण अंधारच आहे. मध्यवर्ती सरकारच्या कोणत्याही सोयी–सवलती या जमातीला उपलब्ध नाहीत. या समाजात बिलकुल जागृती नाही. दलित ग्रामीण समाजाप्रमाणे यांच्या संघटना, शिक्षणसंस्था नाहीत. यातील प्रत्येक जमातच एवढी अल्पसंख्य आणि फुटीर आहे की या सर्वांचं एकत्रीकरण होणं आजच्या परिस्थितीत तर जवळजवळ दुरापास्तच आहे. त्यांच्या भटकेपणामुळे तर यात आणखीनच अडचणी उपस्थित होतात. जातिपंचायतीचं यांच्यावर फार वर्चस्व असतं. या जमातींना गावातही स्थान नसतं आणि गावाबाहेरही. या जमाती टोळ्याटोळ्यांनी भटकत असतात. यातील निम्म्या जमाती गुन्हेगार म्हणून गणल्या जातात. त्याच्यावर गुन्हेगारीचा वारंवार आरोप होतो.

वहीमी नजरेनं त्यांच्याकडे पाहिलं जातं. त्यांच्यावरील गुन्हेगारीच्या शिक्क्याचा मतलबी लोक वाटेल तसा फायदा घेतात. त्यामुळे हे लोक सततचे 'गुन्हेगार' राहतात. या चक्रव्यूहातून त्यांची सुटकाच होत नाही. आजचा सर्वांत तळागाळाचा माणूस हा आहे. पण त्याकडे आपलं लक्षच नाही. यातील काही मंडळी कंत्राटदार, पैसेवाली आहेत. काही शिक्षितही झालेले आढळतात, पण ते तेवढ्यापुरतेच. एकूण सर्वत्र अंधारच आहे. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' द्वारे आता कुठे ह्यांचं चित्र समाजासमोर येत आहे.

प्रश्न : 'उपरा' वरून आठवण झाली. भटक्या जमातींचं जीवनदर्शन घडविणारं मराठीतील हे पहिलंच पुस्तक, त्यामुळे त्याचं महत्त्व विशेषच जाणवतं. दलित किंवा ग्रामीण समाजाप्रमाणे या जमातीही लेखनाभिमुख होतील तर किती बरं होईल ?

आज तरी मला ही शक्यता अनेक कारणांनी फार कमी दिसते. या सर्वांची भाषाही मराठी नाही. प्रत्येक गटाची भाषा वेगळी आहे. शिवाय, या मंडळींना शैक्षणिक सुविधा प्राप्त करून देणाऱ्या संघटना या समाजातून निर्माण होतील, अशी शक्यताही दिसत नाही. शिवाय, साहित्याभिमुख होण्याला ज्या आर्टिक्युलेशनची गरज असते, तीही या समाजात नाही. कलात्मक आर्टिक्युलेशनला काही भौतिक गरजा सामाजिक पद्धतीनं पूर्ण होण्याची गरज असते. ज्यांच्या वाट्याला प्राथमिक गरजा भागविणंही मुष्कीलीचं झालेलं असतं, त्यांना हे आर्टिक्युलेशन कठीण होतं. गुलाबाचं फूल सुंदर खरं, पण त्या फुलाचा सौंदर्यात्मक आस्वाद घ्यावा, याला एक विशिष्ट चिंतारहित मन:स्थितीची किमान गरज असते.

प्रश्न : तुमचा हा मुद्दा मला तेवढासा पटत नाही. हार्डशिपमध्येही काव्यनिर्मिती करणारे आढळतात. हा काहीसा परंपरेचा, सवयीचाही भाग आहे. संत साहित्याची निर्मिती करणाऱ्यांत अध:स्तरातील मंडळीही आढळत नाहीत काय ?

संतसाहित्यानं बहुजनसमाजाला जागृत केलं असं म्हटलं जातं. पण या चळवळीनं जागृत झालेला सारा समाज त्या त्या ग्रामसंस्थेचा घटक आहे. बलुतेदार वर्गाचा घटक आहे. त्यात कोणी मांगगारुडी, फासेपारधी असल्याचं आढळत नाही. शिवाय, या जमातींना गुन्हेगारीचा टिळा लागलेला असल्यामुळे बोलण्यापेक्षा मौन पाळण्याकडे या जमातींचा कल असतो.

प्रश्न : तुम्ही आर्टिक्युलेशनचा मुद्दा काढलात म्हणून विचारतो. या भटक्या जमातीतच वासुदेव, गोंधळी, बहुरूपी यांसारख्या जमाती आहेत ना ? त्यांची उपजीविका विशिष्ट प्रकारच्या आर्टिक्युलेशनवरच नाही का ? तुम्ही सांगितलेल्या विपरीत परिस्थितीमुळे या जमाती आधुनिक अर्थानं

साहित्याभिमुख होण्याची शक्यता कमी आहे. पण परंपरेनं त्यांच्याकडे ज्या कला आहेत, त्यांचा बदलत्या संदर्भात उपयोग करून घेता येणार नाही का ? महार समाजातील गाणं या दिशेने का कार्यरूप होऊ नये ?

येऊ शकेल. पण त्या दृष्टीनं अधिक प्रयत्न व्हावयाला पाहिजेत. पारंपरिक फॉर्म पचवून आधुनिक आशय मांडावयाचा तर दलित साहित्याचा मोहरा दलित बहु-जन समाजाकडे वळला पाहिजे, आंबेडकर काळात हे काहीसं झालंही, पण आज ज्याला 'दलितसाहित्य' या नावानं ओळखलं जातं त्या साहित्याचा सारा मोहरा शहरी सुशिक्षितांकडे आहे. हे साहित्य मुख्यत: उच्चवर्णियांविरुद्ध आहे. त्यांनाच उद्देशून हे मुख्यतः लिहिलेलं असावं. त्याची शैलीही (मुक्तच्छंद वगैरे) ग्रांथिक वळणाची बनली आहे.

दुसरं असं की, ज्या महार समाजात परंपरेनं गाणं बजावणं आलं होतं, त्या समाजानं आजच्या काळात आपल्या सर्वच परंपरांचा त्याग केला. त्यात गाण्या-बजावण्याचाही त्याग झाला.

प्रश्न : दलित साहित्यावरील आक्षेपांकडे आता थोडं वळू या. या साहित्यावर घेण्यात येणारे आक्षेप पुढीलप्रमाणे : ( अ ) ते प्रचारी आहे, ( ब ) एकसूरी आहे, ( क ) व्यक्ती येत नाही, ( ड ) आक्रस्ताळेपणा आढ-ळतो, ( इ ) केवळ नकारात्मक आहे. इत्यादी.

( अ ) प्रचारी आहे असं सरसकट म्हणता येणार नाही. मात्र एकंदर प्रवृत्ती पाहिली तर सुरवातीच्या काळात तरी त्याच त्या प्रतिमा, त्याच त्या पद्धतीनं वापरल्याचं आढळतं. काहीसं हे उर्दू शायरीसारखं होतं म्हणाना !

( ब ) एकसूरी आहे, साचा तयार झाला आहे, हे खरं आहे. दलितांचे अनुभव सच्चे असतील, पण त्यांचं ठराविक पद्धतीनंच का चित्रण होतं ? शाळेतील वागणूक, पंक्तीतून उठविणं वगैरे. या अनुभवांची वेगळी परिमाणं का नाहीत ?

प्रश्न : अनुभवांचे स्वरूप एकसारखंच असल्यामुळे हे असं होतं असं यावर एक उत्तर दिलं जातं.

हे उत्तर पटण्यासारखं नाही. नातं एकच प्रकारचं असलं तरी त्याचा उलगडा वेगवेगळ्या दिशांनी होऊ शकतो. स्त्री-पुरुष नातंच घ्या. हे नातं सनातन असूनही त्यावर कितीतरी वैचित्र्यपूर्ण वाङ्मय निर्माण झालं आहे. घटना एकाच स्वरूपाची असली तरी स्थल, काळ, वेळ, परिस्थिती, प्रसंग, लेखकाची मन:स्थिती इत्यादींमुळे अनुभवाच्या वाटा वेगवेगळ्या प्रकारे वाटू लागतात. अशी वेगवेगळी परिमाणं दलित साहित्यात दिसत नाहीत. सोयीचं तेवढंच मांडलं जातं. दलितांतील कॉन्टे-म्पोररी सिच्युएशनबद्दलचं, राजकारणाबद्दलचं त्याचं कितीसं चित्रण असतं ?

प्रश्न : हे साहित्य समूहनिष्ठ असतं, त्यात व्यक्ती येत नाही, असाही एक आक्षेप आहे.

हा आक्षेप काहीसा पूर्वग्रहदूषित वाटतो. व्यक्तिकेंद्रित चित्रण आणि तदनुषंगिक संघर्षच साहित्यात असला पाहिजे, असा एक ग्रह नवसाहित्यानं निर्माण केला आहे. ( उदा., ' निष्पर्ण वृक्षाच्या छायेत भर दुपारी ' ) किंवा दुसरे टोक म्हणजे ... चे चित्रण, मेळ्यातील गाणी किंवा आजचं ' घाशीराम कोतवाल ' सारखं नाटक, केवळ टीमवर्कचं, कवायतीचंच कौतुक ! चांगल्या साहित्यात व्यक्ती–समाजसंबंध पाहिजे, माणूस आणि त्याची चौकट प्रकट झाली पाहिजे.

प्रश्न : हे साहित्य नकारात्मक आहे ( निगेटिव्ह आहे ) असं म्हटलं जातं. तुम्हाला काय वाटतं ?

एक स्टेज म्हणून काही काळ निगेटिव्ह राहणं अपरिहार्य होतं. पण या स्टेज-मध्येच किती वेळ राहावयाचं, याचा दलित लेखकांनी विचार केला पाहिजे. माझ्या मते ही स्टेज आता संपलेली आहे. एकंदर समाजातून आज माणुसकीचा अभाव जाणवतो, तो का ? याचाही विचार आता दलित साहित्यानं केला पाहिजे. यासाठीं इतरांबरोबर स्वतःकडेही तटस्थपणे पाहावयास शिकलं पाहिजे. विशिष्ट समूहाशी आयडेंटिटी ही आरंभी ठीक. दलितांची अंतिम कमिटमेंट व्यापक मूल्यांशी असली पाहिजे. प्रचाराची राळ पुरे झाली. दलित कवितेनं आपला एकसूरीपणा आत्मपरीक्षणानं दूर केला पाहिजे. समाजाच्या व्यापक संदर्भानंच ही कोंडी फुटणार आहे.

प्रश्न : दलित जाणीव ही कायम–निरंतर राहील असं तुम्हाला वाटतं काय ?

उत्तर अवघड आहे. पण जात ही आता सेक्युलर होत चाललेली आहे. आज पूर्वीची व्यवसायबंधनं राहिलेली नाहीत. वंशपरंपरेच्या व्यवसायपद्धतीला तडा गेलेला आहे. पूर्वीच्या मानानं मोबॅलिटी वाढलेली आहे. आंतरजातीय विवाह होऊ लागलेले आहेत. या प्रकारच्या लग्नांना होणारा विरोध मावळत्या अंगाला आहे. जातिसंस्थेची पकड पूर्णपणे कमी होण्यास वेळ लागेल. परंतु ही प्रोसेस सुरू झाली आहे. उतरंड मोडत असल्याचं आज समाधान आहे.

आता या अनुरोधानं दलित साहित्याचा टेंपो बदलत जाईल किंवा नाही हे दलित चळवळीवर अवलंबून राहील. आज स्पृश्यास्पृश्यपालन आहे, पण त्याचं स्वरूप पूर्वीचं राहिलेलं नाही, ते बदलत गेलेलं आहे. या बदलाचं दर्शन जर यापुढील दलित साहित्यात झालं नाही, तर हे साहित्य गतिशून्य होईल.

प्रश्न : दलित साहित्यात ' शहरी ' आणि ' ग्रामीण ' असा काही भेद करावा, असं तुम्हाला वाटतं काय ?

स्थूलमानानं दोन्ही सारखीच असली तरी मला ग्रामीण दलित साहित्य अधिक

सकस, जवळचं, अनुभवात अधिक भर घालणारं वाटतं. शहरी पार्श्वभूमीवर राहून लिहिणारी दलित मंडळी नवं काही देऊ शकत नाही. 'मुक्काम पोष्ट', 'देवाचं गोठणं' हे पुस्तक मला दलित अनुभव समजून घेण्यास उपयोगी पडतं. दलित आत्मचरित्रं मला या दृष्टीनं खूप महत्त्वाची, कोंडी फोडणारी वाटतात. खेड्यां-इतका शहरात दलित अस्पृश्य नसतो. तेव्हा सच्चा दलित अनुभवांच्या दृष्टीनं मला ग्रामीण दलित साहित्य अधिक महत्त्वाचं वाटतं.

प्रश्न : दलित अस्मिता ठेवणं यात तुम्हाला 'व्हेस्टेड इंटरेस्टस्' जाणवतात ?

काही भाग तसा आहे. उदा., आडसुळांचा बौद्ध साहित्याचा आग्रह. काही दलित लेखक केवळ महार जातीच्या साहित्यिकालाच प्रोत्साहन देतात. नारायण सुर्वे-सारख्या कवीला दलित कवी मानलं जात नाही. एका बाजूनं जातीव्यवस्थेला विरोध करीत असताना स्वत: त्याच व्यवस्थेच्या आहारी ते जात आहेत.

प्रश्न : आता शेवटचा प्रश्न. दलित साहित्यानं मराठी साहित्याला नेमकं काय दिलं ?

प्रचलित मराठी साहित्याला जोराचा धक्का दिला. नवे विषय नजरेसमोर आणले. अधिक जिवंतपणे आणले. माटे, खरात, अण्णाभाऊ यांच्या साहित्यात दलित जीवनाचा खूप तपशील आला आहे, पण त्यात आजच्या साहित्यात आहे तसा प्रचलित व्यवस्थेविरुद्धचा सूर नाही. दलित जीवनावर लिहिणाऱ्या पूर्वीच्या लेखकांची बैठक प्रचलित व्यवस्थेला धरून होती. आजचा लेखक या व्यवस्थेची चौकट मोडू इच्छितो, हा फरक माझ्या दृष्टीनं महत्त्वाचा आहे.

●

# १६ : प्रा. डॉ. गो. मा. पवार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3953
दा. क्र. २९
विषय
प्रंथ शाखा (स्थळ प्रत)

[ प्रा. डॉ. गो. मा. पवार हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मराठीचे विभाग-प्रमुख आहेत. तत्पूर्वी ते मराठवाडा विद्यापीठात मराठी विभागातच काम करीत होते. महर्षी वि. रा. शिंदेविषयक काही साहित्य सोडल्यास डॉ. पवार यांचे फारच थोडे लेखन प्रसिद्ध झाले आहे. तथापि, समतोल वृत्तीचा विचक्षण साहित्य–समीक्षक आणि समाजप्रबोधनाची आस्था बाळगणारा एक विचारवंत या नात्याने डॉ. गो. मा. पवार मराठी साहित्यविश्वाला सुपरिचित आहेत. कोणत्याही साहित्यघटनेचा वा विचारप्रवाहाचा ते शांतपणे, समतोलपणे पण साक्षेपाने विचार करतात; त्यात सांप्रदायिकता किंवा आग्रहीपणाऐवजी एक प्रवाहीपणा आढळून येतो. अशा या विचारवंताची व प्राध्यापकाची दलित साहित्यविषयक मते जाणून घेण्यास मी उत्सुक होतो. औरंगाबाद येथील त्यांच्या वास्तव्यामुळे दलितक्षेत्रातील विविध चळवळीही त्यांनी जवळून पाहिलेल्या आहेत, अनुभवलेल्या आहेत. यामुळे त्यांच्या या बाबतीतील विचारांना एक वेगळे महत्त्व आहे.

मुलाखतीबाबतचे सूतोऽवाच एकदोन वेळा झाले होतेच; पण तो योग एके दिवशी शिवाजी विद्यापीठ परिसरातील त्यांच्या निवासस्थानी काहीसा आकस्मिकपणेच दुपारी चार वाजता जुळून आला. मी त्या दिवशी येणार असल्याची तशी त्यांना पूर्वसूचना नव्हती. पण मुलाखतीबाबत मी आलो आहे, याची कल्पना येताच अत्यंत अनौपचारिकपणे कोणतेही आढेवेढे न घेता, ते मुलाखतीच्या ' मुड ' मध्ये थेटपणे शिरले. विचारलेल्या साऱ्याच प्रश्नांना त्यांनी प्रसन्नपणे उत्तरे दिली. ही मुलाखत म्हणजे डॉ. पवारांचे दलित साहित्यविषयक एक प्रकट चिंतनच आहे, असे म्हणावयास हरकत नाही.]

---

प्रश्न : ' दलित जाणीव ' म्हणजे काय ?

अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातीत जन्म घेतलेल्या लेखकांनी प्रकट केलेल्या तदनुषंगिक जाणिवेला माझ्या मते ' दलित जाणीव ' म्हणावं.

प्रश्न : ‘ दलितत्व ’ हे समाजातील आर्थिक वगैरेसारख्या घटकांशीही संबंधित नाही का ? साम्यवादी–समाजवादी तत्त्वज्ञानातही दलित जाणिवेचा संदर्भ नसतो काय ?

केवळ आर्थिकदृष्टचा शोषित असलेल्या मंडळींच्या जाणिवेला मी ‘ दलित जाणीव ’ म्हणणार नाही. जातीजातीतील भावनिक दळणवळण कमी आहे. प्रत्येक जात आपल्यापुरती बंदिस्त आहे. त्यामुळे जातीजातींचं अनुभवविश्व भिन्न भिन्न होतं. जन्मजात दलितांना जे अनुभव येतात, ते इतरांना येणार नाहीत. म्हणून दलित जन्मामुळेच दलित लेखकांना जी जाणीव येते ती दलित जाणीव.

यामुळेच समाजवादी–साम्यवादी जाणिवेपेक्षा ही दलित जाणीव वेगळी आहे. समाजवादी–साम्यवादी जाणिवेत आर्थिक विषमतेला महत्त्व आहे. तेथे जातीचा संबंध नाही.

प्रश्न : जन्मानं ‘दलित’ पण समाजात दलितपणाचा अनुभव नसलेल्या व्यक्तींच्या जाणिवांना तुम्ही ‘ दलित जाणीव ’ म्हणाल काय ?

हा प्रश्न hypothetical वाटतो. आज वस्तुस्थिती अशी आहे की, प्रत्येक दलित व्यक्तीला मग ती सधन असो वा निर्धन, कमी–अधिक प्रमाणात या अस्पृश्यतेची झळ लागल्याशिवाय राहातच नाही. स्थलकालपरत्वे दलितांच्या जीवनातील काही प्रश्न तीव्र ठरतील, काही ठरणार नाहीत. उदा., खेड्यांत दलितांना पाण्याच्या प्रश्नाला ज्याप्रकारे तोंड द्यावं लागतं, त्याप्रकारे शहरातील दलितांना द्यावं लागणार नाही. पण कोणीही दलित व्यक्ती आज तरी दलित संदर्भापासून मुक्त राहू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. हा प्रश्न संपन्न वा विपन्न, सत्ताधारी वा हीनदीन अशा सर्वच दलितांना कमी–अधिक प्रमाणात सातत्यानं ग्रासणारा आहे.

प्रश्न : दलित जाणिवेचा कटाक्ष वर्णाश्रमविरोधावर आहे असं म्हणता येणार नाही का ?

वर्णाश्रमविरोध हा आहेच. मुख्य रोख त्याविरुद्धच आहे, पण अनुषंगानं का होईना आर्थिक बाबीही येथे येतातच. कारण आपली चातुर्वर्ण्यव्यवस्था ही आर्थिक व्यवहाराशीही संबद्ध आहे. दलित समाज विपन्न राहण्याच्या व्यवसायांचं जातिनिष्ठ विभाजन हेही एक कारण आहेच. यामुळे दलितांच्या लढ्यात आर्थिक विषमतेविरुद्धचाही संघर्ष येणारच. पण त्याला वर्णाश्रमविरोधी लढ्याइतकं प्राधान्य राहणार नाही. कारण आर्थिक दारिद्र्य दूर झालं म्हणजे अस्पृश्यता दूर होईलच असं नाही. म्हणून दलित जाणिवेचा मुख्य रोख वर्णाश्रमविरोधीच राहील. खरं म्हणाल तर अस्पृश्यतेचा हा प्रश्न अस्पृश्यांचा नसून स्पृश्यांचा आहे.

प्रश्न : तो कसा काय ?

एकवेळ आपला आर्थिक अभ्युदय अस्पृश्यमंडळी कसातरी करून घेतील, पण

स्पृश्यांच्या मनातील अस्पृश्यतेचा भाव ते कसा दूर करू शकणार ? हे स्पृश्यांनीच करावयाचं आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचं याबाबतचं म्हणणं येथे मला आठवतं. ते अस्पृश्यतानिर्मूलनाचे दोन घटक मानीत. १) स्पृश्यांच्या मनातून अस्पृश्यतेचा भाव नष्ट होणं, आणि २)अस्पृश्यांनी आपला आर्थिक अभ्युदय करून घेणं. सर्वाधिक महत्त्व पहिल्या घटकालाच आहे.

प्रश्न : 'ग्रामीण साहित्य' आणि 'दलित साहित्य' यात तुम्हाला कोणते साम्य-भेद आढळतात ?

'ग्रामीण साहित्य' ही संज्ञा केवळ वर्णनपर आहे. जशी 'ऐतिहासिक साहित्य' ही संज्ञा वर्णनपर आहे तशी. ग्रामीण वास्तवाचं चित्रण ग्रामीण साहित्यातून व्हावं, ही याबाबतची स्थूल अपेक्षा. 'दलित साहित्य' ही संज्ञा मात्र अशी केवळ वर्णनपर म्हणता येणार नाही. ती एक मूल्यात्मक जाणीव आहे. तीमागील प्रेरणाच भिन्न आहेत. प्रस्थापित समाजव्यवस्थेला विरोध करून समाजाची नवी घडण करण्याची उत्कट तळमळ तीमध्ये आहे. समाजाची असली काही पुनर्घटना करण्याची प्रेरणा ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागे नाही. केवळ ग्रामजीवनाशी संबद्ध ते ग्रामीण साहित्य. म्हणून माझ्या मते 'दलित साहित्य' ग्रामीण साहित्याहून वेगळं मानावयास हवं.

प्रश्न : 'दलित' हाही ग्रामीणतेचाच एक भाग नाही का ?

ग्रामीणतेचा एक भाग असला तरी ग्रामीणतेचे हे दोन भिन्न, काहीसे परस्पर-विरोधी घटक आहेत. एक गावात राहतो, तर दुसरा गावाबाहेर. त्यात अंतर्गत तीव्र स्वरूपाचे विरोध आहेत. ग्रामीण हा गावाच्या कुसुवाच्या आत राहणारा घटक आहे. बाहेरच्याशी त्याचा तसा संबंध नाही. किंबहुना या गावाबाहेरच्या घटकाला त्यानं दडपून ठेवलं आहे. त्यामुळे एकाच ग्रामसंस्थेतील या दोन घटकांचे प्रश्न, विचार, भूमिका वेगवेगळ्या आहेत. ग्रामीण घटकाला ग्रामजीवनाबद्दल जी आत्मीयता वाटते, ती दलित लेखकाला वाटत नाही. उलट, घृणाच वाटते. कारण गावातल्या घटकानं त्यांच्यावर अस्पृश्यता लादली, नाना प्रकारे त्यांची अवहेलना केली हे सतत त्याच्या जाणीवेत असतं.

प्रश्न : ग्रामजीवनातील दलित आणि दलितेतर हे दोन्हीही घटक पीडितच राहिलेले आहेत. अधिक पीडित घटक दलित आहे. अधिक तळागाळाचा आहे. तेव्हा या दलित घटकाला केंद्र कल्पून दलितेतर पीडितांनीही दलित चळवळीत सामील व्हावं, असं काही दलित विचारवंत म्हणतात. तुम्हाला काय वाटतं ?

ही भूमिकाही मला वास्तव वाटत नाही. ग्रामजीवनात बहुसंख्य दलित व दलितेतरांना समानपणे जाणवणारा एकच घटक आहे आणि तो म्हणजे दारिद्र्य. दलिते-

तरांचं हे दारिद्र्य दूर झालं की त्याचे बाकीचे प्रश्न मिटतील. मात्र दारिद्र्य दूर झाल्यानं दलितांचे प्रश्न मिटतीलच असं नाही. दारिद्र्य वगळलं तर दलितेतरांना एरवीची ग्रामजीवनाची चौकट, परंपरा मान्यच आहे. याबद्दल त्याला प्रेमही आहे. वतनदारी हा त्याच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. दलितांना या प्रकारचं ग्रामप्रेम वाटण्याची सुतराम शक्यता नाही. हे ग्रामजीवन केव्हा संपेल, याकडेच त्याचं अधिक लक्ष असतं. म्हणून ग्रामीण दलितांचा ओढा शहराकडे असतो. तर शहरात राहणारा दलितेतर ग्रामीण आपल्या खेड्याबद्दलचं प्रेम मनात सतत जागवीत असतो.

प्रश्न : मग ग्रामीण आणि दलित यांच्या मनात परस्परांबद्दल आस्था निर्माण करण्याचा उपाय कोणता ?

यासाठी प्रबोधनाची गरज आहे. पूर्वीच्या मानानं दलित–दलितेतरांतील अंतर आता कमी झालं आहे. समानतेचं वारं अधिक खेळू लागलं आहे. ही प्रक्रिया वाढीस लावली पाहिजे. परंपराग्रस्त महारवाडे नष्ट कसे होतील हे पाहिलं पाहिजे. अस्पृश्यतानिर्मूलन हे अंतिम उद्दिष्ट समोर ठेऊन त्याला पोषक होईल अशी सर्व प्रकारची योजना केली पाहिजे. जातीची चौकट फार बळकट आहे, ती लवकर उखडली जाणार नाही. आपल्या समाजात साळी–माळी यांसारख्या विविध जमाती आहेत, त्यांनी आपल्या जातिविषयक जाणिवा सोडलेल्या नाहीत. तथापि, त्यांना समाजात कोणी अस्पृश्य मानीत नाही. म्हणून जातिव्यवस्था एकदम गेली नाही तरी अस्पृश्यता दूर होण्याची पातळी तरी लौकरात लौकर आपण गाठली पाहिजे. याबाबतीत रोटी–व्यवहार आणि बेटी–व्यवहार असे दोन उपाय सुचविले जातात. हे दोन्ही उपाय प्रभावी आहेत खरे; परंतु बेटी–व्यवहार अधिक प्रमाणात अमलात येणं अवघड आहे. अन्य व्यवहार तरी समानतेच्या पातळीवरून निकराने व्हावेत. जैन–लिंगायत–मराठा यांच्यात तरी कुठे बेटी–व्यवहार होतो? महार–मांग–चांभार या जातींतही हा बेटी–व्यवहार नाही. म्हणून तूर्त निदान रोटी–व्यवहाराची म्हणजेच अन्य समान व्यवहाराची पातळी वेगानं गाठण्याचा प्रयत्न व्हावा. एकंदर समाजातीलच जात्याभिमान जेव्हा नष्ट होईल तेव्हा परिणाम म्हणून बेटी–व्यवहार होताना दिसेल.

प्रश्न : पूर्वीच्या मानाने स्पृश्यास्पृश्यांतील तणाव आज कमी झाला आहे असं तुम्ही मघाशी एक विधान केलंत. पण वस्तुस्थिती खरोखर तशी आहे का ? शासकीय सवलतींच्या किंवा अन्य निमित्तांनी दलितांवरील दलितेतरांचे अत्याचार वाढत चाललेले दिसतात. पूर्वी कडवी चातुर्वर्ण्यव्यवस्था असूनही अस्पृश्यांची घरं स्पृश्यांनी पेटवून दिल्याचं आढळत नाही, पण आज लोकशाहीच्या, समानतेच्या युगात हे घडत असलेलं आपल्याला दिसतं. हे विचित्र नाही का ?

एका बाजूनं समानतेचं वारं वाहात असताना दुसऱ्या बाजूनं हे घडत आहे, हे दुर्दैवानं खरंच आहे. पण याला माझ्या मते स्पृश्याच्या जोडीनंच दलितांतील पँथरसारख्या आक्रमक संघटनाही जबाबदार आहेत. स्पृश्यवर्ग आता थोडा-थोडा उदार होत असतानाच, त्यांच्या श्रद्धास्थानांवर, पूज्य वाटणाऱ्या विषयांवर दलितांकडून हल्ला होणं, स्पृश्यांना रुचणारं नाही. दलितांनी असा आक्रमक पवित्रा घेतला नसता तर हे दोन समाज अधिक जवळ आले असते, असे उद्रेक झाले नसते. सवलतीचा प्रश्न हा या प्रक्षोभाचा एक घटक झाला. पण त्याहीपेक्षा दलितांतील काही आक्रमक वृत्तीच्या मंडळींनी स्पृश्यांना प्रिय असणाऱ्या भावनांवर आघात केले, ते अधिक प्रक्षोभक ठरले. ह्या आघातांच्या क्रियेला प्रतिक्रिया निर्माण झाली. कायद्यानं अस्पृश्यांना काही सवलती दिल्या हे योग्यच झालं. पण या सवलतींचा गैरफायदा अस्पृश्यांतील काही मंडळींनी घ्यावयास सुरुवात केली. स्पृश्य घटकांवर याचाही विपरीत परिणाम झाला. शासनसंस्था अस्पृश्यधार्जिणी आहे, असा त्यातून ग्रह जन्माला आला. यामुळे तुम्ही म्हणता तसे अनैसर्गिक उद्रेक निर्माण झाले. 'अनैसर्गिक' मुद्दामच म्हणतो कारण तिचं स्वरूप प्रतिक्रियात्मक आहे.

प्रश्न : धक्कातंत्राशिवाय स्पृश्य समाज जागाच होत नाही, असं याचं एक समर्थन अस्पृश्यांकडून दिलं जातं, हे काही अंशी खरं नाही काय ? देव-देवतांवरील किंवा पूज्य कल्पनांवरील त्यांचा हल्ला हा चातुर्वर्ण्यावरील हल्ल्याचा एक भाग ते मानतात.

चातुर्वर्ण्यावर आघात करणं म्हणजे देवदेवतांवर हल्ले करणं नव्हे. चातुर्वर्ण्य-निर्मित भेदांवर जरूर आघात करावा, विषमतेवर जरूर हल्ला करावा, पण त्यासाठी सवर्णांच्या धर्मश्रद्धेवर हल्ला कशासाठी ? वारकरी संप्रदायाचे उदाहरण याबाबतीत मला द्यावंसं वाटतं. त्यांनी पूज्यदैवतविषयक, श्रद्धास्थानविषयक परंपरा एका बाजूनं जपली असेल, परंतु दुसऱ्या बाजूनं कृत्रिम भेदभावांवर हल्लाही केला. पँथरसारखी मंडळी ज्याप्रकारे स्पृश्यांवर दबाव आणतात, तो प्रक्षोभाला प्रेरक ठरतो. त्यामुळे त्यांना फार तर काही अधिक सवलती मिळतील, पण स्पृश्यांचं प्रेम मिळणार नाही. आणि प्रेमच जागृत झालं नाही तर त्यांच्या मनातील अस्पृश्यता तरी कशी दूर होणार ? तेव्हा हा प्रश्न संघर्षानं न सोडविता परस्पर-सामंजस्यानं, प्रेमानंच सोडविला पाहिजे.

प्रश्न : दलित अनुभव दलितेतरांना आविष्कृत करता येणार नाही, असं म्हटलं जातं. तुम्हाला काय वाटतं ?

दलित जाणीव ही दलितेतरांना व्यक्त करता येणार नाही असंच मला ठामपणं वाटतं. बघण्याचेही आतून बघणं आणि बाहेरून बघणं असे दोन प्रकार आहेत. दलितेतरांना दलितांच्या प्रश्नाकडे बाहेरून बघणं शक्य आहे; पण आतून बघणं

फक्त दलितालाच शक्य आहे. अनिल अवचट भटक्या जमातीचे कितीही सहानुभूतीनं चित्रण करोत, पण त्यांना लक्ष्मण मानेंनी ' उपरा ' त वर्णन केलेले अनुभव चित्रित करणं शक्य नाही. व्यंकटेश माडगूळकरांची अस्पृश्यांची चित्रं चांगली रंगविली आहेत. पण त्यांना बाबूराव बागुलांचा feel देता येणार नाही. केवळ सहानुभूती तेथे अपुरी आहे.

प्रश्न : या दिशेनं विचार करू लागल्यास एका जातीचा अनुभव दुसऱ्या जातीला व्यक्त करणंच तत्त्वतः अशक्य ठरणार नाही का ? प्रतिभावंत लेखकांचं प्रतिभावंतपण स्वेतरांचं अनुभव व्यक्त करण्यातच नसतं काय ? आजवर पुरुषमनानं स्त्रीमनाचं प्रत्ययकारी दर्शन घडविलेलं आहेच की. मग दलितांच्या जीवनाचं चित्रणच दलितेतर लेखकाला करणं अशक्य आहे, असं तुम्ही का म्हणता ?

सहसंवेदनेच्या बळावर इतरांचं प्रत्ययकारी दर्शन घडविणं शक्य होतं, हे खरं. तसा प्रत्येक व्यक्तीचाच अनुभव वेगळा असतो. कल्पनेनं सहानुभवाची पातळी गाठता येते. स्त्री–पुरुषांनाही परस्परसहवासातून परस्परांना समजावून घेणं शक्य होतं. पण अस्पृश्यांना येणारे काही अनुभव कल्पनेच्या पातळीवरूनही त्या प्रत्ययकारितेनं वर्णन करणं दलितेतरांना शक्य नाही. कारण ते अनुभव कल्पनेनं जाणणंही स्पृश्य लेखकाला शक्य नसतं. काही अनुभवांची जातच अशी असते. सहानुभूतीनं समजून घेणं वेगळं, जिवंत प्रतीतिपूर्ण चित्रण करणं वेगळं. भटक्या जमातींचं जीवन कितीही समजून घेतलं तरी ' उपरा 'प्रमाणे चित्रण करता येणार नाही. त्याला त्यात आतील अनुभूतीचाच भाग पाहिजे. ' उपरा ' मधील बंदिस्त समाजासारख्या समाजाच्या बाबतीत तर हे अधिकच खरं आहे. जीवनात ज्या तऱ्हेचे अनुभव त्यांच्या वाट्याला येतात ते इतरांच्या कल्पनेच्याही कक्षेबाहेरचे असतात. ते अनुभव आणि तत्सम समांतर अनुभव यात फरक नाही का ?

प्रश्न : ' दलित साहित्याला वेगळे निकष लावले पाहिजेत ' असं म्हटलं जातं. तुमचा अभिप्राय ?

दलित साहित्याचं वाङ्मयीन दृष्ट्या मूल्यमापन करावयाचं असल्यास वेगळे निकष लावण्याची गरज नाही. पण दलित साहित्य हे वेगळ्या सामाजिक परिस्थितीचं अपत्य आहे, याचं भानही दलित साहित्याच्या विचारात ठेवलं पाहिजे. दलित अनुभवांचं स्वरूप ओळखण्यास याचं साहाय्य होईल, पण त्यासाठी ' वाङ्मय ' म्हणून वेगळे निकष वापरण्याची गरज नाही. वाङ्मयाचे निकष सनातन आणि सार्वत्रिक असतात, दलितत्व ही तशी हंगामीच घटना आहे, ते केव्हा तरी संपुष्टात येणारच. ते सपुष्टात यावं अशीच साऱ्या सुजाणांची इच्छा व प्रयत्न असणार. वाङ्मयीन निकषाचं तसं नाही. ते सार्वत्रिक असतात, एका गटापुरते नसतात.

दलित साहित्यातील अनुभवविश्व सांस्कृतिकदृष्टचा वेगळं आहे हे ओळखणं आणि त्यातील विद्रोह समजून घेणं वेगळं, आणि विद्रोहाला केवळ आरडा-ओरडचाचं रूप आलं तरी त्याचं वाङ्मयीन पातळीवरून समर्थन करणं वेगळं. सांस्कृतिक अपरिहार्यता आणि वाङ्मयीन गुणवत्ता यात गल्लत होता कामा नये. जोरानं ओरडून केवळ क्षोभ निर्माण करणारे अनेक दलित कवी आहेत, पण ढसाळां-सारख्या एखाद्या–दुसऱ्या कवीतच साहित्यगुण आढळतात, हे विसरून कसं चालेल?

प्रश्न : साहित्यशास्त्रातही परिस्थितीप्रमाणे बदल होतो. प्राचीन काव्यशास्त्राहून अर्वाचीन काव्यशास्त्र वेगळं आहे असं म्हटलं जातं. याचा आणि साहित्याचे निकष सनातन असतात या तुमच्या म्हणण्याचा अन्वय कसा लावावयाचा ?

शास्त्र बदलतं म्हणण्यापेक्षा मूल्यमापनाचे निकष बदलतात असं म्हणता येईल. 'शास्त्रा' ची चौकट फार बंदिस्त असते. त्याचे घटक एकमेकांशी पक्केपणे बांध-लेले असतात. सांस्कृतिक बदलानुसार मूल्यमापनाच्या–श्रेष्ठकनिष्ठतेच्या कसोटचा बदलत आलेल्या आहेत. पण ज्याला आपण कलातत्त्व म्हणतो, माध्यमाचा उपयोग करण्याची पद्धती म्हणतो, ती बदलते असं नव्हे.

प्रश्न : हे जरा अधिक स्पष्ट कराल काय ?

माझ्या मते प्रत्येक कलेची नृत्य, संगीत, काव्य इत्यादी आविष्कारतत्त्वं द्विविध असतात. त्यात आशय प्रकट करणारा एक भाग असतो. दुसरा भाग असतो माध्य-मांच्या क्रीडेचा, सौंदर्य निर्माण करणाऱ्या तत्त्वांचा. या माध्यमांचा उपयोग कलावंत वेगवेगळचा पद्धतीनं करतो. उदा., कुसुमाग्रज, सुर्वे ज्या पद्धतीनं माध्यमाचा वापर करतात, त्या पद्धतीनं रेगे, चित्रे करीत नाहीत. माध्यमाचा वापर कसाही केलेला असो, त्या कलेची गुणवत्ता त्या कलावंतानं कोणत्या हेतूनं आणि कोणत्या पद्धतीनं हे माध्यम वापरलं आहे, यावर अवलंबून राहील. केवळ लौकिक हेतूच्या पातळीवर कलाकृती राहणार असेल, त्याच्या पलीकडे ती जाणारच नसेल तर ती विशेष गुणवान असणार नाही. वाङ्मयकलेचा सनातन निकष मूलभूत मानवी समस्या आणि तिचा जिवंत प्रत्यय देणं यांत असतो. म्हणून बाबूराव बागुलांसारखा एखादा दलित लेखक दलित जीवनाचं चित्रण करतो, पण त्याबरोबरच त्याची निर्मिती मानवी जीवनविषयक मूलभूत समस्येला सखोलपणे स्पर्श करते. त्यामुळे बाबूराव लेखक म्हणून श्रेष्ठ ठरतात. केवळ दलितांवर लिहितात म्हणून नव्हे. तेव्हा 'दलित साहित्या'ला वेगळे निकष लावावेत, या मागणीचा अर्थ दलित साहित्याकडे पूर्व-ग्रहदूषितपणे पाहू नये, एवढाच असेल तर ठीक. पण दलित साहित्याचं वेगळंच सौंदर्यशास्त्र असतं हे म्हणणं मला पटत नाही. कारण कोणत्याही साहित्याचं अंतिम महत्त्व त्यातील मानवी आस्थेच्या प्रतीतीवर आणि प्रतीती देण्याच्या क्षमतेवरच

आधारलेलं असतं.

प्रश्न : ' दलित साहित्य ' विचारात ' सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच ' घेतला पाहिजे, त्याशिवाय ते कळणार नाही, असं म्हटलं जातं. तुमचं याबद्दलचं मत काय ?

हा सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोच काही एका प्रमाणात आकलनाच्या संदर्भात उपयोगी पडतो. केवळ कलावादासारखी एखादी भूमिका या साहित्याच्या आकलनाच्या आड येण्याचा संभव. यासाठी या साहित्याची परंपरा, भूमिका पाहणं जरुरीचं. हे पाहिल्यानं आकलनसुलभता निर्माण होते. मूल्यमापनाच्या बाबतीत या सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल अॅप्रोचचा काही उपयोग नाही. इतिहासाचं ज्ञान असणारा आणि नसणारा दोघेही ऐतिहासिक कादंबऱ्या वाचतात. इतिहासाचं ज्ञान असणाऱ्याला जेवढं तिचं आकलन होईल तेवढं न वाचणाऱ्याला होईलच असं नाही. परंतु या ज्ञानाचा आणि त्या कादंबरीच्या कालात्मक गुणांचा काही परस्परसंबंध नसतो.

प्रश्न : आता दलित साहित्यावरील काही आक्षेपांकडे वळू. हे आक्षेप पुढीलप्रमाणे आहेत– (अ) दलित साहित्य प्रचारी आहे. (ब) एकसूरी आहे, (क) त्यात व्यक्ती येत नाही. (ड) आक्रस्ताळेपणा आढळतो, (इ) ते नकारात्मक आहे. याबद्दल तुमचं मत काय ?

सामान्यत: हे विधान मान्य करावयास हवं. ' प्रचारी ' हा शब्द भडक, अधिक्षेपात्मक वाटतो. त्याऐवजी सहेतुक हा शब्द योजल्यास ते अधिक समर्पक होईल. सहेतुक साहित्य, कमिटेड साहित्य अकलात्मकच होतं असा काही नियम नाही. टॉलस्टॉय हा नीतिवादी असूनही श्रेष्ठ लेखक होता. दलित साहित्यातील बराच भाग प्रचारी आहे, हे अमान्य करण्यात अर्थ नाही. त्यातील बराचसा भाग संदेशात्मक, प्रतिक्रियात्मक असतो.

याबाबतीत आणखी एक बाब लक्षात घेतली पाहिजे.

प्रश्न : ती कोणती ?

दलित साहित्य लिहिणारी मंडळीच दलित चळवळींचेही पुढारी आहेत ही गोष्ट सहेतुकतेच्या किंवा प्रचाराच्या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखी आहे.

प्रश्न : दलित लेखकांवर दलित चळवळीचं हे पुढारीपण त्यांच्यावर परिस्थितीनं लादलेलं आहे असं नाही का म्हणता येणार ? आधुनिक भारतीय प्रबोधनाच्या आरंभकाळात मराठीत लेखन करणारी मंडळीच महाराष्ट्राचं पुढारीपणही करीत नव्हती का ? दलितांच्या बाबतीतही प्रबोधनदृष्टचा हा आरंभकाळच आहे.

तुम्ही ज्या मराठी लेखक–पुढाऱ्यांचा संदर्भ देता ती मंडळी वृत्तपत्रकार, निबंधकार होती. ललितलेखक नव्हती. केळकर–परांजपेंनी पुढारीपण केलं असेल, पण

हरिभाऊ–केशवसुतांनी असं पुढारीपण केलं नाही. दलित चळवळीत मात्र दलित लेखकच विशेषतः ढाले, ढसाळ, निंबाळकर, ज. वि. पवार यांसारखे पँथरप्रवृत्तीचे लेखक आघाडीवर आहेत हा फरक आहे.

प्रश्न : पण येथेही पुन्हा ऐतिहासिक कारणांनीच असं झालं, असं नाही का म्हणता येणार? हरिभाऊ, केशवसुत हे ललितलेखक असूनही त्यांना पुढारीपण स्वीकारावं लागलं नाही. कारण हे पुढारीपण करावयास टिळक–आगरकरांसारखी मंडळी त्या काळात होती. पण दलित चळवळीच्या दुर्दैवानं डॉ. आंबेडकरांनंतर पुढारीपणाची जी पोकळी निर्माण झाली ती अद्यापही भरून निघाली नाही. दलितांतील संवेदनशील मनाच्या लेखकांना यासाठीच या चळवळीचं पुढारीपण पत्करावं लागलं, असं म्हणता येणार नाही का?

डॉ. आंबेडकरांच्यानंतर दलितांना नेताच उरला नाही, हे म्हणणं मला तेवढं पटत नाही. आंबेडकरांच्या तोडीचे नसतील, पण गायकवाडांसारखे काही निष्ठावंत कार्यकर्ते व पुढारी दलित चळवळीला लाभले होते. पण नव्या पिढीतील नवी संवेदनशीलता ओळखण्यास हे पुढारीपण अपुरं पडलं असावं. म्हणून ही लेखक मंडळीच आपण होऊन चळवळ करू लागली असावीत. याला आणखी एक कारण आहे.

प्रश्न : कोणते?

दलित वर्गातील पुढारी कालांतराने पांढरपेशा मनोवृत्तीचे होऊ लागले. त्याविरुद्धची प्रतिक्रिया म्हणूनही पँथरची चळवळ पुढे आली असावी. या चळवळीलाही पढे निरनिराळ्या कारणांनी ठिसूळपण आलं ही गोष्ट वेगळी!

प्रश्न : हे साहित्य एकसूरी आहे, या आक्षेपाबद्दलची तुमची प्रतिक्रिया काय?

उत्तर : एकसूरी आहे या म्हणण्यात काहीएक तथ्य आहे. परंतु विद्रोह, प्रक्षोभ या ठराविक प्रेरणांमुळे व दलित साहित्याच्या एकंदरीत निर्मितीच्या हेतूमुळे हा एकसूरीपणा अपरिहार्यही आहे असं वाटतं. बागूल–ढसाळांसारख्या प्रतिभावंत लेखककवींमध्ये दलित साहित्याच्या मर्यादा ओलांडण्याचं सामर्थ्य असू शकते.

प्रश्न : हे साहित्य समूहनिष्ठ आहे, असाही एक आक्षेप आहे.

कवितेच्या बाबतीत हे जास्त खरं आहे. बाबूराव बागुल, योगीराज वाघमारे यांसारखे थोडे लेखक वगळल्यास बहुतेक दलित कथाकारांचं लेखन एका सामूहिक साच्यात बसविलेलं असतं–अन्याय, सूड वगैरे.

प्रश्न : हे तुम्हाला आक्रस्ताळे आहे असे वाटते का?

ह्याचं उत्तर मघासारखंच. प्रचार आला की आरडाओरडा आलाच.

प्रश्न : हे साहित्य नकारात्मक आहे असेही म्हटले जाते.

पूर्ण नकारात्मक नाही. हा ‘नकाराला नकार’ आहे. या नकारात एक विधायक

भाग अभिप्रेत आहे.

प्रश्न : दलित जाणीव कालांतरानं नष्ट होण्याची शक्यता गृहीत धरल्यास दलित साहित्याचं भवितव्य काय राहील ?

दलित जाणीव कायम राहणारी नसल्यामुळं कालांतरानं दलित साहित्य मध्यवर्ती साहित्यप्रवाहात मिळून जाईल. ते अलग राहील असं मला वाटत नाही. या चळवळीमुळे मध्यवर्ती साहित्यालाच एक नवं रूप येईल. जातिसंस्था बदलेल तसे हे साहित्यही बदलत जाईल, वेगळं वळण घेत राहील.

प्रश्न : दलित साहित्यात ' शहरी ', 'ग्रामीण' असे भेद तुम्हाला जाणवतात काय ?

शहरी-ग्रामीण असा दलितेतर साहित्यातही फरक करता येईल. पण स्थूलपणे शहरी दलित लेखक आर्थिकदृष्टचा नाडलेपणावर अधिक भर देतो; तर ग्रामीण भागात वर्णव्यवस्थेनं निर्माण झालेल्या विषमतेचा, आर्थिक विषमतेबरोबरच प्रभाव दिसतो, असं सामान्यपणे म्हणता येईल.

प्रश्न : दलित अस्मितेत तुम्हाला व्हेस्टेड इंटरेस्टचा भाग जाणवतो ?

दलित लेखकांपेक्षा vested interest चा हा मुद्दा राजकीय पुढारीपण मिरवणाऱ्यांना अधिक लागू पडतो. दलितत्व ही त्यांच्या दृष्टीने जपण्याची वस्तू असते. दलितांची आर्थिक स्थिती सुधारण्याचे ठोस कार्यक्रम हाती घेण्याऐवजी दलितांच्या काळजाला हात घालणारी भावनिक चळवळ ही मंडळी हाती घेतात की काय असं वाटतं. दलित लेखकांवर मात्र हा vested interest चा आरोप कोणी करावा असं मला वाटत नाही.

प्रश्न : आता आणखी एकच प्रश्न : दलित साहित्यामुळे मध्यवर्ती मराठी साहित्यावर कोणता परिणाम झाला ?

मराठी साहित्याचं अनुभवक्षेत्र संपन्न केलं. आपल्यापैकी काही माणसं कशाप्रकारे जीवन जगतात, कोणते अनुभव घेतात याची कल्पनाही आपण करू शकत नव्हतो. त्याचं भेदक, वास्तवदर्शन या साहित्यानं घडवलं.

साहित्यात रूढ असलेल्या संकेतांवर आपोआपच या साहित्यामुळं प्रहार झाला. अभिव्यक्तीच्या क्षेत्रामध्येही एक मोकळेपणाचं वारं या साहित्यामुळं संचारलं. अभिव्यक्तीत एक प्रकारचा निःसंकोचपणा आला. त्यामुळे एकंदर मराठी वाङ्मयाचं वातावरण मोकळं होण्यास मदत झाली.

मराठी भाषेला अधिक समृद्ध केलं. काही शब्द, शब्दप्रयोग, वाक्यांची मोडणी मध्य मराठीला अज्ञातच होती. या शब्दांना, शब्दप्रयोगांना दलित साहित्यानं मराठी भाषेच्या प्रवाहात आणून सोडलं. या दृष्टीनं हे साहित्य स्वागतार्हच मानावं लागेल. ●

# १७. डॉ. आनंद यादव

[ प्रथितयश ग्रामीण लेखक या नात्याने डॉ. यादव प्रसिद्धच आहेत. त्याबरोबरच त्यांनी अलीकडे ग्रामीण साहित्याचे रंगरूप स्पष्ट करण्याच्या हेतूने बरेच समीक्षात्मक लेखनही केलेले आहे. आजच्या ग्रामीण साहित्य चळवळीचे ते एक प्रमुख प्रवक्तेही आहेत. या दृष्टीने ग्रामीण साहित्याची एकंदर बैठक उलगडून दाखविण्याबाबत मी विनंती केली आणि त्या संदर्भात मला जाणवणारे काही प्रश्न त्यांच्यासमोर ठेवले. प्रस्तुत मुलाखत हा याचाच परिपाक.

आजची ग्रामीण साहित्य चळवळ आणि तिची उद्दिष्टे यांचा हा एक अधिकृत आलेख असल्यामुळे त्याचे वेगळे महत्त्व सांगण्याची आवश्यकता नाही.]

---

दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य चळवळीच्या संदर्भात काही विचार— आनंद यादव

दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांचा तुलनात्मक विचार करताना मनाशी एक व्यवस्था असली पाहिजे. या तुलनेत १९७० पर्यन्तचे ग्रामीण साहित्य घेता येणार नाही. कारण ते काही ग्रामीण साहित्याच्या चळवळीतून निर्माण झालेले साहित्य नाही. तसेच तें प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व ग्रामीण जीवनाशी निगडित आहे. दलित साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्याची चळवळ या स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळी आहेत. त्यामुळे या चळवळींच्या काळातीलच दलित साहित्याचा आणि ग्रामीण साहित्याचा तुलनात्मक विचार करणे योग्य आहे. पण ही शिस्त अनेक विचारवंत पाळत नाहीत. त्यामुळे सामान्य माणसाचा गोंधळ उडतो, त्याची दिशाभूल होते.

१९६७ ते १९७७ या दहा वर्षांच्या काळात निर्माण झालेल्या दलित साहित्याने आपल्या साहित्याचे वास्तव स्वरूप प्रकट केले. या काळात जाणकार भाष्यकारांनी दलित साहित्याची जी वैशिष्टचे व मोठेपणा सांगितला आहे, ते सर्व मान्य करूनसुद्धा असे निदर्शनास आले की ही चळवळ सामाजिकदृष्टचा एका विशिष्ट जातीपुरतीच प्रामुख्याने मर्यादित राहिली आहे.तसेच या चळवळीने साहित्याला प्रबोधनाचे

केवळ एक साधन मानल्याने दलित साहित्य एका आवर्तात भक्कमपणे सापडत चालले आहे. एखाद्या सामाजिक प्रश्नाचे वा समस्येचे साहित्य जेव्हा साधन बनते तेव्हा त्याला अगदी आरंभीच्या काळात मोठी शक्ती (वर्तमान जाणिवेशी भिडण्याची) प्राप्त होते. पण नंतर त्याच वर्तमान समस्यांवर त्याच त्याच जाणिवेच्या साहित्यकृती निर्माण होऊ लागतात आणि त्या अधिकाधिक आक्रस्ताळ्या, एकांगी होऊन समाजाचे लक्ष त्या समस्यांकडे वेधण्याचा प्रयत्न करतात आणि सामाजिक समस्यांचे असे असते की समाजातून त्या झटपट नाहीशा होत नाहीत. समाजाची अनेक वर्षे त्या खाऊन टाकतात. आणि साधनरूप झालेल्या साहित्याला त्या समस्या सुटेपर्यंत त्यांच्यावरच अधिक जोरदार, अधिकतर जोरदार साहित्याची निर्मिती करावी लागते.

या दहा वर्षांच्या काळात दलित साहित्याचे नेमके असेच होत गेले. त्यामुळे ते एकांगी, एकसूरी, आक्रस्ताळे, तेच ते विषय पुनःपुन्हा हाताळणारे, ठराविक जातीचे प्रश्न व समस्या तेवढ्याच मांडणारे झाले. बाकीचा सगळा समाज, त्यांचे सगळे प्रश्न, त्यांचे सगळे जगणे दांभिक आहे, सब झूट आहे, अशी विद्रोही जाणीव त्यांनी साहित्यातून व्यक्त केली.

परिणामी १९७७ च्या आसपास दलित साहित्याच्या चळवळीची तात्त्विक बैठक समग्र मराठी समाजातील दीन–दलितांच्या जाणिवा व्यक्त करणारी असली तरी प्रत्यक्ष चळवळ मात्र दलित समाजातील एका विशिष्ट जातीच्या व्यक्तीचे समूहपण व नेतृत्व व त्यांच्याच मर्यादित जाणिवांना दलित साहित्यातून आविष्कृत करू लागली. या काळात ही दुभंगलेली स्थिती स्पष्ट दिसू लागते. त्यांच्यातील अंतर्गत गटही वेगवेगळ्या भूमिका घेऊ लागले. प्रत्यक्षातील दलित साहित्य त्यांनी स्वीकारलेल्या वरील भूमिकेमुळे आवर्तात सापडू लागले.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा उदय झाला. या चळवळीचे वेगळेपण लक्षात यावे म्हणून व पूर्वीच्या ग्रामीण साहित्यापेक्षा वेगळी प्रेरणा स्वीकारल्याचे लक्षात यावे म्हणून ' आधुनिक ' हे विशेषण या चळवळीने स्वीकारले. स्वातंत्र्योत्तर काळातील लोकशाही आणि विज्ञाननिष्ठा प्रमाण मानून समाज व्यवस्थेची पुनर्मांडणी करावी, मानवी स्वातंत्र्याला, समतेला प्रतिष्ठा देऊन समाजाचे सर्व स्तर समान पातळीवर आणण्यासाठी झटावे. ऐंशी टक्के भारतीय जनता खेड्यापाड्यांत राहते. त्या खेड्यापाड्यांवर विविध सत्तांची केन्द्रे असलेल्या पाश्चात्त्य भांडवलशाही प्रवृत्तीच्या शहरांचा अनेक दिशांनी जुलूम होऊ नये, आज समाजाच्या सर्वच स्तरांतून माणूस शिक्षित होऊन जागृत होत आहे, त्या जागृतीला वेळीच सदाचार, सुविचार, नीतिमत्ता यांनी संपन्न करावे. त्यातून निर्माण होणाऱ्या विचारवंतांना, धुरीणांना, साहित्यिकांना आपल्या विशिष्ट जातीजमातींच्या कुंपणाबाहेर पडण्यास व समग्र समाजाचा विचार करण्यास, समग्र समाजाचे नेतृत्व करण्यास,

समग्र समाजाचा अनुभव घेऊन व्यापक पातळीवर देशी प्रकृतीचे, मराठीपण लाभलेले साहित्य निर्माण करण्यास प्रवृत्त करावे, या हेतूने ही ग्रामीण साहित्याची चळवळ चालविली जात आहे. या चळवळीत मराठी समाजाच्या सर्व स्तरांवरील साहित्यिक एकत्र आलेले आहेत. गेल्या काही वर्षांतील ग्रामीण साहित्याची शिबिरे, संमेलने, चर्चासत्रे इत्यादींमध्ये भाग घेणारे वक्ते, विचारवंत समाजाच्या सर्वच स्तरांतून येऊन आपापले विचार मांडतात, असे दिसून येईल. एवढेच नव्हे, तर 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' या चळवळीच्या काळातील संपादन केलेल्या पुस्तकात समाजाच्या सर्वच स्तरांतील व अनेक जातीजमातींतील साहित्यिकांच्या 'आधुनिक ग्रामीण कथा' असलेल्या आपणांस दिसून येतील.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीतील 'ग्रामीण जाणीव' ही दलित साहित्यातून प्रत्यक्षात दिसून येणाऱ्या जाणिवेपेक्षा मूलतःच व्यापक जाणीव आहे. समग्र मराठी समाजाचा एकच विचार करणारी ती जाणीव आहे. महात्मा फुले यांचा मानवतावाद व शाहू छत्रपती, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दीन–दलितांच्या विषयीची जाणीव तर ग्रामीण साहित्याची चळवळ मानतेच, पण ती आगरकरांचा बुद्धिप्रामाण्यवाद मानते. महात्मा गांधींची समग्र समाजाचा येथील परिस्थितीच्या संदर्भात विचार करणारी, विज्ञान व अध्यात्म यांचा मेळ घालणारी खास भारतीय दृष्टीही ती मानते. अर्थात विचार हा नेहमी प्रवाही असतो. त्यामुळे ही चळवळ कोणत्याही विचारवंताला शंभर टक्के प्रमाण मानत नाही, तर काळाच्या ओघात ज्या गोष्टी कालबाह्य झाल्या असतील त्यांना नाकारत, नवा समाजवादी, समतावादी विचार स्वीकारत सतत पुढे जाऊ पाहते आहे. दलित साहित्याच्या विरोधात ही चळवळ मुळीच नाही, पण काळाच्या ओघात दलित साहित्याच्या चळवळीला व प्रत्यक्ष साहित्याला पडलेल्या मर्यादांच्या पलीकडे जाण्याच्या प्रयत्नात ही चळवळ आहे.

ग्रामीण साहित्याची ही चळवळ प्रामुख्याने सांस्कृतिक चळवळ आहे. 'अशा अशा प्रकारचे, असे असे प्रश्न व समस्या घेऊन साहित्य निर्माण करा.' ही भूमिका ती मानत नाही. नव्याने जागृत झालेल्या समाजाच्या खालच्या स्तरातील साहित्यिक तरुणांपुढे नव्या समाज–मांडणीचे प्रश्न, समस्या, स्थिती, गती ती मांडते, त्या तरुणाला त्याच्या स्वत्वाचे भान देते, त्याचे व्यक्तिमत्व या दिशेने घडविण्याचा प्रयत्न करते. अशा नव्या युगाशी सामोऱ्या जाणाऱ्या व्यक्तिमत्वातून त्याचे साहित्य आकाराला यावे, अशी अपेक्षा ही चळवळ करते आहे. म्हणजेच पर्यायाने एकूण मराठी साहित्यविश्वाला व्यापणारी अशीच ही चळवळ आहे.

या चळवळींमधून निर्माण होणारे साहित्य आणखी पाच–सात वर्षांनी आपले वास्तव स्वरूप स्पष्टपणे प्रकट करील असे वाटते. १९७७ नंतर प्रसिद्ध होणाऱ्या

अनेक ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्यकृतीवर या चळवळीचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परिणाम होत चाललेला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. ‘ बळीराजा ’ मासिकातून या नव्या प्रवृत्तीच्या ग्रामीण साहित्याचे दर्शन गेल्या एक–दोन वर्षापासून घडत आहे. १९७७ नंतर साहित्य–संस्कृती मंडळाच्या अनुदान योजनेत अनेक ग्रामीण साहित्याची पुस्तके प्रसिद्ध झालेलीं आहेत, त्यातूनही हे दर्शन घडू शकेल. या चळवळीतून निर्माण होत असलेले ग्रामीण साहित्य हे नव्या बदलत्या खेड्याची स्पंदने टिपताना दिसेल. नव्या तरुणाला त्याच्या स्वत्वाची जाणीव होत चालल्याचे या साहित्यातून दिसून येईल. त्यात आक्रस्ताळेपणा, एकसूरीपणा, चिडखोरपणा, संतापीपणा दिसणार नाही. पण आताच या चळवळीतून निर्माण होणाऱ्या साहित्याची कुंडली मांडणे घाईचे होईल असे वाटते. समग्र समाजाला बरोबर घेऊन पुढे जावयाचे असल्याने या चळवळीची गती संथ दिसेल. तसेच तिचा परिणामही समग्र मराठी साहित्यावरच पडावा अशी अपेक्षा असल्याने तो परिणामही समाजाच्या एकाच गटावर, एकाच जातीच्या साहित्यिकावर न दिसता सर्वच वर्गांच्या साहित्यावर विखुरलेला दिसेल. तसेच साहित्याच्या अभिव्यक्तीतही अमूक एकच सूर लावावा, अशीही या चळवळीची सक्ती नसल्यानें त्यात विविधता असू शकेल. त्यामुळे दलित साहित्यासारखा त्याचा एकत्रित परिणाम दिसून येणार नाही.

प्रश्न : ‘ जनसाहित्य ’ आणि ‘ ग्रामीण साहित्य ’ यांच्या प्रेरणा एकच की वेगळ्या ?

‘ जनसाहित्य ’ आणि ‘ ग्रामीण साहित्य ’ हे बव्हंशी संवादी प्रकृतीचं साहित्य आहे. समग्र मराठी समाजात जो सामान्य माणूस (कॉमन मॅन) आहे, त्याचं जीवन, त्याच्या समस्या, प्रश्न, भावभावना, अनुभव यांना केंद्रस्थानी मानून साहित्य-निर्मिती झाली पाहिजे, अशी सर्वसाधारण ‘ जनसाहित्या ’ची भूमिका आहे. मार्क्स-वादातील अर्थविचार ते मानते. आधुनिक ग्रामीण साहित्यही हा विचार मानते. सामान्य माणसाचं जीवन केंद्रस्थानी असलं पाहिजे, हेही ग्रामीण साहित्य मानतं.

पण हा सामान्य माणूस प्रामुख्यानं . ग्रामीण विभागात राहतो, त्याला प्रमुख स्थान देणं आवश्यक आहे, अशी ग्रामीण साहित्याची आग्रही भूमिका आहे. जन-साहित्य हा आग्रह धरत नसावे, असं वाटतं. याबाबतीत त्याची भूमिका अजून स्पष्ट झालेली नाही. पुष्कळ वेळा मराठी समाजात असं दिसून येतं की शहरी जीवनातील सर्वसामान्य माणूस म्हणजे कामगार, किसान, कारकूनवर्ग यांचे हित-संबंध शहरी जीवनाशी निगडित असतात. शहरी जीवन हे आज तरी पुष्कळ वेळा ग्रामीण प्रश्न, समस्या, अन्नधान्यांच्या किंमती, ग्रामीण विभागातील वस्तूंच्या किंमती यांच्या विरोधात उभे राहताना दिसते. खेड्याच्या शोषणावर शहर उभे

राहते. याबाबतीत जनसाहित्य कोणती भूमिका घेते हे अजून स्पष्ट झालेले नाही. ग्रामीण साहित्याची भूमिका अशी आहे की, ग्रामीण विभागातील जनसामान्यांच्या प्रश्नांना अग्रस्थान देऊन ते सोडविले की शहरी जनसामान्यांचे बरेच प्रश्न सोडवायला मदत होऊ शकेल, याबाबतीतही जनसाहित्याची भूमिका अजून स्पष्ट नाही.

सारांश, जनसाहित्य आणि ग्रामीण साहित्य यांच्या भूमिकांचा वैचारिक गाभा बव्हंशी एक आहे. त्याची अंगोपांगे अजून नीट स्पष्ट झालेली नाहीत, म्हणून 'जनसाहित्य' व 'ग्रामीण साहित्य' हे एकच मानावयाचं की वेगळं? या प्रश्नाचं निर्णायक उत्तर अजून स्पष्ट होऊ शकत नाही. मात्र या चळवळी एकमेकींना अतिशय पूरक, पोषक आहेत असं मला वाटतं. त्या हातात हात घालून वेगवेगळ्या प्रदेशात कार्य करू शकतात. त्या वेगवेगळ्या प्रदेशात स्वतंत्रपणे आकाराला आलेल्या आहेत. स्वतंत्रपणे त्यांनी प्रगती केली आहे. त्यांना त्या त्या प्रदेशात त्यांची अशी खास 'अस्मिता' प्राप्त झालेली आहे. त्यामुळे आपापलं वेगळं नाव धारण करून त्या जर कार्य करीत असतील तर त्यांना ते करू दिलं पाहिजे. अंतिमत: एकाच प्रकृतीचे साहित्य निर्माण होणार आहे, असा विश्वास या दोन्ही चळवळींना वाटत असावा.

प्रश्न : ग्रामीण साहित्य व मार्क्सवादी विचार यांचं काही नातं तुम्ही मानता किंवा नाही ?

'मार्क्सवादी विचार' ही संकल्पना (मराठी समाजपुरतंच बोलायचं झालं तर) सतत प्रवाही राहिलेली आहे. तिचा अनेक अंगांनी सतत विचार होत राहिलेला आहे. वेळोवेळी त्याच्या उपांगांचे वेगवेगळे अर्थ (इंटरप्रिटेशन्स) लावले गेले आहेत. त्यांच्या सिद्धान्ताच्या आधारे उपसिद्धान्त बांधलेले आहेत. मार्क्सवाद प्रत्यक्षात आणण्यासाठी चीन–रशिया यांनी जी कृत्यं केली, उपाययोजना केल्या, त्यांना मार्क्सवादात मान्यता आहे की नाही, याबद्दल मतभेद आहेत. त्यात पुन्हा मार्क्सवादाचं चुकीचे इंटरप्रिटेशनही झालं असण्याची शक्यता आहे.–या सर्वांचा मी खोलात जाऊन अभ्यास केलेला नाही. म्हणून 'मार्क्सवादी विचार' हा शब्दप्रयोग मी करणं व त्याच ग्रामीण साहित्याशी संबंध जोडणं माझ्यापुरतं तरी मी योग्य मानत नाही. मात्र मार्क्सचा गाभ्याचा आर्थिक समतेचा विचार, श्रममूल्याचा विचार, अर्थनिष्ठ समाजरचनेचा विचार मला तात्त्विकदृष्टया मान्यच आहे. तो विचार स्वीकारल्याशिवाय जनसामान्याला आर्थिक न्याय मिळूच शकणार नाही. मात्र एक संवेदनशील साहित्यिक म्हणून आर्थिक समता एवढंच जीवनमूल्य आहे आणि त्या मूल्याच्या मोबदल्यात बाकीच्या जीवनमूल्यांचा होम करावा, बळी द्यावा असं मला वाटत नाही. काही मार्क्सवादी हा आग्रह धरतात, तो मला मान्य नाही. ते साहित्याला साधनीभूत करतात, ते मला मान्य नाही. सत्य, शिव, सुंदर ही मूल्यं मी मानणारा आहे. याबाबतीत मार्क्सवाद नक्की काय म्हणतो, ह्याची मला

निश्चित माहिती नाही. अशा परिस्थितीत मार्क्सवाद व ग्रामीण साहित्य यांचं नातं प्रस्थापित करणं मला धोक्याचं वाटतं. ग्रामीण साहित्याची चळवळ सामाजिक समता मानणारी असल्यामुळे कदाचित हे नातं अगोदरच आपाततः निर्माणही झालं असण्याची शक्यता आहे, एवढंच मी म्हणू शकेन.

प्रश्न : एका बाजूनं साहित्याचा आणि सामाजिक परिवर्तनाचा संबंध तुम्ही मानता, आणि साहित्य हे प्रत्यक्ष परिवर्तनाशी निगडित झालं की कोणते धोके संभवतात, हेही स्पष्ट करता. तुमच्या मते या संदर्भात साहित्याची सुयोग्य दिशा कोणती ?

सामाजिक परिवर्तनासाठी साधन म्हणून साहित्याचा वापर करणं हे धोक्याचंच आहे. पण साहित्यिकाच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाला समाजात जे अनुभव येतात, हे अनुभव जेव्हा कलात्मक अनुभवात रूपांतरित होऊन साहित्याचं रूप धारण करतात तेव्हाच त्या साहित्याला 'साहित्यपण' प्राप्त होतं आणि ते साहित्य परिवर्तनाकडे आपलं बोट दाखवितं. याला मी अंतरंगी परिवर्तनशील स्वभावाचं साहित्य म्हणेन. पण समाजाचं अमूक एका दिशेनं परिवर्तन झालं पाहिजे, ही इच्छा बाळगून जेव्हा साहित्याच्या मूळ प्रकृतीचा विचार न करता तिच्यावर बलात्कारानं हा हेतू लादला जातो, तेव्हा साहित्याला खरा धोका निर्माण होतो. सामाजिक परिवर्तनाची आत्यंतिक गरज वाटल्यानं हाताशी असलेल्या साहित्याचा या गरजेसाठी सहज वापर होण्याचा धोका असतो. उदाहरणार्थ, दलित साहित्यात अशी विपुल उदाहरणं आहेत.

प्रश्न : यावर तुमच्या मते उपाय ?

यासाठी उत्तम साहित्यिक व्यक्तिमत्त्व घडविणं,त्या व्यक्तिमत्त्वाचा भोवतालच्या सामाजिक परिस्थितीचा परिचय यथार्थपणे करून देणं, तिच्यातील ताणतणाव समजून देणं व हे समजून देऊन त्या साहित्यिकाला सुचवणं की, आता जीवनात तुला वाटतील तसे अनुभव घे, त्याचा अन्वयार्थ लाव, त्यातील परस्परासंबंध शोध, त्यांचा पूर्ण विचार कर, सर्वांगांनी ते न्याहाळ आणि तुला योग्य वाटेल ते साहित्य निर्माण कर. त्याच्या आंतरिक उमाळ्यातून आणि प्रामाणिक अनुभवातून जे साहित्य जन्माला येईल ते खऱ्या अर्थाने परिवर्तनशील असण्याचीच शक्यता आहे, असं मला वाटतं. हीच परिवर्तनशील साहित्यनिर्मितीची सुयोग्य दिशा होय. या दिशेनं जाताना प्रत्येक वेळी परिवर्तनशील साहित्य निर्माण होईल, असं मानणंही धोक्याचं आहे. मात्र हे खरं की, अशा व्यक्तिमत्त्वातून जे परिवर्तनशील साहित्य निर्माण होईल ते पहिल्यांदा साहित्य असेल आणि मग ते परिवर्ततशील असेल. अशा साहित्याची अपेक्षा ग्रामीण साहित्याची चळवळ करीत असते. कारण ते नुसतं साहित्य निर्माण करणारं व्यक्तिमत्त्व नसतं, संपन्न सामाजिक व्यक्तिमत्त्व

नसत, तर ते साहित्यिक व्यक्तिमत्त्वही असतं. त्यामुळे त्या व्यक्तिमत्वाला उत्तम साहित्य म्हणजे काय याचंही भान असतं. तसं ज्ञान त्याला त्याच्या एकूण घडणीच्या वेळीच दिलेलं असतं, असं इथं गृहीत धरलेलं आहे. निदान ग्रामीण साहित्याची चळवळ ही दक्षता घेत आलेली आहे. तरुण पिढीच्या ग्रामीण साहित्यिकाचं व्यक्तिमत्त्व या दोन (सामाजिक आणि वाङमयीन) पातळ्यांवर घडविण्याचं कार्य ती सावधपणे करत आहे.

प्रत्यक्ष संमेलनं, शिबिरं, चर्चासत्रं यांतून हे कार्य चाललेलं असतं. विशेषत: संमेलनांतून किंवा शिबिरांतून तरुण पिढीच्या लेखकांच्या समाजपरिवर्तनशील अनुभव व्यक्त करणाऱ्या कथांची या दोन्ही पातळ्यांवर चर्चा करणारे कार्यक्रम योजिलेले असतात. त्यातून त्यांचे या दोन्ही पातळ्यांवर मूल्यमापन होते, त्यांची सांगड कशी घालता येईल याची मीमांसा केली जाते.

प्रश्न : ग्रामीण साहित्यिकांच्या पहिली, दुसरी, तिसरी अशा तीन पिढ्या तुम्ही मानता. त्या कोणत्या निकषांवर तुम्ही मानलेल्या आहेत?

स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यिकांच्या या तीन पिढ्या कल्पिलेल्या आहेत. १९५० च्या आसपास उदयाला आलेली पहिली, १९६० च्या आसपास उदयाला आलेली दुसरी व १९७० च्या आसपास उदयाला आलेली तिसरी पिढी होय.

पहिली पिढी स्वातंत्र्यपूर्वकाळातील ग्रामीण जीवनाचे अनुभव आपल्या साहित्यातून प्रामुख्याने मांडते. ग्रामीण समाजाच्या वरच्या स्तरात ती प्रामुख्यानं जन्माला आलेली आहे. ती प्रामुख्यानं कलावादी आहे. नागर वाचकवर्ग तिच्या मनासमोर असतो. या कारणांमुळं या पिढीच्या साहित्याला एक विशिष्टता प्राप्त झालेली आहे.

दुसरी पिढी स्वातंत्र्यपूर्वकाळात जन्माला येऊन स्वातंत्र्योत्तर काळाचेही तिच्या मनावर बालपणी संस्कार झालेले आहेत. ती ग्रामीण समाजाच्या खालच्या स्तरातून (उदाहरणार्थ, छोटा शेतकरी, दुसऱ्याची शेती करणारे शेतकरी, कोरडवाहू शेतकरी, शेतमजूर इ.) जन्माला आलेली आहे. त्यामुळे या पिढीच्या व पहिल्या पिढीच्या सामाजिक दृष्टिकोनात फरक पडलेला आहे. कलावादी असली तरी परिवर्तनशील सामाजिक आशयाकडे झुकू लागलेली दिसते. नागर वाचकवर्गापेक्षा ग्रामीण समाजात नव्याने उदयाला आलेल्या वाचकवर्गाकडे तिनं लक्ष दिलं. त्यातून ग्रामीण भाषेचा माध्यम म्हणून तिनं मोठ्या प्रमाणात स्वीकार केला त्यामुळे ग्रामीण साहित्याचं स्वरूप बदलत गेलं.

तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातच जन्माला आली आणि त्यातच वाढली. ग्रामीण समाजपरिवर्तनाशी तिचा बालपणापासून घनिष्ट संबंध आला. ती समा-

जाच्या आणखी खालच्या स्तरातील प्रामुख्याने आहे. स्वातंत्र्योत्तर जे समाजपरिवर्तन झालं त्यातून या पिढीच्या नशिबी वेगळे अनुभव, वेगळे प्रश्न, वेगळ्या समस्या आल्या. त्या प्रखरपणे आल्या. तिच्या मनासमोरचा वाचकवर्ग संपूर्णपणे ग्रामीण वाचकवर्ग आहे. तिचं समाजपरिवर्तनाचं भान अधिक प्रखर आहे. प्रसंगी कलात्मकतेची परवड पत्करून ती साहित्यनिर्मिती करते आहे.

प्रश्न : ग्रामीण साहित्याचं शहरी साहित्याशी नातं काय ?

' शहरी साहित्य ' म्हणजे शहरी जीवनातील अनुभव, प्रश्न, समस्या, ताणतणाव येवढंच महत्त्वाचं मानून तेच सर्व एकूण मराठी समाजाचेही ताणतणाव आहेत असं मानून, व्यक्तिकेंद्रित वृत्तीला विशेष प्राधान्य देऊन जे लिहिलं जातं ते साहित्य.

या शहरी साहित्यालाच आजवर ' मराठी साहित्य ' अशा शब्दप्रयोगानं संबोधलं जात असे. पण त्यात अतिव्याप्तीचा दोष आहे. हे ग्रामीण साहित्याच्या चळवळीनं प्रथम निदर्शनास आणलं आणि त्या साहित्याची मर्यादा सांस्कृतिक दृष्टचा, आशय दृष्टचा फक्त शहरी जीवनापुरतीच आहे, हे दाखवून दिलं. अर्थात तेच तेवढं 'मराठी साहित्य ' नसून, ते ' मराठी सहित्या 'चा एक भाग आहे हे मान्यच केले पाहिजे.

आधुनिक ग्रामीण साहित्याची भूमिका अशी आहे की, मराठी समाजात ७५ ते ८० टक्के समाज ग्रामीण बिभागात राहतो. त्यामुळे खरा मराठी समाज ग्रामीण विभागात आहे. या ग्रामीण समाजाचं प्रतिबिंब असलेलं साहित्यच खरं प्रातिनिधिक ' मराठी साहित्य ' असणार. म्हणून शहरी साहित्यिकांनी आपले शहरी जीवन, शहरी समाज, शहरी अनुभव यांचा एकूण ग्रामीण समाजाशी काय संबंध आहे, याचा शोध घेऊन त्या व्यापक पातळीवर साहित्यनिर्मिती केली पाहिजे, तरच ते साहित्य खऱ्या अर्थानं ' मराठी साहित्य ' होऊ शकेल.

प्रश्न : आजच्या ग्रामीण जीवनामध्ये ज्या काही अपप्रवृत्ती निर्माण होत आहेत, त्याकडे हे साहित्य अंगुलिनिर्देश करीत नाही, असा एक आक्षेप ग्रामीण साहित्यावर घेतला जातो. यासंबंधी आपलं मत काय ?

हा आक्षेप बरोबर नाही. आधुनिक गामीण साहित्य वाचलं तर या आक्षेपात काही तथ्य नाही असं दिसून येईल. आनंद यादव, रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्या, बाबाराव मुसळे, दे. शि. दुधलकर, श्रीराम गुंदेकर, शेषराव मोहिते, आनंद पाटील यांच्या कथा वाचल्या तर खेड्यांतील अपप्रवृत्तींवरच या साहित्यिकांनी आपली लेखणी टेकविलेली आहे, हे दिसून येईल.

प्रश्न : ग्रामीण साहित्याने विविध साहित्यप्रकार हाताळलेले दिसत नाहीत. विशेषतः नाटक, कविता हे साहित्यप्रकार क्वचितच दिसतात. असं कां व्हावं ?

' नाटक ' हा प्रकार ' परफॉर्मिंग आर्ट ' चा प्रकार आहे. ' प्रयोगा 'शिवाय

त्याला अस्तित्व प्राप्त होऊ शकत नाही. आणि नाटक करणाऱ्या कंपन्या फक्त शहरांत असतात. विशेषतः फक्त पुणे–मुंबईतच आहेत. आणि नव्या पिढीचे ग्रामीण लेखक प्रामुख्यानं या शहरांबाहेर राहतात. त्यामुळे त्यांना नाटक पाहणं, अनुभवणे व कंपनीशी संपर्क साधणं कठीण जातं. त्यामुळे तो प्रकार बाजूला पडला आहे. पण नाटकातून व्यक्त करावयाचा अनुभव ते अन्य साहित्यप्रकारांच्या द्वारा व्यक्त करू शकतात. म्हणजे 'नाटक' न हाताळल्यामुळे काही विशिष्ट सामाजिक अनुभव व्यक्त होत नाहीत, अशी अवस्था नाही.

कवितेच्या बाबतीतही तेच. कवितासंग्रह एक तर प्रकाशक व नियतकालिकांचे संपादक छापत नाहीत, किंवा फार कमी प्रमाणात छापतात. दुसरं असं की, ग्रामीण साहित्याची मूळ प्रकृती 'वास्तवदर्शी' आहे. कविता हा साहित्यप्रकार काहीसा आत्मनिष्ठ, रोमॅन्टिक भावनेला अनुकूल असा आहे. त्यामुळे कविता कमी प्रमाणात दिसते. पण आताशा अनेक नवे ग्रामीण कवी उदयाला येऊ लागले आहेत. ग्रामीण साहित्य संमेलनांच्या कवि-संमेलनात त्याचा प्रत्यय येतो. 'बळीराजा'मध्ये आता नेमानं ग्रामीण कविता प्रसिद्ध होत असतात.

प्रश्न : 'देशीपणाची' तुमची कल्पना काय आहे ?

'देशीपण' म्हणजे पुनरुज्जीवन वाद नव्हे. या मातीत जनसामान्याला जीवन जगताना, एकूण समाजाचं परिवर्तन होत असताना, स्थित्यंतर होत असताना ज्या ज्या संघर्षाला तोंड द्यावं लागत आहे ते सर्व 'देशी'च आहे. 'विज्ञान' हे परकं नसतं. ते जागतिक आहे. ते जीवनात प्रवेश करताना जी मोडतोड होते आणि जुन्या-नव्याचा संघर्ष होतो तो देशीच आहे. 'देशीपणा' म्हणजे जुनी संस्कृती, मूल्यं, समाजव्यवस्था यांचं पुनरुज्जीवन करणं, असा अर्थ घेणं म्हणजे जाणीवपूर्वक आड-रानात घुसणं होय.

प्रश्न : या प्रश्नांव्यतिरिक्त आपणास आणखी काही म्हणावयाचं आहे काय ?

एकूण मराठी साहित्यक्षेत्राचा विचार करताना मला अलीकडे सारखे असं वाटतं की, 'साहित्यिका'ची संकल्पनाच आपण बदलून घेण्याची मुळात आवश्यकता आहे. आजवर मराठी साहित्यक्षेत्रात साहित्यिक हे आपापल्या जातीपुरते, स्वतःच्या चाकोरीतील जे काही अनुभव आलेले असतात तेवढ्यावरच आपल्या साहित्यनिर्मितीची गुजराण करतात. त्यांच्या या वृत्तीमुळेच मराठी साहित्याला अनेक मर्यादा पडत गेल्या. वास्तविक साहित्यिक हा प्रतिभावंत असतो, असं आपण मानतो. अशा प्रतिभावंत साहित्यिकानं आपली जात, वर्ग, स्वतःचे चाकोरीतील अनुभव यांच्याबाहेर प्रथम पडलं पाहिजे व समग्र मराठी समाजाचे, माणसाचे, त्या त्या काळाचे अनुभव आपलेसे केले पाहिजेच. या अनुभवांवर आधारित जो साहित्य-

कृती निर्माण करील त्यालाच आपण खऱ्या अर्थानं 'साहित्यिक' मानलं पाहिजे असं जर झालं तरच मराठी साहित्यात 'मराठी संवेदना' खऱ्या अर्थानं प्रतिबिंबित होईल असं वाटतं. या चळवळींनी हा ध्यास घेतला तरच त्यातून निर्माण होणाऱ्या साहित्यिकांना व साहित्याला अर्थपूर्णता प्राप्त होईल, अन्यथा हे सर्व प्रयत्न व्यर्थ जातील.

# १८. प्रा. या. वा. वडस्कर

[ प्रा. या. वा. वडस्कर हे इंग्रजीचे एक नामवंत प्राध्यापक आहेत. त्यांचे वास्तव्य नागपूर येथे आहे. नागपूर येथील धनवटे कॉलेजचे काही काळ ते प्राचार्यही होते. पण प्रा. वडस्कर यांची जी विशेष ख्याती आहे, ती जनसाहित्य चळवळीचे पुरस्कर्ते आणि एक विलक्षण समाजमनस्क साहित्यसमीक्षक म्हणून ! त्यांचे विचार नेहमीच नवदर्शन घडवितात.

ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य या दोन चळवळींप्रमाणे जनसाहित्याची चळवळ ही बहुजन समाजाच्या कैवारातूनच जन्माला आलेली एक सामाजिक–सांस्कृतिक–साहित्यिक चळवळ आहे. ती केवळ विशिष्ट जातीपुरती, वर्गापुरती वा ग्रामीण समाजापुरती मर्यादित नाही. ती सर्वच प्रकारच्या जनसामान्यांचा–शहरी वा ग्रामीण– कैवार घेते. या दृष्टीने तिचे अधिष्ठान दलित वा ग्रामीण साहित्य चळवळीहून अधिक व्यापक आहे. तिचे दुसरे वैशिष्टच तिच्या देशी-पणाच्या जाणिवेत आहे. ही चळवळ पश्चिम महाराष्ट्राला जरी फारशी परिचित नसली तरी नागपूर भागात ती पसरत चालल्याचे दिसते. प्रा. वडस्करांचा कल मार्क्सवादाकडे असला तरी त्यांच्या देशीपणाच्या भानामुळे त्याला एक अस्सल भारतीय परिमाण लाभले आहे. त्यांच्या ग्रामीण साहित्यावरील लेखाचा काही भाग येथे यासाठीच त्यांच्या अनुमतीने पुनर्मुद्रित केलेला आहे. ]

---

## चेहऱ्याच्या शोधात ग्रामीण साहित्य

प्रश्न : दलित साहित्य चळवळीच्या यशाचे रहस्य काय ? प्रस्थापित साहित्या-प्रमाणेंच दलित साहित्याच्या यशाचे रहस्य साहित्यिकांच्या प्रतिभेत शोधणें वेडेपणाचे ठरेल. उच्च दर्जाच्या साहित्यनिर्मितीमधील प्रतिभेचे योगदान मान्य करावे लागतेच. परंतु अव्वल प्रतिभेचे देणे लाभलेल्या अनेक साहित्यिकांचे नेतृत्व मिळूनही मार्क्सवादी व ग्रामीण साहित्य चळ-वळींना दलित साहित्य चळवळीएवढे यश का प्राप्त होऊ शकले नाही ?

या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपल्याला पुन्हा सामाजिक संदर्भाकडे वळावे लागते.

इतर नववाङ्मयीन चळवळींच्या तुलनेत दलित साहित्यामागील सामाजिक प्रेरणा अधिक जोरकस आहे. प्रस्थापितांच्या वर्चस्ववादाला सरळ आव्हान देत ती उभी राहते. हजारो वर्षांच्या अन्यायाची पार्श्वभूमी असल्यामुळे दलित मन आपली प्रतिक्रिया ज्वालामुखीच्या संहारक संतप्तपणाने व्यक्त करते.

शतकानुशतके अस्पृश्यतेचा जाच सहन करावा लागल्यामुळे दलित मन वर्तमान समाजव्यवस्था जशीच्या तशी स्वीकारू शकत नाही. डॉ. आंबेडकरांच्या एकमुखी तेजस्वी नेतृत्वाचा लाभ झाल्यामुळे दलित साहित्य चळवळीचे वैचारिक व तात्त्विक अधिष्ठान निःसंभ्रमी स्वरूपाचे आहे. हजारो वर्षे संपूर्णतः वंचित, पीडित व शोषित अवस्थेत राहावे लागलेला दलित समाज आत्मभान प्राप्त होताच आत्महक्कांसाठी युद्धमान झालेला आहे. दलित साहित्य चळवळीचा शक्तिस्रोत या सामाजिक पार्श्वभूमीत आहे.

प्रस्थापितांप्रमाणेच दलित साहित्य हेही अल्पसंख्याकांचेच. प्रस्थापित साहित्य जसे संपूर्ण मानवतेचे साहित्य नाही, तसेच दलित साहित्यातून संपूर्ण सोषित वर्गाचे मन व्यक्त होत नाही. अस्पृश्यतेचा दाहक पूर्वानुभव हे या चळवळीचे मुख्य बलस्थान. यातूनच त्याचे वर्मस्थान निर्माण होते. त्याचे आवाहन दलितेतर (पूर्वास्पृश्य) मनापर्यंत पोहोचू शकत नाही.

प्रश्न : भारताचे असली रूप ग्रामीण. येथील ऐंशी टक्के लोक खेड्यांमध्ये राहतात. या ऐंशी टक्क्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ग्रामीण साहित्य चळवळीला लक्षवेधी यश का प्राप्त होऊ नये ?

या प्रश्नाची अनेक उत्तरं दिली गेली आहेत. परंतु यापैकी कोणतंच उत्तर समस्येच्या केंद्रबिंदूवर नेमकेपणानं बोट ठेवण्यात यशस्वी झालेलं नाही.

ग्रामीण साहित्य चळवळीला अपेक्षित यश प्राप्त होऊ शकलं नाही, याची कारणं अनेक असली तरी मुख्य कारणं दोन. पहिलं कारण हे की या चळवळीला अजूनपावेतो आपला चेहरा गवसलेला नाही. दुसरे कारण : एक अपरिहार्य गरज म्हणून व इतिहासक्रमातून आपल्यावर अपरिहार्यपणे सोपवलं गेलेलं एक सामाजिक दायित्व आपल्याला पार पाडावयाचं आहे; आजवर अन्यायाने नाकारण्यात आलेली अस्मिता व आपलं हक्काचं स्थान आपल्याला प्राप्त करून घ्यावयाचे आहे, हे भान या चळवळीला अजूनपर्यंत प्रपाती सामर्थ्य घेऊन आलेलं नाही.

प्रश्न : ' ग्रामीण साहित्याला आपला चेहरा अजून गवसलेला नाही.' या विधानाचा नेमका अर्थ कोणता ?

या विधानाचा नेमका अर्थ हा की ज्याप्रमाणे प्रस्थापित हा अर्थ साहित्य व दलित साहित्य यांना आधारभूत असणाऱ्या तात्त्विक व ध्येयविषयक संकल्पना सुस्पष्ट व सुनिश्चित आहेत, तशा त्या ग्रामीण साहित्याच्या बाबतीत नाहीत.

अर्थात याचीही कारणं आहेत. प्रस्थापितांचा वर्ग व दलितांचा वर्ग यांचं स्वरूप एकात्म आहे. आपलं पूर्वप्रस्थापित वर्चस्व कायम ठेवणं ही एकाची आकांक्षा, तर आजपर्यंत अन्यायाने नाकारण्यात आलेलं स्थान प्राप्त करणं, ही दुसऱ्याची. आर्थिक दृष्टीनंसुद्धा या वर्गाचं स्वरूप पूर्णत: नसलं तरी परिणामत: एकसंध आहे.

ग्रामीण समाजासंबंधीची वस्तुस्थिती वेगळी आहे. समाजाचे ग्रामीण व नागर असे वर्गीकरण आपण करू शकत असलो व त्या आधारावर काही परस्परभिन्न वैशिष्टयांचा निर्देश करू शकत असलो, तरी नागर समाजाप्रमाणेच ग्रामीण समाजाचं स्वरूपसुद्धा एकात्म नसतं. एक संघटित व समध्येयी समाजविभाग म्हणून सामाजिक–राष्ट्रीय ध्येयधोरणांवर प्रभाव पाडण्यासाठी जी एकात्मता आवश्यक असते, ती ग्रामीण जीवनात अस्तित्वात नाही.

मानवी समाजाला विभाजित करणारे बहुसंख्य प्रभावी घटक कोणत्याही खेड्यात कार्यरत असतात. इथे जातीधर्माची विभागणी असते. खानदानी–बिगर खानदानीपणाच्या मधल्या भिंती असतात. राजकीय पक्षांच्या मारामाऱ्या असतात. पारंपरिक भाऊबंदकी असते. सर्वात मुख्य म्हणजे भांडवली पद्धतीने नफ्यासाठी शेती करणारा बड्या शेतकऱ्यांचा शोषक वर्ग, मध्यम कृषकांचा वर्ग व श्रम विकून पोट भरणारा अल्पभूधारकांचा व शेतीविहीन मजूरांचा शोषित वर्ग, हे सर्व आर्थिक वर्ग एकाच खेड्यात नांदत असतात.

या विभिन्न ग्रामीण वर्गांचे आर्थिक व सामाजिक हितसंबंध भिन्न असतात. वर्चस्ववादी प्रस्थापित व सामाजिक विषमता निर्मूलनवादी दलित यांच्यातही हितसंबंधांच्या दृष्टीनं संपूर्ण एकरूपता नसते. परंतु त्यांच्यातील विभाजक घटक क्षीण असतात. त्यांना एकत्र बांधून ठेवणारा धागा मात्र घट्ट, चिवट व अतूट असतो. ग्रामीण समाजाच्या बाबतीत ग्रामीणत्वाचा धागा कच्चा असतो. आपल्या लहानशा क्षेत्रात सामूहिकतेचे संस्कार घडविण्याकडे त्याला जाता येत नाही. साहित्याचाच नव्हे, तर अन्य कोणत्याही सामाजिक–राष्ट्रीय अंगावर त्याचा प्रभाव पडत नाही, तो यामुळे.

ग्रामीण समाजातील एकात्मतेचा अभाव व फलस्वरूपी प्रभावी सामाजिक प्रेरणेचा अभाव, ही ग्रामीण साहित्याची प्रमुख अडचण होय. ही अडचण दुर्लंघ्य आहे असं मात्र नाही. ग्रामीणतेसंबंधीचं आपलं आकलन निर्दोष करून या अडचणीवर मात करता येणं शक्य आहे. या आकलनानुसार ग्रामीण जीवनातील अस्सल ग्रामीण घटक कोणते व या जीवनाला विकृत करणारे बाह्य वसाहतवादी घटक कोणते, याचे विश्लेषण आपल्याला करता येतं व चळवळीचं होकायंत्र तयार होतं.

अस्सल ग्रामीण समाज म्हणजे कृषिनिष्ठ समाज होय. सामुदायिक उत्पादन व समान उपभोग या तत्त्वांवर चालणाऱ्या प्राचीन गणराज्यांमध्ये या समाजाच्या

मूळ मानसिक प्रकृतीची जडणघडण झालेली. या समाजात आज दिसून येणाऱ्या दुष्प्रवृत्ती म्हणजे आक्रमक वसाहतवाद्यांनी त्यावर लादलेल्या विकृती होत.

या समाजाची कृषिनिष्ठा म्हणजे निव्वळ कृषिजीवित्व नव्हे. कृषिनिष्ठ माणसं काळ्या आईची लेकरं असतात. मातृगुण आत्मसात करून ती आपल्या धरणी-मातेची सेवा करतात. पृथ्वीची रूपे तशी अनेक. फुलपाखरांच्या मुक्त, मोहक रूपां-पासून तो अथांग महासागरापर्यंत अनेक रूपांमध्ये ती वावरते. तिचं खास व गाभ्याचं रूप मात्र एकच, ती जीवनदायिनी असते. पृथ्वी म्हणजे क्षमाशील, विशाल हृदयी, धारक व पोषक आदिमाता. हे धरातत्त्व म्हणजेच कृषितत्त्व होय. ग्रामीण जीवनातील मध्यवर्ती आधार याच कृषितत्त्वाकडून प्राप्त होतो.

कृषिनिष्ठ समाज म्हणजे केवळ शेतीवर राबणारा समाज, असे मात्र नाही. कृषीशी संबंधित व इतर उपक्रमांशी व एकूण कृषक समाजाच्या सामाजिक अंगाशी जैव पद्धतीने जोडले गेलेले सुतार, लोहार, कुंभार, बुरुड, महार, मांग, चांभार, न्हावी, शिंपी, विणकर, सोनार यासारखे समाजविभाग हेसुद्धा कृषिनिष्ठ समाज होत.

ही मंडळी बिगरकृषी कामं करतात ती सामाजिक दायित्व म्हणून! विशाल ग्रामरथाच्या अनेक चाकांपैकी एक चाक म्हणून त्यांच्या कामांमागे व्यावसायिक नफेखोर प्रेरणा नसते. शिवाय, यापैकी बहुतेकांजवळ स्वतःची थोडीशी तरी शेती असतेच.

समाजविकासाच्या क्रमात एक अनिवार्य गरज म्हणून ग्रामीण समाजातही श्रम-विभाजन झालं. शोषकवर्गानं आपल्या स्वार्थसिद्धीसाठी निर्माण केलेल्या जाती-व्यवस्थेचा प्रभाव असूनही कालपरवापर्यंत ग्रामीण समाज श्रमविभाजित झाला तरी माणूस विभाजित झाला नव्हता. त्याची मूळ प्रकृती विभाजनाची नाहीच. समाज-निर्मितीसाठी अत्यावश्यक असलेली सामूहिकतेची ओढ, हे तर या समाजाचे प्रमुख वैशिष्टच!

कृषक सपाज मुख्यतः निर्मितीशील असतो. त्याचे मन विशाल असते. कुठलीही अहंकारी जाणीव वाढू न देत तो आपले जीवनवर्धक कर्तव्य करीत राहतो. तो फक्त इतर माणसांनाच नव्हे, तर पशू, पक्षी व वृक्ष यांनासुद्धा सगेसोयरे मानतो. तो गायींची, बैलांची, रेड्यांची पूजा करतो. वड, पिंपळ, आंबा, औदुंबर, पळस, आवळा व इतर अनेक वृक्ष त्याला पवित्र वाटतात. गोमुत्राला तो अमृत मानतो. माती तर त्याची माताच असते.

घरच्या जनावराला दुखापत झाली तर आपल्याच काळजाला जखम झाल्या-सारखं त्याचं मन ठसठसतं. शेतावरचं कणीस कुणी तोडलं तर आपल्या लेकरावर आघात झाल्याप्रमाणे तो तळमळतो.

ग्रामीण मानसिकतेचं सारतत्त्व सांगायचं झाल्यास आपण असं म्हणू शकतो की

ग्रामीण मानसिकता धारक, पोषक व सृजनशील श्रमांमध्ये रमणारी असते. याउलट, बिगर ग्रामीण मानसिकतेच्या उपक्रमांमागील प्रेरणा इतरांच्या श्रमांवर गब्बर होणारी, म्हणजेच परोपजीवी असते.

प्रत्येक खेड्यात शेतीची मालकी असलेला, परंतु तिच्यावर प्रत्यक्ष न राबणारा व नफ्यासाठी शेती करणारा एक वर्ग असतो. हा सावकार, जमीनदार, मालगुजारांचा वर्ग ऐश्वर्याला देव मानतो. माणसाला माणूस मात्र मानीत नाही. जनावरं त्याच्या दृष्टीनं ढोरं असतात, माणसं गुलाम. सूत्ररूपानं सांगावयाचं झाल्यास हा वर्ग नागर नफेखोर वर्गाप्रमाणेच स्वेतर जगाकडे उपयुक्ततावादी दृष्टीनं पाहात असतो. आपल्या फायद्याची एक वस्तू या पलीकडे त्याला कशाचीच महती वाटत नाही. प्रादेशिक दृष्टीनं हा वर्ग ग्रामीण असला तरी वास्तविक अर्थानं तो वसाहतवादी परकीय असतो.

ग्रामीण समाजाचं दुर्दैव हे की आजच्या बदलत्या समाजवास्तवाचा प्रभाव म्हणून जे बाहेरचे लोक नव्याने खेड्यात प्रवेश करतात, त्यांचा मानसिक झुकाव अस्सल ग्रामीणतेकडे नसून नकली नागरतेकडे अधिक असतो. यात डॉक्टर्स, नर्सेस, ग्रामसेवक, पटवारी, शिक्षक व अन्य सरकारी नोकर यांचा समावेश होतो. या वर्गाच्या घनिष्ट संपर्कात येणारं ग्रामीण नेतृत्वसुद्धा याचं भ्रष्टीकरण प्रक्रियेत सापडलेलं दिसतं.

अस्सल ग्रामीण मन मात्र निर्जीव वस्तूकडेसुद्धा आत्मौपम्य बुद्धीनं पाहते. शेती त्याची आई असते. जनावरे भाऊ, बहीण, माता–लेकरांसारखी त्याला वाटतात. आपल्या अवजारांना तो देवाचे दान समजतो. त्यांच्या पूजेसाठी वर्षातला एक तरी दिवस राखून ठेवतो. तो देववादी व दैववादी असतो; तरी त्याच्या भावविश्वात सर्वोच्च स्थान असतं ते माणसालाच. तो तोंडानं नशीब व उप्परवाल्याची मर्जी यांचा उच्चार करीत राहतो. तरीसुद्धा आपल्या कष्टामधला विश्वास कधीच गमावत नाही.

ग्रामीणतेसंबंधीचं हे विश्लेषण केवळ प्रादेशिक कसोटयांनी निश्चित होत नाही. त्याच्यामागे एक व्यापक व अर्थघन मूल्यात्मकता आहे. ' ग्रामीण जीवनात दैन्य, दारिद्र्य व अभाव यांचा अंमल चालतो. ते स्थितिशील असतं. आधुनिकतेपासून ते दूर असतं. आधुनिक यांत्रिक संस्कृतीच्या आक्रमणाखाली ते कोसळून पडत आहे...' खेड्यासंबंधीचे हे विश्लेषण असत्य नसलं तरी त्याचं स्वरूप बाह्यलक्षणात्मक आहे. या बाह्यलक्षणाचे मूळ आंतरिक ग्रामीण मानसिकतेत आहे, हे विसरता येत नाही.

ग्रामीण समाज स्थितिशील क्रांतिविरोधी असतो, असं भारतातले कथित विचारवंत मानतात. पण ही गोष्ट खरी नाही. प्रामुख्याने धारक व पोषक भूमिका पार पाडणारा ग्रामीण समाज पृथ्वीच्या अंतर्भागासारखा असतो. आपल्या अमर्याद

क्षमाशीलतेमुळे तो सहजी रौद्र रूप धारण करीत नाही. पण एकदा तो जागा झाला की मग भूकंप घडू लागतात. प्रासाद जमीनदोस्त होतात. सिंहासनं उलथून पडतात. त्याच्या हातापायांतल्या बेडचा तटातट तुटून पडतात, त्या घालणारे हात छाटले जातात. फ्रान्समधील बुरबॉनशाही, रशियातील झारशाही यांच्याप्रमाणेच भारतातील अन्यायी आणीबाणी व नंतरची दिशाहीन जनतापक्षीय दिवाळखोरी या सर्वांना आपली जागा दाखविण्याचं सामर्थ्य ग्रामीण समाजातच असतं. शिवाजीच्या स्वराज्याचा आधार हाच समाज होता. बेचाळीसच्या आंदोलनात आपलं उग्र, विराट रूप दाखवून आजचं स्वातंत्र्य याच समाजानं प्राप्त केलं. उद्याच्या एकात्म भारताची निर्मितीसुद्धा ग्रामीण समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय होणं असंभव !

ग्रामीण समाजाची ही भूमिका अतिशय विशाल, व्यापक व धीरोदात्त अशी आहे. ती अनेक रूपांमधून आविष्कृत होते. विश्वातील सगळी नाटयरूपे इथे पाहावयास मिळतात. ग्रामीण जीवन दयेचा किंवा चेष्टेचा विषय होऊ शकत नाही. कोणत्याही राजा, महाराजा, सेनापती वा नेत्यापेक्षा ग्रामीण व्यक्तीची उंची अधिक असते. शोकात्म नाटयाचा धीरोदात्त नायक होण्याची त्याची पात्रता असते. तो दुबळा किंवा निःसत्त्व नसतो. तो परोपजीवी जगाचे संधिसाधू, व्यापारी मानदंड धैर्याने नाकारतो. या त्याच्या मूल्यनिष्ठेतून बलदंड बांडगूळ जगाशी त्याचा संघर्ष होतो. या युद्धात त्याचा होणारा पराभव म्हणजे क्षुद्र जीवांचा अर्थहीन अंत नव्हे. त्याच्या शोकान्तातून सृजनशील मानवतेला नवं धैर्य देणारी समरगीतं लिहिली जातात. धग, गोतावळा, पाचोळा व नटरंग या कादंबऱ्यांनी ही गोष्ट सिद्ध करून दाखवली आहे.

प्रश्न : ग्रामीण साहित्याच्या छावणीत अनेक जुन्या व नव्या प्रतिभावंतांचा समावेश आहे. तरीसुद्धा ही चळवळ अपेक्षेइतकी यशस्वी का होऊ नये ?

याची अनेक कारणं संभवतात. प्रमुख कारण हे आहे की, काही सामान्य अपवाद वगळता, ग्रामीण साहित्यिकांना ग्रामीण जीवनपद्धतीच्या गौरवास्पद प्राणतत्त्वाचा साक्षात्कार घडला नाही. आजची ग्रामीण साहित्य चळवळ बचावात्मक भावनेनं वावरते. आपल्याला प्राप्त झालेल्या अभिमानास्पद वारशाची सखोल व सुयोग्य जाणीव नसल्यामुळे न्यूनगंडानं प्रभावित झाल्यासारखी दिसते. आत्मविश्वास म्हणजे गर्विष्ठपणा नव्हे, की आपल्या यथार्थ गौरवाचं ज्ञान म्हणजे आक्रमकता नव्हे, हे या चळवळीनं लक्षात घेतले पाहिजे.

ग्रामीण साहित्य चळवळीच्या मर्यादित प्रभावाचं आणखी एक कारण आहे. बहुतेक ग्रामीण साहित्यिक जन्मानं ग्रामीण शेतकरी वर्गातले असले तरी त्यांची वर्तमान जीवनशैली नागरी मध्यमवर्गीय आहे. याचा परिणाम म्हणून अनेक ग्रामीण लेखकांचे व्यक्तित्व दुभंग आहे. यांच्या मनात नागर मध्यम व उच्चवर्गीय जीवन-

शैलीचं जबरदस्त आकर्षण आहे. परंतु भारतीय समाजाच्या विशिष्ट रचनेमुळे हा वर्ग मूळच्या मध्यम वर्गाशी पूर्णत: एकजीव होऊ शकत नाही. ग्रामीण जीवनाबद्दलची त्याची कळकळ अनेकदा या चिडीतून जन्माला येते. या जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोण कनिष्ठांबद्दल वाटणाऱ्या कणव भावनेच्या (patronising) असा असतो. अर्थात, हे विश्लेषण सर्वच ग्रामीण लेखकांना लागू पडतं, असं मात्र नाही.

ग्रामीण साहित्य चळवळीच्या आड येणारं आणखी एक महत्त्वाचे कारण हे की, ग्रामीण लेखक साहित्यक्षेत्रात विलक्षण एकांडेपणाने वावरतात. वास्तविक पाहता, यांचा जन्मसंस्कार सामूहिकतेचा असतो. ग्रामीण जीवनात प्रत्येकजण एकदुसऱ्याशी गाव—नात्यानं बांधलेला असतो. 'गाव करे सो राव न करे' असे ग्रामीण माणूस गर्वानं म्हणतो, ते उगाच नाही. परंतु हाच ग्रामीण माणूस स्थलांतर करून शहरात येतो तेव्हा त्याचं स्वभावांतरसुद्धा झालेलं असते. तो केवळ स्वत:पुरतं पाहणारा व आसुसल्यासारखा प्रतिष्ठेच्या मागे धावणारा, असा होतो. आपल्या सामाजिक कर्तव्याचं त्याला विस्मरण होतं. ग्रामीण साहित्य चळवळीकडे तो आपल्या वैयक्तिक लाभाचं एक साधन म्हणून पाहतो. काही एक सामाजिक जबाबदारी म्हणून या चळवळीला आपण देणं अधिक लागतो, ही भावना त्याच्या मनाला क्वचितच स्पर्श करते.

प्रश्न : या लेखात आतापर्यंत चर्चिलेले दोष दलित साहित्यिकांमध्ये सुद्धा आहेत. मग त्यांची चळवळ अधिक यशस्वी कशी, असा आक्षेप घेतला जाऊ शकतो.

या आक्षेपाचं उत्तर हे की डॉ. आंबेडकरांचे प्रभावी अधिष्ठान असल्यामुळे वर्गांतर होऊनही दलित साहित्यिक मानसिक दृष्टीनं दुभंगले नाहीत. सामाजिक विषमतेला विरोध, या आधारावर त्यांना आपलं व्यक्तित्व एकसंध ठेवता आलं. सामूहिक चळवळीचं बाळकडू जन्मापासूनच मिळत गेल्यामुळे आपल्या एकांडेपणावरसुद्धा स्वभावत:च मात करता आली. ग्रामीण साहित्यिकांमधील दुष्प्रवृत्ती दलित साहित्यिकांमध्ये अजिबात नाहीत, असं नाही. परंतु मूळावरच प्रहार करण्याइतक्या त्या बलिष्ठ नाहीत, हे मात्र लक्षात घ्यावंच लागतं.

प्रश्न : ग्रामीण साहित्याची चळवळ बलिष्ठ होण्याच्या आड येणाऱ्या काही महत्त्वाच्या अडचणींची चर्चा आपण केली. समजा, या अडचणी दूर झाल्या तर ही चळवळ सशक्त होईल, यात शंका नाही. ही फलनिष्पत्ती उपेक्षणीय खासच नव्हे. परंतु चळवळीच्या यशाचे महत्त्व वाङ्मयीन यशापेक्षा सामाजिक यशाचे निदर्शक अधिक राहील. त्यातून विश्वसाहि-

त्यात स्थान मिळविणाऱ्या श्रेष्ठ कलाकृती निर्माण होतीलच असं आपण ठामपणं म्हणू शकू काय ?

तसे, अर्थातच ठामपणे म्हणता येणार नाही. परंतु श्रेष्ठ साहित्याच्या निर्मितीसाठी उपयुक्त सरकारी पार्श्वभूमी त्यामुळे निर्माण होईल, असं मात्र आपण निश्चितःपणे म्हणू शकतो. जागतिक साहित्याच्या इतिहासाचं अवलोकन केल्यास असं दिसतं की ज्या ज्या वेळी समाजमन आपल्या अर्थपूर्ण अस्तित्वाच्या प्रश्नांवरून विशेष सचेतन होतं, त्यासाठी संघर्षात उतरतं, त्या त्या वेळी अधिक जोरकस साहित्यनिर्मिती होते. इंग्लंडमधील एलिझाबेथचा कालखंड (सोळाव्या शतकाचा अखेरचा भाग), फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) पूर्वीचा काल व रशियन साहित्याचा रशियन राज्यक्रांती (१९१७) पूर्वीचा काल, ही उदाहरणं याबाबतीत सहजपणे लक्षात येतात. खुद्द भारतात दलित साहित्याचे उदाहरण आपल्यासमोर येतं.

ग्रामीण साहित्याची अडचण ही की ग्रामीण जीवनात आज अशी कोणतीच चेतना आढळून येत नाही. ग्रामीण मानसिकतेचं वैशिष्टच हे असतं की त्याच्या नाकातोंडात पाणी जाऊ लागेपर्यंत तो कसलीच हालचाल करीत नाही. परिणामी, ग्रामीण भागात कसल्याही चळवळी नाहीत. परोपजीवी शक्तीचं त्याच्यावर सर्व बाजूंनी आक्रमण सुरू आहे. तो अक्षरशः नागवला जात आहे. या समाजाचं विघटन वेगानं घडून येत आहे. याचा जाणीवपूर्वक प्रतिकार करावा, आपल्या स्वत्वाच्या पुनरप्रस्थापनेसाठी युद्ध सुरू करावं, असं अजूनही त्याच्या मनात येत नाही. याहून खेदाची गोष्ट ही की ग्रामीण समाजाचे जे काही छोटेमोठे थोडेसे संघर्ष चालतात त्यात ग्रामीण साहित्यकांचा सहभाग नगण्य स्वरूपाचा असतो.

ही गोष्ट अतिशय हानिकारक आहे. ग्रामीण साहित्याचं आजचं जे दुभंग स्वरूप आहे, त्याचं मूळ या घटनाविशेषात आहे. नागर भागात स्थलांतर करण्यापूर्वी त्यानं ग्रामीण जीवनाचा जो अनुभव घेतलेला असतो, तेवढीच त्याची अनुभवसामुग्री असते. नव्या तळस्पर्शी जाणिवांच्या अभावी या अनुभवाचा त्याला गवसलेला अर्थ हासुद्धा पृष्ठपातळीच्या फारसा खाली जाणारा नसतो. वर प्रस्थापितांच्या मोहमयी दुनियेचं आकर्षण असतं.

ग्रामीण साहित्याची आजवरची वाटचाल नाही म्हटलं तरी प्रस्थापितांचं बोट धरून झालेली आहे. आजसुद्धा ग्रामीण साहित्यिकांनी प्रस्थापित साहित्याशी पूर्णतः फारकत घेतली आहे, असं वाटत नाही. हे साहित्य आज कलावादाचा अधिक्षेप करीत असलं तरी या अधिक्षेपानं संपूर्ण बंडाचं स्वरूप धारण केलेलं नाही. संपूर्ण बंड याचा अर्थ प्रस्थापितांच्या मूल्यसरणीला संपूर्ण विरोध. त्यांनी कमावलेल्या कलात्मक ताकद व हौतमीसामर्थ्य यासारख्या शक्तिस्थानांना विरोध नव्हे.

वर वर्णन केलेल्या परिस्थितीचं स्पष्टीकरण समाजशास्त्राच्या आधारे आपण

देऊ शकतो. ग्रामीण जीवनातील व साहित्यातील आजचे स्थितिविशेष विशिष्ट अशा सामाजिक, आर्थिक, परिसरीय व अनुवंशिक परिस्थितीतून निर्माण होतात. असा नियतत्ववादी सिद्धान्त पूर्ण समर्थनानिशी आपण मांडू शकतो.

परंतु नियतत्ववाद (determinism) म्हणजे नियती नव्हे. नियतीवादानुसार सर्व गोष्टी नियतीने आधीच नियत केलेल्या असतात. माणूस म्हणजे नियतीच्या हातातील एक कळसूत्री बाहुलं. नियती सूत्र हालवील तसं त्यानं नाचावं व त्यातच समाधान मानून घ्यावं.

नियतत्ववादात माणसाला व त्याच्या जीवनाला आकार देण्याच्या कार्यात सामाजिक, आर्थिक, परिसरीय व अनुवंशिक शक्तींचा फार मोठा प्रभाव चालतो, ही गोष्ट मान्य केली जाते. परंतु या सिद्धान्तानुसार मानवी चेतनेचं सामर्थ्य नाकारण्यात येत नाही. मानवाची ध्येयशक्ती ही अतिशय सामर्थ्यशाली असते, ही गोष्ट नियतत्ववाद मान्य करतो. सभोवतीची परिस्थिती व माणूस यांचा परस्पर संबंध द्वंद्वात्मक असतो. दोघेही एकमेकांवर आपला प्रभाव पाडत असतात. या प्रक्रियेत दोघेही एकमेकांना बदलवतात, घडवतात. स्वतः बदलतात, घडतात.

ग्रामीण साहित्याची चळवळ व ग्रामीण जीवन या दोहोंच्याही दृष्टीनं या सिद्धान्तांचं महत्त्व फार मोठं आहे.

आजचा ग्रामीण साहित्यिक स्थलांतरित व वर्गांतरित असा आहे. सर्वसामान्यतः नवपरिसर व नववर्ग यांच्याशी संपूर्णतः समरस होणं, ही गोष्ट अधिक सोपी आहे. ही क्रिया अधिक सुरक्षितपणा व स्थैर्य देणारी आहे. परंतु साहित्यिक ही विशेष दायित्व असलेली व्यक्ती असते. निकट लाभाचा व सुरक्षिततेचा विचार वाऱ्यावर सोडून ग्रामीण साहित्यिक आपल्या वर्तमान परिसरीय व वर्गीय वास्तवावर मात करू शकतो. आपल्या निर्मिक वर्गाशी—ग्रामीण समाजाशी पूर्णतः एकरूप होऊ शकतो. नव्हे, तसं केल्याशिवाय अन्य पर्याय नाही.

याच सिद्धान्तानुसार ग्रामीण मानसिकतासुद्धा बदलू शकते; बदलली जाऊ शकते. या समाजाला सत्त्वप्राप्तीच्या लढ्यात उतरवता येणं शक्य आहे. नव्हे, इथंसुद्धा तसं केल्याशिवाय पर्याय नाही.

समस्या दोन आहेत. दोन्हींचं उत्तर मात्र एकच आहे. आत्मभाव प्राप्त करणं हे ते उत्तर आहे. ग्रामीण समाजाला ते मिळवावं लागणार आहे. आपल्या न्याय्य स्थानप्राप्तीसाठीचे त्याचे संघर्ष त्याशिवाय सुरू व्हावयाचे नाहीत.

ग्रामीण साहित्यिकांनाही ते मिळवावेच लागेल. आपल्या गौरवशालीत्वाची जाणीव म्हणजे उथळ अहंकारीपणा नव्हे. ही जाणीव झाली की त्यातून प्रचंड असंतोषाचा जन्म होतो. आपल्या स्वत्वावर आघात करणारांच्या विरोधात संघर्ष करण्यास आपण सिद्ध होतो.

भारतीय ग्रामीण समाज व ग्रामीण साहित्यिक यांना आत्मस्वरूपाची नीट ओळख पटल्यास त्यातून फार मोठ्या शक्तीचा जन्म होऊ शकेल. ग्रामीण समाजाची मूळ व अस्सल प्रकृती विश्वलक्षी आहे. दलित व साम्यवादी यांच्यापेक्षा ती व्यापक आहे. जागी व कृतिसिद्ध झाल्यास तिचं सामर्थ्य फार मोठं आहे.

ग्रामीण भूमिका प्रदेशांच्या पलीकडे जाते. वर्गीयतेची बंधनं तिला मान्य नाहीत. ग्रामीण साहित्यिकांनी ही गोष्ट आपल्या संवेदनशीलतेत अंतर्बाह्य एकजीव करून घेतल्यावर त्यांना वेगळा चक्षु प्राप्त होईल. सभोवतीची सृष्टी, या सृष्टीला अर्थवत्ता देणारं जीवन, आपल्या सर्व शक्तिमर्यादांसह जगणारा माणूस व त्या सर्वांचे परस्पर संबंध यांचे सम्यक् आकलन या नव्या चक्षुमुळे शक्य होईल.

प्रश्न : हा उथळ आशावादी दृष्टिकोन आहे काय? मार्गातल्या अडचणींचा विचार केल्यास तसा आरोप सहजच केला जाऊ शकतो. पण, जगाच्या इतिहासात अशक्यप्राय वाटणाऱ्या आव्हानांवर मात करून नवीन इतिहास घडविले गेले नाहीत काय? जो ग्रामीण समाज बेचाळीसचे देशाच्या स्वातंत्र्याचं आंदोलन घडवू शकतो तो आत्मस्वातंत्र्याचं आंदोलन घडवू शकणार का?

या दिशेनं नुसती सुरुवात झाली तरी ग्रामीण साहित्यात चमत्कार घडू लागतील. या साहित्याजवळ प्रतिभावंतांची वाण नाही. विश्वसाहित्यात मानाचं स्थान प्राप्त करू शकतील अशा काही कलाकृती ग्रामीण साहित्यिकांनी या आधीच निर्माण केल्या आहेत. न्यूनता आहे ती मोठ्या कॅनव्हासची. ग्रामीण साहित्य म्हणजे एकूण मानवी स्वभावाचं वा जीवनाचं साहित्य नव्हे. अशा प्रकारच्या भ्रामक समजुती ग्रामीण साहित्यिकांनी सोडल्या पाहिजेत. उलटपक्षी, वैश्विकतेकडे जाण्याचं सर्वाधिक सामर्थ्य ग्रामीण साहित्यातच आहे, हे आवर्जून लक्षात घेतलं पाहिजे.

असं घडून आल्यास, कुणी सांगावं, ग्रामीण साहित्यातून 'गुड अर्थ' च्या तोडीच्या कलाकृती निर्माण होतील. कदाचित नवं महाभारत लिहिलं जाईल, ज्याचा नायक धारक, पोषक व सर्जक कृषक असेल; ज्यातून मानवाचा व त्याच्या जीवनाचा सम्यक् शोध सादर केला जाईल. सर्वात महत्त्वाचं हे की ही महानिर्मिती परोपजीवी, बांडगूळ वर्गाची भाटगिरी करणार नाही. या वर्गानं लादलेली गुलामगिरी झुगारून देईल. तिची बांधिलकी श्रमिक व सर्जक मानवतेशी असेल!

●

# समारोप

'दलित साहित्या'चे स्वरूप स्पष्ट होण्याच्या दृष्टीने हे साहित्य ज्या 'दलित जाणिवे'तून उगम पावले आहे, त्या 'दलित जाणिवे'चे अंतरंग समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मुलाखत देणाऱ्यांसमोर पुढील काही प्रश्न ठेवण्यात आले होते : 'दलित जाणीव' म्हणजे नेमके काय ? समाजवादी– साम्यवादी जाणिवेहुन ही जाणीव वेगळी मानावयाची का ? समतेचा आशय असलेल्या इतर सर्व जाणिवांशी या जाणिवेचे नाते काय ? सर्व शोषित या जाणिवेत अंतर्भूत होतात किंवा नाही ? ही जाणीव फक्त वर्णाश्रमविरोधी किंवा जातिव्यवस्थाविरोधी मानावयाची का ? तशी ती मानल्यास त्याने काय साधते ? गरिबी, दुःख, विषमता इत्यादी घटक या जाणिवेतही नाहीत का ? 'दलित'त्वाचा व्यापक अर्थ येथे घ्यावयाचा, की ही जाणीव पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यवर्गापुरती सीमित करावयाची ?

वरीलसारख्या प्रश्नांना मुलाखत देणाऱ्या दलित आणि दलितेतर विचारवंतांनी जी उत्तरे दिली आहेत; तींत मतमतांतरांची बरीच गजबज आढळते; कारण 'दलित' या संज्ञेत लोकशाही विचार, प्रबोधनाचे विविध प्रवाह, फुले–आंबेडकरी चळवळी, मार्क्सवादी विचारधारा, स्वातंत्र्योत्तर काळात बहुजनसमाजात झालेली जागृती, तीतून त्यांना आलेले आत्मभान इत्यादी घटकांचा संकर झालेला आहे. यामुळे प्रत्येक लेखक वा विचारवंत आपापल्या भूमिकेनुसार 'दलित' संज्ञेचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतो. काहींनी ही संज्ञा चातुर्वर्ण्यव्यवस्थेशी संबंधित केली आहे तर काहींनी (बाबूराव बागुल, अरुण कांबळे, नारायण सुर्वे यांसारख्या मंडळींनी) या संज्ञेचा जेवढा व्यापक अर्थ करता येईल तेवढा केला आहे. ही संज्ञा त्यांनी तळागाळातील सर्व व्यक्तींशी, सर्वंकष क्रांतीशी अनुबंधित केली आहे. आर्थिक वा मानसिक दृष्ट्या कुचंबलेल्या सर्वच व्यक्तींचा–यांत उच्चवर्णीय स्त्रियाही आल्या–अंतर्भाव केलेला आहे. सर्वच क्षेत्रांतील प्रस्थापित व्यवस्थेला विरोध आणि मानवाची सर्वच क्षेत्रांतील जाचक बंधनांपासून मुक्ती, या जाणिवेच्या पाठीमागे असल्याचे मानले आहे. आपले सान्निध्य इतरांना नकोसे वाटण्याशी या संज्ञेचा संबंध असल्याचे श्री. वसंत पळशीकर मानतात. या जाणिवेला कालौघात कसे वेगळे अर्थ आले आहेत, ते स्पष्ट करतात. डॉ. भालचंद्र नेमाडे ही चळवळ ऐतिहासिक भूमिकेतून महानुभाव आणि संत चळवळीशी संबंधित करतात. काहींनी ही चळवळ फुले–

आंबेडकरवादाशी जोडली आहे. मार्क्सवादी मंडळी या चळवळींचे नाते मुख्यतः आर्थिक शोषणाशी लावतात. डॉ. अनिल अवचटांनी ' दलित ' संज्ञेत परीट, न्हावी, यासारखी ग्रामसंस्थेतील मंडळी आणि गावगाड्याच्या बाहेर वावरणाऱ्या भटक्या जमाती यांचा समावेश केलेला आहे. प्रा. रा. भि. जोशींनी आंबेडकरवादी, मार्क्सवादी आणि ढसाळ–ढालेप्रणीत पॅन्थरवाले असे दलित चळवळीच्या प्रवक्त्यांचे तीन गट कल्पिले आहेत.

'दलित ' संज्ञेबाबतची ही मतमतांतरे पाहता ' दलित ' ही संज्ञा गोंधळात टाकते. तिला अनेक फाटे फुटलेले दिसतात. यामुळे नेमकेपणाच्या दृष्टीने या संज्ञेची कक्षा निश्चित करण्याची गरज निर्माण होते. या संज्ञेत तत्त्वतः सर्वच मानवांची सर्वच प्रकारची मुक्ती हे ध्येय मानले गेले असले तरी व्यवहारतः किंवा अग्रक्रमाच्या दृष्टीने पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यवर्गाशी ती निगडित झालेली आहे. या जाणिवेची पाळेमुळे अवैदिक दर्शनांशी किंवा बहुजन समाजाच्या कैवारातून जन्माला आलेल्या महानुभाव वा संत चळवळीशी ऐतिहासिकदृष्ट्या संबोधित केली असली तरी या जाणिवेला भूतकाळात आजचे परिमाण प्राप्त झाले नव्हते, ही वस्तुस्थिती आहे.

डॉ. अनिल अवचटांनी दलित जाणिवेत धोबी, न्हावी किंवा भटक्या जमाती यांचा जो अंतर्भाव केलेला आहे तो या जाणिवेची व्याप्ती स्पष्ट होण्याच्या दृष्टीने योग्य असला तरी काटेकोरपणे या समाजगटाला अस्पृश्यतेच्या संदर्भात ' दलित ' असे मानता येणार नाही. Criminal tribes स्वतःहून बाजूला राहतात तर अस्पृश्यांना मुद्दाम बाजूला ठेवले जाते, हा प्राचार्य म. भि. चिटणीसांचा मुद्दा या दृष्टीने लक्षणीय आहे. प्रा. श्री. म. माटे यांनी या संदर्भात वापरलेली ' उपेक्षित ' ही संज्ञा या दृष्टीने अधिक युक्त वाटते. कारण धोबी, न्हावी इत्यादींवर अस्पृश्यांइतकी कडक बंधने ग्रामसंस्थेकडून लादली गेली नव्हती, आणि भटक्या जमातींवर जरी 'गुन्हेगारी'-चा शिक्का मारला जात असला तरी त्यांना अस्पृश्यांइतकी हीन वागणूक मिळत नाही. यामुळे ' अस्पृश्य 'तेची जाणीव या सर्वांहून अलग करावी लागते. ती विशिष्ट अस्पृश्य वर्गाशी जोडावी लागते, अर्थकारणापासूनही अलग करावी लागते. दलित जाणीव ही मार्क्सवादी जाणिवेहून कशी भिन्न आहे, हे स्पष्ट करताना शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी काढलेले पुढील उद्‌गार लक्षणीय आहेत :

' मार्क्सवादी जाणीव दलित जाणिवेपेक्षा मूलतः भिन्न जाणीव आहे. मार्क्सीय जाणीव ही मानुषमूल्याधिष्ठित वर्गीय आंतरराष्ट्रीय जाणीव आहे व मुख्यतः आजच्या भांडवली अर्थव्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणारी आहे, तर दलित जाणीव ही मानुषमूल्याधिष्ठितच परंतु भारतातील एका वर्गाच्या जाणिवेचा आविष्कार आहे. मार्क्सवादी जाणीव ही भारतीय समाजव्यवस्थेत आमूल वर्गीय क्रांती करू पाहणारी जाणीव आहे, तर दलित जाणीव ही व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांच्या आधुनिक मध्यम-

वर्गात पदार्पण करणारी-या वर्गाची सुधारणावादी जाणीव आहे. मार्क्सवादी वैचारिकतेचे, जाणिवेचे स्वरूप नेहमी आर्थिक, राजकीय संघर्षात्मक असते, तर दलित जाणिवेचे स्वरूप सामाजिक सांस्कृतिक असते.'

दलित जाणिवेबद्दल श्री. वसंत पळशीकर यांनी केलेली विधानेही लक्षणीय आहेत. मलीनत्वाची जाणीव, हा एक भाग व दुसरा आजचा दडपणुकीचा जागृत झालेला दलित मनातील भाव त्यांना अभिप्रेत आहे.

साहित्यदृष्टचा आधुनिक दलित जाणिवेचे दोन भाग कल्पावे लागतात. एक, आधुनिक प्रबोधनाच्या मार्गाने दलित मनात जागृत झालेले आत्मभान, दडपणुकीची जाणीव; आणि दुसरे या आत्मभानाला आलेले आजचे विद्रोहाचे उग्र रूप. ज्याला आज दलित साहित्य म्हणून मान्यता मिळालेली आहे. त्या साहित्याचा कटाक्ष सामान्यतः विद्रोह, नकार, बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठा या घटकांवर असतो. आणि म्हणूनच या प्रकारच्या विद्रोहावर भर न देणारे बंधुमाधव मोडक किंवा शंकरराव खरात यासारख्या दलित लेखकांचे साहित्य काटेकोर अर्थाने दलित साहित्य नाही, असे म्हणणारा एक मोठा वर्ग आजच्या दलित लेखकांतच आहे. बाबूराव बागुलांसारखे आजचे आघाडीचे दलित लेखक क्रांतीची प्रखर जाणीव ही दलित साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण मानतात. यामुळे बंधुमाधव मोडक किंवा शंकरराव खरात यासारख्यांच्या साहित्याची गणना सुधारणावादी साहित्यात केली जाते. परिणामतः दलित साहित्याला एकांडेपण येते.

प्रा. अरुण कांबळे यांनी आपल्या मुलाखतीत आगरकरी प्रेरणांची आणि आंबेडकरी प्रेरणांची तुलना केली आहे. आगरकरांचा विद्रोह हिंदुधर्मांतर्गत आहे. त्यांनी समता, बंधुता वगैरे मूल्ये घोषित केली, पण त्यांची व्यावहारिक मजल उच्चवर्णियांतील सुधारणावादापलीकडे गेलेली नाही. या सुधारणावादाचे केंद्र ब्राह्मण्य हेच राहिले. हे कांबळे यांचे विधान एका दृष्टीने बरोबरच आहे. पण ऐतिहासिक दृष्टचा विचार करता, आगरकर काळात हे असे होणे स्वाभाविकच होते, हेही लक्षात घ्यावे लागते. आगरकर आणि आंबेडकर यांच्या भूमिका तत्त्वतः एकच आहेत. तपशिलातील फरक तत्त्वाशी संबंधित नसून कालघटितांशी संबंधित आहे. हरिभाऊंचा गरिबांविषयीचा कळवळा मध्यमवर्गीय संज्ञेचा भाग आहे, हे श्री. बाबूराव बागुल यांचे मुलाखतीतील विधानही या अनुषंगानेंच विचारात घेतले पाहिजे.

दलित साहित्याचे एकंदर विभाजन तसे काटेकोर नाही. कारण प्र. ई. सोनकांबळे यांच्या ' आठवणींचे पक्षी ' या अलीकडे निर्माण झालेल्या आणि गाजलेल्या दलित आत्मचरित्रात विद्रोहाचा तसा कोणताही सूर नसताही ते आजच्या दलित साहित्यात मान्यता पावलेले आहे. योगिराज वाघमारे यांच्या कथेतही विद्रोहाचा तसा सूर कमी प्रमाणातच आढळतो. पण यामुळे त्यांची दलित लघुकथालेखक या नात्याने

असलेली प्रतिष्ठा कमी गणली गेलेली नाही. विद्रोहाचा नारा दलित कवितेतून जेवढा प्रकट होतो, तेवढा गद्यात्मक दलित साहित्यातून होत नाही, हेही या संदर्भात लक्षात घ्यावयास हवे. साहित्यक्षेत्रातील कोणतीही वर्गीकरणे अखेर तारतम्यानेच विचारात घ्यावयाची असतात. शास्त्रीय संज्ञांप्रमाणे ती कधीच काटेकोर नसतात. यासाठी 'दलित' जीवनावर, त्यातील व्यथा-वेदनांवर, तदनुषंगिक विविध प्रकारच्या जाणिवांवर आधारलेले जे साहित्य आहे ते 'दलित साहित्य' होय, असे म्हणावे लागेल. प्राचार्य चिटणीसांनी म्हटल्याप्रमाणे दलितत्वाचा संबंध स्पृश्याच्या विशिष्ट Psychological Mechanism शी आहे. वर्णाश्रमविरोध हा त्याचा त्यांनी axis मानला आहे. यात क्रांतिकारकत्वाची, परिवर्तनाची जाणीव जरी प्रकटपणे व्यक्त झाली नाही तरी ती सुप्तपणे अनुस्यूत असते, असे म्हणावयास हरकत नाही. दलित साहित्य हे वैचारिकतेपेक्षा भावनेवर अधिक अधिष्ठित आहे, असे जे भालचंद्र नेमाडे आपल्या मुलाखतीत म्हणतात, ते या अनुरोधाने विचारात घेण्यासारखे आहे. या जाणिवेमागे जी क्रांतिप्रवण वैचारिकता आहे, ती पुरेशा प्रमाणात अद्यापि कार्यकर झालेली नाही. परिणामतः आजचे दलित साहित्य दलितांवरील अन्यायांचा भावनिक पाढा वतृक्त्वपूर्णरीतीने वाचण्यातच अधिक मग्न असलेले आढळते. कोणत्याही परिवर्तनवादी चळवळीत काही काळ ही परिस्थिती अपरिहार्यही ठरत असावी. चिटणीस म्हणतात त्याप्रमाणे ही एक विरेचन प्रक्रिया (Purgative Process) आहे. ती स्वाभाविकही असेल; पण आजचे दलित साहित्य येथेच थांबले आहे, ते योग्य वाटत नाही.

दलित जाणिवेबाबत, दलित जाणीव ही निरंतर, कायम टिकणारी आहे काय ? आणि ही जाणीव बाळगण्यात काही मतलबी हितसंबंध (Vested interest) तर गुंतलेले नाहीत ना ? असे आणखी दोन पूरक प्रश्न मुलाखतींतून विचारले गेले आहेत. यांपैकी पहिला प्रश्न, काहींनी म्हटल्याप्रमाणे अनुमानधपक्याचा (Hypothetical) आहे, हे खरे आहे. भविष्यवेत्त्याच्या आविर्भावात याबाबत काही बोलणे कठीणच. दलित जाणिवेच्या निमित्ताने झालेल्या सामाजिक-सांस्कृतिक जागृतीला अंतिम उद्दिष्टांच्या दृष्टीने फार दूरचा पल्ला गाठावयाचा आहे, आणि ही वाटचाल या ना त्या स्वरूपात दीर्घकाळ चालावी लागणारी आहे, असा एक स्वाभाविक निष्कर्ष यातून निघतो. 'ही जाणीव या ना त्या स्वरूपात राहणारच' हे बंधुमाधव यांचे म्हणणे मान्य करावे लागते.

दलित जाणीव बाळगण्यात दलितांचे काही मतलबी हितसंबंध गुंतलेले आहेत का ? हा प्रश्न तसा दलितांना बोचकच वाटणारा, पण सवर्ण समाजात असा सर्वसाधारण समज असल्यामुळें सहेतुकपणेच हा प्रश्न मुलाखतींतून उपस्थित केलेला होता. मुलाखत देणाऱ्या साऱ्याच दलित लेखकांनी हा आरोप फेटाळून लावलेला

आहे. दलितत्वाची जाणीव सातत्याने बाळगणे म्हणजे सातत्याने चिखलात राहण्याची इच्छा बाळगणे ठरते, असे प्रा. केशव मेश्राम यांनी म्हटले आहे. हा एक कलंक (Stigma) आहे आणि तो मिरविण्यात कसले भूषण ? असा सवाल प्रा. अरुण कांबळे यांनी केला आहे. दलितांनी दलितत्वाची जाणीव बाळगण्यात ‘ vested interest ’ आहे, असे म्हणणे म्हणजे भुकेल्या माणसाने अन्नाची इच्छा बाळगण्यात ‘ vested interest ’ आहे, असे म्हणण्यासारखे आहे. अशा शब्दांत शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी या संबंधात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. हरवून जावयाचे नसेल तर दलित जाणिवेचे अग्र दलितांनी काही काळ धारदार ठेवले पाहिजे असा प्राचार्य चिटणीसांचाही अभिप्राय आहे. तत्त्वतः हे सारे बरोबर आहे. पण शासकीय सवलतींच्या संदर्भात जे दलित राजकारण चालू असते, त्यातून वरील सारखा प्रश्न उपस्थित होतो. दलितत्वाच्या जाणिवेबद्दल जेवढे बोलले जाते, त्या तुलनेने दलितत्वाच्या निर्मूलनासाठी कार्यवाही झाल्याचा दाखला मिळत नाही, म्हणूनही वरील सारखे प्रश्न उपस्थित होतात.

दलित–दलितांतील आजच्या छेद–भेदाची श्री. पळशीकर यांनी केलेली परखड मीमांसाही दलित लेखक–विचारवंतांनी अंतर्मुखपणे विचारात घेणे अगत्याचे वाटते. जातीयतेच्या निर्मूलनाच्या नावाखाली अनेक कारणांनी आज जातीय अस्मितेची वाढच होत चाललेली आहे. मतलबी राजकारणी लोकांकडून या जाणिवेला स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात खतपाणीच घातले जात आहे. या विपरीत अवस्थेत सापडलेल्या दलित चळवळीने जातीयतेच्या निर्मूलनाची व जाति–जातींतील आंतरिक संघटनेची कोणतीही व्यापक आणि विधायक योजना आखलेली नाही. आजची दलित चळवळ खऱ्याखुऱ्या अर्थाने व्यापक तात्त्विक अधिष्ठान असलेल्या भूमिकेवरून पोटतिडकीने संघटित केल्याखेरीज ती खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाची चळवळ होऊ शकणार नाही. दलितांना बौद्ध धर्माच्या आधारे हे करावयाचे असल्यास बौद्ध धर्माची आखणी त्या दिशेने नव्या संदर्भात केली गेली पाहिजे, असे पळशीकरांचे म्हणणे आहे. दलित लेखक आज काही प्रमाणात का होईना, खरेखुरे दलित साहित्य निर्माण करण्याऐवजी एक प्रकारचे राजकीय पातळीवरील प्रचारात्मक साहित्य निर्माण करीत आहेत, असे जे पळशीकरांनी म्हटले आहे, ते कितीही अप्रिय वाटले तरी एक अंशात्मक का होईना पण एक वस्तुस्थिती म्हणून दलितांनी विचारात घेतले पाहिजे.

दलित साहित्य चळवळ आज एका प्रतिक्रियात्मक अवस्थेत आहे. तशी ती काही काळ राहणे अपरिहार्य आहे. दलित साहित्य चळवळीसमोर सर्वच प्रकारच्या तळागाळातील व्यक्तींचे वा व्यक्तिसमूहांचे विमोचन हे तात्त्विक उद्दिष्ट आहे, ते वारंवार घोषितही केले गेले आहे. पण ते साकार होण्यास अद्यापि अवधी आहे; असे

यावर प्रतिवादात्मक पातळीवरून म्हणता येईल. तसे ते म्हटलेही गेले आहे, पण दलित चळवळीने पुढे ठेवलेले स्वप्न व आजच्या जीवनातील तद्विरोधी वर्तन यांतील आजची रुंद दरी भरून काढण्याच्या दृष्टीने काही जोरदार विधायक हालचाल होत असल्याची रोकडी प्रतीती येत नाही. याचाही विचार गंभीरपणे दलित विचारवंतांनी करावयास नको काय ? ही वस्तुस्थिती केवळ दलितांपुरतीच मर्यादित नसून तिने आजच्या भारतीय जीवनाच्या सर्वच अंगोपांगांना ग्रासले आहे. परिणामतः आजच्या सर्वच सांस्कृतिक चळवळींना म्लानत्व आलेले आहे. आजचे ग्रामीण साहित्यही याला अपवाद नाही.

दलित साहित्याचा विचार करू जाता ग्रामीण साहित्याचा विचार स्वाभाविकपणेच सामोरा ठाकतो. कारण साहित्यक्षेत्रातील या दोनही चळवळींचा संबंध बहुजनसमाजातील जागृतीशी आहे. दलित आणि ग्रामीण समाज हे परंपरेने एकाच कृषिसंस्कृतीची अपत्ये आहेत. आजच्या दलित साहित्य विचारात 'ग्रामीण दलित साहित्य' नावाचा एक प्रकार कल्पावा का, असा एक प्रश्नही उपस्थित झालेला आहे. कारण आजचे बहुसंख्य दलित साहित्य हे एकप्रकारे ग्रामीण साहित्यही आहे. म. फुले यांच्या आचारात व विचारात या दोन्ही समाजघटकांच्या विचारांना सारखेच स्थान होते; पुढे डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे दलित चळवळींना विशेष गती आली, तशी गती दलितेतर ग्रामीण समाजातील चळवळींना आली नाही. महात्मा फुले यांच्या विचारसरणीची ब्राह्मणेतर चळवळीत पुढे जी परिणती झाली ती मुख्यतः ब्राह्मणविरोधी आणि प्रतिक्रियात्मक स्वरूपाची होती. महात्मा फुलेंचा व्यापक दृष्टिकोण तीमागे नव्हता. यामुळे दलितांच्या तुलनेने स्पृश्य ग्रामीण समाज जागृतीच्या दृष्टीने मागासलेलाच राहिला. दलित साहित्याची चळवळ उभी झाल्याला आता वीस–पंचवीस वर्षे झाली. त्यामानाने ग्रामीण साहित्य चळवळ ही 'चळवळ' दृष्टया अगदी अलीकडच्या काळातील म्हणजे गेल्या पाचदहा वर्षांतील घटना आहे, आणि ती तशी गतिपूर्णही नाही.

वस्तुतः ग्रामीण संस्कृतीतून वा कृषिसंस्कृतीतून उदयाला आलेली स्पृश्य मंडळीच आज सत्तास्थानी आहेत. औद्योगीकरणामुळे वा 'हरितक्रांती' मुळे या कृषिसंस्कृतीत वाढलेला एक वर्गही आता संपन्न झालेला आहे. या मंडळींनी शिक्षणाचे लोणही खेडयापाडयांपर्यंत पोचविले आहे; पण असे असूनही ग्रामीण साहित्य चळवळीला यावा तसा वेग आलेला नाही. डॉ. आनंद यादव किंवा प्राचार्य रा. रं. बोराडे या सारख्या आजच्या प्रथितयश ग्रामीण लेखकांनी या दिशेने पावले टाकण्यास अलीकडेच प्रारंभ केलेला आहे. नागपूरचे प्रा. या. वा. वडस्कर यांनीही जनसाहित्याची एक वेगळी चळवळ नागपूर भागात अलीकडेच चालविली आहे. दलितविषयक गुलाखतींच्या या पुस्तकात डॉ. यादव आणि प्रा. वडस्कर यांचे ग्रामीण साहित्यविषयक

विचार यासाठीच अंतर्भूत केलेले आहेत. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांत तुम्ही काही फरक करता का ? हा प्रश्न प्रस्तुत संग्रहातील विविध मुलाखतींत विचारण्यामागील भूमिका या दोन साहित्य चळवळींतील साम्यभेद स्पष्ट व्हावेत, यासंबंधीच्या तौलनिक विचारांना चालना मिळावी, हा आहे. कारण या दोन चळवळींच्या कार्यकारितेवरच उद्याच्या मराठी साहित्याचे भवितव्य अवलंबून आहे. साहित्याची समाजपरता प्रभावीपणे सिद्धीस जाण्यास या दोन्ही चळवळी परस्परपूरक होण्याची गरज आहे. आज मात्र या दोन्ही चळवळी परस्परविरोधी पवित्रा घेत असल्याचे जाणवते. या मुलाखतींतील दलित लेखकांची ग्रामीण साहित्यविषयक एकंदर प्रतिक्रिया पाहता, ती प्रतिकूल तर आहेच, पण प्रसंगी ती फार तीव्र आणि तिखटही झालेली आहे. उदाहरणार्थ, बाबूराव बागुल यांनी आपल्या मुलाखतीत या संदर्भात मांडलेले पुढील विचार पाहा :

'ग्रामीण साहित्याला सिद्धांत नाही. वैचारिकता नाही. ग्रामीण साहित्याचे आदर्श स्पष्ट झालेले नाहीत. 'ग्रामीण साहित्य' म्हणते काय, हेही स्पष्ट झालेले नाही. वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था याबद्दल हे साहित्य काही बोलत नाही. त्या दिशेने विचार करीत नाही. परिणामत: ग्रामीण साहित्य म्हणजे वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करणारे साहित्य असेच ठरत नाही काय ? त्याचा दलित जाणिवेशी कुठे संबंध येतो ? मला तर अशी शंका येते की, जी गोष्ट लोकशाहीच्या व दलित साहित्याच्या व क्रांतीच्या गाजावाजांना किंवा घोषणांना घाबरून हिंदुवर्णवादी बोलू शकत नाहीत, ती ग्रामीण साहित्यांच्या पदराआडून तर बोलली जात नाही ना ?

एवढ्या तीव्र शब्दांत नव्हे, पण बहुतेक दलित आणि काही दलितेतर मुलाखतकारांनी ग्रामीण साहित्याबाबत जे विचार मांडले आहेत ते ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने प्रतिकूल स्वरूपाचेच आहेत. प्रा. केशव मेश्रामांच्या मते, ग्रामीण आणि दलित साहित्याच्या प्रेरणाच भिन्न आहेत. ग्रामीण साहित्य वाङ्मयीन आविष्कारा-' वर भर देते; ग्रामीण लेखकांचे जेवढे लक्ष Sophistication कडे आहे, तेवढे दलित लेखकांचे नाही; ग्रामीण साहित्यात शोषणसंदर्भ येत नाही, अंधश्रद्धाविरोध नाही, ही एक टूम आहे, असे वामन निंबाळकर म्हणतात. ग्रामीण साहित्यात Idealogy नाही, ते मचूळ आहे, मूलभूत ग्रामीण प्रश्नांकडे ते लक्ष देत नाही; अशी तक्रार नारायण सुर्वे करतात तर दया पवारांना ग्रामीण साहित्य दलित साहित्याप्रमाणे मूलगामी 'original' वाटत नाही. ग्रामीण साहित्याला मूलभूत परिवर्तन अभिप्रेत नाही. ते परंपरावादी आहे असा शेरा ते मारतात.

रा. भि. जोशींनी ग्रामीण साहित्य हे एक प्रकारचे 'सदाशिवपेठी' साहित्य आहे, असे म्हटले आहे तर मुक्तिबोध दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य या भिन्न 'कॅटेगरीज' आहेत, असे म्हणतात. ग्रामीण साहित्यावर Middle class

वृत्तीचा पगडा आहे, ग्रामीण साहित्य पेंटरची भूमिका घेते. ग्रामीण वास्तव पूर्ण-पणे ओळखण्याची क्रिया ग्रामीण साहित्यात नाही. ग्रामीण आंतरव्यवस्थेला त्यात स्पर्श नाही. 'दलित conciousness ग्रामीण असू शकतो. पण ग्रामीण consiousness दलित असू शकेलच असे नाही.' असेही या संदर्भात पुढे मुक्तिबोधांनी म्हटले आहे. ग्रामीण साहित्य कुसवाच्या आतले तर दलित साहित्य कुसवाबाहेरचे असल्यामुळे त्यात भेद आहे, असाही एक अभिप्राय प्रकट झालेला आहे. डॉ. गो. मा. पवारांना 'ग्रामीण' ही संज्ञा वर्णनात्मक वाटते तर 'दलित' ही संज्ञा ते मूल्यमापनात्मक मानतात. ग्रामसंस्कृतीची ओढ किंवा त्यातील आनंदतत्त्वाबद्दलची आस्था (नेमाडेंचा अभिप्राय) जशी ग्रामीण साहित्यातून प्रकट होते, तशी दलित साहित्यातून होत नाही. दलितांना गावाबद्दलची ओढ नसून तिटकाराच असतो, असेही म्हटले जाते.

दलित आणि ग्रामीण साहित्यात बरेच वेगळेपण आहे, यात शंकाच नाही. एकाच संस्कृतीची ही दोन अंगे असली तरी या दोहोंत फार तफावत आहे, हेही खरे. सवर्ण आणि सवर्णातील संघर्षाची तीव्रता शहरापेक्षा ग्रामीण विभागात अधिक आढळते, ही वस्तुस्थिती आहे तथापि दलित साहित्याचा पुरस्कार करताना सामान्यत: ग्रामीण साहित्यावर सरसकट हल्ले करण्याची जी प्रवृत्ती आहे, ती कितपत बरोबर म्हणता येईल? उदा., ग्रामीण साहित्य हे मध्यमवर्गीय वृत्तीचे आहे किंवा ते Sophistication च्या मागे आहे, असे म्हणताना आजचे दलित साहित्य या प्रवृत्तीपासून दूर आहे,असा जो सूर निघतो, तो मान्य होण्यासारखा आहे का ? आजचे दलित साहित्य ग्रामीण साहित्याप्रमाणेच Sophistication च्या मागे लागलेले दिसत नाही का ? किंबहुना नवजागृत समाजातील साहित्यनिर्मितीत ही मध्यमवर्गीय नागरता Sophistication कडे वळण्याची प्रक्रिया स्वाभाविकपणेच प्रकट होत असल्याचे आढळत नाही का ? ग्रामीण साहित्याला Dimensions नाहीत, असे म्हणणे किंवा ते सामाजिक आंतरव्यवस्थेकडे लक्ष पुरवीत नाही, असे म्हटल्याने दलित साहित्याला Dimensions आहेत, असा जो ध्वनी निघतो, तो वस्तुस्थितीला कितपत धरून आहे ? तसे असते तर दलित साहित्यावर एकसूरीपणाचा आरोप कशाला झाला असता ? ग्रामीण साहित्य हे परंपरावादी आहे, असे म्हणताना दलित लेखकांनी ज्या पद्धतीने सरसकटपणे परंपराविद्रोह मांडला आहे, तो कितपत योग्य म्हणता येईल ? मुद्दा असा की, दलित वा ग्रामीण साहित्य यांतील भेद मान्य केले तरी दलित साहित्यविचाराच्या वेळी ग्रामीण साहित्यावर ज्याप्रकारे आणि ज्या पद्धतीने हल्ला केला जातो, तो युक्त वाटत नाही. उदा. दया पवार यांनी 'गोतावळा' या कादंबरीबद्दल केलेली विधाने पाहा : गोतावळ्यातील नायक ग्रामीण वातावरणाबद्दल पशुपक्ष्यांबद्दल, खूप बोलतो, पण तो मालक–मजूर संबंधाबद्दल अवाक्षरही

उच्चारीत नाही, असे ते म्हणतात. पण असे म्हणण म्हणजे या कादंबरीतील जीवन-वास्तवाचे योग्य प्रकारे आकलन न करणे ठरते. या कादंबरीचा नायक-नारबा हा एका परंपरागत समाजव्यवस्थेत वाढलेला, नव्या जाणिवांचा स्पर्श नसलेला, गावापासून दूर राहणारा शेतमजूर आहे. शेतमजूर आणि शेतमालक यांच्या परस्परसंबंधाबाबतच्या परंपरागत कल्पना त्याच्या रक्तातच मुरलेल्या आहेत, असा हा शेतमजूर, मालक–मजूर संबंधाबद्दल जे बोलेल ते परंपरायुक्तच असणार, आणि तेच स्वाभाविक ठरत नाही का ? उलट, नारबाच्या मनातील याबाबतची गृहीते बदलण्याचा उपरा प्रयत्न केल्यास यातील सेंद्रीयतेला तडा जाण्याची शक्यता आहे.

याचा अर्थ, ग्रामीण साहित्यव्यवहारात जे काही आज चालले आहे, ते सारे समर्थनीयच आहे, असा नव्हे. दलित साहित्यव्यवहाराप्रमाणे याही साहित्यव्यवहारात काही त्रुटी आहेतच; या साऱ्यांचे भान आजच्या ग्रामीण लेखकाला किंवा त्यांच्या प्रवक्त्यांना पुरेशा प्रमाणात आलेले आहे, असेही नाही. ग्रामीण साहित्यविषयक तात्त्विक विचारांत बरीच धूसरता आहे, पण या साहित्यावर इष्ट हल्ला करण्यापूर्वी या साहित्याची एकंदर भूमिका योग्य प्रकारे समजून घेणे इष्ट नाही का ? दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य दोन्हीही साहित्यप्रवाहांची गंगोत्री आधुनिक काळातील प्रबोधन हीच असली तरी हे साहित्य निर्माण करणाऱ्या दोन समाजघटकांची राजकीय–सामाजिक–सांस्कृतिक स्थितिगती भिन्न आहे. आणि हे भिन्नत्व त्यांच्या साहित्यविषयक धारणांत स्वाभाविकपणेच प्रतिबिंबित झालेले आहे. दलित साहित्याची प्रेरणा, प्रवृत्ती व त्याचे साहित्यात उमटलेले चित्र ग्रामीण लेखकांना साहित्यदृष्टचा योग्य वाटत नाही. दलित साहित्य हे परिवर्तनाचे साधन बनल्यामुळे ते एकांडे बनले आहे, आवर्तात सापडले आहे, बटबटीत झाले आहे. साहित्यचित्रणाऱ्या विशिष्ट आग्रहामुळे कलावंताच्या स्वातंत्र्यावर गदा येते.परिणामी दलित साहित्य फार उंचीवर जाऊ शकत नाही, आणि परिवर्तनाचे उद्दिष्टच त्यामुळे संपुष्टात येते, असे ग्रामीण साहित्यिकांचे या बाबतीतील म्हणणे आहे. त्यांचा भर साहित्याच्या साहित्यपणावर आणि त्याच्या स्वाभाविक विकासावर आहे. प्रस्तुत संग्रहातील डॉ. आनंद यादव यांचा लेख ग्रामीण साहित्य संदर्भात प्रातिनिधिक मानावयास हरकत नाही. या लेखातील वा मुलाखतीतील त्यांची काही विधाने पुढील प्रकरची आहेत :

सामाजिक परिवर्तनासाठी साधन म्हणून साहित्याचा वापर करणे धोक्याचे आहे. साहित्यिकाच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाला समाजात जे अनुभव येतात, हे अनुभव जेव्हा कलात्मक अनुभवात रूपांतरित होऊन साहित्याचे रूप धारण करतात तेव्हाच त्यांना साहित्यपण प्राप्त होते, आणि याप्रकारचे साहित्यच परिवर्तनाकडे बोट दाखविते. साहित्याच्या मूळ प्रकृतीवर बलात्कार केल्याने परिवर्तनाचा हेतू

साध्य होत नाही. दलित साहित्यात या प्रकारचा बलात्कार होतो, यावर उपाय म्हणून उत्तम साहित्यिक व्यक्तिमत्त्व घडवणे आणि अशा या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाला सामाजिक परिस्थितीचा परिचय करून देणे, हा उपाय आहे. आणि या दिशेने ग्रामीण साहित्य चळवळ कार्यकर होऊ इच्छिते. दलित साहित्य स्वजातीपुरता विचार करते, तर ग्रामीण साहित्याची भूमिका व्यापक आहे, असे यादव यांचे म्हणणे. क्रांतीची विशिष्ट दिशा न स्वीकारता प्रबोधनाचे सर्व टप्पे हे साहित्य आत्मसात करू इच्छिते.

यादवांची ही ग्रामीण साहित्यविषयक भूमिका लक्षात घेता, ती क्रांतिवादी नाही, हे स्पष्ट होते. तथापि तिला प्रतिक्रांतिवादीही म्हणता येणार नाही. तिला विकासवादी म्हणता येईल. देशीपणाचा आग्रह हाही या चळवळीचा एक विशेष मानावा लागेल.

परिवर्तनाची जी तातडी दलित लेखकाला वाटते, त्या प्रकारची तातडी ग्रामीण लेखकाला वाटत नाही. याचे कारण या उभय समाजातील परिस्थितिभिन्नता आणि भारताची आजची विशिष्ट राजकीय–सामाजिक–सांस्कृतिक परिस्थिती. आजच्या ज्या विशिष्ट भारतीय परिस्थितीतून हा ग्रामीण लेखक उदयाला आलेला आहे, त्याला सद्य:परिस्थितीतही आत्मविकासाची साधने–दलित लेखकांच्या तुलनेने–उपलब्ध असल्यामुळे परिवर्तनासाठी विशिष्ट निशाण हाती घेऊन धावाधाव करावी असे त्याला वाटत नाही. ग्रामीण लेखकाच्या पांढरपेशीकरणाचाही हा भाग आहे. सर्वंकष क्रांतीपेक्षा सद्य:स्थितीत सांस्कृतिक विकास हे त्याने आपले उद्दिष्ट ठरवले आहे. विशिष्टतेपेक्षा समग्रतेकडे, समन्वयाकडे त्याचे लक्ष आहे. विशिष्ट Idealogy चा आवर्जून पुरस्कार करावा असे त्याला वाटत नसावे. नारायण सुर्वे यांनी ग्रामीण साहित्याला 'मचूळ' असे संबोधले आहे. विशिष्ट प्रकारच्या Idealogy च्या पुरस्कारामुळे आपली वाङमयनिर्मितीही कमअस्सल ठरेल अशी भीतीही ग्रामीण लेखकाला वाटते.

दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांचे हे परस्परांवरील आरोप–प्रत्यारोप लक्षात घेता, हे परस्परविरोधी पातळ्यांवर उभे आहेत, हे स्पष्ट होते. विचारांच्या विशिष्ट बांधिलकीमुळे दलित साहित्य भरड झाले आहे, असे ग्रामीण लोक मानतात, तर या बांधिलकीच्या अभावामुळे ग्रामीण साहित्यात कच्चेपण संचारले आहे, असे दलित लेखकांचे म्हणणे दिसते. वस्तुस्थिती मात्र अशी आहे .की दलित वा ग्रामीण साहित्याने वैचारिक बांधिलकीबद्दल आडवेतिडवे पट्टे फिरवूनही अद्यापि फार साभिप्राय अशी कलाकृती निर्माण केलेली नाही. याचा अर्थ औपचारिकरीत्या केवळ बांधिलकी मानल्यामुळे वा न मानल्यामुळे चांगली कलाकृती जन्माला येते असे नाही. वैचारिक बांधिलकी लेखकाच्या रक्तात भिनावी लागते. ती स्वाभाविकपणे

कलाकृतीत अवतरावी लागते. तिला कलादृष्टीची जोड मिळणे आवश्यक असते. त्याचबरोबर केवळ बाह्य स्वरूपाची ठिसूळ कलानिष्ठा बाळगून जीवनाच्या तळाला स्पर्श करणारे साहित्य निर्माण करता येत नाही. केवळ दलित वा ग्रामीण साहित्यातच नव्हे तर एकंदर मराठी साहित्यविश्वातच आज जो तोकडेपणा शिरला आहे, त्याचे कारण आजच्या समाजात कलानिर्मितीला प्रेरक ठरणाऱ्या जीवन-तत्त्वांचा अभाव हे आहे. आधुनिक मराठी साहित्यापुरता जरी विचार केला तरी केशवसुत–हरिभाऊंच्या काळात किंवा मर्ढेकरयुगात जीवनाकडे पाहण्याची मानव व विश्व यांतील संबंधांची एक विशिष्ट नवी जीवनदृष्टी (vision) प्राप्त झाली होती. प्रचलित काळात अशी दृष्टी कुठल्याच क्षत्रात दिसत नाही. सारेच दीप मंदावलेले दिसतात. त्याचा परिणाम आजची एकंदर मराठी साहित्यसृष्टीच कळं-जण्यात झाला आहे.

प्रस्तुत संग्रहातील प्रा. या. वा. वडस्कर यांचा 'चेहऱ्याच्या शोधात ग्रामीण साहित्य' हा लेख या दृष्टीने विचारात घेण्यासारखा आहे. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य या दोहोंचा व्यापक तात्त्विक भूमिकेवरून विचार करून यांतील बलस्थानांचा वा दुर्बलस्थानांचा विचार केला आहे.

वडस्करांची भूमिका दलित लेखक किंवा ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवक्ते आनंद यादव यांच्याहून वेगळी आहे. यादवांच्या भूमिकेचा कल प्रचलित ग्रामीण साहित्यव्यवहाराचे काही प्रमाणात का होईना, पण समर्थन करण्याकडे आहे. एकप्रकारे ती प्रचलित कलावादाला जवळची आहे. साहित्याच्या मूळ प्रकृतीचा विचार ते समाजस्थितीपासून अलग करू इच्छितात. पण आजचे शहरी साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांच्या तुलनेच्या वेळी शहरी साहित्याला सामाजिक संदर्भ नाही, याबद्दल ते नाराजीही व्यक्त करतात. त्यांचे साहित्य आणि समाज या संबं-धीचे विचार यामुळे संदिग्ध वाटतात. साहित्यप्रेम आणि समाजप्रवणता यांमधील ही ओढाताण आजच्या साहित्यविचाराचे एक प्रधान अंगच बनले आहे.

याउलट, दलित लेखकांना ग्रामीण साहित्याच्या अधिक्षेपाच्या आधारे स्वसाहित्य व्यवहाराचे मंडन करावयाचे आहे. वडस्कर या दोन्ही साहित्यव्यवहारांकडे वेगळ्या दृष्टिकोणातून पाहतात. प्रचलित दलित साहित्य प्रचलित ग्रामीण साहित्याहून काही बाबतीत पुढे असल्याचे सांगतात. ग्रामीण साहित्याला तात्त्विक-अधिष्ठान नाही हे मान्य करतात. ग्रामीण साहित्याच्या संभाव्य मोठेपणाकडे अंगुलिनिर्देश करतात; त्याची दिशा सूचित करतात. ग्रामीण समाज बहुसंख्य आहे पण तो अनेक कारणांनी विभागला आहे. त्यामुळे ग्रामीणतेचे बळ एकवटले जात नाही आणि दलित समाज अल्पसंख्य असूनही विशिष्ट विचाराने बांधला आहे यामुळे दलित साहित्य ग्रामीण साहित्याच्या तुलनेने एकसंध आहे म्हणून काही बाबतींत बलवान

आहे, असे प्रा. वडस्कर म्हणतात. ते साहित्याची बलवत्ता प्रतिभावंताच्या गुणाप्रमाणे सामाजिक संदर्भात शोधतात. हे दोन संदर्भ ते अलग करू इच्छित नाही. ग्रामीण साहित्याला आपले प्राणतत्त्व अद्यापि सापडले नाही, म्हणून ते बिनचेहऱ्याचें आहे, असे प्रतिपादन करतात. या प्राणतत्त्वांच्या सूत्राचा मागोवा घेतात. प्रा. या. वा. वडस्करांचा लेख ग्रामीण साहित्यातील व पर्यायाने दलित साहित्यातील जमाखर्चाचा वेध घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. साहित्य आणि समाज यांच्या संबंधावर प्रकाश टाकणारा आहे. ग्रामीण साहित्याची त्यांनी भारतीय कृषिसंस्कृतीशी तदनुषंगिक इतर ग्रामीण घटकांशी घातलेली सांगड ग्रामीण साहित्याची व्याप्ती स्पष्ट करते.

प्रस्तुत स्थळी प्राधान्याने आपल्याला दलित साहित्याचाच विचार करायचा असल्याने दलित साहित्याने मराठी साहित्याला कोणते योगदान केले ? असा प्रश्न सर्वच मुलाखतींत आला आहे आणि मुलाखत देणाऱ्या सर्वांनीच दलित साहित्यामुळे मराठी साहित्यविश्व अधिक अनुभवदृष्टचा संपन्न झाले. या साहित्यामुळे मध्यवर्ती मराठी साहित्यातील आवर्तपणाची कोंडी फुटली, या साहित्याने मराठीला भाषादृष्टचाही संपन्न केले, जीवनवास्तवाकडे भेदकपणे लक्ष वेधले, असे एकमुखाने म्हटले आहे. दलित साहित्यनिर्मिती ही मराठी साहित्यविश्वात अलीकडच्या काळात घडलेली एक युगप्रवर्तक घटना आहे, यात शंका नाही. या दृष्टीने या साहित्याचे साहित्य–संस्कृतीबद्दल आस्था असलेल्या साऱ्यांनीच सहर्ष स्वागत केले आहे. 'भारतीय समाजाला नीतिमान बनविणं हे दलित साहित्याचं प्रयोजन आहे.' असे प्राचार्य चिटणीस म्हणतात ....दलित चळवळ ही पतितोद्धाराची चळवळ नसून राष्ट्रोद्धाराची चळवळ आहे असे त्यांनी म्हटले आहे

पण दलितांचे हे साहित्य अधिक बलसंपन्न व्हावे, या भूमिकेवरून या साहित्यात डोकावणाऱ्या प्रचलित त्रुटींकडेही अनेकांनी लक्ष वेधले आहे. दलित लेखकांची याकडे पाहण्याची दृष्टी तेवढी अंतर्मुख नाही, ती प्रतिक्रियात्मक किंवा आत्मसमर्थनाची आहे. म्हणून याबाबतच्या दलित आणि दलितेतरांच्या प्रतिक्रिया समजून घेण्याच्या दृष्टीने दलित साहित्यावरील ठळक आक्षेपांचे एकत्रीकरण करून मुलाखतींतून ते पुढीलप्रमाणे मांडले आहेत : (अ) दलित साहित्य प्रचारकी आहे. (ब) ते एकसूरी आहे (क) दलित साहित्यात व्यक्ती येत नाही (ड) ते नकारात्मक आहे, आक्रस्ताळे वाटते.

वरीलसारखे आक्षेप साऱ्याच दलित साहित्याला सारख्याच प्रमाणात लागू पडतात, असा याचा अर्थ नाही. दलित साहित्यात काही चांगला भागही निःसंशयपणे आहे दलित साहित्यनिर्मितीबाबतच्या अडचणी लक्षात घेता, हे कौतुकास्पदही म्हणावे लागेल. तथापि दलित लेखकांत जी आत्मसंतुष्टतेची भावना बळावत चालली

आहे, ती दूर होण्याच्या दृष्टीने वरीलसारखे आक्षेप चर्चिणे आवश्यक वाटले.

दलित साहित्यावरील प्रमुख आक्षेप ते प्रचारात्मक आहे हा. हे प्रचारासाठीच जन्माला आलेले आहे, कोणतेही साहित्य अंती प्रचारकीच असते; हे समर्थन विपर्यासात्मक वाटते. साहित्याचा प्रचाराशी संबंध येतो. साहित्याला पुष्कळदा प्रचाराचे व्रत धारण करावे लागते, हे खरे असले तरी येथे दलित लेखक वृत्तपत्रीय प्रचार आणि साहित्यातून निर्माण होणारे श्रेष्ठ संस्करण यांतील फरक लक्षात घेत नाहीत. एखाद्या उत्कट जीवनजाणिवेचा प्रारंभ प्रचाराच्या उद्देशाने जरी झाला तरी त्याची अंतिम परिणती वाचकदृष्टचा अंतर्मुख करणाऱ्या संस्कारात व्हावी लागते, या मुद्याकडे दलित लेखक सहेतुकपणे वा अहेतुकपणे दुर्लक्ष करतात.

'दलित साहित्य नकारात्मक आहे' या मुद्याबाबतही हेच म्हणावे लागेल. नवे निर्माण करताना जुन्याला नकार देणे प्राप्त होते. 'जुने जाऊ दे मरणा लागुनि' ची भूमिका घ्यावी लागते, हे खरे आहे. पण याचा अर्थ, साहित्याने नकाराच्या आवर्तातच भोवंडत राहावे, असा होत नाही. याबाबत मांडण्यात येणारा पुढील मुद्दा मात्र लक्षणीय आहे. या नकारात एक होकार भरलेला आहे. आणि कालांतराने तो प्रकट होईल, असे काही दलित लेखकांचे म्हणणे आहे. नकाराची स्वाभाविकता स्पष्ट करताना दलितांच्या मानगुटीवर बसलेले भूतकाळाचे जबरदस्त दडपण दूर होण्याच्या दृष्टीने दलित लेखकाला सातत्याने नकाराचा अवलंब करावा लागतो, असे डॉ. पानतावणे म्हणतात. हेही मान्य करण्यास हरकत नाही. पण कोणत्याही चांगल्या साहित्यात आजच्या दलित साहित्यात येतो तसा नकार केवलपणे येत नाही. नकाराबरोबरच एका होकाराची जाणीव सापेक्षपणे का होईना प्रकट होणे आवश्यक असते. या मुद्याकडे बहुसंख्य दलित लेखकांचे दीर्घकाल नको इतके दुर्लक्ष होत आलेले आहे. या वस्तुस्थितीवर पळशीकरांनी आपल्या मुलाखतीत बोट ठेवले आहेच.

दलित साहित्याबाबत घेतला जाणारा आणखी एक आक्षेप म्हणजे दलित साहित्य एकांडे । एकसुरी आहे हा. हा आक्षेप तसा महत्त्वाचा आहे. पण बऱ्याच दलित लेखकांनी तो उडवून लावण्याचा प्रयत्न केला आहे. संतसाहित्य किंवा नवसाहित्य एकसूरीच नाही का? हे या आक्षेपाचे उत्तर होऊ शकत नाही. या प्रकारच्या दलित साहित्यरूपाची स्वाभाविकता सांगणे वेगळे व त्याचे समर्थन करणे वेगळे. संतसाहित्य किंवा नवसाहित्य एकांडे आहे असे घटकाभर मानले तरी त्यामुळे दलित साहित्य एकांडे किंवा एकसूरी नाही, हे कसे सिद्ध होते ?

दलित जीवनात 'दलित' या नात्याने दलितांना येणारे अनुभव एका ठराविक प्रकाराचे असतात, दलितांकडे व्यक्ती म्हणून न पाहता दलितसमूह म्हणूनच पाहिले जाते आणि या प्रकारच्या जाणिवांना वाचा फोडणे, हेच दलित साहित्याचे प्रमुख प्रयोजन आहे, असे म्हटले जाते. हे मान्य केले तरी या जाणिवेला अनेक पदर असू

शकतात. एका वर्तुळात अनेक बिंदू नांदतात. मन:पूर्वकपणे पाहिल्यास त्यांचे दर्शन होते. हे कसे विसरता येईल ? या दृष्टीने डॉ. अनिल अवचट यांनी आपल्या मुलाखतीत सादर केलेले स्त्री–पुरुष प्रेमाचे उदाहरण विचारात घेण्यासारखे आहे. प्रेम हा विषय सनातन असूनही तो नित्य नवी रूपे धारण करू शकतो, असे साहित्यातून प्रतीतीस येत नाही का ? दलित साहित्याच्या बाबतीत हा दाखला तेवढा समर्पक नाही. पण दिशासूचनापुरता तो उपयुक्त ठरावा. एकच वास्तव प्रतीतियुक्ततेमुळे नवरूप धारण करू शकते, हे संगीत किंवा नृत्यशास्त्रात जाणवत नाही का ? रागाची बंदिशी ठराविक प्रकारची असूनही गवयागणिक जो ताजेपणाने प्रकट होत राहतो, या ताजेपणाचा संदर्भ निर्मात्याच्या आस्थेशी, खोल जाणकारीशी आहे. दलित साहित्यात चित्रणविषयाबाबत आस्था नसते, असे येथे सुचवायचे नाही. पण या आस्थेला ठराविकपणे छेडत राहिल्यामुळे तिचे एकतारीत रूपांतर होते. ती सतार-रूप धारण करीत नाही, असे सुचवायचे आहे. दलित साहित्य ज्या अर्थाने आणि ज्याप्रकारे एकांडे आहे, त्याप्रकारे संतसाहित्य किंवा नवसाहित्य एकांडे नाही हेही या संदर्भात लक्षात घ्यावयाला हवे.

दलित साहित्यात व्यक्ती येत नाही, समूह येतो. या आक्षपाचा विचारही या अनुरोधानेच करावयास हवा. साहित्यात समूहनिष्ठता नसते काय ? किंवा व्यक्तीद्वारा समूहाचे प्रतिनिधित्व होत असेल तर त्यात काय बिघडले ? असा प्रतिप्रश्न याबाबतीत केला जातो. दलित साहित्याचे विश्व समूहात्मक असल्यामुळे दलित साहित्यात ही समूहात्मकता स्वाभाविकपणेच अवतरते; असे यावर एक उत्तर दिले जाते. सारेच साहित्य समूहनिष्ठ नसते हेही खरे आहे. उदा., दलित आत्मचरित्रे, दलित कवितेत समूहनिष्ठेइतकी व्यक्तिविशिष्टताही प्रकट झाली आहे. आणि आजच्या व्यक्तिवादी साहित्याला समूहनिष्ठा अपरिचित असली तरी आपल्या लोकसाहित्यात ही समूहनिष्ठा प्रतिबिंबित झालेली आढळते. दलित साहित्याच्या निमित्ताने या समूहात्मकतेकडे साहित्याचे लक्ष वेधले जाते, ही घटनस्वागतार्हच मानावी लागेल, असेही याबाबत म्हणणे शक्य आहे.

हे सारे मान्य करूनही जेव्हा दलित साहित्यात व्यक्ती येत नाही, समूह येतो, असे म्हटले जाते. तेव्हा या साहित्यात व्यक्ति–समूहसंबंध समवाची पद्धतीने, परस्परप्रेरक पद्धतीने प्रकट होत नाहीत किंवा कमी प्रमाणात प्रकट होतात, असे सुचवावयाचे असते. व्यक्ति–वस्तूतील परस्परसापेक्षता सूचित करावयाची असते. उदा., आजची दलित नाट्यसृष्टी आशयदृष्ट्या समूहनिष्ठ आहे, पण येथील समूहदर्शन ठोकळेबाजपणे होत राहते. हा ठोकळेबाजपणा दूर होणे अगत्याचे आहे.

दलित साहित्यावर घेण्यात येणारा आणखी एक आक्षेप म्हणजे आक्रस्ताळेपणाचा. याही आक्षेपाचा परामर्श घेताना, पुन्हा हे असे होणे कसे स्वाभाविक आहे'

हे पटवून देण्याचा प्रयत्न होतो. त्यातील स्फोटकतेचे समर्थन केले जाते किंवा रक्त, घाम, अश्रू इत्यादींचा याबाबत उल्लेख केला जातो. आक्रस्ताळेपणाचा हा आरोप कवितेइतका अन्य साहित्यास कसा लागू नाही, हे स्पष्ट केले जाते. 'शॉक ट्रीटमेंट'चा हा एक भाग मानला जातो. इतर आक्षेपाप्रमाणे याही आक्षेपाबाबत असे म्हणावे लागते की, या प्रकारचे आक्षेप घेण्यामागील उद्देश दलित लेखकांचा तेजोभंग करणे, हा नसून या साहित्यातील त्रुटीकडे अंगुलिनिर्देश करणे हा आहे. दलित साहित्य आक्रास्ताळे आहे, हे म्हणताना ते पुरेसे अंतर्मुख नाही, असे सुचवावयाचे असते. दलित लेखकांनी वरील सारख्या विविध आक्षेपांचा अधिक गांभीर्याने विचार करण्याची निकड या साहित्याच्या सामर्थ्यपूर्ण भावी आविष्काराच्या दृष्टीने जाणवते.

दलित साहित्य विचारात ज अनेक प्रश्न उपस्थित होतात, त्यात ' शहरी दलित साहित्य ' आणि ' ग्रामीण दलित साहित्य ' असा भेद करावा का ? असा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. बहुसंख्य दलित समाज खेड्यांत राहतो परंतु यांतील काही व्यक्ती आज शहरात गेल्या आहेत; सुशिक्षित बनल्या आहेत; पांढरपेशा व्यवसायात शिरल्या आहेत; यामुळे नाही म्हटले तरी दलित समाजाचे ' शहरी ' आणि ' ग्रामीण ' असे विभाजन झालेले आहे. या विभाजनाचा दलित जीवनावर पर्यायाने दलित साहित्यावर काय परिणाम झाला ? असा प्रश्न या संदर्भात निर्माण होतो. दलित साहित्यात जरी दलितांचे प्रश्न मांडले जात असले तरी बहुसंख्य दलित लेखक आज शहरात राहतात. नागरसंवेदनेचा त्यांच्यावर काही संस्कार झालेला आहे. या लेखकांनी जे दलित जीवनदर्शन घडविले आहे, ते प्राधान्याने खेड्यातील. लेखकांच्या भूतकालीन अनुभवांशी ते संबंधित आहे. खेड्यातील भूतकालीन दलित अनुभव आणि दलित लेखकांचे वर्तमानकालीन शहरी वास्तव्य यातील ताण पुष्कळदा दया पवार, बाबूराव बागुल यासारख्या लेखकांच्या साहित्यातून प्रकट झालेले दिसतात. शहरी वातावरणातूनही काही दलितविषयक अनुभवांना चालना मिळते, यामुळे दलित साहित्याचे ग्रामीण आणि शहरी असे दोन कप्पे कल्पिणे स्वाभाविक ठरते. (ग्रामीण साहित्यात हा प्रश्न उपस्थित होत नाही, कारण ग्रामीण साहित्य हे केवळपणे कृषिसंबंध आहे.) योगिराज वाघमारे आणि बाबूराव बागुल यांची कथा किंवा वामन निंबाळकर आणि यशवंत मनोहर किंवा नामदेव ढसाळ यांची कविता पाहता, दलित साहित्यातील ग्रामीण आणि शहरी हा भेद स्पष्टपणे प्रतीत होतो.

दलित साहित्यावरील विविध आक्षेपांचा आणि तदनुषंगिक प्रतिक्रियांचा विचार करताना पुढीलसारखे साहित्यविषयक काही जुने प्रश्न नव्याने पुढे येतात : कला आणि जीवन, जीवनवास्तव आणि साहित्य, साहित्य आणि सामाजिक परिवर्तन, साहित्य आणि प्रचार, साहित्य आणि बांधिलकी इत्यादी. या साऱ्याच प्रश्नांचा येथे

ऊहापोह करता यणार नाही, पण या निमित्ताने उद्‌भवलेल्या काही प्रश्नांचा थोडा परामर्श घेणे प्रस्तुत ठरेल. दलित साहित्यनिर्मितीला स्वानुभवाची गरज असते का ? आणि दलित साहित्याचा आस्वाद मानववंशशास्त्राच्या सामाजिक दृष्टिकोना-शिवाय (Social Anthropological Approch) घेता येईल किंवा नाही? हे यांतील प्रमुख प्रश्न. दलितांचे अनुभव फक्त दलितच सांगू शकतील, अशी एक भूमिका दलित साहित्यिक सामान्यतः घेत असतात. दलितांचे अनुभव विशिष्ट प्रकारचे, खास दलितजीवनसंबद्ध असल्यामुळे त्यांचे प्रतीतियुक्त चित्रण दलित लेखकच करू शकेल, हे स्थूलपणे मान्य करावयास हरकत नाही. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा'-तील आंतरिक अनुभव त्यांच्यासारख्या लेखकालाच मांडणे शक्य आहे, हे नाकारता येत नाही. पण दलितेतर लेखकाला प्रतिभेच्या, सहानुभूतीच्या बळावर दलितजीवन-दर्शन घडविता येईल किंवा नाही ? या प्रश्नाला बऱ्याच दलित लेखकांनी जे ठण-ठणीत नकारात्मक उत्तर दिले आहे, ते युक्त वाटत नाही. कारण तत्त्वतः मग लेखकाला स्वानुभवापलीकडे जाताच येणार नाही. पुरुषलेखक स्त्रीच्या भावनांना वाचा फोडू शकणार नाही. परकायाप्रवेशाच्या कल्पनेला अर्थच राहणार नाही.

कलावंत मनाला जीवनाची वास्तव अनुभूती असणे आवश्यक आहे. या कलावंत मनाने घेतलेले अनुभव कलानिर्मितिदृष्टचा उपयुक्त ठरतात, हे खरे असले तरी व्यक्तिगत पातळीवर सारेच्या सारे जीवनानुभव कोणालाही घेता येत नाहीत. कलावंतमनाचे वैशिष्टच ' स्व ' च्या अतीत होण्यात, स्वेतर अनुभव आत्मसात कर-ण्यात,त्यांच्याशी तादात्म्य होण्यात असते; हे या संदर्भात लक्षात घेणे आवश्यक आहे. कलाकृतीतील अनुभवविश्व प्रातिनिधिक असते; स्वानुभवाच्या निमित्ताने त्यात विश्वात्मकतेचे प्रतिबिंब पडलेले असते, पडावे लागते. एकाला अनेकांच्या पातळ्यांचा स्पर्श व्हावा लागतो. कलात्मक अनुभव प्रतिमापूरित असतात, ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास ' दलितांचे अनुभव दलितच वर्णू शकेल.' हे म्हणणे तात्त्विकदृष्टचा तरी टिकत नाही. मात्र आजच्या जीवनात दलित आणि दलितेतरांतील रुंद दरी जिला चिटणीसांनी Social Mobility चा अभाव, असे म्हटले आहे ती लक्षात घेता, सहानुभवाची किंवा सहसंवेदनेची शक्यता आज कमी आहे. या दृष्टीने आजच्या घडीला दलितांचे अनुभव दलितच वर्णू शकतील, हे विधान स्थूलपणे मान्य करावयास हरकत नाही. डॉ. पानतावणे यांनी उपयोजिलेला सहसंवेदन-क्षमतेचा मुद्दा या दृष्टीने प्रस्तुत म्हणावा लागेल.

स्वानुभवाप्रमाणेच मानववंशशास्त्रीय दृष्टिकोणाचा मुद्दाही दलित साहित्याच्या निमित्तानेच उपस्थित झालेला आहे, कारण आजपर्यंतचे मराठी साहित्यविश्व तसे एकसंध सुशिक्षित पांढरपेशा जीवनाशी संबद्ध होते, आता हे कवच फुटले आहे, यापुढे अनेक पद्धतींचे आणि अनेक पातळ्यांवरील अनुभव साहित्यातून प्रकट होत

आहेत, होणार आहेत. यांतील काही अनुभवांचे पोत अपरिचिततेमुळे धक्कादायक वाटतात. (उदा. 'गोलपीठा' तील वातावरण) पांढरपेशीं संवेदना त्याला सामोरी जाण्यास बिचकते. उदा. दलित आत्मचरित्रांतील शिव्यागाळीचे वातावरण. अशा वेळी 'सोशल अॅन्थ्रापॉलॉजिकल' दृष्टिकोण आस्वादनव्यापाराला साह्यभूत होण्याची शक्यता आहे. यामुळेच या अंगाने या दृष्टिकोणाचे महत्त्व बहुतेकांनी मान्य केलेले आहे. पण हा मुद्दा तसा फार ताणण्यात अर्थ नाही, कारण दलित आणि दलितेतर यामध्ये सांस्कृतिक दृष्टचा कितीही अंतर असले तरी हे दोन्ही समाजघटक एका विशिष्ट भारतीय परंपरेचीच अपत्ये आहेत. दोघांना समान सूत्रात आणणारे कितीतरी दुवे या परंपरेत आढळतात. यामुळे या दूरस्थपणातूनही जवळिकेची भावना काही एका प्रमाणात तरी साधता येते. श्री. म. माटे यांनी उलगडलेले 'उपेक्षितांचे अंतरंग' हे पुस्तक या दृष्टीने खूपच बोलके आहे.' निर्मितिव्यापाराप्रमाणे आस्वादन-व्यापारही 'स्व' चा भेद करून स्वेतराकडे जाणारा असतो. अव्वल दर्जाच्या रसिकाला 'सहृदय' असे संबोधले जाते, ते यासाठीच !

दलित आणि दलितेतर यांना एकत्र बांधणारा भारतीय परंपरेचा एक बळकट धागा आहे, असे म्हणताना दलितलेखकांची परंपराविद्रोहाची भूमिका आठवते. या विद्रोहाचे प्रखर स्वरूप प्रा. अरुण कांबळे यांच्या मुलाखतीतून प्रकट झालेले आहे. पण ही प्रखरता विशिष्ट संदर्भापुरती मान्य करूनही त्यांनी दलित जाणिवेचे संदर्भ अवैदिक पण भारतीय परंपरेतच शोधले आहेत, हे लक्षात येते. दलित साहित्य हे मराठी साहित्य आहे. यामुळे मराठी परंपरेशी आणि तीमार्फत भारतीय परंपरेशी या ना त्या रूपात संलग्न होणे अपरिहार्य आहे. अरुण कांबळे यांनी मांडलेले संतसाहित्यविषयक विचारही परंपरेच्या व्यापक संदर्भातच लक्षात घेतले पाहिजेत. संतांवर टीका करूनही त्यांना संतकर्तृत्व मान्य करावे लागले आहे. परंपरा आणि साहित्य यांचे लागेबांधे प्राचार्य चिटणीसांनी आपल्या मुलाखतीतून स्पष्ट केले आहेत. दलित साहित्यात आज परंपराविद्रोह खदखदत असला तरी हे साहित्य मराठी साहित्याशी, भाषेशी या ना त्या प्रकारे जिव्हाळ्याने अनुबंधित राहणे अटळ आहे. म्हणूनच दलित साहित्य आणि निग्रो साहित्य यांची तुलना ताणण्यात अर्थ नाही. दलित लेखक काही वेळा ही तुलना करतात, म्हणून हे सुचवावेसे वाटते.

दलित साहित्यचर्चेच्या अनुरोधाने उपस्थित झालेला आणखी एक प्रश्न म्हणजे दलितलेखकांची स्वतंत्र साहित्यशास्त्राची मागणी, दलितांचे संवेदनाविश्व दलितेतर संवेदनाविश्वाहून अनेक बाबतींत वेगळे असल्यामुळे या संवेदनाविश्वाची आकलन आस्वादन वा मूल्यमापन प्रचलित साहित्यशास्त्राच्या आधारे करता येणार नाही, असा काही दलित लेखकांचा आग्रह असतो. प्रस्तुत संग्रहातील मुलाखतींतून

तो प्रकटही झाला आहे. या अनुषंगाने सौंदर्यशास्त्र स्थिर असते की परिवर्तनात्मक? ते परिवर्तनशील असेल तर ते केव्हा आणि कोणत्या परिस्थितीत बदलते ? यासारखे प्रश्नही येथे चर्चिले गेले आहेत. सौंदर्यसंवेदनेत बऱ्याच प्रमाणात देश-कालपरिस्थितिसापेक्षता असते आणि कालौघात आशय-अभिव्यक्तीचे स्वरूप बदलते, त्या त्या साहित्याच्या अवलोकनाला त्या त्या साहित्याचे डोळे आणि कान वापरले पाहिजेत, हे मान्य केले तरी प्रचलित दलित साहित्याच्या आकलन-आस्वादनाला प्रचलित मराठी साहित्यशास्त्रीय मानदंड अपुरे पडतात का ? हा प्रश्न आहे. या संदर्भात प्रा. रा. भि. जोशी यांच्या मुलाखतीत बराच उहापोह आला आहे. 'दलित साहित्याला वेगळे निकष लावण्याइतके प्रचलित साहित्याहून ते भिन्न झालेले नाही.' हे त्यांचे म्हणणे सयुक्तिक वाटते. दलित साहित्य हरिभाऊ, प्रेमचंदांच्या वास्तववादी परंपरेत बसण्यासारखे आहे. हा मुक्तिबोधांचा मुद्दाही या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. वेगळ्या साहित्यशास्त्राचा मुद्दा तूर्त बाजूला ठेवावा, असा सल्ला प्राचार्य चिटणीसांनीही दिला आहे.

दलितांना दलितेतर अनुभवविश्वात कितपत रस आहे, असाही एक प्रश्न विचारला गेलेला होता; रस आहे पण दलित अनुभवांना अग्रक्रम द्यावासा वाटतो, हे त्यांचे याबाबतचे म्हणणे योग्य आहे. विविध विषयांप्रमाणे विविध वाङ्मय-प्रकारांबद्दल, दलितेतर साहित्याबद्दल आस्था असल्याचेही बहुतेक दलित लेखकांनी मान्य केले आहे. ही प्रक्रिया लक्षात घेता, दलित आणि दलितेतर साहित्यविश्व नजीकच्या काळात परस्परांना जवळ येण्याची शक्यता फार दूर नाही असे वाटू लागते.

या संग्रहातील दलित साहित्य चर्चेच्या निमित्ताने दलित क्षेत्रातील काही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांनाही स्पर्श झाला आहे; तो दलित साहित्य विचाराला प्रत्यक्ष-प्रत्यक्षपणे हातभार लावणाराच आहे. दलितांचे आर्थिक प्रश्न निकडीचे आहेतच, पण ते सुटल्याने दलित समस्या दूर होईलच असे नाही; असाच सर्वांचा सूर दिसतो. दलित-दलितांतील छेदभेद हा असाच आणखी एक प्रश्न. या प्रश्नाचा विचार करताना, छेदभेदाची वस्तुस्थिती सर्वच मान्य करतात, पण नेमकी उपाययोजना सुचवू शकत नाहीत. या दृष्टीने मुक्तिबोधांनी आपल्या मुलाखतीत दलित लेखकांना त्यांच्या जबाबदारीची जी जाणीव करून दिली आहे, ती उद्बोधक आहे. भारतीय जीवनातील आजच्या, निर्नायकीचा, वैचारिक वंध्यत्वाचा विधायक दृष्टिकोणाच्या अभावाचा परिणाम दलित विश्वावरही स्वाभाविकपणेच झालेला आहे; त्यामुळे प्रश्न जाणवतो, पण उत्तर सुचत नाही. अशी स्थिती अनुभवास येते. प्रस्तुत संग्रहातील मुलाखतींत प्रादुर्भूत झालेल्या काही प्रश्नांबद्दलही असेच म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत उत्तर सुचले नाही तरी स्वतःला व

संबोधिताना सातत्याने प्रश्न विचारीत राहणे वेडंवाकडेपणाने का होईना पण छेडीत राहणे एवढेच शक्य असते व आवश्यकही. ती आवश्यकता पूर्ण करण्याचा अल्प-स्वल्प प्रयत्न मुलाखतीच्या प्रस्तुत संग्रहात आढळेल. मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीला विविध मर्यादांमुळे मुलाखत देणाऱ्या या साऱ्या महाभागांची भूमिका योग्य प्रकारे किंवा पुरेशा सामर्थ्याने येथे प्रगट न झाल्याचीही शक्यता आहे, ती मान्य करूनच येथील या उपक्रमाकडे पाहिले पाहिजे. या दिशेने आणखी कोणी प्रयत्नशील झाल्यास ते हवेच आहे. या मुलाखतीतील सर्वच उत्तरे सर्वांना सारख्याच प्रमाणात रुचतील वा पटतील, पटावीत अशी अपेक्षा नाही. येथे प्रश्नांची दिशा चुकल्यामुळे उत्तराची दिशाही भलतीकडे गेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

हे सारे गृहीत धरूनच प्रस्तुत संग्रहातील प्रश्नोत्तरांचा विचार व्हावयास हवा. यातून दलित साहित्य विचाराला अल्पस्वल्प प्रमाणात जरी चालना मिळाली तरी हा खटाटोप सफल झाला, असे म्हणता येईल.

--गो. म. कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९५३
ना. क्र. ३२०२९
निबंध/टीका/लेख
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# परिशिष्ट : प्रश्नावली

प्र. १ : ' दलित जाणीव ' म्हणजे काय ?

(अ) समाजवादी, साम्यवादी जाणिवांहून ती वेगळी ? समतेचा आशय असलेल्या सर्वच जाणिवांहून वेगळी ? सर्व शोषित तीत अंतर्भूत होतात की नाही ?

(ब) ही जाणीव फक्त वर्णाश्रमविरोधी आहे काय ? दलितत्वाचा व्यापक अर्थ का घ्यावयाचा नाही ?

प्र. २ : (अ) दलित साहित्याला वेगळे निकष लावावेत ?

(ब) वेगळं असं साहित्यशास्त्र असतं ?

(क) या संदर्भात ' दलितत्वा 'चा काय अर्थ घ्यावयाचा ?–अपूर्वत्व ? –श्रेष्ठत्व ?

(ड) मानववंशप्रवण समाजशास्त्रीय (सोशल ॲन्थ्रापॉलॉजिकल) दृष्टिकोण दलित साहित्याच्या आकलन–आस्वादाला आवश्यक आहे काय ? हा दृष्टिकोण न स्वीकारताही दलित साहित्याचा आस्वाद घेता येणार नाही का ?

प्र. ३ : दलित साहित्यामधील खालील आक्षेपांबाबत तुमचं म्हणणं ? –प्रचारकी आहे– एकसूरी वाटतं– व्यक्तिगत नाही–फक्त समूह येतो– आक्रस्ताळं आहे– नकारात्मक आहे–

प्र. ४ : (अ) दलित जाणीव कायम निरंतर राहणारी !

(ब) तसं असल्यास जातिसंस्था बदलत गेल्यावर काय ?

(क) दलित अस्मिता ठेवणं यात मतलबी हितसंबंध (vested interest) गुंतलेले नाहीत काय ?

प्र. ५ : ' शहरी दलित साहित्य ' आणि ' ग्रामीण दलित साहित्य ' असे प्रकार–भेद कल्पिणं आवश्यक वाटतं ?

प्र. ६ : तुम्ही कोणता वाङ्मयप्रकार हाताळता ?

(अ) कविता (ब) कथा (क) आत्मचरित्र (ड) कादंबरी (इ) इतर, विशिष्ट वाङ्मयप्रकार निवडण्याची कारणं ?

प्र. ७ : तुमच्या साहित्यात भर कशावर– (अ) स्वानुभव ? (ब) कल्पना ?

(क) जीवनार्थाचं स्पष्टीकरण ?

प्र. ८ : (अ) इतर जातींचं चित्रण करावंसं वाटतं किंवा नाही ?

(ब) दलितेतर अनुभव भावतात किंवा नाही ?

प्र. ९ : तुमचे दलितेतर साहित्याशी नातं ?

प्र. १० : दलित साहित्याचा मराठी साहित्यावर कोणता परिणाम झाला ?

[वरील प्रश्न दिग्दर्शनार्थ आहेत. ते याच क्रमानं आणि याच पद्धतीने विचारले गेलेलेच आहेत, असं नाही. प्रसंगोपात काही प्रश्न गाळलेलेही आहेत.]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९५३
दा. क्र.
निबंध
ग्रंथ शाखा (स्थळ
REFBK-0024921

प्रा. म. भि. चिटणीस
बंधुमाधव मोडक
बाबूराव बागुल
दया पवार
प्रा. केशव मेश्राम
वामन निंबाळकर
डॉ. गंगाधर पानतावणे
माधव कोंडविलकर
प्रा. अरुण कांबळे
नारायण सुर्वे
प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध
प्रा. रा. भि. जोशी
वसंत पळशीकर
डॉ. भालचंद्र नेमाडे
डॉ. अनिल अवचट
डॉ. गो. मा. पवार
डॉ. आनंद यादव
प्रा. या. वा. वडस्कर
प्रा. गो. म. कुलकर्णी

ह्यांच्या दलित साहित्याच्या प्रवाहावरील प्रतिक्रिया– मुलाखत स्वरूपात.

---

प्रतिमा प्रकाशन